**(सभापतीस्थानी माननीय उपसभापती )**

**<u>अर्धातास चर्चा</u>**

**पृ. शी.** : ठाणे जिल्हयातील डोंबिवली(प) येथील ज्ञानमंदिर प्राथमिक शाळेतील शिक्षिकेने डी.एड. पूर्ण करुनही शासनाची वेतनश्रेणी लागू न करणे

**मु. शी.** : ठाणे जिल्हयातील डोंबिवली(प) येथील ज्ञानमंदिर प्राथमिक शाळेतील शिक्षिकेने डी.एड. पूर्ण करुनही शासनाची वेतनश्रेणी लागू न करणे यासंबंधी सन्मानीय सदस्य श्री. अरवंद सावंत यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

श्री. अरविंद सावंत ( मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये पुढील विषयावर अर्धा-तास चर्चा उपस्थित करतो :-

"राज्य शासनाने अप्रशिक्षित शिक्षकांना प्रशिक्षित करण्याची योजना राबविणे, ठाणे जिल्ह्यातील डोंबिवली (प) येथील ज्ञानमंदिर प्राथमिक शाळेतील श्रीमती. संगिता श. सावंत या शिक्षिकेने त्या योजनेचा लाभ घेऊन सन २००२ मध्ये डी.एड पूर्ण करणे, सदर शिक्षिकेने सन २००२ मध्ये डी.एड.पूर्ण करून वैयक्तिक मंजुरीसाठी प्रस्ताव प्रशासन अधिकारी, कल्याण डोंबिवली महापालिका शिक्षण मंडळ, कल्याण (प) यांच्याकडे पाठवून प्रस्तावास मंजुरी न देणे, सेवाज्येष्ठता यादीनुसार श्रीमती सावंत या शिक्षिकेच्या वय क्षमापनाच्या प्रस्तावास दिनांक ६ फेब्रुवारी, २००४ रोजी विभागीय शिक्षण उपसंचालक, नाशिक विभाग यांच्याकडून मंजुरी मिळूनही नंतर आलेल्या शिक्षकांच्या वय क्षमापनाच्या प्रस्तावाला वैयक्तिक मंजुरी देण्यात येणे, सदरहू शिक्षिका शासनाच्या सर्व अटी व शर्ती मध्ये बसत असतानांही उक्त शिक्षिकेला कनिष्ठ असलेल्या शिक्षिकेस वैयक्तिक मंजुरी देण्यात येणे, याप्रकरणी शिक्षण उपसंचालक, मुंबई विभाग, मुंबई यांनी दिनांक ३ ऑक्टोबर, २००७ रोजी सुनावणी घेऊन योग्य ते आदेश संस्थेला देऊनही त्यांचीदेखील पूर्तता न होणे, उक्त शिक्षिकेला सन २००२ पासून शासनाची वेतनश्रेणी लागू होण्यास होत असलेला विलंब, उपरोक्त शिक्षिके प्रमाणेच राज्यातील अनेक शिक्षकांनी डी.एड.पूर्ण करुनही त्यांना शासनाची वेतनश्रेणी लागू न होणे, परिणामी शिक्षकांमध्ये पसरलेला असंतोष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

...2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत ....

सभापती महोदय, मी अत्यंत जिव्हाळयाच्या विषयावर अर्धातास चर्चा उपस्थित केलेली असून ही वैयक्तिक बाब आहे परंतु संस्था कशा पिळवणूक करतात याचे उत्तम उदाहरण मी या ठिकाणी देणार आहे. ज्ञानमंदिर प्राथमिक शाळा, डोंबिवली, पश्चिम या शाळेच्याबद्दल 3 ऑक्टोबर 2007 रोजी सुनावणी झाली होती. श्रीमती संगिता सावंत, या शाळेत 5 ऑगस्ट 1985 पासून कार्यरत आहेत त्यावेळी त्या प्रशिक्षित नव्हत्या. दरम्यानच्या काळात शासनाने यासंदर्भात एक चांगली योजना आणली व जे कोणी अप्रशिक्षीत शिक्षक आहेत त्यांनी डी.एड. पूर्ण करावे अशा प्रकारची ही योजना होती त्याप्रमाणे त्यांनी डी.एड. पूर्ण केले. 1985 ते 1988 या कालावधीत ही प्राथमिक शाळा विनाअनुदानित होती . 1988 मध्ये ही शाळा अनुदानित झाली. या संदर्भात 9 एप्रिल रोजी या सभागृहात चर्चा झाली होती त्या चर्चेला माननीय शिक्षण मंत्र्यांनी उत्तर दिलेले होते. खरे म्हणजे शाळांना जेव्हा मान्यता मिळते तेव्हा शिक्षकांना देखील ताबडतोब मान्यता मिळते. त्या प्रमाणे त्यांना देखील मान्यता मिळाली होती. 1988 ते 2002 या कालावधीत श्रीमती सावंत हया सदर शाळेत शिक्षिका म्हणून 1500 रुपयावर काम करीत होत्या. सन 2002 मध्ये त्यांनी डी.एड. पूर्ण केल्यानंतर त्यांनी संस्थेला सांगितले की, मी आता प्रशिक्षित झालेली असून मला आता नियमित वेतनश्रेणीवर घेण्यात यावे असे सांगितले. तेव्हा त्यांच्याकडून 2002 पासून नियमित वेतनश्रेणीवर घेण्यात येईल, 1985 ते 2002 पर्यंतची वेतनश्रेणी मी मागणार नाही असे श्रीमती सावंत यांच्याकडून सक्तीने लिहून घेण्यात आले. चला निदान 2002 पासून तरी आपल्याला नियमित वेतनश्रेणीवर घेतले जात आहे म्हणून या शिक्षिकेने 2002 मध्ये लिहून दिले. आता 2008 साल सुरु असूनही या शिक्षिकेला 1500 रुपये एवढेच वेतन दिले जात आहे. दरम्यानच्या काळात शाळेने विभागाकडे जे प्रस्ताव पाठविले होते त्यामध्ये श्रीमती सुदर्शना शिरोडे आणि श्रीमती संगिता सावंत या दोन्ही शिक्षिकेचाही प्रस्ताव शाळेने पाठविला होता. खरे तर श्रीमती शिरोडे ही शिक्षिका या संस्थेच्या दुस-या शाळेत काम करीत होती. परंतु असे असतांनाही त्यांना मात्र त्याच वेळी मान्यता मिळाली. या शिक्षिकेला कशी काय मान्यता मिळाली हे मंत्रीमहोदयांनी आपल्याच अधिका-यांना विचारले तर बरे होईल. अजून एक घटना झालेली आहे. श्रीमती अरुणा येवले

...3





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत....

आणि श्री. उध्दव वाणी या शिक्षकांना वैयक्तिक मंजुरी देण्यात आलेली आहे. त्यानंतर त्यांचा वयक्तिक क्षमापनाचा प्रस्ताव देखील पाठविण्यात आला होता. उपरोक्त दोन्ही शिक्षक हे सेवा ज्येष्ठता यादीनुसार श्रीमती सावंत यांच्या नंतरचे असतांना सुध्दा त्यांना मंजुरी देण्यात आलेली आहे. एखाद्या शिक्षकाला किती टार्गेट करायचे याला सुध्दा काही मर्यादा असतात. म्हणून मी या ठिकाणी हा विषय अर्धा तास चर्चेच्या निमित्ताने उपस्थित केलेला आहे. या अर्धा तास चर्चेच्या माध्यमातून मला माननीय मंत्रीमहोदयांना विनंती करावयाची आहे की, हे काही मोठे काम नाही. माननीय मंत्रीमहोदयांनी जे आदेश दिलेले आहेत ते आदेश ही संस्था मानत नाही त्यामुळे आपले आदेश न मानण्याच्या मागे कोणते अधिकारी आहेत ? या संस्थांना कोणत्या अधिका-यांपासून संरक्षण मिळत आहे? याचीही माहिती या ठिकाणी माननीय मंत्रीमहोदयांनी देण्याची आवश्यकता आहे. त्यामुळे माझी मागणी आहे की, आपण दिलेल्या निदेशानुसार श्रीमती सावंत यांना 2002 पासून नियमित सेवेत घेऊन नियमित वेतनश्रेणी द्यावी अशी विनंती करतो व ज्या अधिका-यांनी त्रास दिला त्यांच्यावर कारवाई करुन संबधित संस्थेला कडक शब्दात सुनावण्याची आवश्यकता आहे व त्या प्रमाणे आपण योग्य ती कारवाई कराल अशी अपेक्षा बाळगून मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

--------

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.हसन मुश्रीफ ( शालेय शिक्षण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत यांनी एका शिक्षिकेवर झालेल्या अन्यायाबाबतची अर्धा तास चर्चा उपस्थित केलेली आहे. एखाद्या संस्थेने एखाद्या शिक्षिकेच्या जीवनाशी किती खेळ खेळावयाचा याचे हे एक उत्कृष्ट उदाहरण डोंबिवली पश्चिम येथील ज्ञान मंदिर प्राथमिक शाळेत घडले आहे. त्याचबरोबर सुशिक्षित असूनही एखाद्याच्या मागे मेंढरासारखे किती जावयाचे हे देखील या शिक्षिकेने दाखवून दिलेले आहे. सभापती महोदय, दिनांक 5.8.1985 रोजी अप्रशिक्षित शिक्षिका म्हणून श्रीमती सावंत यांची या संस्थेत नेमणूक करण्यात आली होती . मान्य पदा पेक्षा हे पद जास्त होते तरी सुध्दा या महिलेने ही नेमणूक स्वीकारली आहे. 2001 सालापर्यत अनट्रेन्ड शिक्षिका म्हणून जादा पदावर त्या काम करीत होत्या . हे पद जादा असल्यामुळे 1985 पासून 2001 पर्यत त्यांच्या पदाला मान्यता दिली गेली नव्हती. त्याचप्रमाणे या संस्थेने देखील त्यासंबंधीचा प्रस्ताव पाठविला नव्हता. जे सेवेमध्ये आहेत त्यांना पत्राव्दारे डी.एड.चा कोर्स करता येईल असा निर्णय 2002 साली शासनाने घेतला होता. त्याप्रमाणे या शिक्षिकेने डी.एड.ची अर्हता प्राप्त केली होती . 2002-2003 मध्ये या संस्थेतील दोन शिक्षक सेवानिवृत्त झाल्यामुळे दोन पदे रिक्त झाली होती. श्रीमती सावंत आणि श्रीमती शिरोडे यांचा उल्लेख मघाशी सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत यांनी केला होता. त्यापैकी श्रीमती शिरोडे या दुस-या शाळेत होत्या परंतु त्यांची नियुक्ती या शाळेमध्ये करण्यात आली होती. श्रीमती शिरोडे या वयोमर्यादेत बसत होत्या त्यामुळे त्यांना मान्यता मिळाली परंतु श्रीमती सावंत वयोमर्यादेत बसत नव्हत्या म्हणून त्यांना मान्यता मिळाली नाही. त्यावेळी श्रीमती सावंत यांचे वय 47 वर्षाचे झाले होते. .त्यानंतर डेप्युटी डायरेक्टरानी 2003 मध्ये वय क्षमापनाचा प्रस्ताव दिला होता.दिनांक 9.2.2004 ला वय क्षमापनाच्या प्रस्तावाला डेप्युटी डायरेक्टर, नाशिक यांनी मंजुरी दिली होती . एक वर्षासाठी ही मान्यता देण्यात आली होती. उप संचालकांनी वय क्षमापित केले म्हणून शिक्षणाधिकारी व प्रशासन अधिकारी, डोंबिवली यांनी 2002-2003 या एकाच वर्षासाठी त्या पदाला मान्यता दिली. 2003 साली या शाळेतील अकरा पदांना मान्यता देण्यात आली होती. 2003-2004 या एका वर्षासाठी या शिक्षिकेच्या पदाला मान्यता दिल्यानंतर या शिक्षिकेचे दुर्देव असे आहे की, पाचवी आणि सहावीच्या वर्गातील पटसंख्या कमी झाल्यामुळे दोन तुकडया कमी झाल्या होत्या.अशा वेळी जे कनिष्ठ असतात त्यांना कमी केले जाते. त्यानुसार श्रीमती शिरोडे आणि श्रीमती सावंत या दोघींनाही कमी करण्यात आले होते.या शाळेत 11 पदे मंजूर होती.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

त्यानंतर दोन जण सेवानिवृत्त झाले होते. तोपर्यंत विद्यार्थ्याची पटसंख्या कमी झाल्यामुळे या दोन शिक्षिका कमी झाल्या होत्या त्या शाळेतील विद्यार्थ्याची संख्या न वाढल्यामुळे शिक्षकांची सख्या 9 झाली होती. दरम्यान या संस्थेची दुसरी एक कायम विना अनुदानित शाळा डोंबिवली पूर्व येथे आहे उप संचालकांनी असे सांगितले की, या शाळेमध्ये त्या शिक्षिकेला कायम वेतनश्रेणीवर घेण्यात यावे. तेव्हा या संस्थेने असे सागितले की, "त्यांना या शाळेत कायम वेतनश्रेणीवर घेणे आम्हाला परवडत नसल्यामुळे त्यांना शिक्षण सेविका म्हणून आम्ही घेत आहोत." 48 वर्ष वय झाल्यानंतर शिक्षण सेविका म्हणून काम करण्यास त्यांनी नकार दिला आहे. त्याची तीन वर्षेच सेवा राहिलेली आहे त्यामुळे यातून एकच मार्ग दिसत आहे. या शाळेने असा प्रस्ताव दिला आहे की, पूर्वेची शाळा पश्चिमेला जोडण्यात यावी त्यामुळे तुकडया वाढतील. अशा प्रकारे स्थलांतरणाचा प्रस्ताव शाळेने दिला आहे. तेव्हा या प्रस्तावाचा निश्चितपणे शासन विचार करणार आहे त्यामुळे या शाळेतील तुकडया वाढतील. गेल्या दोन तीन वर्षापासून तुकडया बंद झालेल्या आहेत त्यामुळे या तुकडया पुन्हा टप्पे अनुदानावर सुरु होतील. या शिक्षिकेला पूर्ण वेतनश्रेणीवर घेण्यास शासन या संस्थेला भाग पाडणार आहे त्याचबरोबर या शिक्षिकेची आयुष्यभर या संस्थेने थट्टा केलेली आहे त्यामुळे त्या संस्थेवर कारवाई करण्यात येणार आहे.

**उपसभापती** : या अटीवरच स्थलांतराचा प्रस्ताव मंजूर करण्यात यावा.

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, या अटीवरच त्यांना स्थलांतरणाची मंजुरी देण्यात येईल. त्याचप्रमाणे या शिक्षिकेला पूर्ण वेळ कसे घेता येईल आणि पूर्ण पगार कसा देता येईल याची देखील निश्चितपणे खबरदारी घेण्यात येईल.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत यांनी एका शिक्षिकेचा प्रश्न मांडलेला आहे. त्याबाबत माननीय मंत्री महोदयांनी उत्तर देतांना मान्य केलेले आहे की, संबंधित शिक्षिका 1985 सालापासून सेवेत आहेत. या शिक्षिका अप्रशिक्षित असल्याने 2002 मध्ये त्यांनी डी.एड.चे प्रशिक्षण पूर्ण केले आहे. शासनाच्या प्रचलित नियमानुसार पत्राव्दारे डी.एड.चा अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी कोणाला परवानगी दिली जाते ? ज्या शिक्षकाची नियमित सेवा आहे, ज्या शिक्षकाला नियमित शिक्षक म्हणून मान्यता दिली आहे त्यांना डी.एड.चा अभ्यासक्रम पत्राव्दारे करण्याची परवानगी दिली जाते. या प्रकरणी विभागाने जरी मान्यता दिलेली



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नसली तरी त्या नियमित शिक्षिका होत्या म्हणूनच एस.ई.आर.टी.ने त्यांना डी.एड.चे प्रशिक्षण पत्राव्दारे घेण्याकरिता मान्यता दिली आहे. अन्यथा त्यांनी परवानगी दिली नसती . त्यांना परवानगी दिली आहे याचा अर्थ असा आहे की, या शिक्षिका कायम आहेत हे आपण मान्यच केलेले आहे. ज्यावळी अनुदान तत्वावर या पदाला मान्यता देण्याचा प्रश्न निर्माण झाला होता त्यावेळी दुस-या शिक्षिकेला मान्यता दिली गेली आणि श्रीमती सावंत यांना मान्यता दिली गेली नाही. ज्यावेळी मान्यता देण्याचा प्रश्न आला होता त्यावेळी वयाची अडचण निर्माण झाली . माध्यमिक शाळेमध्ये वयाची अट नाही परंतु प्राथमिक शाळेमध्ये मात्र वयाची अट आहे. परंतु त्यांचे वय जास्त असल्यामुळे डेप्युटी डायरेक्टरांना वय क्षमापित करता येते. वय क्षमापन करण्यासबंधीचा प्रस्ताव देखील कोणाचा पाठविता येतो ? तर जो शिक्षक नियमित आहे, ज्याची नियमित पदासाठी नेमणूक झालेली आहे अशाच शिक्षकाच्या बाबतीत वय क्षमापित करण्यासंबंधीचा प्रस्ताव पाठविता येतो.

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मोते ....

या सगळ्या गोष्टी विचारात घेता आणि आता आपण जे सांगितले आहे त्या म्हणण्यानुसार त्या तुकड्या कमी झाल्या, विद्यार्थी संख्या कमी झाली. शिक्षकांची पदे त्यामुळे कमी झाली म्हणून त्यांना सामावून घेता येणार नाही असे जे आपले म्हणणे आहे ते बरोबर वाटत नाही. या शिक्षिकेची तेथे 1985 पासून सेवा झालेली आहे आणि त्या शिक्षिकेने पत्रव्यवहाराने डीएड पूर्ण केलेले आहे. तेव्हा आता त्या शाळेमध्ये जरी जागा नसली तरी विशेष बाब म्हणून या शिक्षिकेच्या संपूर्ण सेवेचा विचार करता या शिक्षिकेला अतिरिक्त शिक्षक म्हणून 2002 पासून सामावून आपण घेणार का ?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, अतिरिक्त झाल्यानंतर समायोजन हे कायम सेवेत असलेल्यांना करता येते ...

**उपसभापती** : तरी देखील मी आपल्याला विनंती करीन की, सन्माननीय सदस्यांनी सांगितलेली बाब आपण तपासून घ्यावी, तसे करता येते किंवा काय हे पहावे, सकारात्मक दृष्टिकोन त्यांच्यासंबंधात आपण ठेवावा.

श्री. हसन मुश्रीफ : ठीक आहे. ही बाब तपासून घेण्यात येईल. सभापती महोदय, शासनाची या शिक्षिकेच्या संबंधात पूर्णत: सहानुभूतीच राहील. किंबहुना त्यांची राहिलेली जी वर्षे आहेत त्यामध्ये तरी त्यांना चांगला पगार मिळावा ही आमचीही इच्छा आहे.

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, कोणत्याही शाळेत या शिक्षिकेला सामावून घेतले तरी आमचे काही म्हणणे नाही.

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, तसे करता येईल किंवा काय ते पाहून घेण्यात येईल.

***

..... सी 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : मु.पो. माळेगाव-मानखेड (जि.अमरावती) येथे श्री.गोविंद प्रभू ग्रामीण विकास संस्था यांना पशुपैदास व दुग्धविकास प्रकल्प सुरू करण्यास मंजुरी देण्यात येणे.

**मु.शी.** : मु.पो. माळेगाव-मानखेड (जि.अमरावती) येथे श्री.गोविंद प्रभू ग्रामीण विकास संस्था यांना पशुपैदास व दुग्धविकास प्रकल्प सुरू करण्यास मंजुरी देण्यात येणे या विषयावरील ता.प्र.क्र. 40628 ला दिनांक 4 एप्रिल 2008 रोजी शासनाने दिलेल्या उत्तराच्या संदर्भात श्री.जगदीश गुप्ता वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

श्री. जगदीश गुप्ता (अमरावती स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, "मु.पो. माळेगाव-मानखेड (जि.अमरावती) येथे श्री.गोविंद प्रभू ग्रामीण विकास संस्था यांना पशुपैदास व दुग्धविकास प्रकल्प सुरू करण्यास मंजुरी देण्यात येणे " या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक 40628 ला दिनांक 4 एप्रिल 2008 रोजी शासनाने दिलेल्या उत्तराच्या संदर्भात मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये ही अर्धा-तास चर्चा उपस्थित करीत आहे.

सभापती महोदय, पात्र पॅकेजमधील जे जिल्हे आहेत त्यात अमरावती हा एक जिल्हा आहे आणि ही अतिशय आवश्यकतापूर्ण योजना आहे या संस्थेने अतिशय कष्टाने ती आणली आहे. दुर्दैवाने आणि अधिकाऱ्यांच्या अट्टाहासाने ती योजना आज अमरावतीतून जात आहे काय असा प्रश्न निर्माण झालेला आहे. सभापती महोदय, सदर प्रकल्पाच्या कामाला सुरूवात का करण्यात आली नाही असे विचारले होते त्यावेळी सांगितले गेले की, 12 नोव्हेंबरला केंद्र सरकारचे पत्र आले आणि त्या पत्राद्वारा संस्थेचे नाव बदलले म्हणून ही योजना रद्द करीत आहे असे कळविले गेले आहे. सभापती महोदय, माझ्याकडे केंद्र सरकारच्या त्या पत्राची प्रत आहे. त्यातील महत्त्वाचा मजकूर मी येथे आपल्या माहितीसाठी वाचून दाखवितो. त्यात असे म्हटले आहे की, "It is regretted that DRDA, Amravati has not acted in a manner which is transparent, vigilant and sincere." म्हणजे यातील हे एकच वाक्य महत्त्वाचे आहे. डीआरडीएने योग्य प्रकारे कारवाई न केल्यामुळे 2 कोटी रूपये पाठविले होते ते परत करा. याचा अर्थ असा आहे की, त्या संस्थेची काही यात चूक नाही. खरे तर यातून बीपीएल खालील 700

...... सी 3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जगदीश गुप्ता .....

लोकांना फायदा मिळणार आहे. परंतु हा प्रकल्प जो मंजूर झाला तेव्हा त्यासाठी जो अर्ज केला होता तो वेगळ्या नावाने केला होता आणि त्यानंतर केंद्र सरकारच्या मंजुरीने त्यात बदल घडविण्यात आलेला आहे. सभापती महोदय, केंद्र सरकारने ज्या नावाने हा प्रकल्प फायनल केला आणि मान्यता दिली त्याच नावाने संस्था कार्यरत आहे. केवळ 4 महिने पर्यंत डीआरडीएचे अधिकारी आहेत त्यांनी याबाबत पत्रव्यवहार केला. सभापती महोदय, या प्रकल्पात असे होते की, जॉईंट व्हेन्चर म्हणून ॲग्रीमेंट व्हायला पाहिजे होते. परंतु ही जागा डीआरडीएच्या नावाने खरेदी केली आणि डीआरडीएच्या समितीची मान्यतादेखील घेतलेली नाही. सभापती महोदय, सर्व प्रकल्प होत असताना आम्हाला किती टक्के मिळणार असे अधिकाऱ्यांकडून संस्थेला विचारण्यात आले. तेव्हा संस्थेने सांगितले की, आम्ही काहीही देणार नाही आणि तेव्हा पासून या संस्थेवर अन्याय सुरू झाला. यातून बीपीएल खालील 700 लोकांना फायदा होणार होता, त्या 700 लोकांवर त्यामुळे अन्याय झालेला आहे. ...

( यानंतर सौ.रणदिवे.... डी 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जगदीश गुप्ता . . . .

माझ्याजवळ सर्व कागदपत्रे आहेत. माझी मागणी एकच आहे की, या संस्थेला रॉंग बॉक्समध्ये उभे केलेले आहे. याबाबत तक्रारी झाल्या. जिल्हा परिषद अध्यक्षांनी तक्रार केली की, ही संस्था बोगस आहे. मग आयुक्तांच्या माध्यमातून चौकशी करण्यात आली. माझ्या हातामध्ये या चौकशीचा अहवाल देखील आहे. त्यामध्ये त्यांनी स्पष्टपणे म्हटलेले आहे की,"येथे कोणत्याही प्रकारची गडबड झालेली नाही, भ्रष्टाचार झालेला नाही." डी.आर.डी.ए.च्या माध्यमातून एक पैसा देखील मिळालेला नसताना संबंधितांनी मोठया प्रमाणात गैरव्यवहार केला ही बाब प्रेसमध्ये मॅनेज करुन प्रसिध्द करण्याचा प्रयत्न केला आहे. हा विषय फार मोठा आहे. सभापती महोदय, मला आपल्या माध्यमातून माननीय मंत्री महोदयांना दोन प्रश्न विचारावयाचे आहेत.या विषयाच्या संदर्भातील सर्व कागदपत्रे, केंद्राशी झ ालेला व्यवहार, प्रकल्प कोणत्या तारखेला मंजूर झाला,या सगळयाची नोंद आहे. माझा पहिला प्रश्न असा आहे की, या सर्व बाबींची चौकशी माननीय आयुक्तांच्या माध्यमातून 15 दिवसामध्ये पूर्ण करणार आहात काय ? माझा दुसरा प्रश्न असा आहे की, या प्रकल्पामध्ये एका अधिकाऱ्यामुळे जवळपास 700 बी.पी.एल.खालील लोकांवर अन्याय होत असेल तर त्या अधिकाऱ्यावर कोणती कारवाई करणार आहात ? याबाबतीत माननीय मंत्री महोदयांनी उत्तर द्यावे अशी माझी विनंती आहे.

----

. . . .डी-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रणजित कांबळे (ग्रामविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी ज्या पत्राचा उल्लेख केलेला आहे, ते मी पूर्ण पत्र वाचतो. सन्माननीय सदस्यांनी या पत्रातील केवळ तीनच वाक्ये वाचलेली आहेत. सन्माननीय सदस्यांनी असे वाचून दाखविले की, "It is regretted that DRDA, Amravati has not acted in a manner which is transparent, vigilant and sincere." परंतु त्यांनी या पत्रातील शेवटची ओळ वाचलेली नाही. त्यामध्ये असे म्हटलेले आहे की, "Therefore, it has been decided by the Ministry to close this project....."

श्री.जगदीश गुप्ता : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे.

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जो मुद्दा उपस्थित केला आहे, त्यासंदर्भात मी स्पष्टीकरण देत आहे. मग त्यांना याबाबतीत हरकतीचा मुद्दा कसा उपस्थित करता येईल ?

श्री.जगदीश गुप्ता : सभापती महोदय, मूळ प्रश्नामध्ये दुसऱ्या क्रमांकाच्या उत्तरामध्ये असे म्हटलेले आहे की,"प्रस्तुत प्रकल्पाच्या अंमलबजावणी करणाऱ्या स्वयंसेवी संस्थेमध्ये बदल झाल्याचे लक्षात आल्यामुळे ही बाब जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेने केंद्र शासन व राज्य शासनाच्या निदर्शनास आणून दिली." तसेच केंद्र शासनाने ही योजना सुमोटो रद्द केलेली आहे असा लेखी उत्तरामध्ये उल्लेख आहे. म्हणून मी पत्रातील जो भाग वाचून दाखविलेला आहे, त्यातून माननीय मंत्री महोदयांच्या एवढेच निदर्शनास आणले आहे की, केंद्र शासनाने सुमोटो नव्हेतर डी.आर.डी.ए.ने योग्य कारवाई केली नाही म्हणून हा प्रकार झालेला आहे.

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, हा डी.आर.डी.ए.चा स्पेशल प्रोजेक्ट आहे. तो प्रत्येक जिल्हयातील एका एन.जी.ओ.संस्थेला दिलेला आहे. या स्पेशल प्रोजेक्टसाठी जवळपास किमान 10 कोटी रुपयांचा निधी केंद्र शासन देते. सन्माननीय सदस्यांनी पत्रातील थोडासा भाग वाचून दाखविला आहे.म्हणून मी या पत्रातील शेवटचा भाग वाचून यासंदर्भात माहिती देत होतो. सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाचे उत्तर देत आहे.सन्माननीय सदस्यांनी पत्राच्या संदर्भात पहिला प्रश्न उपस्थित केलेला आहे.मी याठिकाणी पूर्ण पत्र वाचून दाखवित आहे.या पत्रामध्ये शेवटी असे म्हटलेले आहे की,"Therefore,it has been decided by the Ministry to close this project and to advise the State Government to submit a de .....

. . . .डी-3



श्री.रणजित कांबळे . . . .

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

novo revised proposal for Amravati in the light of revised Guidelines as and when finalized.

State Government is, therefore, requested to refund the entire amount released as first installment of Central share within 15 days of the receipt of this letter."

श्री.जगदीश गुप्ता (खाली बसून) : माननीय मंत्री महोदयांनी दि.4 एप्रिल 2008 रोजी ता.प्र.क्र.40628 बाबत पहिल्या प्रश्नाला जे उत्तर दिलेले आहे, ते वाचावे.

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, मघाशी सन्माननीय सदस्यांनी पत्राचा उल्लेख केला आहे आणि मी त्याबाबत स्पष्टीकरण करीत आहे. मी अगोदर सांगितले की, एस.जी.एस.वाय.चा हा स्पेशल प्रोजेक्ट आहे आणि तो प्रत्येक जिल्हयातील एका संस्थेला राबविण्यासाठी दिलेला आहे. अमरावती जिल्हयात गोविंद प्रभू ग्रामीण युवा मंच विकास संस्थेने दि.4-2-2004 रोजी जिल्हा परिषदेला एक प्रस्ताव सादर केला होता. त्यामधून एकंदर 5700 लाभार्थींना लाभ मिळेल अशी योजना होती. यामध्ये कॅटल रेझिंग, कॅटल ब्रिडींग, रिसर्च, ट्रेनिंग सेंटर, मिल्क प्रोसेसिंग, डेअरी फार्म, कम्पोस्ट खत इ.बाबी आहेत. हा प्रस्ताव जवळपास 13 कोटी 90 लाख रुपयांचा होता. याबाबतीत अशी प्रोसीजर आहे की, अगोदर हा प्रस्ताव डी.आर.डी.ए.कडे येतो.

यानंतर कु.गायकवाड . . ..

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DVG/ KGS/ MMP/ प्रथम श्रीमती रणदिवे.. 09:50

श्री. रणजित कांबळे..

डीआरडीए राज्य शासनाकडे प्रस्ताव पाठविते व त्यानंतर त्याची स्क्रुटीनी करुन हे प्रस्ताव केंद्र शासनाकडे पाठविले जातात. स्कुटीनी करण्यासाठी केंद्र शासनाची एक वेगळी कमिटी आहे. या कमिटीमध्ये प्रस्तावांना मान्यता दिली जाते. मी आपणास एक गोष्ट सांगू इच्छितो की, या बाबतीत राज्य शासनाचा कोणताही रोल नाही. केवळ प्रस्ताव पाठविण्याचे काम राज्य शासन करीत असते. या प्रस्तावांना मान्यता द्यावयाची की नाही हे ठरविण्याचा संपूर्ण अधिकार केंद्र शासनाला आहे. राज्य शासनाने दिनांक 27.4.05 रोजी स्क्रुटीनी करुन हा प्रस्ताव केंद्र शासनाकडे पाठविला होता. केंद्र शासनाने हा प्रस्ताव सन 2005 मध्ये परत पाठविला. एसजीएसवाय या योजनेच्या अंतर्गत सुरु करण्यात येणारा हा प्रकल्प नवीन किंवा फारसा विशेष नाही, असे केंद्र शासनाने कळविले. या कार्यक्रमाप्रमाणेच राज्यामध्ये सध्या इतर 5 कार्यक्रम सुरु आहेत. त्यामुळे केंद्र शासनाने त्यास परवानगी दिली नाही. गोविंद प्रभू ग्रामीण युवा विकास संस्था या नावावर हा प्रस्ताव पाठविण्यात आला होता. माझ्याकडे हे दोन्ही प्रस्ताव आहेत. प्रोजेक्ट डायरेक्टर श्री. खाडे यांनी या प्रकल्पाचा कारभार पाहिला आहे. त्यांनीच या प्रोजेक्टच्या कामाची संपूर्ण प्रोसेस केली होती. तसेच श्री. नायक, अंडर सेक्रेटरी यांनी स्वत:च्या अधिकारावर.....

**उपसभापती** : सन्माननीय मंत्री महोदयांनी थोडक्यात उत्तर द्यावे.

श्री. रणजित कांबळे : या प्रश्नाकरिता मला तीन वेळा बोलविण्यात आले आहे त्यामुळे मला याबाबत सविस्तर उत्तर द्यावयाचे आहे. याबाबत कोणताही गैरसमज होऊ नये याकरिता मी सविस्तर उत्तर देणार आहे.

सभापती महोदय, हा प्रोजेक्ट रिव्हाईज करण्यासाठी माननीय मंत्री महोदयांची व सचिवांची परवानगी घेतली होती व त्यासंदर्भात एक पत्र पाठविण्यात आले हेते. त्याबाबत पुन्हा एकदा विचार करु. तसेच श्री.खाडे, प्रोजेक्ट डायरेक्टर यांच्याकडे हा प्रस्ताव दिला होता. जुन्या प्रस्तावाला रिव्हाईज करण्यात येईल असे त्यामध्ये सांगितले होते. जुन्या प्रस्तावामध्ये काही कागदपत्रे काढून वेगळी कागदपत्रे घातली होती. हा बदल प्रोजेक्ट रिव्हाईज करणाऱ्या कमिटीच्या लक्षात आला नाही. त्यामुळे नवीन संस्था रजिस्टर झाली. यामध्ये मूळ अट अशी होती की, संस्था रजिस्टर

..2..

DVG/ KGS/ MMP/ प्रथम श्रीमती रणदिवे.. 09:50

श्री. रणजित कांबळे..

करण्यासाठी 5 वर्षाचा अनुभव असणे आवश्यक आहे. नवीन रजिस्टर झालेल्या संस्थेचे नाव गोविंद प्रभू ग्रामीण विकास संस्था असे देण्यात आले. संस्थेच्या रजिस्ट्रेशनची तारीखही वेगळी दाखविली आहे. जुन्या प्रस्तावाचा रिव्हयू झालेला आहे. त्यामध्ये काही बदल दाखविला आहे. ज्यावेळी आपण एखाद्या संस्थेची तपासणी करतो त्यावेळी त्या संस्थेच्या ऑडीटची पाहणी आवश्यक असते. या संस्थेची नोंदणी 2005 मध्ये झाली होती व त्याचे ऑडीट 2002 मध्ये करण्यात आले असल्याचे दाखविण्यात आले होते. तसेच या संस्थेकडे 1994 पासून वर्क एक्सपिरियन्स असल्याचे दाखविण्यात आले होते.

श्री. जगदीश गुप्ता : सभापती महोदय..

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, मला आता पूर्ण उत्तर देण्याची परवानगी द्यावी. मी सविस्तर उत्तर देण्याचा प्रयत्न करीत आहे.

यानंतर श्री. बरवड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जगदीश गुप्ता : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांनी सांगितले की, यामध्ये शासनाचे काही घेणे-देणे नाही आणि जी काही छाननी होते ती केंद्र सरकार करते.

**उपसभापती** : आज इतरही अर्धा-तास चर्चा आहेत. एका अर्धा-तास चर्चेमध्ये एवढा वेळ गेला तर बाकीच्या चर्चेसाठी वेळ मिळणार नाही.

श्री. जगदीश गुप्ता : सभापती महोदय, मी विनंती करतो. या संपूर्ण प्रकरणाची चौकशी विभागीय आयुक्तांच्या माध्यमातून 15 दिवसात करण्याचे निदेश आपण द्यावेत. तसे निदेश आपण दिले तर माझा विषय संपेल.

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, मी पुन्हा एकदा सांगू इच्छितो की, यामध्ये पोलीस केस झालेली आहे. याबाबत तक्रार झालेली आहे. याबाबत कोर्ट केस सुध्दा प्रलंबित आहे. केंद्र शासनाने हे रिजेक्ट केले असून त्यांनी पैसे परत मागितलेले आहेत. सन्माननीय सदस्य वारंवार उल्लेख करीत आहेत की, एका अधिकाऱ्याच्या चुकीमुळे हे झालेले आहे. यामध्ये अधिकाऱ्याची चूक नाही.

**उपसभापती** : हा विषय मी या ठिकाणी थांबवतो. यानंतर सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा घेण्यात येईल.

श्री. जगदीश गुप्ता : सभापती महोदय, हा माझ्यावर अन्याय आहे.

**उपसभापती** : आपल्यावर अन्याय होणार नाही. हा विषय आपण उद्या घेऊ.

श्री. जगदीश गुप्ता : सभापती महोदय, 15 दिवसामध्ये या संपूर्ण प्रकरणाची चौकशी विभागीय आयुक्तांच्या माध्यमातून झाली तर माझे समाधान होईल.

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, ही बाब सबज्युडिस आहे. ती संस्थाच कोर्टात गेलेली आहे. याबाबतीत पोलीस स्टेशनमध्ये एफ.आय.आर. दर्ज केलेला आहे. सन्माननीय सदस्य अधिकाऱ्यांच्या चौकशीबद्दल उल्लेख करीत आहेत. अधिकाऱ्यांनी काय केले आहे ? त्यांच्या निदर्शनास आले की, या संस्थेचा रजिस्ट्रेशन नंबर चुकीचा आहे. त्यांनी सर्व कागदपत्रे मागितली. त्यामध्ये त्यांच्या असे लक्षात आले की, दोन संस्था वेगळ्या आहेत, डायरेक्टर्स वेगळे आहेत आणि यामध्ये फार मोठा फ्रॉड झालेला आहे. त्यामुळे त्यांनी ॲक्शन घेतली आणि केंद्र शासनाच्या

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MMP/ KGS/

श्री. रणजित कांबळे .....

निदर्शनास आणले. जवळपास 10 कोटीची योजना आहे. ते चुकीच्या संस्थेला मिळणार होते म्हणून त्यांनी ते थांबवले.

श्री. जगदीश गुप्ता : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांनी सांगितले की, या पध्दतीचा कारभार सुरु आहे हे नंतर निदर्शनास आले. माझा एकच प्रश्न आहे. 4 महिनेपर्यंत संबंधित संस्थेशी पत्रव्यवहार झालेला आहे. संबंधित संस्थेची जागा डीआरडीएने परचेस केलेली आहे. ही सर्व कार्यवाही पाहता यामध्ये दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्यावर शासन कारवाई करणार काय ? 4 महिनेपर्यंत पत्रव्यवहार केलेला आहे तसेच त्यांनी जमीन खरेदी केली आहे.

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, खरा प्रश्न असा आहे की, तेव्हाचे जे प्रकल्प संचालक होते त्यांनी ते सगळे केलेले आहे. त्या प्रकल्प संचालकांची बदली झाल्यानंतर जे नवीन प्रकल्प संचालक आले त्यांच्या निदर्शनास आल्यानंतर त्यांनी हे केले. हा प्रस्ताव डीआरडीएमार्फत तेव्हाच्या प्रकल्प संचालकांनी तयार केला होता.

**उपसभापती** : ही अर्धा-तास चर्चा मी या ठिकाणी थांबवत आहे. याबाबत सन्माननीय सदस्यांनी लक्षवेधी सूचना द्यावी. ती लक्षवेधी सूचना उद्या घेण्यात येईल.

----

....3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : रायगड जिल्ह्यात शेतकऱ्यांना विश्वासात न घेता वेगवेगळ्या कंपन्यांकडून गॅस पाईपलाईन टाकण्यात येणे

**मु. शी.** : रायगड जिल्ह्यात शेतकऱ्यांना विश्वासात न घेता वेगवेगळ्या कंपन्यांकडून गॅस पाईपलाईन टाकण्यात येणे यासंबंधी श्री. जयंत प्र. पाटील, वि. प. स. यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

श्री. जयंत प्र. पाटील ( विधानसभेने निवडलेले ) सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये पुढील विषयावर अर्धा-तास चर्चा उपस्थित करतो :-

" रायगड जिल्ह्यात गेल इंडिया कंपनीची गॅस पाईप लाईन सुधागड तालुक्यातील भारजे गावापासून अलिबाग तालुक्यातील भाकरवड गावापर्यंत व आय.पी.सी.एल. कंपनीची (रिलायन्सची) उरण ते नागोठणापर्यंत जात असल्याने व संबंधित मौजे कोपरी, कुर्डुस, फणसापूर, सिमादेवी, नवखार, सांबरी इत्यादी गावातील शेतकऱ्यांना विश्वासात न घेतल्याने शेतकऱ्यांचा याबाबत विरोध निर्माण होणे, याच भागातून आय.पी.सी.एल. ची पूर्वी एक गॅस पाईपलाईन गेलेली असणे, सबब बहुतांश शेतकऱ्यांना जमीन कसण्यासाठी न राहणे, शेतकऱ्यांची जमीन जबरदस्तीने हस्तांतरित करण्याचा प्रयत्न झाल्याने शेतकऱ्यांमध्ये प्रचंड असंतोष निर्माण होणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची उपाययोजना."

सभापती महोदय, रायगड जिल्ह्यामध्ये गेल कंपनीच्या माध्यमातून वेगवेगळ्या कंपन्यांना गॅसचा पुरवठा करण्यासाठी पाईपलाईन टाकण्याचे काम जोरात चालू आहे. शरीरातील रक्तवाहिन्यांसारख्या गॅस पाईपलाईन आमच्या जिल्ह्यामध्ये आहेत. या सभागृहामध्ये मी अनेक वेळा हा प्रश्न मांडलेला आहे तसेच चर्चा उपस्थित केलेली आहे. ओ.एन.जी.सी. कंपनी तसेच गेल कंपनी त्या जिल्ह्यामध्ये किंवा त्या परिसरामध्ये किती प्रकल्प करणार आहे आणि त्यांना किती ठिकाणी गॅस पुरवावयाचा आहे याचा एकदा प्लॅन तयार केला पाहिजे. किती ठिकाणी आपल्याला

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MMP/ KGS/

श्री. जयंत प्र. पाटील .....

हा प्रकल्प न्यावयाचा आहे हे एकदाच त्यांनी ठरविले पाहिजे. मी सांगू इच्छितो की, दरवर्षी त्या परिसरामध्ये एक एक गॅस पाईपलाईन टाकण्याचे काम वेगवेगळ्या कंपन्यांकडून चालू आहे. त्या ठिकाणी गॅस पाईपलाईन टाकल्यानंतर अल्पदराने जमिनीची किंमत दिली जाते. पाईपलाईनच्या दोन्ही बाजूला 50 मीटरपर्यंत कोणतेही बांधकाम करण्यास किंवा स्ट्रक्चर उभे करण्यास परवानगी नाही. फक्त पाईपलाईन टाकण्यापुरत्या जमिनीच्या बाबतीत शेतकऱ्यांना पैसे दिले जातात. त्या ठिकाणी जे प्रकल्प आलेले आहेत त्यांना गॅस द्यावयास पाहिजे परंतु ज्या पध्दतीने एमआयडीसीची पाण्याची मोठी पाईपलाईन असते त्या पध्दतीने मोठी गॅस पाईपलाईन टाकून पुढच्या 25 वर्षात त्या भागामध्ये किती प्रकल्प येणार आहेत त्यादृष्टीने त्या ठिकाणी नियोजन केले पाहिजे.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील.....

एकच पाईप लाईन टाकून हा प्रश्न सुटणार नाही. माझा प्रामुख्याने असा आक्षेप आहे की, तेथील ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद आणि स्थानिक आमदारांना विश्वासात घेतले जात नाही. या लोकप्रतिनिधींना शासन विश्वासात घेणार आहे की नाही ? लोकप्रतिनिधींना विश्वासात न घेता पाईप लाईन टाकल्यामुळे असे प्रश्न निर्माण होतात. राज्य शासनाने भूसंपादनाच्या संदर्भात मदत करीत असताना एक नियोजनबध्द आराखडा तयार केला पाहिजे ही मागणी या अर्धा-तास चर्चेच्या निमित्ताने करीत आहे. त्याठिकाणी प्रकल्प येणार आहे, सन्माननीय मंत्री श्री.दिलीप वळसे-पाटील यांच्या खात्याची वीज येणार आहे, त्यासाठी गॅस लागणार आहे. सभापती महोदय, मी अतिरेकी मागणी करीत नाही किंवा टोकाची भूमिका घेऊन मागणी करीत नाही. शासनाला या कंपन्यांच्या संदर्भात नियोजनबध्द आराखडा करावा लागेल. शासनाने त्या कंपन्यांना तुमच्याकडे कशाप्रकारे नियोजन केले आहे त्याची विचारणा केली पाहिजे. तेथे त्या कंपन्यांचे अधिकारी येतात, ग्रामस्थांबरोबर इंग्रजीतून बोलतात, ते ग्रामस्थांना कळत नाही. मद्रासी टच असलेले त्यांचे इंग्रजी असते त्यामुळे ते समजत नाही. म्हणून या कंपन्यांनी शेतक-यांबरोबर वा स्थानिक लोकांबरोबर बोलताना किमान राजभाषेमध्ये बोलू शकणा-या अधिका-यांना नेमले पाहिजे. त्यासाठी शासनाने कायदा करावा अशी मी मागणी करतो. तेथे गेल या कंपनीने पाईप लाईन टाकली आहे. ही लाईन टाकत असताना त्यांनी विविध स्तरावरील लोकप्रतिनिधींचा सहभाग घ्यावा अशा सूचना त्यांना द्याव्यात अशी पुन्हा विनंती करतो आणि येथेच थांबतो.

------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

2....

श्री.राणा जगजितसिंह पाटील ( उद्योग राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी अर्धा-तास चर्चेच्या निमित्ताने ज्या सूचना केल्या आहेत त्या योग्यच वाटतात. गेल आणि आयपीसीएल या कंपन्यांनी पाईप लाईनचे स्ट्रक्चर सुरु केले आहे किंवा नेट वर्क उभे केले आहे. त्यासंदर्भात या कंपन्यांना इंटिग्रेटेड प्रोजेक्ट रिपोर्ट तयार करुन घेण्यासंबंधी सूचना देण्यात येतील...

श्री.दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य पाईप लाईनबद्दल बोलत आहेत. परंतु हाजीराहून उरणला येणारी पाईप लाईन कालपासून चार्ज झाली आहे आणि त्या लाईनमधून पहिल्यांदाच राज्यात गॅस आणला जात आहे. त्यामुळे कालपासून उरणच्या गॅस बेस प्रोजेक्टमधून अतिरिक्त वीज सुरु झाली आहे.

**उपसभापती** : सन्माननीय ऊर्जा मंत्री श्री.दिलीप वळसे-पाटील यांचे सर्वांनी अभिनंदन करावे.

श्री.राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, ही पाईप लाईन टाकत असताना ती 1.2 मीटर खोल टाकली जाते. त्यामुळे शेतक-यांच्या जमिनीचे खूप नुकसान होते असे नाही. गेल या कंपनीच्या माध्यमातून 4 तालुक्यांच्या 265 खातेदारांना साधारणपणे 96 लाखांची मदत करण्यात आली आहे, त्याला मी नुकसान भरपाई म्हणणार नाही. तसेच सुधागड तालुक्यातील 144 खातेदारांना 54 लाख रुपयांची नुकसान भरपाई देण्यात आलेली आहे. ही नुकसान भरपाई योग्य वाटत नसेल किंवा कमी वाटत असेल तर त्याबाबत बैठक घेता येईल.

नंतर श्री.शिगम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. राणा जगजितसिंह पाटील...)

तेथील लोकप्रतिनिधी, ग्रामस्थ आणि ग्रामपंचायत यांना विश्वासात घेऊन त्यांना प्लँनिंगच्या संदर्भात माहिती दिली जाईल. त्या कंपनीच्या अधिका-यांची भाषा समजत नसेल तर एखादा दुभाषी बरोबर ठेवावा असे देखील त्यांना सांगितले जाईल. तेथील स्थानिकांना विश्वासात घेऊन काम करावे अशा प्रकारच्या सूचना त्यांना देण्यात येतील.

श्री. जयंत प्र. पाटील : माननीय मंत्री महोदयांच्या उत्तराने माझे समाधान झालेले आहे. ही बैठक माननीय मंत्री महोदय केव्हा घेतील ?

श्री. राणा जगजितसिंह पाटील : मे 2008 मध्ये ही बैठक घेण्यात येईल.

----

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : शासकीय मुद्रणालयाचे आधुनिकीकरण करण्यासाठी करावयाची उपाययोजना

**मु. शी.** : शासकीय मुद्रणालयाचे आधुनिकीकरण करण्यासाठी करावयाची उपाययोजना यासंबंधी श्री.अरविंद सावंत, वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

श्री. अरविंद सावंत (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये पुढील विषयावर अर्धा-तास चर्चा उपस्थित करतो :-

"राज्य शासनाच्या अर्थसंकल्प व निरनिराळी पुसतके, लॉटरीची तिकिटे आदी सर्व शासनाच्या मालकीच्या आठ मुद्रणालयामध्ये छपाई करण्यात येणे, सदर शासकीय मुद्रणालये 20-40 वर्षची असून त्यातील छपाईची यंत्रणा अत्यंत जुनाट झल्याने शासनाच्या पुस्तकांची छपाई करणे तेथील कामगारांना अत्यंत कठीण जात असणे, शासकीय मुद्रणालयाचे आधुनिकीकरण करण्यासाठी, उपाययोजना सुचविण्यासाठी शासनाने एक समिती नेमणे, सदर समितीने आपला अहवाल माहे फेब्रुवारी, 2007 मध्ये शासनाला सादर करणे, त्यावर अद्याप कारवाई न होणे, शासकीय मुद्रणालयाच्या आधुनिकीकरणासाठी गेली कित्येक वर्षे मागणी करुनही आर्थिक तरतूद शासनाने न करणे, तेथील शेकडो कामगारांच्या रास्त व न्याय्य मागण्याही प्रलंबित असणे, सदर महत्वाच्या विषयावर तात्काळ निर्णय घेण्याची नितांत आवश्यकता."

सभापती महोदय, महाराष्ट्र राज्य शासनाची मुंबई, पुणे, नागपूर, संभाजीनगर इत्यादी 8 ठिकाणी शासकीय मुद्रणालये आहेत. शासनाच्या विविध भागांना लागणारी सर्व छपाईची कामे करुन देण्यासाठी या मुद्रणालयांची निर्मिती केली होती. या मुद्रणालयामध्ये शासन राज्यपत्रके, शासन निर्णय, अर्थसंकल्पीय अधिवेशनासह विधिमंडळाचे सर्व कामकाज, सांस्कृतिक कार्य, माहिती व जनसंपर्क विभागाची प्रकाशने, दिनदर्शिका, सोडत तिकिटे, प्रसिध्दी विषयक साहित्य, नकाशे, उच्च न्यायालयाची अपिले, भित्तिपत्रके इत्यादींची छापाई व रबरी शिक्के तयार केले जातात. या मुद्रणालयांना राष्ट्रीयस्तरावर उत्कृष्ट मुद्रण कामासाठी 71 पारितोषिके मिळालेली आहेत.

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. अरविंद सावंत...)

बाहेरच्या आधुनिक छपाई यंत्रणेला सामोरे जाऊन या मुद्रणालयांनी ही पारितोषिके मिळविलेली आहेत. दुर्दैवाने या सगळया मुद्रणालयांची यंत्रसामग्री जुनी आणि कालबाह्य झालेली आहे. 1991-92 या कालावधीत मुद्रणालयाच्या आधुनिकीकरणासाठी एक समिती नेमण्यात आली होती. या समितीने तत्कालीन मुद्रणतंत्रज्ञानाशी निगडित अशा शिफारशी केलेल्या होत्या. पण शासनाने त्यासाठी 33 कोटी रुपये मंजूर करुन केवळ 8 कोटी रुपये चार वर्षामध्ये टप्प्याटप्प्याने दिल्याने आधुनिकीकरण झाले नाही. त्यानंतर 2006मध्ये शासनाने या मुद्रणालयांच्या आधुनिकीकरणासाठी नव्याने समिती नेमली. या समितीने फेब्रुवारी 2007मध्ये शासनाला अहवाल सादर केला. या अहवालामध्ये समितीने या 8 मुद्रणालयांच्या आधुनिकीकरणासाठी 88 कोटीच्या यंत्रसामग्रीची शिफरशी केली होती. परंतु फक्त साडेचार कोटी रु.चा प्रस्ताव उद्योग विभागाने वित्त विभागाकडे पाठविल्याचे समजते. या अर्धा-तास चर्चेच्या निमित्ताने माझी एकच मागणी आहे की, या समितीने मुद्रणालयांच्या आधुनिकीकरणासाठी 88 कोटींची शिफारस केलेली आहे. ही शिफारस महत्वाची आहे. ही शिफारस मान्य करुन घेण्यासाठी माननीय मंत्री महोदय काय करणार आहेत ? आणखी दोन-तीन महत्वाच्या गोष्टी मी सांगू इच्छितो. या मुद्रणालयाकडून लॉटरीची तिकिटे छापली जात होती. त्या तिकिटांचा दर्जा उत्तम होता. पण लॉटरी तिकिटे छपाईचे हे काम खाजगी यंत्रणेकडे दिलेले आहे. तसेच शासनाच्या माहिती व जनसंपर्क विभागातर्फे लोकराज्य आणि अन्य प्रकाच्या प्रकाशित होणा-या मासिकांच्या छपाईचे काम देखील खाजगी संस्थांना दिलेले आहे. शासनातर्फे प्रकाशित होणारी प्रसिध्दीपत्रके लॉटरीची तिकिटे आपण जर खाजगी यंत्रणेकडे छपाईसाठी द्यायला लागलो तर शासकीय मुद्रणालयामध्ये ज्या प्रमाणे गोपनीयता ठेवली जाते तशा प्रकारची गोपनीयता या खाजगी यंत्रणेकडून ठेवली जाणार नाही असे मला वाटते. दुसरे असे की, या शासकीय मुद्रणालयातील कर्मचा-यांना वेतनश्रेणी लागू केलेली आहे. परंतु त्यांना रिक्रुटमेंट रुल्स लागू केलेले नाहीत. अनुकंपा तत्वावर सेवा भरती केली जात नाही. विशेषत: नागपूर आणि वाई येथील मुद्रणालयाच्या इमारतींची अतिशय दुरवस्था झालेली आहे. या इमारती केव्हा कोसळतील आणि कर्मचा-यांना दुखापत होईल हे सांगता येत नाही. तेव्हा या इमारती दुरुस्त करणे आवश्यक आहे.

..नंतर श्री. गिते...

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ KGS/ MMP/ प्रथम श्री. शिगम 10:10

श्री. अरविंद सावंत....

महोदय, माझा शेवटचा मुद्दा असा आहे की, शासनाच्या सर्व खात्यामधील कर्मचा-यांना 100 रुपये धुलाई भत्ता दिला जातो आहे. परंतु या शासकीय मुद्रणालयामध्ये धुलाई भत्ता फक्त 20 रुपये देण्यात येतो. 20 रुपयात त्या कर्मचा-याने कसे काय कपडे धुवावयाचे हे मला कळत नाही. शासनाच्या सर्व खात्यातील कर्मचा-यांना धुलाई भत्ता 100 रुपये केला आहे, त्याप्रमाणे या मुद्रणालयातील कर्मचा-यांना देखील 100 रुपये धुलाई भत्ता करण्यात यावा अशी माझी मागणी आहे. तसेच या मुद्रणालयांचे आधुनिकीकरण हा महत्वाचा विषय आहे. मुद्रणालयांचे आधुनिकीकरण करण्यासाठी निधी मंजूर करुन घेण्यात येईल काय ? तसेच सदर आधुनिकीकरणाचे काम किती कालावधीत करण्यात येईल ?

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राणा जगजितसिंह पाटील (उद्योग राज्यमंत्री ): महाराष्ट्र शासनाच्या उद्योग विभागाच्या अधिपत्याखाली मुद्रण व लेखन सामुग्री संचालनालय यांच्या अखत्यारित आठ शासकीय मुद्रणालये आहेत. सन्माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत यांनी उल्लेख केल्याप्रमाणे मुद्रणालयाच्या आधुनिकीकरणासाठी निश्चितपणे अडचणी आहेत. या मुद्रणालयांचे अजून पर्यंत आधुनिकीकरण करु शकलो नाही ही वस्तुस्थिती आहे. काही छपाईचे काम खाजगी प्रिंटींग प्रेसकडे द्यावे ही देखील वस्तुस्थिती आहे. साधारणत : दिनांक 13.1.2006 रोजी शासन निर्णयाव्दारे तेंव्हाचे विकास आयुक्त,उद्योग यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती गठीत करण्यात आली होती. आधुनिकीकरण करावयाचे म्हणजे नेमके काय करावयाचे याचा विचार करुन साधारणत: 88 कोटी रुपयांचे आधुनिकीकरणाचे प्रपोजल तयार करण्यात आले होते. दोन टप्प्यामध्ये सदर मुद्रणालयांचे आधुनिकीकरण करावयाचे असे ठरले होते. यासंदर्भात निधी उपलब्ध व्हावा म्हणून वित्त विभागाकडे अनेक वेळा पत्रव्यवहार केलेला आहे. 22 मे, 2007 रोजी नियोजन विभागाकडे प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. तसेच 5 जून, 2007, 14 फेब्रुवारी, 2008, 20 फेब्रुवारी 2008 रोजी प्रस्ताव सादर केले आहेत. मुद्रणालयाच्या आधुनिकीकरणाच्या कामासाठी निधी उपलब्ध व्हावयास पाहिजे होता तो निधी उपलब्ध होऊ शकलेला नाही. पुढील अधिवेशनात सप्लीमेंटरी डिमांडसाठी 28 कोटी 12 लाख प्रपोजल सादर केले आहे. सदरहू सप्लीमेंटरी डिमांड पुढील अधिवेशनात मंजूर होईल यासाठी आम्ही निश्चितपणे प्रयत्न करु.

सन्माननीय सदस्यांनी अनुकंपाचा विषय मांडला. त्याबाबतीत मी सांगू इच्छितो की, एकूण अनुकंपाच्या 5 टक्के रिक्त जागा भरण्यात आलेल्या आहेत. या मुद्रणालयातील कर्मचा-यांना 100 रुपये धुलाई भत्ता देण्यासंबंधीचा निर्णय झालेला आहे. केवळ वित्त विभागाचा क्लिअरन्ससाठी आपण थांबलेलो आहोत.

श्री. अरविंद सावंत : त्या ठिकाणी रिक्रुटमेंट रुल्स तयार करण्यात आलेले नाहीत त्याबाबतीत माननीय मंत्री महोदयांनी खुलासा करावा.

श्री. राणा जगजितसिंह पाटील : सुपरवाझर पदांसंबंधी रिक्रुटमेंट रुल येत्या तीन महिन्यात तयार करण्यात येतील. नागपूर येथील शासकीय मुद्रणालयाची इमारत आहे. त्या इमारतीचे आधुनिकीकरणाच्या 13 कोटी रुपयांच्या प्रस्तावाला प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे. सदरहू मान्यता 2002 या वर्षी मिळालेली आहे. परंतु शासनाकडून निधी उपलब्ध न झाल्यामुळे त्या

3...



ABG/ KGS/ MMP/ प्रथम श्री. शिगम 10:10

श्री. राणा जगजितसिंह पाटील......

इमारतीच्या आधुनिकीकरणाच्या कामास सुरुवात करता आलेली नाही. सदरहू इमारतीसाठी 13 कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करुन घेण्याबाबत निश्चितपणे प्रयत्न करण्यात येईल. वाई येथील शासकीय मुद्रणालयाचे आधुनिकीकरणाचा प्रस्ताव 2 कोटी 14 लाख रुपयांचा असून त्यास देखील प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे. या प्रस्तावास 2007 मध्ये मान्यता मिळालेली आहे. याबाबतीत देखील पाठपुरावा करुन सप्लीमेंटरीमध्ये निधी उपलब्ध करुन घेण्याचा निश्चितपणे प्रयत्न करण्यात येईल.

श्री. जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, मुद्रणालयाच्या आधुनिकीकरणासाठी 88 कोटी रुपये लागणार आहेत आणि ही रक्कम मोठी नाही. या कामासाठी शासनाकडून निधी उपलब्ध होत नसेल तर कर्ज घ्या. या आधुनिकीकरणामध्ये सी.पी.सी.ऑफसेट आणि सी,पी.सी.मशीन्स तुम्ही घेतल्या तर 200 पटीने प्रॉडक्शन वाढते. एका वर्षात कर्जाचे रिपेमेंट होऊ शकते. मी स्वत: प्रिंटर घेतला आहे. मी देखील सी.पी.सी.मशीन घेतली आहे. सी.पी.सी.मशिन्स घेतल्या तर 100 कोटी रुपयांचा नफा होऊ शकतो. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत यांनी जो मुद्दा मांडला आहे त्यास मी पाठिंबा देतो. तुम्हाला निधी उपलब्ध होत नसेल तर माझ्या बँकेतून तुम्हाला कर्ज उपलब्ध करुन देतो.

श्री. राणा जगजितसिंह पाटील : सप्लीमेंटरी डिमांडमध्ये निधी उपलब्ध करुन घेऊ.

----

यानंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता. शी.** : सिंधुदुर्ग जिल्हयात आयटीआय प्रशिक्षण केंद्र बंद असणे.

**मु. शी.** : सिंधुदुर्ग जिल्हयात आयटीआय प्रशिक्षण केंद्र बंद असणे यासंबंधी सन्माननीय सदस्य श्री. परशुराम उपरकर यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

श्री. परशुराम उपरकर ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये पुढील विषयावर अर्धा-तास चर्चा उपस्थित करतो :-

" सिंधुदुर्ग जिल्हयातील विद्यार्थ्यांना औद्योगिक प्रशिक्षण देण्यासाठी कोटयवधी रुपये खर्च करुन इमारत व वर्कशॉप बांधण्यात येणे, या प्रशिक्षण केंद्रात आवश्यक असलेले शिक्षक कमी असल्याने कमी विद्यार्थी प्रवेश घेणे, विद्यार्थ्यांना अपुरे विद्यावेतन व शिक्षकांना मिळणारा तासिका पगार सन 1980 पासून आजतागायत न वाढणे, शासनाने कोटयवधी रुपये खर्च करुन बांधलेले औद्योगिक प्रशिक्षण केंद्र बंद पडण्याच्या अवस्थेत असणे, यामुळे शासनाचे कोटयवधी रुपयांचे होणारे नुकसान याबाबात शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना "

सभापती महोदय, सिंधुदूर्ग जिल्हयात औद्योगिक प्रशिक्षण देणाऱ्या संस्था प्रत्येक तालुक्यात झालेल्या आहेत. या प्रशिक्षण देणाऱ्या इमारतींवर कोटयवधी रुपये खर्च झालेला आहे. या इमारतींमध्ये असलेली बरीचशी वर्कशॉप मुले नसल्यामुळे बंद पडलेली आहेत. या प्रशिक्षण केंद्रात शिक्षक कमी असल्यामुळे मुले प्रशिक्षण घेण्यासाठी पुढे येत नाहीत. फोंडा येथील प्रशिक्षण केंद्राचे एकच उदाहरण देता येईल. याबाबत फोंडा प्रशिक्षण केंद्रात 156 मुलांची क्षमता होती. त्याठिकाणी जवळजवळ गेल्या 3/4 वर्षापासून फक्त 56 मुले कोर्स घेत आहेत. या आयटीआय कोर्ससाठी ट्रेन झालेले शिक्षक दिलेले नाहीत. याठिकाणी फक्त 6 शिक्षक ट्रेनिंग घेतलेले आहेत. त्यामुळे त्याठिकाणी असलेले सामान्य कारागिर मुलांना काय शिकविणार आणि या मुलांनी प्रशिक्षण घेतल्यानंतर काय व्यवसाय करावा असा प्रश्न निर्माण होतो. त्याचवेळी या आयटीआय प्रशिक्षण केंद्रात शिक्षक कमी असल्यामुळे आणि एकाच शिक्षकाकडे 4/4 चार्ज असल्यामुळे प्रशिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांना योग्य प्रकारे मार्गदर्शन होत नाही त्यामुळे त्या भागातील कारखान्यांमध्ये प्रशिक्षणाच्या धर्तीवर नोकऱ्या मिळण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. जी मुले प्रशिक्षण घेत आहेत त्यांना स्टायपेंड दिला जातो तो आजची महागाई बघून देण्याची गरज आहे. कोकणातील शिक्षक कोकणामध्येच ठेवण्याची गरज आहे. अन्य

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. परशुराम उपरकर.....

ठिकाणी असलेले शिक्षक कोकणात येण्यास तयार आहेत. शिरगांव आयटीआय केंद्रात फळप्रक्रिया कोर्स चालू केला परंतु शिक्षक नसल्यामुळे तो बंद आहे. कोकणात कोकण कृषी विद्यापीठ आहे. तेथून अनेक शिक्षक मिळू शकतील. सिंधुदुर्ग जिल्हयातील आयटीआय प्रशिक्षण संस्था चांगल्या पध्दतीने चालण्याच्यादृष्टीने आणि मुलांना आकर्षित करण्याच्या दृष्टीने आणि प्रशिक्षण दिल्यानंतर मुलांना नोकऱ्या मिळण्याच्या दृष्टीने शासनाकडून प्रयत्न केले जाणे आवश्यक आहे. तसेच मुलांना स्टायपेंड देण्याची योजना शासन चालू करणार आहे काय ? त्याचप्रमाणे आयटीआयमध्ये शिक्षक पूर्णपणे देण्याच्या दृष्टीने शासन विचार करणार आहे काय ? मंत्रीमहोदयांनी कृपया या गोष्टींचा खुलासा करावा अशी मी त्यांना विनंती करतो.

---

....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिलीप वळसे-पाटील (उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. परशुराम उपरकर यांनी विशेष करुन सिंधुदुर्ग जिल्हयातील आयटीआय मधील त्रुटींच्या संदर्भात या सदनामध्ये जी चर्चा उपस्थित केली त्याबद्दल मी त्यांचे मनापासून आभार मानतो. बऱ्याच वेळेला राज्य पातळीवर काम करीत असताना अनेक छोटया छोटया गोष्टी आपल्या लक्षात येत नाहीत. परंतु अशा चर्चेचे ब्रिफींग घेत असताना उत्तर देण्याच्या दृष्टीने अनेक गोष्टी डोळयासमोर येतात आणि त्याच्यामधून काही सुधारणा करावयाला वाव मिळतो. माझ्यासारख्याला लर्निंग एक्सपिरीयन्स मिळतो. एक गोष्ट खरी आहे की, सिंधुदुर्ग जिल्हयातील 8 आयटीआय पैकी सावंतवाडी, ओरोस, फोंडा आणि देवगड या चार तालुक्यातील आयटीआयचे बांधकाम पूर्ण झालेले आहे. मालवण येथील इमारतीचे बांधकाम हाती घेतलेले आहे. त्यासाठी 2007-08 मध्ये 1.5 कोटी रुपये आणि 2008-09 मध्ये 1.23 कोटी रुपये उपलबध करुन दिलेले आहेत. मात्र वैभववाडी येथील आयटीआय केंद्रासाठी जागा उपलब्ध नाही. वेंगुर्ले येथील प्रशिक्षण केंद्रासाठी एमआयडीसीकडे जागेची उपलब्धता नाही. दोडामार्ग येथील आयटीआय इमारतीसाठी जागेचा शोध सुरु आहे. या तीन ठिकाणी जागा मिळण्याच्या दृष्टीने लक्ष देण्याची आवश्यकता आहे.

नंतर श्री. भोगले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ KGS/ MMP/ 10:20

श्री.दिलीप वळसे पाटील........

आपण सगळ्या राज्यभरात आयटीआय इमारतींचे बांधकाम करण्याच्या संदर्भात धडक कार्यक्रम गेल्या पाच वर्षात हाती घेतला आणि गेल्या 15 वर्षात जेवढ्या आयटीआय इमारती बांधून झाल्या त्यापेक्षा जास्त इमारती गेल्या पाच वर्षात राज्यात बांधू शकलो. सिंधुदुर्ग जिल्हयात ज्या 8 आयटीआय आहेत, त्या 8 पैकी ज्या नियमित आयटीआय आहेत त्याठिकाणी 49 निर्देशकांची पदे मंजूर असून त्यापैकी 9 पदे रिक्त आहेत. ती पदे भरण्याच्या संदर्भात निश्चितपणे प्रयत्न करीत आहोत. एकंदरीत कोकण आणि कोकणचा किनारा लक्षात घेतला तर या परिसरात ज्या ट्रेडसना प्राधान्य देता येईल अशा फूड प्रोसेसिंग, शिप ब्रेकिंग आणि कोकणात येणाऱ्या वीज प्रकल्पाशी निगडित इलेक्ट्रीकल ट्रेड असू शकतात, टूरिझम आणि हॉस्पिटॅलिटी मॅनेजमेंटचे ट्रेड असू शकतात. यासाठी कोकणामध्ये प्राधान्य दिले तर निश्चितपणे कोकणातील युवकांना प्राधान्य देता येईल. स्थानिक पातळीवर रोजगार निर्माण करता येईल. एक गोष्ट मला निदर्शनास आणून द्यावयाची आहे ती म्हणजे ब-याच वेळेला हॉटेल मॅनेजमेंट आणि हॉस्पिटॅलिटी मॅनेजमेंटच्या संदर्भात विद्यार्थ्यांना ट्रेण्ड करतो. त्यांना ट्रेण्ड केल्यानंतर ते स्थानिक रहात नाहीत. गोवा किंवा मुंबईकडे जातात. म्हणून एका बाजूला पर्यटनाला वाव देत असताना स्किल मॅनपॉवर निर्माण करण्याची आपली जबाबदारी आहे. 2004 मध्ये सिंधुदुर्ग जिल्हयात ओरस आणि फोंडाघाट ही दोन आयटीआय कोकण पॅकेजमध्ये सुरु केली. त्याठिकाणी प्रयत्न करुनही गेल्या काही दिवसात त्याला कन्सॉलिडेटेड पे वर्कच्या माध्यमातून विशिष्ट कोर्ससाठी पदे निर्माण केली असल्यामुळे शिक्षक उपलब्ध होऊ शकले नाहीत. त्यामुळे त्याठिकाणी विद्यार्थ्यांची रिक्रूटमेंट करु शकलो नाही, ही बाब वस्तुस्थितीला धरुन आहे. या संदर्भात निश्चितपणे प्रयत्न करु. कोणत्याही परिस्थितीत येत्या जूनपूर्वी ही पदे रिक्रूट करीत असताना सुप्रीम कोर्टाने अपंगांच्या संदर्भात जज्जमेंट दिले होते आणि भरती करण्यासाठी बॅन घातला होता. आता तो बॅन उठला आहे. हे सगळे कॅण्डिडेट कसे मिळवायचे या संदर्भात विचार करीत आहोत. 1983 सालापासून आयटीआयमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांपैकी 50 टक्के विद्यार्थ्यांना दरमहा 40 रुपये विद्यावेतन दिले जाते. अनुसूचित जाती-जमातीच्या विद्यार्थ्यांना दरमहा 60 रुपये विद्यावेतन दिले जाते. मात्र आदिवासी विद्यार्थ्यांना दरमहा 500 रुपये विद्यावेतन दिले जाते. ब-याच दिवसापासून हा निर्णय ठरलेला असल्यामुळे यामध्ये काही सुधारणा करणे आवश्यक आहे. खाजगी आयटीआयमध्ये मागासवर्गीय किंवा आर्थिकदृष्टया

..2..

श्री.दिलीप वळसे पाटील........

दुर्बल विद्यार्थ्यांना काही देत नाही. या संदर्भात जरुर विचार करु. ज्याठिकाणी शिक्षक उपलब्ध नाहीत त्याठिकाणी महात्मा फुले आणि दापोली कृषि विद्यापीठाकडून शिक्षक उपलब्ध होऊ शकतात. परंतु सी.एस.बी.बेसीसवर प्रती तास 20 रुपये दर आहे. शालेय शिक्षक आणि अन्य शिक्षकांबाबत निर्णय बदलला आहे. त्याठिकाणी 20 रुपयाऐवजी 72 रुपयापर्यंत दर वाढविलेला आहे. परंतु शासकीय संस्थातील सी.एस.बी.वरचे शिक्षक बाजूला राहिले. या संदर्भात प्रस्ताव वित्त विभागाला सादर केला आहे. ते दर वाढल्यानंतर जरुर स्थानिक पातळीवर क्लॉक बेसिसवर शिक्षक उपलब्ध होऊ शकतील. मी या निमित्ताने एवढेच सांगू इच्छितो की, मी यावर्षी विशेष लक्ष देत आहे. कोकणातील चारही जिल्हयातील सर्व आयटीआयचे प्राचार्य, विधानसभा आणि विधानपरिषद सदस्य, पालकमंत्री यांची बैठक बोलावण्यात येईल. कोकणातील चारही जिल्हयातील आयटीआयमधील मशिनरी, शिक्षक, इन्फ्रास्ट्रक्चरबाबत ज्या त्रुटी आहेत त्या त्रुटी दूर करण्याचा प्रयत्न केला जाईल. त्याचबरोबर त्याठिकाणी काही आऊटडेटेड कोर्सेस असतील तर ते रद्द करुन जे अत्यावश्यक कोर्स आहेत, डिमांड कोर्सेस आहेत ते सुरु करण्याचा जरुर प्रयत्न करु.

(नंतर श्री.जुन्नरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिलीप वळसे-पाटील.....

दोडा मार्ग येथे शिक्षक मिळाले नाहीत तसेच अन्य काही काही अडचणी त्या ठिकाणी निर्माण झाल्या होत्या. त्या ठिकाणी आपण दोन व्यवसाय सुरु केले होते. यावर्षी या ठिकाणी अजून पाच व्यवसाय सुरु करण्यात येतील त्यासाठी लागणारे इन्फ्रास्ट्रक्चर उभे करण्यात येईल. विद्यार्थी गरीब आहे म्हणून त्यांना काही तरी द्यावयाचे म्हणून द्यावयाचे आणि नंतर त्यांना रस्त्यावर सोडून द्यावयाचे असे होणार नाही तर शिक्षण आणि व्यवसाय इंडस्ट्रीज यांचे लिंकेज करण्याच्या संदर्भात राज्यसरकारने भूमिका घेतलेली आहे. यामध्ये जॉईंट पार्टनरशिप खाजगी क्षेत्राबरोबर, इंडस्ट्रीयल हाऊसेसच्या बरोबर, सरकारी संस्थांमध्ये जॉईंट पार्टनरशिप करण्याचा विचार केलेला आहे. हा कार्यक्रम संपूर्ण राज्यभर करीत असतांना सिंधुदुर्ग जिल्हा मागे राहू नये यासाठी आपण जो पब्लीक पार्टनरशिपचा मोड घेतलेला आहे त्याअंतर्गत केंद्रसरकारने सुध्दा नॅशनल नॉलेज कमिशनच्या रिपोर्टवर या देशातील आयटीआयमध्ये व्यवसाय शिक्षणाला चालना देण्यासाठी योजना हातामध्ये घेतली आहे, त्याची सुरुवात आपल्या राज्यामध्ये आपण केलेली आहे. काही आयटीआय सेन्ट्रल ऑफ एक्सलन्समध्ये रूपांतरित करावयाचे आणि काही आयटीआयमध्ये जॉईंट पार्टनरशिपच्या माध्यमातून इंडस्ट्रीजला आणावयाचे. यामध्ये सन 2007-08 मध्ये फोंडा घाटच्या आयटीआयला सेन्ट्रल ऑफ एक्सलन्स तयार करण्यासाठी 2.5 कोटी रुपये विशेष बाब म्हणून मंजूर केलेले आहेत. हे पैसे यावर्षात बँकेत जमा देखील झालेले आहेत. पैसे खर्च करुन चांगले आयटीआय तयार करण्याचा प्रयत्न शासन करीत आहे. ओरसच्या आयटीआय संदर्भात ताज ग्रुपबरोबर चर्चा झाली असून ताज ग्रुपने ओरसचे आयटीआय ॲडॉप्ट करावयाचे ठरवले आहे. ओरसच्या आयटीआय मधील विद्यार्थी काही दिवस आयटीआय मध्ये शिक्षण घेतील आणि काही दिवस ताज ग्रुपमध्ये ट्रेनिंग घेतील व त्यानंतर ही मुले हॉटेल इंडस्ट्रीजमध्ये ॲबसॉर्ब केले जातील. ओरसला सर्व फॅसेलिटी देण्यासाठी जागतीक बँकेच्या कार्यक्रमाअंतर्गत यावर्षी 3.5 कोटी रुपये देण्याचे प्रस्तावित केलेले आहे. मालवणच्या आयटीआयला सुध्दा पब्लीक प्रायव्हेट प्रॉपर्टीजच्या अंतर्गत 2.5 कोटी रुपये आपल्याला द्यावयाचे आहे. माझी आपल्याला विनंती आहे की, रत्नागिरीमध्ये दाभोळचा प्रकल्प सुरु केल्यानंतर त्या ठिकाणी बंद पडलेली जी शिक्षण संस्था होती त्या ठिकाणी आम्ही आता सरकारी आयटीआय स्थलांतरित करण्याचा प्रयत्न केला आहे. तेथील हॉस्पिटल दुरुस्त करण्याचा

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिलीप वळसे-पाटील.....

प्रयत्न देखील करीत आहोत. रायगड जिल्हयामध्ये जागा मिळणे अवघड आहे परंतु रायगडच्या पालकमंत्र्यांना सांगितल्यानंतर त्यांनी एका दिवसात 4 आयटीआयसाठी जागा उपलब्ध करुन दिलेल्या आहेत. बाकीच्या ठिकाणी जागा उपलब्ध करुन घेण्यासाठी आपल्याला तरतूद करावी लागणार आहे. मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, आयटीआयच्या इमारती, त्यांची वसतीगृहे आणि त्यातील मशिनरीचा बॅकलॉग भरुन काढण्यासाठी राज्यव्यवस्थेमध्ये डीपीडीसी अंतर्गत कामगार आणि कामगार कल्याणचा जो ग्रुप आहे त्यासाठी आपल्याला निधी उपलब्ध करुन द्यावा लागतो. ज्यावेळेस आपल्या डीपीडीसीच्या मिटिंग होतील त्यावेळी कामगार आणि कामगार कल्याणच्या अंतर्गत या विभागासाठी डीपीडीसीसाठी अधिक तरतुदी कशा उपलब्ध्द करुन देण्यात येतील हे पाहिले तर जागतीक बँक व केंद्रसरकार कडून येणारा आयटीआयचा निधी उपलब्ध्द करुन देण्याच्या संदर्भात भूमिका घेऊ. त्रुटी जरी असल्या तरी त्यातील त्रुटी दूर करण्याची आमची मानसिकता आहे. केवळ सरकारच्या रिपोर्टवर अवलंबून राहण्याऐवजी सर्व लोकप्रतिनिधींबरोबर चर्चा करुन त्या ठिकाणी प्राचार्य, जिल्हा व्यवसाय शिक्षणाधिकारी, डेप्युटी डायरेक्टर, डायरेक्टर उपलब्ध करुन देण्यात येतील. कोकणातील विद्यार्थ्यांना ट्रेनिंग देणे, नोक-या मिळवून देणे, ॲबसॉर्ब करणे, करिअर गाईडन्स करणे या सगळया गोष्टीचा विशेष कार्यक्रम येत्या तीन महिन्यात घेऊ. माझी खात्री आहे की, कोकणातील विद्यार्थ्यांना ज्या अडचणी येतात त्यावर त्यांना मार्ग काढून पुढे जाण्याचा प्रयत्न करता येईल . आपण या ठिकाणी ही चर्चा उपस्थिती केली त्याबद्दल मी पुन्हा एकदा आपले आभार मानून माझे दोन शब्द थांबवतो.

--------

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. परशुराम उपकर : सभापती महोदय,मालवण मध्ये आय.टी.आय. होत आहे परंतु मच्छिमारीसाठी ज्या यांत्रिकी बोटी लागतात त्या रिपेअर करण्याचा कोर्स सुरु करण्याची आवश्यकता आहे.............

**उपसभापती** : ही अर्धा तास चर्चा संपली आहे. अनुक्रमांक 4 व 5 वरील अर्धातास चर्चा सायंकाळी घेण्यात येतील. आता सभागृहाची विशेष बैठक स्थगित होत असून नियमित बैठक सकाळी 10 वाजून 45 मिनिटांनी सुरु होईल.

(सभागृहाची बैठक सकाळी 10.30 ते 10.45 वाजेपर्यंत स्थगित झाली )

----

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( सभागृह स्थगितीनंतर --- )

**सभापतीस्थानी - माननीय उपसभापती**

**सभापतींच्या निवडणुकीबाबत घोषणा**

**उपसभापती** : माननीय सदस्यांना माहीत आहे की, महाराष्ट्र विधान परिषदेच्या सभापतींचे पद दिनांक 24 एप्रिल 2008 रोजी मध्यान्होत्तर रिक्त होणार आहे. म्हणून महाराष्ट्र विधान परिषद नियमातील नियम 6 मधील तरतुदीस अनुसरून माननीय राज्यपालांनी सभापती पदाच्या निवडणुकी साठी दिनांक 25 एप्रिल 2008 हा दिवस निश्चित केला आहे.

**सभापतींच्या निवडणुकीसंदर्भात महाराष्ट्र विधान परिषद नियम 289 अन्वये नियम स्थगित करण्याबाबतचा प्रस्ताव.**

श्री. हर्षवर्धन पाटील (संसदीय कार्य मंत्री) : महोदय, सभापती पदाच्या निवडणुकीच्या संदर्भात महाराष्ट्र विधान परिषद नियम 289 अन्वये मी पुढील प्रस्ताव मांडू इच्छितो.-

" महाराष्ट विधान परिषद नियम 6(1) अन्वये माननीय राज्यपालांनी सभापती पदाची निवडणूक घेण्यासाठी दिनांक 25 एप्रिल 2008 ही तारीख ठरवून दिल्यामुळे त्या दिवशी घेण्यात येणाऱ्या माननीय सभापती पदाच्या निवडणुकी संदर्भात विधान परिषद नियम 6(2) मधील "निश्चित केलेल्या तारखेच्या अगोदरच्या दिवशी मध्यान्हपूर्व कोणत्याही सदस्यास दुसऱ्या कोणत्याही सदस्याला सभागृहाचा सभापती म्हणून निवडण्यात यावे" अशा प्रस्तावाची लेखी नोटीस पाठविण्या-संदर्भातील तरतूद विधान परिषद नियम 289 अन्वये स्थगित करून असा लेखी प्रस्ताव पाठविण्याची मुदत दिनांक 25 एप्रिल, 2008 रोजी सकाळी 11.00 वाजेपर्यंत करण्यात यावी."

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

**उपसभापती** : हा प्रस्ताव सभागृहाने संमत केला असल्याने आता सदस्यांनी मांडावयाचा प्रस्ताव श्री.अनंत कळसे, प्रधान सचिव, महाराष्ट्र विधान परिषद, कक्ष क्रमांक 021, तळमजला, विधान भवन, मुंबई यांच्याकडे दिनांक 25 एप्रिल 2008 रोजी सकाळी 11.00 वाजण्यापूर्वी पोहोचेल अशा बेताने पाठविणे आवश्यक आहे.

या निवडणुकीसाठी निश्चित करण्यात आलेल्या दिवसा संबंधीची अधिसूचना तसेच प्रस्तावाचा नमुना स्वतंत्रपणे वितरित करण्यात येत आहे.

***

( यानंतर सौ.रणदिवे...ओ 1 ..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: तोंडी उत्तरे

ता.प्र.क्र.37304

(सन्माननीय सदस्य अनुपस्थित)

----

**राज्यातील शेतकऱ्यांच्या गहाण टाकलेल्या जमिनी सावकारांनी परत करण्याबाबत**

**(1) * 41867 श्री. पांडुरंग फुंडकर, श्री. नितीन गडकरी , श्री.सय्यद पाशा पटेल** : सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(1) राज्यातील शेतकऱ्यांच्या जमीनी ज्या सावकारांकडे गहाण आहेत त्या सावकारांनी त्या जमिनी 15 दिवसांच्या आत परत कराव्यात असा निर्णय शासनाने माहे मार्च, 2008 मध्ये घेतला आहे, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, याबाबतचा शासन निर्णय केव्हा काढण्यात आला आहे वा काढण्यात येणार आहे,
(3) अद्याप याबाबतचा शासन निर्णय काढला नसल्यास, तो लवकरात लवकर केव्हा काढण्यात येणार आहे ?

**श्री.जयप्रकाश दांडेगावकर, डॉ.पतंगराव कदम यांच्याकरिता** : (1) नाही.
(2) व (3) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, याठिकाणी सर्व प्रश्नांच्या संदर्भात "नाही""उद्‌भवत नाही" अशा प्रकारचे निगेटीव्ह उत्तर दिलेले आहे. याठिकाणी शेतकऱ्यांच्या जमिनी ज्या सावकारा कडे गहाण आहेत. सावकारांनी त्या जमिनी 15 दिवसाच्या आत परत कराव्यात अशा प्रकारचा निर्णय शासनाने घेतलेला आहे काय ? असा मी प्रश्न विचारला असून त्याबाबत उत्तरामध्ये "नाही" "प्रश्न उद्‌भवत नाही" असे म्हटलेले आहे. केंद्र शासनाचे बजेट जाहीर झाल्यानंतर दुसऱ्याच दिवशी माननीय कृषी मंत्री श्री.शरद पवार यांनी असे स्टेटमेंट दिले की, सावकाराचे कर्ज देऊ नका. त्या पाठोपाठच या सदनाचे नेते आणि या राज्याचे उप मुख्यमंत्री यांनी "शेतकऱ्यांच्या जमिनी 15 दिवसामध्ये परत करा, श्री.आर.आर.पाटील यांचा सावकरांना इशारा" असे लोकसत्ता या पेपरमध्ये छापून आलेले आहे आणि माझ्याकडे त्याचे कटींग आहे. परंतु याठिकाणी छापील उत्तरामध्ये "नाही" असे म्हटलेले आहे. माझे म्हणणे असे आहे की, जर शासनाचा निर्णय झालेला नव्हता तर मग असे स्टेटमेंट देण्याची काय गरज होती ? म्हणून माझा प्रश्न आहे की, माननीय गृहमंत्री श्री.आर.आर.पाटील यांनी असे म्हटलेले आहे की," केंद्र सरकारने शेतकऱ्यांचे कर्ज माफ केलेले आहे. आता शेतकऱ्यांनी सावकारांना कर्ज परत करु नये.सावकाऱ्यांनी शेतकऱ्यांच्या जमिनी

. . . .ओ-2



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.41867 . . . . .

15 दिवसामध्ये परत कराव्यात. शेतकऱ्याच्या केसालाही धक्का लागला तर सावकारांची कातडी सोलून काढू" असा इशारा माननीय उप मुख्यमंत्री श्री.आर.आर.पाटील यांनी अकोला येथे मेळाव्यासाठी आले होते. त्यावेळी फुले, हार, काय-काय झाले ? ढोल-ताशे, फटाके वाजविण्यात आले. त्या मेळाव्यामध्ये हजारो शेतकऱ्यांच्या उपस्थितीमध्ये माननीय उपमुख्यमंत्री श्री.आर.आर पाटील यांनी ही घोषणा केली आणि ती सर्व वर्तमानपत्रामध्ये छापून आली आहे. परंतु जर शासनाचा निर्णय झालेला नव्हता तर माननीय उप मुख्यमंत्र्यांनी ही घोषणा करण्याची काय गरज होती ? पण ही घोषणा केल्यानंतर अधिवेशनाच्या काळामध्ये अशा प्रकारचा कायदा का आणला नाही ? शासन अशा प्रकारचा कायदा आणणार आहे काय ? याबाबतीत शासन किती दिवसामध्ये अध्यादेश काढणार आहे ?

श्री.जयप्रकाश दांडेगावकर : सभापती महोदय, माननीय गृहमंत्री श्री.आर.आर.पाटील यांनी सांगितले, त्याप्रमाणे याबाबतीत गेल्या एक-दीड वर्षापासून कार्यवाही सुरु आहे. माननीय विरोधी पक्षनेत्यांकडे 15 दिवसापूर्वीचे वर्तमानपत्रातील कटींग असले तरी यापूर्वीच आपण जिल्हाधिकारी, एस.पी.आणि डी.डी.आर. यांची समिती नियुक्त केलेली असून सावकारांच्या बाबतीत जेवढया तक्रारी येतात, त्याचे निराकरण करण्यासाठी ही समिती कार्य करते आणि यामध्ये मार्ग काढून जमिनी परत करण्याचा प्रयत्न करते. माननीय विरोधी पक्षनेते वृत्तपत्रातील बातमीच्या आधारावर बोलत आहेत, म्हणून मी अधिक काही बोलत नाही. यासंबंधात मंत्रिमंडळाने कायदा पास केलेला असून केंद्र शासनाची परवानगी घेऊन लवकरच सावकारीच्या बाबतीतील नवा कायदा म्हणजे महाराष्ट्र सावकारी अधिनियम कायदा लवकरच आणणार आहोत.

श्री.पांडुरंग फुंडकर (खाली बसून) : सभापती महोदय, लवकर म्हणजे कधी ?

श्री.जयप्रकाश दांडेगावकर : सभापती महोदय, याच अधिवेशनामध्ये हा कायदा आणण्याचा प्रयत्न होता. पण यासाठी केंद्र शासनाची परवानगी आवश्यक असल्यामुळे आणि लॉ ॲण्ड ज्युडिशिअरी विभागाने देखील तसे मत दिल्यामुळे, केंद्र शासनाची परवानगी घेऊन अध्यादेश काढण्यात येईल किंवा पुढच्या अधिवेशनामध्ये असा कायदा आणण्यात येईल.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, याबाबतीत जिल्हाधिकारी, एस.पी. आणि डी.डी.आर.यांची कमिटी नेमलेली आहे आणि तक्रारींचे निवारण

. . . .ओ-3

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

करण्याची प्रक्रिया सुरु आहे. तुमचे अधिकारी मॅनेज होतात. आपण माझे हे चॅलेंज स्विकारणार आहात काय ? खामगाव येथे ए.आर.च्या समोर ज्या केसेस चालल्या, त्यामध्ये सावकाराच्या विरोधातील 100 टक्के केसेस त्यांनी खारीज केल्या. त्यामुळे सावकारांनी शेतकऱ्यांच्या जमिनी परत केल्या नाहीत. जर सरकार, पक्षाचे आमदार अधिकाऱ्यांवर अशा पध्दतीने दबाव आणत असतील तर शेतकरी सावकारांच्या पाशातून मुक्त होणार आहे काय ? खामगाव येथील डी.डी.आर.ने सावकारांच्या संबंधातील सर्व केसेस खारीज केलेल्या आहेत. त्याबाबतीत सी.आय.डी.मार्फत चौकशी करणार आहात काय ? तेथे डी.डी.आर.कोण आहे ? आजही जमिनी सावकारांच्या ताब्यात आहेत. शेतकरी 15-15 वर्षे जमीन कसत आहे.

यानंतर कु.गायकवाड . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 41867......

श्री. पांडुरंग फुंडकर ..

अशा प्रकारच्या संस्था असताना देखील, सावकारी संस्था नाही असे सांगितले जाते. या संबंधात शेतकरी हायकोर्टमध्ये देखील गेले होते. आपण शेतकऱ्यांना कर्ज देण्याच्या घोषणा कशा करिता देत आहात ? अशा घोषणा देण्याची काय गरज आहे ? आपण सावकारांचे काहीही करु शकत नाही. "सावकाराला कोपरापासून ढोपरापर्यंत सोलून काढू "असे गेल्या 3 वर्षापासून आम्ही ऐकत आहोत. केंद्र शासनाची एक महिन्यामध्ये परवानगी घेऊन, ऑर्डीनन्स काढला जाईल काय ?

श्री. जयप्रकाश दांडेगावकर : सभापती महोदय, सन्माननीय विरोधीपक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर यांनी सावकाराच्या तक्रारीबाबत येथे प्रश्न उपस्थित केला आहे. राज्यामध्ये याबाबत 5248 एकूण तक्रारी आल्या होत्या. त्या पैकी 4750 तक्रारी निकाली काढल्या आहेत व 415 तक्रारीच्या संदर्भात गुन्हे दाखल करण्यात आले आहे. खामगाव येथील एखाद्या एआरने गुन्हा केलेला असेल तर त्याबाबत तक्रार आल्यास पुन्हा एकदा चौकशी करण्यात येईल. एखादा अधिकारी चुकीचा वागला असेल तर त्याबाबत फेर तपासणी करण्यात येईल अशी मी आपल्याला ग्वाही देतो. शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी शासनाकडून प्रयत्न करण्यात येतील. तसेच महाराष्ट्र सावकारी कायदा मंजूर करण्याच्या बाबत केंद्र सरकारकडे प्रयत्न करण्यात येतील.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, आताच माननीय मंत्री महोदयांनी सांगितले आहे की, या संदर्भात केंद्रीय मंत्रिमंडळाने निर्णय घेतलेला आहे. तसेच त्या संबंधी कायदा आणला जाणार आहे. असे असताना या बाबत उत्तरामध्ये काहीच दिलेले नाही. माननीय मंत्री डॉ. पतंगराव कदम हे अतिशय कर्तव्यदक्ष मंत्री आहेत. माझा स्पेसिफिक प्रश्न आहे की, एक महिन्याच्या आत केंद्र शासनाची परवानगी घेऊन ऑर्डीनन्स काढला जाणार आहे काय ?

डॉ. पतंगराव कदम : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर यांनी येथे सावकारी कायद्याबाबत प्रश्न विचारला आहे. इममूव्हेबल प्रॉपर्टी ट्रान्सफर करण्याचा अधिकार राज्य शासनास नाही. ही केस हायकोटमध्ये गेली होती व त्यास आता हायकोर्टाने स्टे दिला आहे. आता नवीन कायदा आणण्यात येत आहे. आमचा याबाबत आग्रह होती की, हे विधेयक आजच ठेवण्यात यावे. परंतु याबाबत अनेकांनी अनेक सल्ले दिले. ट्रान्सफर ऑफ प्रॉपर्टी

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 41867......

डॉ. पतंगराव कदम..

ॲक्ट बाबत माहिती दिली. मी आपणास सांगू इच्छितो की, अधिवेशन संपल्यानंतर लवकरात लवकर ऑर्डीनन्स काढला जाईल व त्यासाठी केंद्र शासनाची परवानगी 1 महिन्यामध्ये घेतली जाईल.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, खामगाव येथील एआरचा उल्लेख येथे केलेला आहे. या संदर्भात तेथे जितक्या केसेस असतील त्या सर्व केसेसची चौकशी दुसरा अधिकारी नेमून करण्यात येईल काय व तेथील अधिकाऱ्याला ताबडतोब निलंबित केले जाईल काय ?

डॉ. पतंगराव कदम : सभापती महोदय, ज्या ज्या प्रकरणासंदर्भात तक्रारी आलेल्या आहेत त्या सर्व प्रकरणांबाबत एक अधिकारी नेमून फेर तपासणी केली जाईल. तसेच तेथील एआर दोषी असतील तर त्यांच्यावर कारवाई केली जाईल.

**उपसभापती** : आता आपण पुढील प्रश्न घेऊ या.

श्री. पाशा पटेल : सभापती महोदय, या प्रश्नावर माझे नाव आहे. याबाबत प्रश्न विचारण्याकरिता मी बराच वेळेपासून हात वर केलेला आहे. हा प्रश्न शेतकऱ्यांच्या संदर्भात आहे. त्यामुळे आपण मला बोलण्याची संधी द्यावी.

**उपसभापती** : ठीक आहे.

श्री. पाशा पटेल : सभापती महोदय, माननीय केंद्रीय कृषी मंत्र्यांपासून माननीय राज्य मंत्र्यांपर्यंत सावकाराला कोपरापासून ढोपरापर्यंत सोलून काढू असे सांगितले जात आहे. हा प्रश्न शेतकऱ्यांशी संबंधित असल्यामुळे आपण याबाबत गांभीर्य ठेवावे.

यानंतर श्री. बरवड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 41867 ...... श्री. पाशा पटेल .....

श्री. किर्दत नावाच्या एका शेतकऱ्याची जमीन भनसाळे नावाचा सावकार परत देत नाही म्हटल्यानंतर तीन अर्ज आदरणीय गृहमंत्र्यांकडे केले गेले पण त्याला जमीन परत मिळाली नाही. सावकाराला फोडून काढू म्हटल्यानंतर असे झाले की, आता सावकाराने सावकारी देणे बंद केले. लातूर तालुक्यामध्ये बोराडे नावाच्या शेतकऱ्याला हार्ट अटॅक आला. त्याला दवाखान्यामध्ये घेऊन जावयाचे होते. सावकार म्हणाला की, जर पैसे दिले तर ते परत येणार नाहीत. सावकाराने पैसे दिले नाहीत. बँका रात्री 12.00 वाजता पैसे देत नाहीत. एका बाजूला ही अवस्था आहे तर दुसऱ्या बाजूला अशी अवस्था आहे. आदरणीय सहकार मंत्र्यांनी कायद्यात बदल करण्याबाबत सांगितले. मी माझी जमीन सावकाराला रजिस्ट्री करुन दिल्यानंतर ती पैशाच्या मोबदल्यामध्ये टेम्परररी दिलेली आहे असे कायद्यामध्ये कोठेही दाखवता येत नाही. असे काही आपण कायद्यामध्ये दाखविणार आहात काय की, ही जमीन एवढ्या पैशापुरती, एवढ्या दिवसासाठी मी ठेवलेली आहे ? कायद्यामध्ये अशा पध्दतीची दुरुस्ती करणार काय ?

डॉ. पतंगराव कदम : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. पाशा पटेल यांनी सांगितले त्याप्रमाणे सर्व लॅक्युना आता दूर केलेले आहेत. सर्व अधिकाऱ्यांना, डी.डी.आर.ना कळवले आहे. अशा पध्दतीचे रजिस्टर रद्द करणे, तात्पुरते व्याज, त्याच्या व्याख्या यासंदर्भात सन्माननीय सदस्यांनी हा कायदा मुद्दाम पहावयास पाहिजे. कारण हा अतिशय महत्वाचा कायदा आहे. त्यासंदर्भामध्ये माझ ा आग्रह होता की, याच अधिवेशनामध्ये तो कायदा मंजूर करावयाचा. परंतु तांत्रिक अडचण आली. केंद्राची इन्फॉर्मल मान्यता घ्यावयाची आहे म्हणून ते राहिलेले आहे. तरी सुध्दा आम्ही ताबडतोब अध्यादेश काढणार आहोत आणि मान्यताही घेणार आहोत. आता सन्माननीय सदस्यांनी जे सांगितले ते सर्व लॅक्युना दूर करणार आहोत.

----

...2...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ KTG/

**महाराष्ट्रातील साखर कारखान्यास शासनाने अर्थसहाय्य उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(२) * ३९२१६ श्री. नितीन गडकरी, श्री.सय्यद पाशा पटेल, श्री. जगदीश गुप्ता, श्री.केशवराव मानकर :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्रातील साखर कारखान्यास सहकार्य करण्यासाठी विक्री झालेल्या साखरेमधील विकास निधी अंतर्गत दोन वर्षाच्या मुदतीसाठी बिगरव्याजी कर्ज देण्याचा निर्णय शासनाने जाहीर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील साखर कारखान्यास सहकार्य करण्यासाठी किमान १२०० कोटींचे अर्थसहाय्य उपलब्ध होणार आहे, मात्र हे अर्थसहाय्य राज्य सहकारी बँकेस देण्यासाठी नाबार्ड शासनाची हमी मागते, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर हमी देण्यास शासन टाळाटाळ करीत असल्याचेही उघडकीस आले आहे, हे खरे आहे काय,

(४) महाराष्ट्रातील साखर कारखान्यांना अर्थसहाय्य उपलब्ध करण्याबाबत शासनाने कोणती ठोस कार्यवाही केली आहे,

(५) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. जयप्रकाश दांडेगावकर, डॉ.पतंगराव कदम यांच्याकरिता** : (१) नाही. तथापि, केंद्र शासनाने दिनांक ७/१२/२००७ च्या अधिसूचनेन्वये हंगाम २००६-०७ मध्ये वैधानिक न्युनत्तम दराने देय असलेली ऊस दराची बाकी व हंगाम २००७-०८ मध्ये वैधानिक न्युनत्तम दराप्रमाणे ऊसाची किंमत ऊस उत्पादकास कारखान्यांना अदा करता यावी म्हणून हंगाम २००६-०७ व २००७-०८ मधील उत्पादित साखरेवर देय होणाऱ्या उत्पादन शुल्काच्या रकमेइतके बिनव्याजी कर्ज संबंधित कारखान्यांना खेळते भांडवल पुरविणाऱ्या बँकांकडून उपलब्ध करुन देण्याबाबत साखर उद्योगाला अर्थ सहाय्याची योजना २००७ जाहीर केली आहे.

(२) उपरोक्त योजनेंतर्गत ज्या कारखान्यांच्या कर्जापोटी बँकांना एनपीए तरतूद करावी लागली आहे अशा कारखान्यांना राज्य शासनाच्या थकहमीची आवश्यकता राहणार आहे. त्यानुसार महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेकडील १९ व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांकडील ५ अशा एकूण २४ साखर कारखान्यांसाठी रुपये ९४८८.२२ लाखाची थकहमी द्यावी लागेल.

(३) या प्रकरणी साखर आयुक्तांकडून प्रस्ताव नुकताच प्राप्त झाला असून, सदर प्रस्ताव विचाराधीन आहे.

(४) या योजनेंतर्गत महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेने व संबंधित जिल्हा मध्यवर्ती बँकांनी कारखान्यांना कर्ज उपलब्ध करुन देण्याबाबत साखर आयुक्तालय स्तरावर बँका व कारखान्यांच्या प्रतिनिधींच्या बैठका आयोजित करुन तसेच पत्राद्वारे या योजनेच्या अंमलबजावणीबाबत सूचना देण्यात आल्या आहेत. त्यानुसार महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेने व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांनी ९९ सहकारी साखर कारखान्यांसाठी रुपये ८०९९१.०८ लाख कर्ज मंजूर केले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

श्री. जगदीश गुप्ता : सभापती महोदय, सहकारी कारखान्यांना ही जी सवलत दिलेली आहे ती खाजगी कारखान्यांना सुध्दा देणार आहात काय ?

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 39216 ......

श्री. जयप्रकाश दांडेगावकर : सभापती महोदय, ही केंद्र सरकारने दिलेली सवलत आहे. ही सवलत महाराष्ट्र सरकारने दिलेली नाही. केंद्र शासनाच्या नियमाप्रमाणे ती सगळ्यांना लागू होईल.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, सन 2007-08 व 2008-09 या वर्षाच्या गळीत हंगामात राज्यामध्ये किती व कोणत्या साखर कारखान्यांना कर्ज पुरवठा केलेला आहे ?

श्री. जयप्रकाश दांडेगावकर : सभापती महोदय, साधारणत: महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेने 59 कारखान्यांना 40 कोटी 973 रुपये एवढा कर्जपुरवठा केलेला आहे. त्यापैकी 33 कारखान्यांनी कर्जाची उचल केलेली आहे. जिल्हा मध्यवर्ती बँकेकडून 48 कारखान्यांना 48377.01 लाख रुपये एवढा कर्ज पुरवठा केलेला आहे. कर्ज उचल केलेल्या कारखान्यांची संख्या 24 असून त्याची रक्कम 18 कोटी 635 लाख रुपये आहे.

डॉ. वसंत पवार : सभापती महोदय, उत्तरामध्ये असे म्हटले आहे की, केंद्र शासनाने वैधानिक न्युनतम दराने देय असलेली ऊस दराची बाकी तसेच चालू हंगामासाठी द्यावयाची रक्कम यासाठी केंद्र शासनाने उत्पादन शुल्काच्या रकमेइतके बिनव्याजी कर्ज मंजूर केलेले आहे त्याबद्दल केंद्र शासनाला खास धन्यवाद देतो. माझा राज्य शासनाला असा प्रश्न आहे की, आपण परचेस टॅक्स माफ केला. मागच्या वर्षी काही कारखान्यांनी आपल्याकडे परचेस टॅक्स भरलेला आहे. त्याचे रिकंसिलिएशन आपण केलेले नाही. ते सुध्दा रिफंड करणे गरजेचे आहे. शासन ते करणार काय ? दुसरा प्रश्न असा की, 24 कारखान्यांना आपण थकहमी दिलेली आहे. त्या 24 कारखान्याची यादी पटलावर ठेवण्यात येईल काय ?

श्री. जयप्रकाश दांडेगावकर : सभापती महोदय, परचेस टॅक्सच्या बाबतीत गेल्या वर्षी सूट दिलेली आहे. काही कारखान्यांकडून तो भरला गेला होता. तो परत करण्यासाठी शासनाकडून प्रयत्न करण्यात येईल. ज्या 24 कारखान्यांच्या बाबतीत सन्माननीय सदस्यांनी यादी मागितली आहे ती यादी पटलावर ठेवण्यात येईल.

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ KTG/

ता. प्र. क्र. 39216 ......

**उपसभापती** : या 24 कारखान्यांना आपण थकहमी देणार काय असा प्रश्न सन्माननीय सदस्यांनी विचारलेला आहे.

श्री. जयप्रकाश दांडेगावकर : शासन थकहमी देणार आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, प्रश्न क्रमांक 2 च्या उत्तरामध्ये असे म्हटले आहे की, उपरोक्त योजनेंतर्गत ज्या कारखान्यांच्या कर्जापोटी बँकांना एनपीए तरतूद करावी लागली आहे अशा कारखान्यांना राज्य शासनाच्या थकहमीची आवश्यकता राहणार आहे. त्यानुसार महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेकडील 19 व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांकडील 5 अशा एकूण 24 साखर कारखान्यांसाठी रुपये 9488.22 लाखाची थकहमी द्यावी लागेल.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ SBT/ KTG/ श्री.बरवडनंतर 11:05

ता.प्र.क्र.39216....

**उपसभापती** : सभागृहात काही सन्माननीय सदस्यांनी डोक्यावर काळी टोपी घातलेली आहे. सभागृहात सावकार आले आहेत की, शेतकरी आले आहेत ?

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेकडील 19 व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांकडील 5 अशा एकूण 24 साखर कारखान्यांसाठी रुपये 9488.22 लाखांची थकहमी द्यावी लागेल असे म्हटले आहे. ज्या सहकारी साखर कारखान्यांना आणि खाजगी साखर कारखान्यांना नागरी सहकारी बँकांनी कर्ज दिलेले आहे अशा नागरी सहकारी बँका सुध्दा आता एनपीएमध्ये गेलेल्या आहेत. अशा बँकांचा साखर आयुक्तांकडून आलेल्या प्रस्तावात समावेश आहे काय ?

श्री.जयप्रकाश दांडेगावकर : सहकारी साखर कारखान्यांचा हा प्रश्न आहे, खाजगी बँकांचा याच्याशी संबंध नाही. सहकारी बँक लीड बँक म्हणून काम करीत असेल तर त्याचा जरुर विचार करण्यात येईल.

श्री.जयंत प्र.पाटील : या सर्व योजनेला थकहमी देण्यास शासन तयार आहे. 692 कोटीची हमी राज्य सहकारी बँकेला शासन देत नाही. नाबार्डने राज्य शासनाची थकहमी चालणार नाही असे कळविले आहे ही गोष्ट खरी आहे काय ?

श्री.जयप्रकाश दांडेगावकर : राज्य सहकारी बँकेने शासनाकडे 692 कोटीसाठी थकहमीची मागणी केलेली आहे. त्याबाबतची छाननी सुरु आहे. त्याची प्रकरणनिहाय तपासणी चालू आहे, त्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात आली आहे. नाबार्डची माहिती घेऊन पटलावर ठेवण्यात येईल.

श्री.पाशा पटेल : साखर कारखाना सहकारी असो की खाजगी असो, दोन्ही ठिकाणी शेतक-यांच्या ऊसाला पैसा द्यावयाचा असतो. त्यामुळे सरकारने खाजगी आणि सहकारी असा भेदभाव करु नये, त्याशिवाय निकोप स्पर्धा होईल काय ? आता खाजगी साखर कारखाने आले आहेत. हे खाजगी कारखाने सहकाराला वैतागून शेतक-यांच्या भांडवलातूनच तयार झालेले आहेत. म्हणून

खाजगी आणि सहकारी भेदभाव बंद करणार काय आणि दोन्ही प्रकारच्या कारखान्यांना सारखीच मदत देणार काय ?

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.39216...

श्री.जयप्रकाश दांडेगावकर : सहकार कारखानदारी 5 हजार, 10 हजार किंवा 15 हजार शेतक-यांमध्ये असते. त्याचा होणारा नफा, नुकसान शेतकरी वाटून घेतात. खाजगी कारखानदारी मर्यादित लोकांमध्ये असते. खाजगी कारखाने नफा कमविण्याच्या उद्देशानेच सुरु झालेले असतात, त्यामुळे खाजगी कारखान्यांबाबत विचार करण्यात येणार नाही.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, शासन सहकारी साखर कारखान्यांना अर्थसहाय्य करीत आहे. या वर्षीचा ऊसाचा हंगाम सुरु होणार आहे. त्या कारखान्यांनी अमूक हमी भाव द्यावा असे त्यांच्यावर बंधन घातले आहे काय आणि मराठवाडयामध्ये प्रत्येक साखर कारखान्याच्या कार्यक्षेत्रात अतिरिक्त ऊस शिल्लक राहणार आहे त्यासाठी शासनाचे काय धोरण राहणार आहे ?

श्री.जयप्रकाश दांडेगाकवकर : साखर कारखान्यांवर स्टॅच्यूटरी मिनिमम प्राईस देणे बंधनकारक आहे. प्रत्येक कारखान्याची एस.एम.पी. वेगळी निघते. त्याप्रमाणे प्रत्येक कारखान्याचा हमी भाव वेगळा असू शकतो. मराठवाडयात अतिरिक्त ऊस शिल्लक राहिला तर शेजारच्या कारखान्यांना ऊस वितरित करण्याचे आदेश काढले आहेत. परंतु तरीही दुर्दैवाने ऊस शिल्लक राहिला तर त्याबाबत नुकसान भरपाई देण्यात येईल.

------

3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ SBT/ KTG/

## दिग्रस (ता.यवतमाळ) नगरपालिका क्षेत्रातील पुरग्रस्तांचे पुनर्वसनाबाबत

**(३) * ३९८५२ श्री. जयंत प्र. पाटील , प्रा. शरद पाटील :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दिग्रस (ता.यवतमाळ) नगरपालिकेच्या क्षेत्रातील पुरग्रस्तांचे कायमस्वरुपी पुनर्वसन करण्याचा निर्णय दिनांक १ जानेवारी, २००८ रोजी राज्यमंत्री मंडळाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निर्णयानुसार ९५७ पुरग्रस्तांचे पुनर्वसन करण्यात येणार आहे, हे खरे आहे काय, असल्यास, याकरिता नगरपरिषदेने प्रकल्प अहवाल तयार करुन तो जिल्हाधिकारी यवतमाळ यांच्याकडे पाठविला असून जिल्हाधिकाऱ्याकडून सदरचा प्रकल्प अहवाल राज्य समितीकडे पाठविण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास,सदर अहवालातील प्रमुख बाबी कोणत्या आहेत व त्यावर कोणती कार्यवाही करण्यात आली आहे अथवा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, अहवालास विलंब होऊन अंमलबजावणी न होण्याची कारणे काय आहेत ?

**डॉ.पतंगराव कदम** : (१) होय, दिग्रस (ता.यवतमाळ) नगरपालिकेच्या क्षेत्रातील पूरग्रस्तांचे कायमस्वरूपी पुनर्वसन करण्याचा निर्णय शासन निर्णय क्रमांक पुनर्वसन -४७०६/ १२०२९९/ प्र.क्र.४५/ म-३ (विकाग), दिनांक २८ जानेवारी, २००८ अन्वये घेण्यात आला आहे,
(२) मुख्याधिकारी, नगरपरिषद, दिग्रस यांचे स्तरावर ९५७ पूरग्रस्तांचे पुनर्वसन करण्याबाबतचा प्रकल्प अहवाल तयार करण्याची कार्यवाही सुरू आहे.
(३) भूसंपादनाची कार्यवाही करावी लागेल. लाल व निळ्या पट्टयात येत असलेल्या बाधित कुटुंबाचे सर्वेक्षण करून अहवाल तयार करतांना एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रमातील निकषांप्रमाणे घरकुल व नागरी सुविधा ह्या बाबी अंतर्भूत करण्यात येतील.
(४) भूसंपादनाची कार्यवाही पूर्ण न झाल्याने प्रकल्प अहवाल सादर करण्यात विलंब होत आहे.

श्री.जयंत प्र.पाटील : हा प्रस्ताव तयार करुन केंद्र सरकारकडे पाठविला आहे काय, पाठविला नसल्यास किती दिवसात पाठविणार आहे ? भूसंपादनाचे काम किती दिवसात पूर्ण होईल आणि त्यानुसार पुढील कार्यवाही केली जाईल काय ?

डॉ.पतंगराव कदम : खास बाब म्हणून नगरपालिकेच्या हद्दीतील या दिग्रस गावासंबंधी निर्णय घेतला आहे. त्यासंबंधीचे विशेष आदेश मंत्रिमंडळाने दिले आहेत. परंतु नगरपालिकेने आमच्याकडे पैसा नाही, त्यामुळे सरकारने आम्हाला निधी द्यावा असे कळविले आहे. जिल्हाधिका-यांना आदेश दिला आहे.

नंतर श्री.शिगम

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

(ता.प्र.क्र. 39852...) (डॉ. पतंगराव कदम...)

ब्ल्यू लाईनच्या बाहेर जागा घ्यावी अशा प्रकारचे आदेश जिल्हाधिका-यांना दिलेले आहेत. त्याप्रमाणे त्या जमिनी घेण्याच्या संदर्भात जे पैसे लागणार आहेत त्या बाबतीत नगरपालिकांची आर्थिक कुवत नसेल तर आर्थिक तरतूद करावी अशा प्रकारच्या सूचना नगरविकास विभागाला देण्यात आलेल्या आहेत.

प्रा. बी.टी.देशमुख : पुनर्वसनासाठी जमिनीची निश्चिती केलेली आहे काय ? नसल्यास, ती केव्हा करण्यात येईल ?

डॉ. पतंगराव कदम : जमिनीची निश्चिती करण्यात आलेली नाही.

प्रा. बी.टी.देशमुख : भूसंपादनाची कार्यवाही पूर्ण न झाल्याने प्रकल्प अहवाल सादर करण्यास विलंब होत आहे असे प्रश्न भाग (4)च्या उत्तरामध्ये म्हटलेले आहे. मुलाचे नाव का ठेवले नाही ? तर, मुलगा झालेला नसल्यामुळे नाव ठेवलेले नाही. हे झाल्यानंतर ते, ते झाल्यानंतर ते, अशा पध्दतीने हे उत्तर दिलेले आहे. एक हजार लोकांच्या पुनर्वसनाचा प्रश्न आहे. माझे म्हणणे असे आहे की, भूसंपादनाची प्रक्रिया ही नंतर होते. त्याआधी जागेची निश्चिती ही ताबडतोबीने करण्याची गरज आहे. त्यासाठी जबाबदार अधिका-यांना निश्चित वेळ देऊन जागा निश्चित करण्याचे आदेश मंत्री महोदय देतील काय ? जागा निश्चिती किती दिवसात केली जाईल ?

डॉ. पतंगराव कदम : तेथे शासकीय जागा नाही. त्यामुळे दोन-तीन खाजगी लोकांशी संपर्क साधून त्यांच्याशी जिल्हाधिकारी चर्चा करीत आहेत. याबाबतीत मी आज सकाळी जिल्हाधिका-यांना बोलावून घेऊन त्यांच्याशी चर्चा केलेली आहे. सन्माननीय सदस्यांनी विचारल्याप्रमाणे 1 महिन्याच्या आत जागेचा प्रश्न निकाली काढावा असे आदेश देण्यात येतील.

श्री. गोपीकिसन बाजोरिया : अकोल्यामध्ये देखील पूर आला होता. तेथील लोकांचे पुनर्वसन करण्यात येईल असे शासनाने सांगितलेले असताना अजून पुनर्वसन झालेले नाही. डेव्हलपमेंट प्लॅनमध्ये नदीकाठचा जो भाग ब्ल्यू आणि रेड झोनमध्ये दाखविलेला आहे तो रिस्ट्रिक्टेड झोन आहे. तेव्हा तेथील लोकांच्या कायम स्वरुपी पुनर्वसनासाठी उपाययोजना करण्यात येणार आहे काय ?

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

(ता.प्र.क्र. 39852...)

डॉ. पतंगराव कदम : पूर्वी ब्ल्यू लाईन ठरलेली होती. परंतु गेल्या वर्षी अतिवृष्टी झाली आणि पूर आला. त्यामुळे जिल्हाधिका-यांना परत आदेश देण्यात आलेले आहेत की, या बाबतीत जलसंपदा विभागाचा सल्ला घेऊन एक लेटेस्ट प्लॅन करावा. कारण मागील दोन वर्षामध्ये ॲब्नॉर्मल पाऊस झाला. त्यामुळे ब्ल्यू लाईन तयार झाल्यानंतर प्रत्येक गावाचे कामयस्वरुपी पुनर्वसन करण्याच्यादृष्टीने विचार सुरु आहे. आदिवासी विभागातील गावांचे पुनर्वसन करावयाचे असेल तर आदिवासी विभाग पैशाची तरतूद करील, मागासवर्गीय वस्त्यांचे पुनर्वसन करावयाचे असेल तर समाजकल्याण विभाग तरतूद करील, अशा पध्दतीने केन्द्र आणि राज्य शासनाच्या ज्या ज्या योजना विविध खात्याकडून राबविल्या जातात त्या विभागामार्फत या लोकांचे कायमस्वरुपी पुनर्वसन केले जाईल.

----

**ता.प्र.क्र. 39386**

(सन्माननीय सदस्य अनुपस्थित)

-----

....3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**हिंगोली येथील बनावट शाळा दाखवून लाखो रूपयांचे अनुदान घेतल्याबाबत**

**(५) * ४०२५७ श्री. सुरेश जेथलिया , श्री. किसनचंद तनवाणी , डॉ. निलम गोऱ्हे :** सन्माननीय **सामाजिक न्याय व व्यसनमुक्ती कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली तालुक्यातील चिंचोली येथील ज्ञानसाधन शिक्षण प्रसारक मंडळाच्या नावे महात्मा फुले विद्यालय नावाची शाळा कागदोपत्री दाखवून मार्च, २००३ पासून शिष्यवृत्तीच्या नावाखाली लाखो रूपयांची लूट करण्यात आल्याचे शासनाच्या निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपनिर्दिष्ट बोगस शिक्षण संस्थेला बनावट कागदपत्रे तयार करुन लाखो रूपये अनुदान तेथील समाजकल्याण अधिकाऱ्यांवर व काही कर्मचाऱ्यांवर पोलिसांत गुन्हे दाखल करण्यात आले आहेत हे खरे काय,

(३) असल्यास, अनुदान बोगस दस्ताऐवज तयार करून लाटणाऱ्या सदर शिक्षण संस्थेच्या चालकांवर शासनाने काही कारवाई केली आहे काय ?

**ॲड. प्रितमकुमार शेगांवकर, श्री.चंद्रकांत हंडोरे यांच्याकरिता** : (१) होय.

(२) संबंधित दोषी अधिकारी/कर्मचारी यांचेविरुध्द फौजदारी गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

(३) संबंधित संस्थाचालकांविरुध्द फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

श्री. सुरेश जेथलिया : हिंगोली येथे बनावट शाळा दाखवून शासनाकडून घेतलेले अनुदान वसूल करण्यात येणार आहे काय ? अशा प्रकारे बनावट शिक्षण संस्था काढणा-या संचालकांना शोधून काढण्यासाठी शासन एखादी समिती स्थापन करणार आहे काय ? या शाळेचे संस्थाचालक कोण आहेत ? एकूण किती रकमेचा अपहार केलेला आहे ?

श्री. चंद्रकांत हंडोरे : हिंगोली या ठिकाणी अस्तित्वात नसलेल्या महात्मा फुले विद्यालय नावाची बोगस शाळा दाखवून शिष्यवृत्ती, वेगवगळे भत्ते असे मिळून 7 लाख 25 हजार रु. घेण्यात आलेले आहेत. या संबंधीची तक्रार आल्यानंतर विभागीय समाजकल्याण अधिका-यांनी त्या ठिकाणी जाऊन चौकशी केल्यानंतर 7 लाख 25 हजार रु.चा अपहार झाल्याचे लक्षात आले. त्याबाबतीत पोलीस स्टेशनवर गुन्हा दाखल करण्यात आला. या प्रकरणी संबंधित अधिका-या विरुध्द विभागीय चौकशीची कारवाई सुरु आहे.

...नंतर श्री. गिते....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 40257...

श्री. चंद्रकांत हंडोरे...

जो संस्था चालक आहे, त्यास अटक करण्यात आली आहे आणि तो अजूनही अटकेमध्ये आहे. सदर संस्था चालकाचे नाव श्री. भिसे असे आहे. सदर संस्था चालक गेल्या दोन महिन्यापासून अटकेत आहे. या संस्थेकडून शासनाच्या रक्कमेची निश्चितपणे वसुली केली जाईल.

श्री. राम पडांगळे : ही संस्था बोगस आहे असे आढळून आले आहे. संस्था बोगस असताना त्या संस्थेस शासनाचे अनुदान दिले जाते. सदर संस्था चालकाने बोगसगिरी केल्यामुळे ते अटकेमध्ये आहेत. परंतु ज्या अधिका-यांनी या संस्थेला अनुदान दिले, त्यांनी कोणत्या आधारावर या संस्थेला अनुदान दिले आहे. या बोगस संस्थेला अनुदान देणा-या अधिका-याला तुरुंगात टाकण्यात आले आहे काय ? जर त्यांना तुरुंगात टाकले नसेल तर त्यांना तुरुंगात टाकले जाईल काय ?

श्री. चंद्रकांत हंडोरे : सभापती महोदय, या प्रकरणी श्री.एस.एल.जाधव यांना निलंबित करण्यात आले आहे. समाजकल्याण विभागाचे अधिकारी होते त्यांना निलंबित करण्यात आले आहे. त्याचबरोबर गटशिक्षण अधिकारी श्री. आर.यू. घाडगे यांचे विरुध्द शिस्तभंगाची कारवाई करण्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांना सूचना देण्यात आल्या आहेत. श्री. देवसटवार, समाजकल्याण अधिकारी यांची बदली करुन त्यांचे विरुध्द शिस्तभंगाची कारवाई सुरु आहे. त्याचप्रमाणे श्रीमती देशमुख, अधीक्षक यांनाही निलंबित करण्यात आले आहे. श्री. कांबळे, शिपाई याने संस्था चालक श्री.भिसे यांना कागदपत्रे पुरविल्यामुळे त्यांना देखील निलंबित करण्यात आले आहे. त्याचबरोबर या कटकारस्थानामध्ये श्री.एम.बी.नाईक, वरिष्ठ लिपिक, श्री. कांदळकर, कनिष्ठ लिपिक, श्री. आंबोरकर, कनिष्ठ लिपीक यांचे विरुध्द चौकशी सुरु आहे. या अधिकारी आणि कर्मचा-यांनी अटकपूर्व जामीन मिळावा म्हणून उच्च न्यायालयामध्ये अर्ज केला होता. परंतु त्यांचा अर्ज उच्च न्यायालयाने फेटाळला आहे. संबंधित अधिकारी आणि कर्मचाऱ्यांविरुध्द पोलिसांनी कलम 468,420,404,201,व कलम 34 अन्वये खटला दाखल केलेला आहे. सदरहू खटला न्यायालयात दाखल करण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी, हिंगोली यांना सूचना देण्यात आल्या आहेत. क्लास-1 अधिका-यांविरुध्द खटला दाखल करण्यासबंधी मुख्य कार्यकारी अधिकारी यांना परवानगी दिली जाईल.

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र.पाटील : या शाळेला परवानगी दिल्यानंतर हे प्रकरण उघडकीस येईपर्यंत त्या शाळेला किती अधिका-यांनी भेटी दिल्या ? या संस्थेला अधिका-यांनी भेटी दिल्यानंतर त्यांना अशा प्रकारचे दोष आढळून आले नाहीत काय ? या संस्थेचे इन्स्पेक्शन करताना ज्या अधिका-याने या संस्थेचे दोष दाखविले नाहीत, त्या अधिका-यांविरुध्द कारवाई केली जाईल काय ?

श्री. चंद्रकांत हंडोरे : या सगळया अधिका-यांवर कारवाई सुरु आहे.

-----------

**<u>तारांकित प्रश्न क्रमांक 41293</u>**

( सन्माननीय सदस्य अनुपस्थित. )

-----------

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**मौजे कुसगाव बु.(ता. मावळ, जिल्हा पुणे) येथील मानीव राखीव वन म्हणून निहीत केलेली जमिनी वनेत्तर कामांसाठी वापरण्यात येत असल्याबाबत**

**(७) * ४१५९९ श्री. अरविंद सावंत :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे कुसगाव बु.ता. मावळ, जि.पुणे येथील गट नं ३०९ (स.नं. १२७/१२८), ३१० (स.नं.१२९), ३११ (स.नं.१३०/५) मधील जमिनी मुळ मालक श्री. पुरुषोत्तम बापे, यशवंत बाणसे श्री. दगडू गुंड यांची असून सदरची जमिन भारतीय वन अधिनियम १९२७ च्या कलम ३५ अन्वये महाराष्ट्र खाजगी वन (अधिनियम) १९७५ नुसार शासनाकडे मानीव राखीव वन म्हणून निहित झालेली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ही जमीन अध्यक्ष श्री.एन.एम.नवले, सिंहगड टेक्नीकल एज्युकेशन सोसायटी यांनी दिनांक १८ सप्टेंबर, २००२ रोजी खरेदी केली, हे ही खरे आहे काय,

(३) सदर जमिनीचा दर्जा निम राखीव वन असल्याने वनेत्तर कामे करावयाची असल्यास केंद्र शासनाकडे वन (संवर्धन) अधिनियम १९८० अंतर्गत पूर्व परवानगी घेणे आवश्यक असते, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले आहे व तद्नुसार कोणती कारवाई करण्यात आली आहे अथवा येत आहे ?

**श्री.बबनराव पाचपुते** : (१), (२), (३) व (४) प्रश्नांकित क्षेत्रास भारतीय वन अधिनियम १९२७ च्या कलम ३५ (३) च्या नोटीसी लागल्यामुळे सदरचे क्षेत्रास महाराष्ट्र खाजगी वने (संपादन) अधिनियम १९७५ च्या तरतुदीनुसार मानीव राखीव वनांचा दर्जा प्राप्त झाला आहे. सदरचे क्षेत्र अध्यक्ष, सिंहगड टेक्नीकल एज्युकेशन सोसायटी यांनी दिनांक १८.९.२००२ रोजी खरेदी केले आहे. सदर क्षेत्रावर वनसंवर्धन अधिनियम १९८० च्या तरतुदीनुसार केंद्र शासनाच्या मंजूरी शिवाय वनेत्तर कामे करता येत नाहीत. तथापि, सिंहगड टेक्नीकल एज्युकेशन सोसायटी यांनी सदर क्षेत्रावर केंद्र शासनाची परवानगी न घेता सन २००४ मध्ये वनेत्तर कामे केली आहेत. त्याविरुद्ध वन गुन्हा नोंदविला असून, क्षेत्रीय वन अधिकाऱ्यांकडून अतिक्रमण निष्कासनाबाबत नोटीस दिली आहे.

४...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सदर नोटीसीस उप आयुक्त, पुणे यांनी स्थगिती दिली आहे. सदर स्थगिती हटवून वन अधिनियमाचे भंग करणारे अतिक्रमण काढून टाकण्याबाबत प्रयत्न सुरु आहेत. प्रकरण न्यायालयात प्रलंबित आहे.

सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने उत्तरामध्ये थोडी दुरुस्ती करु इच्छितो. उत्तराच्या शेवटच्या तिसऱ्या ओळीमध्ये "उप आयुक्त " असे छापले आहे. त्याऐवजी "अपर आयुक्त" असे वाचावे.

**उपसभापती** : ठीक आहे.

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, हा विषय मी वारंवार सभागृहात उपस्थित केला आहे. दांभिकपणाचा कळस असे या ठिकाणी विभागाने उत्तर दिलेले आहे. या संस्थेने वन विभागाच्या किती क्षेत्रफळावर अतिक्रमण केलेले आहे? या संस्थेचे अध्यक्ष कोण आहेत ? अपर आयुक्त, पुणे यांनी स्थगिती दिली होती. त्या स्थगितीसंबंधीची कागदपत्रे माझ्याकडे उपलब्ध आहेत. त्या स्थगिती आदेशात असे म्हटले आहे की, चालू असलेली बांधकामे बंद करणेबाबत सांगण्यात आले आहे. अपर आयुक्तांनी ४ जानेवारी, २००५ रोजी स्थगितीसंबंधीचा निर्णय दिलेला आहे.

यानंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.41599

श्री. अरविंद सावंत...

निर्णय दिल्यानंतर सुध्दा सिंहगड एज्युकेशन सोसायटीने बेदरकारपणे बांधकाम चालू केले आणि प्रचंड मोठी अशी इमारत उभी केली. म्हणून माझा प्रश्न असा आहे की, अप्पर आयुक्त, पुणे यांनी जी स्थगिती दिलेली आहे ती स्थगिती उठविण्याबाबत शासन प्रयत्न करणार आहे काय ?

श्री. बबनराव पाचपुते : सभापती महोदय, ही गोष्ट खरी आहे की बांधकाम झालेले आहे. परंतु वनखात्याच्या जागेवर झालेले नाही. ही खाजगी जमीन होती त्या जमिनीला 35(3) कलमाप्रमाणे नोटीस बजावण्यात आली आणि ते खाजगी वन म्हणून जाहीर झाले. बांधकाम चालू आहे. स्थगिती उठविण्याचे प्रयत्न सुरु आहेत. कोर्टात प्रकरण गेले आहे. वन खात्याने राखून ठेवण्याची जागा नाही. सुरुवातीला डीएफओ यांनी नोटीस दिली त्यानंतर ते प्रकरण कोर्टात गेले. जिल्हाधिकाऱ्यांनी आपल्या बाजूने निकाल दिला. नंतर अप्पर आयुक्तांनी त्याला स्थगिती दिली. नंतर प्रकरण हायकोर्टात गेले. हायकोर्टाने त्यांचा दावा फेटाळला. त्यानंतर सिव्हील ॲप्लीकेशन क्रमांक 228/2006 केले गेले. त्यानंतर रेव्हेन्यू ॲप्लीकेशन केले. स्टे उठविण्याचा प्रयत्न चालू आहे.

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, रेव्हेन्यू ॲप्लीकेशन किती तारखेला करण्यात आले ? खरे म्हणजे हे सगळे दांभिक उत्तर दिलेले आहे. वनक्षेत्रपालांचे मी कौतुक करतो त्यांनी तातडीने कारवाईची नोटीस दिली. 2002 सालातील हे प्रकरण आहे. आज आपण 2008 मध्ये आहोत. त्याठिकाणी पॅलेससारखी इमारत उभी राहिली आहे. या संस्थेमध्ये आता शिक्षणाचा व्यवसाय सुरु आहे. जोपर्यंत या प्रकरणाचा निकाल लागत नाही तोपर्यंत या सर्व गोष्टी तातडीने थांबविणाल्या जाणार आहेत काय ?

श्री. बबनराव पाचपुते :सभापती महोदय, 20/4/2006 रोजी अंतरिम निकाल दिला असून त्यानंतर कॅव्हेट दाखल करण्यात आले आणि त्यानंतर सिव्हील सूट दाखल करण्यात आला. वकीलाने सांगितले की सिव्हील सूट बरोबर नाही स्थगिती देऊ नये.स्थगिती उठविण्याचे प्रयत्न चालू आहेत. कोर्टात दोन तारखा पडल्या होत्या. आणखी एका तारखेला या केसचा निकाल लागेल. सभापती महोदय, हे प्रकरण जुने आहे या जुन्या प्रकरणामध्ये वन खात्याने सतर्कतेने भूमिका घेतलेली आहे. सुरुवातीला नोटीस दिलेली होती. 2003 साली पहिली नोटीस दिली. ज्या

.....3



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.41599 पुढे सुरु....

श्री. बबनराव पाचपुते....

प्रमाणे कोर्टाचा निकाल लागत गेला त्यानुसार आपण पुढे पुढे गेलो आहोत. हायकोर्टात सिव्हील सूट आहे त्याबाबत सुध्दा शासनाने अत्यंत गांभीर्याने दखल घेतलेली आहे.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, आपण हा सर्व प्रकार ऐआयसीटीई या दिल्लीच्या संस्थेला कळवून ज्यांनी या टेक्नीकल एज्युकेशन संस्थेला मान्यता दिली त्यांना सांगून या संस्थेची मान्यता शासन काढून घेणार आहे काय ? टेक्नीकल एज्युकेशन संस्थांना मान्यता देतात ती संस्था दिल्लीमध्ये आहे. त्यांना शासन कळवू शकते की ही संस्था अनधिकृत आहे. अशा प्रकारे दिल्लीच्या संस्थेला कळवून या संस्थेची मान्यता रद्द करणार काय ?

नंतर श्री.भोगले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.41599............

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, ही जमीन खाजगी वन जमीन आहे. खाजगी शेतकऱ्याची जमीन आहे. त्या जमिनीला 35(3) सेक्शन लावले असून नोटीस देऊन वनसदृश जमीन जाहीर केली आहे. खाजगी वन जमिनीवर वनेतर काम करावयाचे असेल तर त्यासाठी सी.एस.सी.ची परवानगी घ्यावी लागते. सी.एस.सी.ची परवानगी न घेता बांधकाम केले आणि नियमाचा भंग केला म्हणून 2004 साली नोओीस दिली. 2004 पासून हे प्रकरण चालू आहे. कोर्टात स्थगिती आहे ती उठविण्यासाठी आम्ही प्रयत्न केला नाही असे नाही. त्यांनी कॅव्हेट दाखल केल्यानंतर आम्ही कोर्टात गेलो आहे. कोर्टात आमचा से दिला असून हिअरिंग करुन निकाल द्यावा अशी मागणी केली आहे. निकाल आल्यानंतर संस्था वरच्या कोर्टात जाणार असेल तर लगेच कारवाई होणार नाही. संस्थेची मान्यता काढून घेण्याबाबत एआयसीटीईला कळवावे असे सांगण्यात आले. त्या संस्थेला परिस्थितीप्रमाणे कळविण्याची आमची तयारी आहे. आठ दिवसात आम्ही कळवू.

श्री.राम पंडागळे : सभापती महोदय, शिक्षण संस्थेच्या इमारतीचा प्रश्न असला तरी तेथे हजारो शेतकऱ्यांची, गोरगरिबांची मुले शिक्षण घेत आहेत. एका बाजूला मुंबई शहरामध्ये असा प्रश्न निर्माण झाल्यानंतर हीच मंडळी बोर्ड लावतात, जाये तो जाये कहॉ? गरीब मुले निराधार होऊ नयेत म्हणून एका बाजूला प्रयत्न करायचा आणि सभागृहात मात्र शेतकऱ्यांच्या मुलांना हुसकावून लावण्याची भूमिका घ्यायची. माननीय मंत्रीमहोदय, जी मुले शिक्षण घेत आहेत त्यांना शिक्षणापासून वंचित करणार नाही अशा प्रकारचा प्रयत्न करणार आहात का?

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, प्रश्न काय आहे हे समजून घेण्याची गरज आहे. ही जमीन खाजगी वन जमीन आहे. त्या जमिनीवर वनेतर कामे करावयाची असतील, कोणतीही कामे करावयाची असतील तर त्या कामासाठी परवानगी घेण्याची आवश्यकता आहे. अशी परवानगी घेतली नव्हती ही वस्तुस्थिती आहे. अशाच प्रकारचा प्रश्न मुलुंड आणि ठाणे येथे निर्माण झाला आहे. या संदर्भात महाराष्ट्राच्या कॅबिनेटने निर्णय घेतला. झालेली कामे नियमित करावयाची आहेत. चुकीचे काम केले असेल तर दंड आकारुन सवलत देता येते. 1.10 लाख फ्लॅटच्या संदर्भात जे धोरण स्वीकारले तशा प्रकारचे धोरण या प्रकरणी घ्यावे लागेल. दंड वसूल करणे आणि कारवाई करणे ही दोन्ही कामे करु.

..2..

ता.प्र.क्र.41599...............

श्री.अरविंद सावंत : अनधिकृत बांधकाम करताना माननीय वनमंत्र्यांनी डोळे झाकले याचा निषेध करुन मी सभात्याग करीत आहे.

(सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत यांनी बहिर्गमन केले)

----------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**<u>पॉईंट ऑफ इन्फर्मेशनसंबंधी</u>**

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी आज जो ड्रेस घातला आहे त्यामागची भूमिका काय आहे?

श्री.दिवाकर रावते : आज शेतकऱ्यांच्या प्रश्नावर, कर्जमाफीच्या प्रश्नावर, सावकारीच्या प्रश्नावर चर्चा केली जाणार आहे. शासनाला आजच्या दिवशी त्याची आठवण रहावी म्हणून हा ड्रेस घातला आहे.

श्री.जैनुद्दीन जव्हेरी : सावकार कोण आहेत?

श्री.दिवाकर रावते : काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसचेच सावकार आहेत. यादी पाहिजे असेल तर मी देण्यास तयार आहे. पुढील प्रश्न जो चर्चेला येणार आहे तो एसईझेडच्या नावाखाली शेतकऱ्यांना उद्ध्वस्त करण्याच्या संदर्भातील प्रश्न आहे.

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी पुढील प्रश्न पुकारावा.

--------

(नंतर श्री.जुन्नरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**अलिबाग जिल्ह्यातील पेण, पनवेल व उरण तालुक्यातील ४५ गावांना नागरी सुविधा देण्यासाठी रिलायन्स कंपनीने दिलेल्या ९० कोटी रूपयांच्या पॅकेजबाबत**

**(८) * ४०४९१ श्री. दिवाकर रावते :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शेतकऱ्यांच्या महामुंबईला असणारा विरोध संपविण्यासाठी रिलायन्स कंपनीने पेण, पनवेल, उरण तालुक्यातील सुमारे ४५ गावांना नागरी सुविधा पुरविण्यासाठी ९० कोटी रुपयांचे पॅकेज मंजूर केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ९० कोटी रुपयांच्या रक्कमेचा विनियोग लवकर करण्यासाठी जिल्हाधिकारी रायगड कार्यालयाने सर्वे सुरु केला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, पेण, पनवेल व उरण तालुक्यातील ४५ गावांना नागरी सुविधा देण्यासाठी रिलायन्स कंपनीने पूर्ण तयारी दर्शविली आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, रिलायन्सच्या ९० कोटी रुपयांच्या पॅकेजबाबत शासनाने काही निर्णय घेतला आहे काय, असल्यास तो कोणता ?

**डॉ.पतंगराव कदम** : (१) होय.

(२) प्रकल्पामुळे बाधित होणाऱ्या प्रकल्पग्रस्तांचे बेसलाईन सर्व्हे करण्यासाठी शासनाने मिटकॉन या संस्थेची नियुक्ती केलेली आहे.

(३) होय.

(४) कंपनीच्या योजनेस महाराष्ट्र राज्य पुनर्वसन प्राधिकरणाने तत्वत: मान्यता दिलेली आहे. ४५ गावांत असलेल्या नागरी सुविधा उंचावणे व ज्या सुविधा नाहीत त्या पुरविण्यासाठी रूपये ९० कोटीची योजना पुनर्वसन पॅकेजमध्ये समावेश केला आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, रिलायन्स कंपनीने 90 कोटी रुपयांचे पॅकेज दिले आहे. पहिल्यांदा या ठिकाणच्या 42 गावांना बाजूला काढले असून या 42 गावांचा या प्रकल्पाला विरोध आहे त्यामुळे शासन यासंदर्भात नेमकी काय भूमिका घेणार आहे तसेच रिलायन्स कंपनीच्या संदर्भात या ठिकाणी काय परिस्थिती आहे याची माहिती द्यावी ?

डॉ. पतंगराव कदम : सभापती महोदय, शासनाने एसईझेडच्या संदर्भात धोरण जाहीर केलेले असून शेतक-यांची एसईझेडसाठी जमीन देण्याची तयारी असेल व कंपनीच्या पॅकेजला सहमती असेल तर सरकारचा त्यामध्ये संबंध येणार नाही. राज्य पुनर्वसन प्राधिकरणासमोर पॅकेज ठेवण्यात आले असून त्यासंदर्भात कमिशनर आणि कलेक्टर मार्फत पैकेज दिले जाईल. लोकांचे म्हणणे काय आहे हे समजून योग्य तो निर्णय घेतला जाईल. लोकांचा विरोध असेल तर सरकार कोणतीही कार्यवाही करणार नाही.

...2



अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र. : 40491** .......

श्री. जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, या सभागृहामध्ये राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी सिंचनाखालील जमिनी घेतल्या जाणार नाहीत, अशा ठिकाणी कोणतेही पॅकेज दिले जाणार नाही अशा प्रकारचे आश्वासन त्या ठिकाणच्या शेतक-यांना दिले होते. त्यानंतर आम्ही माननीय मुख्यमंत्री महोदयांची भेट घेतली होती त्यावेळी त्यांनी सिंचनाखालील जमिनी घेतल्या जाणार नाहीत असे सांगितले असतांना आता या ठिकाणी रिलायन्स कंपनी कशी काय पॅकेज देत आहे? यामध्ये कशासाठी वेळ घालवला जात आहे ? एका बाजूला एक सांगावयाचे आणि दुस-या बाजूला दुसरेच सुरु ठेवायचे असा प्रकार सुरु असल्यामुळे शासनाची यासंदर्भात नेमकी भूमिका काय आहे?

डॉ. पतंगराव कदम : सभापती महोदय, केंद्रीय ॲक्ट प्रमाणे पुनर्वसनाचे धोरण आहे तसेच महाराष्ट्र राज्याच्या कायद्या प्रमाणे सुध्दा पुनर्वसनाचे धोरण आहे. यासंदर्भात शासनाने कोणतीही कारवाई सुरु केलेली नाही. रिलायन्स कंपनीकडून पॅकेज आले होते त्याची नोंद घेऊन कलेक्टर आणि कमिशनर यांना सांगण्यात आले होते की, संबंधित पॅकेज लोकांच्या समोर ठेवा. त्यामुळे लोकांचे म्हणणे ऐकल्यानंतरच विचार करण्यात येईल. या क्षणाला या विषयाच्या संदर्भात शासनाने कोणतीही कार्यवाही केलेली नाही.

श्रीमती मंदा म्हात्रे : सभापती महोदय, उत्तरामध्ये म्हटले आहे की, 45 गावात असलेल्या नागरी सुविधा उंचावणे व त्या ठिकाणी ज्या सुविधा नाहीत त्या पुरवण्यासाठी 90 कोटी रुपयांच्या योजनेचा पुनर्वसन पॅकेजमध्ये समावेश केला आहे. खरे म्हणजे शेतक-यांच्या जीवाशी खेळण्याचाच हा प्रकार आहे. 45 गावांना 90 कोटी रुपये देणे म्हणजे प्रत्येक गावाला 2 कोटी रुपये दिले जातील त्यामुळे या 2 कोटी रुपयांमध्ये आपण या गावांना काय सुविधा देणार आहात ? मला शासनाला विचारावयाचे आहे की, हा प्रकल्प रिलायन्स आणणार आहे त्यामुळे हा प्रकल्प थांबवण्यात येईल काय ?

डॉ. पतंगराव कदम : सभापती महोदय, या लोकांना पॅकेज पाहिजे की नाही, त्यांची एसईझेडला संमती आहे की नाही, हे तपासले जाईल आणि त्यानंतर पुढचा निर्णय घेतला जाईल. 2 कोटी रुपये द्यावयाचे की, अजून द्यावयाचे यासंदर्भात गावाचा निर्णय झाल्यानंतर पुढचा निर्णय घेण्यात येईल.

---------------------------



अप्रकाशित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**घोलवड (ता.डहाणू, जि.ठाणे) टोकेपाडा सर्वे नं. १५९ च्या सरकारी खाजण जमिनीवर करण्यात आलेले अतिक्रमण**

**(९) * ३८१५९ श्री. संजय दत्त , श्री. गोविंदराव आदिक , श्री. शरद रणपिसे , श्री. सुरेशदादा देशमुख , श्री. प्रतापसिंह मोहिते-पाटील :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) घोलवड (ता.डहाणू, जि.ठाणे) टोकेपाडा येथील सर्वे नं.१५९ मधील सरकारी महसूल खात्याची सरकारी खाजण जमिनीवर दलालीचा व्यवसाय करणाऱ्यांनी अतिक्रमण करुन महसूल खात्याची व ग्रामपंचायतीची दिशाभूल करुन जमीन हडप करण्याचे प्रयत्न सुरु असल्याची तक्रार तेथील सामाजिक कार्यकर्ते श्री.दत्तात्रेय इंदुलकर यांनी मा.महसूल मंत्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई व अन्य सर्व संबंधितांकडे माहे ऑक्टोबर, २००७ च्या पहिल्या आठवड्यात वा त्या सुमारास करण्यात आलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू जमीन घोलवड-डहाणू या रस्त्याच्या विकासासाठी संपादित करण्यात आली असून तथाकथित दलाली व्यावसायिक खातेदाराने ७/१२ च्या उताऱ्याच्या आधारे समुद्र किनारी टोकेपाडा खाडी जवळील खाजण जमिनीवर आपला मालकी हक्क प्रस्थापित केलेला आहे, हे खरे आहे काय,

(३) तसेच खाडीजवळच्या जमिनीवर भराव टाकल्यामुळे खाडीचे पात्र अरुंद होऊन तेथे राहणाऱ्या आदिवासी वस्तीला त्याचा धोका निर्माण झालेला आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीत काय निष्पन्न झाले,

(५) तसेच सरकारी खाजण जमिनीवर अतिक्रमण करुन जमीन हडप करणाऱ्या संबंधित दलालाविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे आणि भविष्यात सदरहू जागेवर अतिक्रमण होऊ नये म्हणून कोणती ठोस उपाययोजना केलेली आहे ?

**श्री.नारायण राणे** : (१) तहसिलदार डहाणू यांचेकडे दिनांक २७/९/२००७ ची तक्रार प्राप्त झाली आहे.

(२) व (३) नाही.

(४) होय, मौजे घोलवड, टोकेपाडा येथील स.नं.१५९ मधील जमीन सरकारी नसून खाजगी मालकीची आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

श्री. सुरेशदादा देशमुख : सभापती महोदय, शासनाच्या उत्तराने माझे समाधान झालेले आहे.

-----------

...4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**दोडामार्ग (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यातील कळणे, फोंड्ये येथील डोंगरातील खनिजासाठी असलेली माती गोवा येथे विनापरवानगी नेत असल्याबाबत**

**(१०) * ४०१९६ श्री.परशुराम उपरकर :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दोडामार्ग (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यातील कळणे, फोंड्ये येथील डोंगरातील एका ठिकाणची खनिजसाठी असलेली माती गेल्या काही दिवसांपासून गोवा येथील काही जण विनापरवानगी काढून गोवा या ठिकाणी नेत असल्याचे माहे डिसेंबर, २००७ च्या सुमारास उघडकीस आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास त्यात काय आढळून आले आहे,

(३) तद्नुसार पुढे कोणती कारवाई करण्यात आली आहे अथवा येत आहे ?

**श्री.नारायण राणे** : (१), (२) व (३) दोडामार्ग तालुक्यातील मौजे कळणे गावात अनधिकृत मातीचे उत्खनन झालेले नाही. मौजे फोंड्ये गावात मातीचे अनधिकृत उत्खनन झाल्याचे नोव्हेंबर, २००७ मध्ये आढळून आले आहे. अनधिकृत माती उत्खननाबाबत श्री.शंकर जयंत नाईक यांच्याकडून रु. १६,८००/- इतकी दंडाची रक्कम वसूल करण्यात आली आहे.

श्री. परशुराम उपरकर : सभापती महोदय, सिंधुदुर्ग जिल्हयात खनिज मिळत असल्यामुळे मातीच्या नावावर या ठिकाणचे खनिज गोव्याला नेले जात आहे. ज्यांनी मातीच्या नावावर खनिज काढलेले आहे त्यांच्यावर शासन काय कारवाई करणार आहे ?

श्री. नारायण राणे : सभापती महोदय, या प्रश्नाच्या संदर्भात कळणे आणि फोंडये या दोन गावातून उत्खनन करण्याची कोणतीही परवानगी देण्यात आलेली नाही. फोंडये या गावात माती उत्खनाचे काम करणा-या एका गाडीवर कारवाई करुन त्यांच्याकडून 16,800 रुपये दंड वसूल करण्यात आलेला आहे. परवानगी न घेता जे उत्खनन करतात त्यांच्यावर सिंधुदुर्गमध्ये कारवाई सुरु आहे. कळणे गावात उत्खननाची कोणतीही परवानगी देण्यात आली नसून या ठिकाणी उत्खनन झालेले नाही.

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

ता.प्र.क्र.40196..

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, सिंधुदूर्ग जिल्हयातील दोडा मार्ग येथे विना परवानगीने खनिजाचे उत्खनन करण्यासबंधी हा प्रश्न विचारण्यात आलेला आहे. या निमित्ताने मला माननीय मंत्री महोदयांना असा प्रश्न विचारावयाचा आहे की, सावंतवाडी तालुक्यातील साटेली गावामध्ये देखील काही ठिकाणी बेकायदेशीरपणे उत्खनन सुरु आहे. खनिजाच्या चो-या करणे, दुस-याच्या जमिनीत जबरदस्तीने घुसून खनिजाचे उत्खनन करणे या प्रकारामुळे तेथे मारामा-या होतात तसेच काही प्रकरणात फौजदारी गुन्हे नोंदविण्यात आलेले आहेत याची माहिती माननीय मंत्री महोदयांना आहे काय ? त्या ठिकाणी असे प्रकार घडत असल्यामुळे त्याला ताबडतोबीने आळा घालण्याचा प्रयत्न केला जाईल काय ?

श्री.नारायण राणे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी यांनी विचारलेला उपप्रश्न हा मूळ प्रश्नापेक्षा वेगळा आहे तरीसुध्दा मी त्या प्रश्नाचे उत्तर देऊ इच्छितो. सन्माननीय सदस्यांनी विचारल्याप्रमाणे ती माहिती आता माझ्याकडे उपलब्ध नाही. परंतु त्यांनी या ठिकाणी जी माहिती दिलेली आहे त्या माहितीच्या आधारे संपूर्ण चौकशी केली जाईल आणि तसे होत असेल तर योग्य ती कारवाई केली जाईल.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## धामणगांव रेल्वे (ता.सालनापूर, जि.अमरावती) येथील मुख्य रस्त्यावरील नाल्यावर बांधण्यात आलेले नवीन बांधकाम कोसळल्याबाबत

**(११) * ३८५०६ डॉ. वसंत पवार , श्री. रणजितसिंह मोहिते-पाटील , श्री. सुधाकर गणगणे , श्री. संजय दत्त , श्री. गोविंदराव आदिक , श्री.जैनुद्दीन जव्हेरी** : सन्माननीय **सामाजिक न्याय व व्यसनमुक्ती कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धामणगांव रेल्वे (ता.सालनापूर, जि.अमरावती) येथील मुख्य रस्त्यावरील नाल्यावर दिनांक १६ डिसेंबर, २००७ रोजी बांधण्यात आलेले नवीन बांधकाम दिनांक २६ डिसेंबर, २००७ मध्ये कोसळले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या कामात कंत्राटदराने मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार केला असून याची चौकशी करण्याची मागणी स्थानिक वासियांनी ग्राम पंचायत (सावला) तहसिलदार (धामणगांव रेल्वे) जिल्हापरिषद (अमरावती) तसेच जिल्हाधिकारी (अमरावती) यांच्याकडे दिनांक २७ डिसेंबर, २००७ रोजी वा त्या सुमारास निवेदनाद्वारे केली आहे,हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत उक्त निवेदनाच्या अनुषंगाने यासंदर्भात चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार संबंधितांविरुध्द पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**ॲड.प्रितमकुमार शेगावकर, श्री.चंद्रकांत हंडोरे यांच्याकरिता** : (१) अंशत: खरे आहे. सदरच्या ठिकाणी मुख्य रस्त्यावरील नालीवर रपट्याचे बांधकाम करण्याकरीता काँक्रीटचे तीन दगड बाजूला करण्यात आले होते. ते काँक्रीट दगड नालीवर टाकत असतांना त्यातील एक दगड फुटला होता.

(२) व (३) तक्रार प्राप्त झाली नाही. तथापि, दिनांक १.३.२००८ रोजी संबंधित गट विकास अधिकारी व उपअभियंता यांनी प्रत्यक्ष जागेवर जावून चौकशी केली असता, नालीच्या रपट्यावरील एक काँक्रीटचा दगड फुटल्याचे निदर्शनास आल्यामुळे काँक्रीट दगडा ऐवजी काँक्रीट स्लॅब टाकून नालीवरील रपट्याचे कायमस्वरुपी काम करण्यात आले आहे.

(४) नालीवरील रपट्याचे बांधकाम पूर्ण झाल्यामुळे व गावांतील नागरिकांची तक्रार नसल्याने कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

डॉ.वसंत पवार : सभापती महोदय, धामणगाव रेल्वे येथील मुख्य रस्त्यावरील नाल्यावर दिनांक १६ डिसेंबर २००८ रोजी बांधकाम करण्यात आले होते आणि ते २६ डिसेंबर २००८ रोजी कोसळले म्हणजेच दहा दिवसात हे बांधकाम कोसळले आहे.तेथील एक दगड फुटला व नवीन कॉक्रिटीकरण करण्यात आले. शेवटच्या उत्तरात असे म्हटलेले आहे की, " या बाबतीत गावातील नागरिकांची तक्रार नसल्याने कारवाई करण्याचा प्रश्न उदभवत नाही."या प्रकरणी स्थानिक लोकांनी तक्रार करुनसुध्दा चौकशी करण्यात आलेली नाही तसेच हे काम करणा-या कंत्राटदाराविरुध्द

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कोणतीही कारवाई करण्यात आली नाही. मला असा प्रश्न विचारावयाचा आहे की, या कंत्राटदाराने भ्रष्टाचार केला म्हणून त्याच्याविरुध्द कारवाई करण्यात येणार आहे काय तसेच जे बांधकाम करण्यात आलेले आहे त्या बाबतीत क्वालिटी कन्ट्रोलकडून सर्टिफिकेट घेण्यात आलेले आहे काय ? काँक्रिटीकरण करण्यासाठी जो जादा खर्च झाला होता तो सरकारने केला की कंत्राटदाराने केला होता ?

ॲड.प्रितमकुमार शेगावकर : सभापती महोदय, या सदंर्भात कोणीही तक्रार केलेली नाही त्यामुळे चौकशी करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. त्याचबरोबर हे काम पूर्ण झालेले आहे . एक लाख रुपयांच्या कामाला मंजुरी देण्यात आली होती आणि ग्रामपंचायतीने हे काम केलेले आहे त्यामुळे या कामाची चौकशी करण्याचा प्रश्न येत नाही. दुसरी गोष्ट अशी की, कंत्राटदाराने जादा कामाचा खर्च केलेला असल्यामुळे त्याच्या विरुध्द कारवाई करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

**उपसभापती** : रपटे म्हणजे काय ?

श्री.चंद्रकांत हंडोरे :सभापती महोदय, त्या ठिकाणी रस्त्यावरील नाल्याचे काम सुरु आहे त्या नाल्यावर जे धापे टाकले जातात त्याला रपटे म्हणतात. त्या ठिकाणी तीन सिमेन्टचे धापे टाकले होते. त्यातील एक सिमेन्टचा धापा तुटला होता त्यामुळे लोकांनी तसे सांगितले होते. एका धाप्यासाठी म्हणजे तीन हजार रुपयांच्या कामासाठी सात आठ सन्माननीय सदस्यांनी हा प्रश्न विचारला आहे.

----- '

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**मौजा पहाट फरिद गिरड (ता.समुद्रपूर, जि.वर्धा) येथील प्रसिध्द धार्मिक यात्रास्थळी वन विभागाने वायरलेस रिपिटरचे बांधकाम केल्याबाबत**

**(१२) * ४०३३२ श्री.जैनुद्दीन जव्हेरी** : सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजा पहाट फरिद गिरड (ता.समुद्रपूर, जि.वर्धा) येथील प्रसिध्द धार्मिक यात्रास्थळी वन विभागाने वायरलेस रिपिटरच्या बांधकामाला सुरुवात केली असता तेथील दर्गाच्या अध्यक्षांनी, नागरीकांनी व स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २० जुलै, २००७ रोजी केलेल्या तक्रारीवरुन मा.वने मंत्री यांनी उपवनसंरक्षक, वन विभाग, वर्धा यांना दिनांक २१ व २३ जुलै, २००७ रोजी सदरहू बांधकामास स्थगिती आदेश दिले आहेत, हे खरे आहे काय,
(२) याबाबत उपवन सरंक्षक, वन विभाग, वर्धा यांनी स्थगिती पूर्वीच बांधकाम पूर्ण झालेले आहे अशी शासनाची दिशाभूल करुन खोटी माहिती दिलेली आहे, हे खरे आहे काय,
(३) सदरहू वायरलेस रिपीटर दर्गाहच्या मुख्य प्रवेश द्वारापासून याच टेकडीवर इतरत्र हलविण्याबाबत शासनाने कोणती कारवाई केलेली आहे,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीत काय निष्पन्न झाले,
(५) तसेच याबाबत ज्या अधिकाऱ्यांनी मा.मंत्री महोदयांचे आदेश डावलले त्या संबंधीत अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे ?

**श्री.बबनराव पाचपुते** : (१) हे खरे आहे.(२) हे खरे नाही, वायरलेस रिपिटरचे बांधकाम दिनांक १६/३/२००७ ते दिनांक ३१/३/२००७ या कालावधीत करण्यात आले आहे तर मा.मंत्री (वने) यांनी दिनांक २०/७/२००७ अन्वये स्थगिती दिली आहे.
(३) व (४) सध्या रिपिटर हलविण्यात आलेले नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.जैनुद्दीन जव्हेरी : सभापती महोदय, या संदर्भात नागरिकांनी व स्थानिक लोकप्रतिनिधींनी 20 जुलै 2007 रोजी तक्रार केली होती व त्यानंतर माननीय वन मंत्र्यांनी बांधकामास स्थगिती दिली होती काय या प्रश्नाला " होय " असे उत्तर देण्यात आलेले आहे त्यानंतर दुसरा प्रश्न असा विचारण्यात आला होता की, स्थगिती दिल्यानंतर हे काम कसे झाले ? त्या प्रश्नाला असे उत्तर देण्यात आले होते की," दिनांक 20.7.2007 ला स्थगिती दिली आणि 16.3.2007 ते 31.3.2007 पर्यंत काम करण्यात आलेले आहे." परंतु ही वस्तुस्थिती खरी नाही याबाबत. लोकप्रतिनिधींनी, नगरपालिकेच्या अध्यक्षांनी तक्रार केली होती. या ठिकाणी सर्व धर्मियाचे लोक जात असतात. ही गोष्ट माननीय मंत्री महोदयांनादेखील माहीत आहे. माननीय मंत्री महोदयांनी या कामाला पहिल्यांदा स्थगिती दिली होती. 31 मार्च पूर्वी संपणा-या आर्थिक वर्षामध्ये

5..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

काम झाले आहे असे दाखवावयाचे असल्यामुळे 31 मार्च पूर्वी काम झालेले आहे असे कागदोपत्री दाखविण्यात आलेले आहे. स्थगिती दिली तेव्हा काम चालू नव्हते. काम नंतर करण्यात आले आहे आणि 31 मार्च पूर्वी काम झाल्याचे दाखविण्यात आलेले आहे. तेव्हा या कामाची चौकशी करुन संबंधिताविरुध्द कारवाई करण्यात येणार आहे काय ?

नतर श्री सुंबरे

अस्थुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 40332 ....

श्री. बबनराव पाचपुते : सभापती महोदय, या संदर्भात सर्व चौकशी केलेली आहे आणि माझ्याकडे विधानसभा सदस्य श्री.राजू तिमांडे यांनी पत्र दिले आहे की, कृपया कोठल्याही परिस्थितीत धार्मिक वा इतर अडचणी होत असेल तर त्वरित काम थांबविण्यात यावे. सर्वांच्या सोयीने जागा ठरविण्यात यावी. नंतर काम करण्यात यावे अशा प्रकारचा शेरा मी त्यावर लिहिलेला होता. हे पत्र 20.7.2007 चे आहे. सभापती महोदय, हे किरकोळ काम आहे, मोठे काम नाही. दुसरे म्हणजे ते दर्ग्याच्या बाहेरच्या बाजूला आहे, आतमध्ये नाही. दर्ग्याभोवती पूर्ण कंपाऊंड आहे. तसेच हे काम सुरू झालेले आहे. हे काम 16.3.2007 ते 31.3.2007 या कालावधीत पूर्ण झालेले आहे आणि आपण 20.7.2007 ला पत्र दिलेले आहे म्हणजे तीन साडेतीन महिन्यांनी दिलेले आहे तोपर्यंत याची चर्चा झालेली नव्हती. माझ्याकडे त्याचे फोटोग्राफ्सदेखील आहेत. तेथे कोठेही त्याप्रमाणे धार्मिक भावना दुखावणारे काही नाही. तेथे त्यांना जे गेट बांधायचे आहे ते गेटपासून देखील लांब आहे.

****

..... वाय 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**बीड (ता,जि.बीड) या गावात नवीन प्रशासकीय इमारत उभारण्याबाबत**

**(13) * 40720 श्रीमती उषाताई दराडे** : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) बीड (ता.जि.बीड) या गावातील जिल्हाधिकारी कार्यालयासह अनेक महसूल कार्यालये एकाच छताखाली आणण्यासाठी नवीन प्रशासकीय इमारत उभारण्यास तांत्रिक मंजूरी राज्य शासनाने दिली, हे खरे आहे काय,
(2) या बांधकामासाठी पुरेसा निधी उपलब्ध व्हावा अशी मागणी झाली आहे काय,
(3) याबाबत शासन काय उपाययोजना करीत आहे ?

**श्री.नारायण राणे** : (1) शासन निर्णय महसूल व वन विभाग क्र.बीएलडी 4107/प्र.क्र.28/ई-8, दिनांक 17 एप्रिल, 2007 अन्वये जिल्हाधिकारी बीड कार्यालयाच्या प्रशासकीय इमारतीच्या बांधकामासाठी रु.3,86,86,300 इतक्या रक्कमेच्या अंदाजपत्रके व नकाशास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे. तांत्रिक मान्यता अद्याप दिलेली नाही.
(2) बांधकामासाठी निधीची मागणी झालेली नाही. तथापि सन 2008-09 या वित्तीय वर्षासाठी रु.60 लाख इतकी तरतूद करण्यात आली आहे.
(3) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्रीमती उषा दराडे : सभापती महोदय, प्रशासकीय इमारत,बीड या संबंधात या उत्तरात आपण म्हटले आहे की, या इमारतीच्या बांधकामासाठी 3,86,86,300 रूपये इतक्या रकमेच्या अंदाजपत्रके व नकाशास प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून तांत्रिक मान्यता अद्याप दिलेली नाही. तर ही तांत्रिक मान्यता केव्हा देण्यात येईल ? तसेच या बांधकामासाठी निधीची मागणी झालेली नाही, मात्र 2008-09 या वर्षासाठी 60 लाख रूपयांची तरतूद करण्यात आली आहे असेही उत्तरात म्हटले आहे. तेव्हा ही तरतूद जास्तीची करणार काय ? आणि ही इमारत किती दिवसात पूर्ण करून देणार आहात ?

श्री. नारायण राणे : सभापती महोदय, या कामास तांत्रिक मान्यता 15 दिवसांच्या आत दिली जाईल. तसेच आता यासाठी 60 लाख रूपयांची तरतूद केलेली आहे आणि त्यातून काम सुरू केले जाईल व आवश्यक निधीची योग्य वेळी तरतूद केली जाईल.

***

..... वाय 3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**मौजे वाकद (जि.वाशिम) येथील पडीक गायरान जमिनीचे पट्टे सरकारी परिपत्रकानुसार दलित, आदिवासी अथवा शेतकारी यांच्या नावे होत नसल्याबाबत**

**(14) * 41625 डॉ. एन. पी. हिराणी** : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) मौजे वाकद (जि.वाशिम) येथील पडीक गायरान जमिनीचे पट्टे सन 1984 च्या सरकारी परिपत्रकानुसार दलित, आदिवासी अथवा इतर शेतकरी यांचे नावे होत नसल्याने दिनांक 15 फेब्रुवारी, 2008 रोजी वा त्यासुमारास आझाद मैदान, मुंबई येथे वाशिम येथील शेतकरी उपोषणास बसले होते, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(3) अद्याप, कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.नारायण राणे** : (1) मौजे वाकद येथील शासकीय जमीनीवरील अतिक्रमणे नियमित करण्यासंदर्भात, श्री.शेख अब्दूल शेख अब्बास, हे दिनांक 16/2/2008 पासून मंत्रालयासमोर बसणार असल्याचे निवेदन प्राप्त झाले आहे.
(2) व (3) ज्या जमिनीवर अतिक्रमण केलेले आहे, ती जमीन वन विभागास हस्तांतरीत केलेली असल्याने, प्रस्तूत प्रकरणी नियमानुसार पुढील कार्यवाही वन विभागाच्या सहमतीने करण्यात येईल.

श्री. एन.पी. हिराणी : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी दिलेल्या लेखी उत्तराने माझे समाधान झाले आहे, त्यामुळे मी उपप्रश्न विचारू इच्छित नाही.

***

..... वाय 4 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

KBS/ श्री. गायकवाड नंतर --- 11:40

**जळगांव येथील कुणाल सहकारी गृहनिर्माण संस्था या संस्थेने बांधलेली घरे अपूर्णावस्थेत व निकृष्ठ दर्जाची असल्याबाबत**

**(15) * 41041 श्री. गुरुमुख जगवानी, श्री. जगदीश गुप्ता, श्री. प्रतापराव सोनवणे, श्री.सागर मेघे:** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) जळगांव, (जि.जळगांव) येथील कुणाल सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, जळगांव या संस्थेस सन 2006 अखेर घर बांधणीसाठी शासनाकडून रुपये 1 कोटी कर्ज वितरण करण्यात आले, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, अद्यापही घरे अपूर्णावस्थेत असून, बांधकामे निकृष्ठ दर्जाची झाल्याबाबतच्या तक्रारी संस्थेच्या सभासदांनी जिल्हाधिकारी, जळगांव यांचेकडे केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(3) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली काय, असल्यास, त्यात काय निष्पन्न झाले व त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे ?

**डॉ.पतंगराव कदम** : (1) होय. कुणाल सहकारी गृहनिर्माण संस्था (म.), जळगांव या संस्थेस सन 2006 अखेर घरबांधणीसाठी शासनाकडून एकूण रु.99,04,000/- एवढे कर्ज वितरीत करण्यात आले आहे.तसेच डिसेंबर-07 अखेर या संस्थेस एकूण रु.1,04,89,000/- एवढे 100% कर्ज वितरीत करण्यात आलेले आहे.

(2) होय. संस्थेच्या एका सभासदाने जिल्हाधिकारी, जळगांव यांचेकडे तक्रार केलेली आहे.

(3) सदर प्रकरणी उप निबंधक, सहकारी संस्था, जळगांव, तालुका जळगांव यांनी चौकशी केली असून चौकशीत आक्षेपार्ह काहीही आढळून आलेले नसल्याने कार्यवाहीचा प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. जगदीश गुप्ता : सभापती महोदय, उत्तराने माझे समाधान झाले आहे.

***

..... वाय 5 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**मौजे बेलमंडळ (ता.कळमनुरी, जि.परभणी) येथील शेतकऱ्याचा ऊस कारखान्याने न नेल्यामुळे शेतकऱ्याने केलेली आत्महत्त्या**

**(16) * 41323 श्रीमती मंदा म्हात्रे, श्री.अरुण गुजराथी** : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) मौजे बेलमंडळ (ता.कळमनुरी, जि.परभणी) येथील शेतकऱ्याचा ऊस कारखान्याने न नेल्याने दिनांक 8 फेब्रुवारी, 2008 रोजी वा त्या सुमारास आत्महत्त्या केल्याची घटना घडली, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार कर्जामुळे आत्महत्त्या करणाऱ्या शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना शासनाने आतापर्यंत कोणती मदत केली वा करण्यात येत आहे,

(3) अद्याप कोणतीच मदत केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.नारायण राणे** : (1) होय. संभाजी देवराव मुधळ, रा.मौजे बेलमंडळ, ता.कळमनुरी, जि.हिंगोली या शेतकऱ्यांने दिनांक 7.2.2008 रोजी रात्री आत्महत्या केली आहे.

(2) व (3) होय. सदर शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना शासनाच्या प्रचलित धोरणानुसार शेतकऱ्यांच्या वारसास रुपये 1.00 लाख मदत देण्यात आली आहे.

श्रीमती मंदा म्हात्रे : सभापती महोदय, खऱ्या अर्थाने मी माननीय मंत्र्यांचे अभिनंदन करीन की, त्यांनी 1 लाख रूपये दिलेले आहेत. त्यामुळे माझे समाधान झालेले आहे.

***

.... वाय 6 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**मु.पो.ता.जि.बीड येथील शेतकऱ्याने जमीनीचे क्षेत्र मोजून देण्यासाठी नगर रोडवरील भुमी अभिलेख कार्यालयाकडे केलेली मागणी**

**(17) * 40709 श्री.सय्यद पाशा पटेल, श्री. श्रीकांत जोशी, श्री. जगदीश गुप्ता, श्री. विनोद तावडे:** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) दिनांक 4 फेब्रुवारी, 2008 रोजी वा त्यासुमारास मु.पो.ता.जि.बीड येथील नगर रोडवरील भुमी अभिलेख कार्यालयामध्ये जमीन मोजणीसाठी दिलेला प्रस्ताव वारंवार मागणी करुनही कार्यवाही होत नाही याच्या निषेधार्थ राणुजी नामा बोरवडे या शेतकऱ्याने विष पिऊन आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, सदर शेतकऱ्याने जमिनीचे क्षेत्र मोजून देण्यात यावे म्हणून किती दिवस, महिने वर्षापासून अर्ज करुन वारंवार विनंती केली होती,
(3) सदर अर्जाप्रमाणे मोजणीचे काम पूर्ण होण्यास झालेल्या विलंबास जबाबदार असणाऱ्या कर्मचारी व अधिकारी यांचे विरोधात काय कारवाई करण्यात आली वा येत आहे ?

**श्री.नारायण राणे** : (1) श्री.राणु नामा बोरवडे यांनी त्यांच्या मालकीच्या गट नं.210 या मिळकतीच्या ताब्यासंबंधात लगतच्या धारकासोबत झालेल्या वादाअंती दिनांक 04/02/2008 रोजी विष प्राशन करण्याचा प्रयत्न केला. वाद मिळकतीच्या मोजणीचे कोणतेही प्रकरण प्रलंबित नाही.
(2) व (3) श्री.राणु नामा बोरवडे यांनी सन 1999 मध्ये केलेल्या मोजणीबाबतच्या अर्जानुसार मोजणी करुन त्यांना मोजणी नकाशाची प्रत पुरविण्यात आलेली आहे. प्राप्त परिस्थितीत सदर धारकाचा मोजणीबाबतचा कोणताही अर्ज प्रलंबित नाही. तथापि मौजे भाटसंघवी, ता.जिल्हा बीड या गावच्या मंजूर एकत्रिकरण योजनेसंबंधात प्रश्नाधीन वाद मिळकतीबाबत संबंधित लगत धारकाकडील प्राप्त तक्रार अर्जाच्या अनुषंगाने उप संचालक भूमि अभिलेख, औरंगाबाद कार्यालयाकडून एकत्रिकरण अधिनियमांतर्गत दिनांक 21.11.2007 च्या आदेशाने दुरुस्तीची कार्यवाही करण्यात आलेली आहे. तथापि उप संचालक भूमि अभिलेख, औरंगाबाद यांनी दिनांक 21.11.2007 रोजी दिलेल्या निर्णयाच्या अंमलबजावणीस स्थगिती देण्यात आलेली असून, जैसे थै परिस्थिती ठेवण्याचे आदेश दिले आहेत. दिनांक 21.11.2007 च्या आदेशाने केलेल्या दुरुस्तीच्या कार्यवाहीची प्रत्यक्ष स्थळ पहाणी करुन सखोल चौकशी करण्याच्या सूचना उप संचालक भूमि अभिलेख, पुणे यांना देण्यात आलेल्या आहेत. चौकशीअंती संबंधिताविरुद्ध नियमानुसार योग्य ती कारवाई करण्यात येईल.

तसेच श्री.राणु नमा बोरवडे यांनी मे.सिव्हील जज्ज बीड यांचे न्यायालयात अवमान याचिका दाखल केलेली आहे. तसेच मा.उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद येथे दिनांक 21.11.2007 रोजी दिलेल्या निर्णयाच्या विरोधात स्थगिती मिळणेबाबत दावा दाखल केलेला आहे. सद्य:स्थितीत प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

..... वाय 7 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 40709 .....

श्री. पाशा पटेल : सभापती महोदय, या उत्तरात म्हटले आहे की, श्री.राणू नामा बोरवडे यांनी त्यांच्या मालकीच्या गट क्र.210 या मिळकतीच्या ताब्यासंबंधात लगतच्या धारकासोबत झ ालेल्या वादाअंती दिनांक 4.2.2008 रोजी विष प्राशन करण्याचा प्रयत्न केला. सभापती महोदय, याचा सरळ सरळ अर्थ असा आहे की, ती जमीन मोजून त्याच्या ताब्यात दिली असती तर ते मेलाच नसता किंवा त्याने विष प्राशन करण्याचा प्रश्नच आला नसता, हे खरे आहे काय ?

( यानंतर सौ.रणदिवे .....झेड 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/ KGS/ MMP/ पूर्वी श्री.सुंबरे . . . . 11:45

ता.प्र.क्र.40709 . . . .

श्री.नारायण राणे : सभापती महोदय, हे खरे नाही. श्री.राणु रामा बोरवडे यांनी त्यांच्या मालकीच्या गट नं.210 मध्ये मिळकतीच्या ताब्यासंबंधात लगतच्या धारकासोबत झालेल्या वादाअंती दि.4-2-2008 रोजी विष प्राशन केले. त्यांचा लगतच्या धारकाबरोबर वाद झाला, त्यामुळे त्यांनी विष प्राशन केले ही गोष्ट खरी आहे. पण यासंबंधात मिळकतीच्या मोजणीसाठी पैसे भरले परंतु ते प्रकरण प्रलंबित आहे अशी स्थिती नव्हती.

**उपसभापती** : प्रश्नोत्तराचा तास संपलेला आहे.

-----

. . . . झेड-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: मुख्य कार्यकारी अधिकारी, जसलोक हॉस्पिटल, मुंबई यांनी रुग्णांचा रेकॉर्ड देण्यास दिलेला नकार

मु.शी.: मुख्य कार्यकारी अधिकारी, जसलोक हॉस्पिटल, मुंबई यांनी रुग्णांचा रेकॉर्ड देण्यास दिलेला नकार याबाबत डॉ.दीपक सावंत व सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांनी श्री.मनेश मसंद यांच्याविरुध्द दिलेली विशेष हक्कभंगाची सूचना.

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत व सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांनी नियम 240 अन्वये विशेष हक्कांचा प्रश्न उपस्थित करण्याची सूचना दिली असून यामध्ये विशेष हक्कभंग झाल्याचे सकृतदर्शनी वाटत असल्यामुळे मी ती मान्य केली आहे. तेव्हा सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत व सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांनी आता विशेष हक्काचा प्रश्न उपस्थित करण्याकरिता सभागृहाची अनुमती मागावी. असे करतांना त्यांना विषयास धरुन अल्प निवेदन करता येईल.

डॉ.दीपक सावंत (मुंबई विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी पुढील विशेष हक्काचा प्रश्न उपस्थित करण्याकरिता सभागृहाची अनुमती मागतो.

सभापती महोदय,मी खालील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या विषयावर महाराष्ट्र विधान परिषद नियम 240 अन्वये मुंबईतील जसलोक हॉस्पिटलचे मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री.मनेश मसंद यांच्याविरोधात पुढील विषयावर हक्कभंगाची सूचना देत आहे.

"दिनांक 16 जानेवारी 2008 रोजी विधीमंडळात नेमलेल्या मुंबईतील धर्मदाय व खाजगी हॉस्पिटल्स्ना, शासनाने हॉस्पिटल बांधण्यासाठी अल्प दराने दिलेले मोक्याच्या जागेवरील भूखंड, सदर शासकीय भूखंड देताना काही खाटा शासन निर्देशित करील अशा गरीब रुग्णांसाठी आरक्षित ठेऊन, त्यांच्यांवर मोफत औषधोपचार करण्याच्या घातलेल्या अटी व शर्ती, परंतु सदर शासनाच्या अटींचे पालन मुंबईतील बहुतांश खाजगी पंचतारांकित हॉस्पिटल्स् उदाहरणार्थ ब्रीचकॅण्डी व जसलोक आदि, याबाबत शासनाकडे मोठया प्रमाणावर आलेल्या तक्रारीनुसार विधिमंडळ सचिवालयाने याप्रकरणी सदर हॉस्पिटल्स्ना भेटी देऊन या हॉस्पिटल्स्नी शासनाच्या अटी-शर्ती व मार्गदर्शक तत्वानुसार गरीब रुग्णांना औषधोपचार दिले आहेत किंवा नाही याबाबत तपशील जाणून

. . . .झेड-3



APR/ KGS/ MMP/ 11:45

घेण्याकरिता सदर समितीने दिनांक 16 जानेवारी 2008 रोजी जसलोक हॉस्पिटलला पूर्वसूचना व प्रश्नावली पाठवून भेट दिली असतांना जसलोक हॉस्पिटलचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.मनेश मसंद यांनी आपण रेकॉर्ड ठेवत नाही व तशी आवश्यकता वाटली नाही असे सांगून रुग्णांचा रेकॉर्ड देण्यास स्पष्ट नकार दिला, सदर समितीच्या भेटीच्या वेळी समितीचे प्रमुख मा.श्री.हसन मुश्रीफ, राज्यमंत्री, विधी व न्याय महाराष्ट्र शासन व सन्माननीय समिती सदस्य डॉ.दीपक सावंत, वि.प.स., सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील वि.प.स.व सन्माननीय सदस्या श्रीमती सुधा जोशी व धर्मदाय आयुक्त हजर होते. श्री.मनेश मसंद, मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी "आपण माझ्याकडे प्रश्नांची उत्तरे व रेकॉर्ड कोणत्या अधिकारात मागत आहात ? "अशी उर्मट उत्तरे दिली व प्रश्न उपस्थित केले. तशी नोंद सदर समितीच्या इतिवृत्तात केलेली आहे. मुंबईतील धर्मदाय खाजगी हॉस्पिटल्स्ना शासनाने मोक्याच्या जागेवरील कोट्यावधी रुपयांचे अल्प किंमतीत दिलेले भूखंड व त्या बदल्यात शासनाने घातलेल्या रास्त व न्याय्य अटी-शर्तीचे पालन न करणे, यासंदर्भात मी मुंबईच्या जसलोक हॉस्पिटलचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.मनेश मसंद यांच्या विरोधात विशेष हक्कभंगाची सूचना देत आहे. ती विधान परिषदेच्या विशेष हक्कभंग समितीकडे पुढील कार्यवाहीसाठी देण्यात यावी ही विनंती."

सभापती महोदय, आपण मला याठिकाणी हक्कभंगाची सूचना मांडण्यासाठी परवागनी दिली, त्याबद्दल मी आपल्याला धन्यवाद देतो. विधीमंडळाने विधान परिषदेच्या सन्माननीय सदस्यांची एक रुग्ण समिती गठित केली होती. या रुग्ण समितीचा उद्देश असा होता की, धर्मादाय आणि खाजगी हॉस्पिटलनां ते बांधण्यासाठी शासनाने अल्प दराने मोक्याच्या जागेवरील भूखंड दिले आणि सदर भूखंड देताना खाटा निर्देशित करुन त्यातील काही खाटा गरीब रुग्णांसाठी आरक्षित ठेऊन, या गरीब रुग्णांवर मोफत औषधोपचार करणे आवश्यक होते. शासनाने त्यासाठी काही अटी आणि शर्ती घातलेल्या होत्या.परंतु शासनाच्या अटींचे पालन मुंबईतील बहुतांशी खाजगी पंचतारांकित हॉस्पिटल्स्नी केले नाही.उदाहरण द्यावयाचे तर जसलोक हॉस्पिटल, ब्रीच कँण्डी हॉस्पिटल, लिलावती हॉस्पिटल, हिंदूजा हॉस्पिटल यांच्या संबंधात मोठया प्रमाणात आलेल्या तक्रारीनुसार शासनाने विधीमंडळाची जी समिती नियुक्त केली होती, त्या समितीने दि.16 जानेवारी 2008 रोजी पूर्वसूचना देऊन व प्रश्नावली पाठवून भेट दिली होती. त्यावेळी जसलोक हॉस्पिटलचे मुख्य .......

. . . .झेड-4



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कार्यकारी अधिकारी श्री.मनेश मसंद यांनी आपण काही रेकॉर्ड ठेवत नाही अशा प्रकारे सांगितले. या समितीच्या बरोबर विधीमंडळाचे सचिव देखील होते. तसेच चॅरिटी कमिशनर कार्यालयातील डेप्युटी चॅरिटी कमिशनर आणि त्यांचा स्टाफ देखील होता. ज्यावेळी माननीय शालेय शिक्षण राज्यमंत्री श्री.हसन मुश्रीफसाहेब आणि समितीचे सन्माननीय सदस्य जसलोक हॉस्पिटलमध्ये गेले, त्यावेळी श्री.मनेश मसंद यांनी याबाबतचा कोणताही रेकॉर्ड ठेवत नाही. यासंदर्भातील त्यांची जी विधाने आहेत, ती मी येथे उद्‌धृत करतो. कर्नल मसंद असे म्हणतात की, "आप मुझे बोलने दीजिए.पॉवर है तो क्या हुआ, यह पाकिस्तान है  क्या ? हमारे देश में डेमोक्रेसी है.मैं आपको बताना चाहता हूँ कि हाईकोर्ट के आर्डर्स के अनुसार सितम्बर 2006 से हमारे हॉस्पीटल में इंडीजेंट पेशंट की संख्या 570 है और उनके ऊपर खर्चा 2.23 करोड़ हुआ है." यानंतर आम्ही असे विचारले की, आपण जे पैसे खर्च केलेले आहेत. त्याचे काही रेकॉर्ड ठेवलेले आहे काय ? त्यावर कर्नल मसंद काय म्हणतात तर "हमारा सोशल वर्कर तहसीलदार का सर्टिफिकेट अथवा राशन कार्ड देखता है, लेकिन हमारे पास ऐसे लोग भी आते हैं, जिनके पास न तो तहसीलदार का सर्टिफिकेट होता है और न ही राशन कार्ड होता है, उनको भी यह सुविधा देते है."  यापुढे जे म्हटलेले आहे, ते अवमानास्पद आहे.  "सर्टिफिकेट तो 2 हजार रुपए में मिल जाएगा",  त्यांनी अतिशय बेछूटपणे सांगितले आहे की, "I am finalising the poor patients.  This is as per the High Court's ruling.  My discretion is final discretion." म्हणजे कोणता पेशंट दारिद्रय रेषेखालील आहे किंवा अल्प उत्पन्न गटातील आहे हे तेच ठरवितात. तसेच आम्ही त्यांना सांगितले की, ही राज्य शासनाची कमिटी आहे आणि ती विधी मंडळाने नियुक्त केलेली आहे. तरीदेखील त्यांनी कोणत्याही प्रकारचे सहकार्य केले नाही. त्यांनी सरळसरळ असे सांगितले की, मी अशा प्रकारच्या कमिटीला मानत नाही. श्री.शेख यांनी देखील त्यांना सांगितले की, ही विधीमंडळाची कमिटी आहे आणि त्या कमिटीचा मान ठेवणे आवश्यक आहे. या कमिटीचे सन्माननीय सदस्य तुमच्याकडे जी काही माहिती मागत आहेत, ती त्यांना देणे आवश्यक आहे. तरी देखील त्यांनी माहिती देण्यासाठी नकार दिला आणि आपल्याकडे कोणत्याही प्रकारचे रेकॉर्ड नाही असे सांगितले. या सर्व गोष्टीमधून असे दिसते की, विधीमंडळाने नेमलेल्या कमिटीचा, माननीय मंत्री महोदयांचा मान ठेवण्यात आलेला नाही. आणि त्यावेळी माझ्यासोबत सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील देखील होते.

अशुद्धित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DVG/ प्रथम श्रीमती रणदिवे.. 11:50

डॉ. दीपक सावंत..

माजी सन्माननीय सदस्या श्रीमती सुधा जोशी या देखील या दौऱ्यामध्ये होत्या. सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण त्यावेळी नव्हते परंतु त्या नंतरच्या दौऱ्याला ते देखील उपस्थित होते. त्यामुळे हा हक्कभंग आपण ॲडमिट करुन घ्यावा अशी मी आपणास विनंती करीत आहे. हॉस्पीटलमधील सीईओचे बेछूट वागणे व माननीय मंत्री महोदयांचा अपमान करणे योग्य नाही. खरे तर तेथे विधी मंडळीतील समिती गेली होती त्यामुळे त्यांनी माहिती देणे आवश्यक होते. हा प्रश्न सामान्य रुग्णांच्या संदर्भात आहेच परंतु त्याचबरोबर पंचतारांकित रुग्णालयांमध्ये त्यांना चांगली ट्रिटमेंट मिळत नाही. हा विधीमंडळाचा देखील अपमान आहे त्यामुळे ही हक्कभंगाची सूचना ॲडमिट करुन घ्यावी अशी माझी नम्र विनंती आहे.

**उपसभापती** : प्रश्न असा आहे की, माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांना विशेष हक्काचा प्रश्न उपस्थित करण्यास सभागृहाची अनुमती आहे काय ?

काही सन्माननीय सदस्य : आहे.

**उपसभापती** : विरोध नसल्यामुळे प्रश्न उपस्थित करण्यास अनुमती आहे.

विशेष हक्क भंग झाल्याचे सकृतदर्शनी वाटत असल्यामुळे, मी ही बाब विशेष हक्क समितीकडे सोपवित आहे. समितीने आपला अहवाल पुढील अधिवेशना पर्यंत सादर करावा.

---------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## विशेष हक्कभंगाच्या सूचनेबाबत

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मी देखील विशेष हक्कभंगाचे 4 प्रस्ताव यापूर्वी दिले होते. त्यातील एक प्रस्ताव माननीय मंत्री श्री. आर.आर. पाटील यांच्या संदर्भात होता. त्याबाबत उत्तर मला प्राप्त झाले. ते उत्तर समाधानकारक आहे किंवा नाही हा विषय निराळा आहे. बाकीच्या हक्कभंगाची सूचना देऊन 5 अधिवेशने झालेली आहेत. सभापतींच्या निर्णयप्रक्रीयेकरीता मी थांबलो आहे. त्यातील एक हक्कभंगाची सूचना अतिशय गंभीर आहे. माननीय सभापतींनी फिक्सींग केले आहे असे त्यामध्ये श्री. दाभोळकर यांनी वर्तमानपत्रामध्ये लिहिले आहे. हे सर्व माननीय सभापतींना मान्य आहे काय ? आता 6 अधिवेशने होऊन गेलेली आहेत. तरी देखील याबाबत कोणताही निर्णय झालेला नाही. हे प्रकरण अत्यंत गंभीर आहे. यामुळे आज सदनाची बेअब्रु झालेली आहे. माननीय मंत्री महोदय, विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्य हे सर्व फिक्सिंग करुन काम करीत आहेत अशा आशयाचे एक आर्टिकल वर्तमानपत्रामध्ये छापून आले होते. त्यांच्यावर आरोप केले गेलेले आहेत. आता 6 अधिवेशने होऊन गेलेली आहेत. या संदर्भातील निर्णयाकरिता अजून आम्ही किती दिवस थांबायचे हे मला कळत नाही.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी आता येथे सांगितल्याप्रमाणे मी देखील हक्कभंगाच्या 3 सूचना दिलेल्या होत्या. त्या अजूनही प्रलंबित आहेत. या सूचना अतिशय गंभीर आहेत. माननीय सभापतींना थ्रेट दिलेली आहे व असे सांगितले आहे की, माझ्या बाबत चर्चा सभागृहामध्ये घडवून आणली तर मी आपल्याला कोर्टात खेचीन. अशा प्रकारची धमकी दिलेली आहे. हा हक्कभंग माझा व्यक्तिगत स्वरुपाचा नसून यामुळे सभागगृहाचा व माननीय सभापतींचा अवमान झालेला आहे. हे सभागृह सार्वभौम आहे. माननीय सभापतींना धमकी दिली जात आहे. 5 अधिवेशने होऊन देखील हा हक्कभंग प्रलंबित आहे. याबाबत कोणतेही उत्तर आले नाही व मलाही काहीही कळविण्यात आले नाही. त्यामुळे आपण हा हक्कभंग मांडण्याची परवानगी दिली पाहिजे. त्यासंबंधी काय पत्रव्यवहार झालेला आहे, या बाबत नोटीस दिली आहे काय याची माहिती मिळालेली नाही. याबाबत लवकरात लवकर निकाल लागला पाहिजे.

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते व सन्माननीय सदस्य श्री. पांडुरंग फुंडकर यांनी ज्या हक्कभंगाच्या सूचना दिलेल्या आहेत त्याबाबत माननीय सभापती यांच्याशी चर्चा करुन निर्णय घेण्याबाबत मी विनंती करीन.

-------------

3..



**पृ.शी./मु.शी.**: नियम 93 अन्वये सूचना.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य सर्वश्री. जयंत प्र.पाटील, शरद पाटील डॉ.नीलम गोऱ्हे यांनी "दिनांक 23 एप्रिल, 2008 रोजी भाटघर धरणाच्या पाणलोट क्षेत्रात वाढाणे ते राजघर या दरम्यान होडी उलटून 21 जण पाण्यात बुडाले असून त्यापैकी फक्त दोन मृतदेहांचा तपास लागणे "या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र.पाटील, प्रा.शरद पाटील यांनी " राज्यात 75 हजार अंगणवाडया कार्यरत असून त्यापैकी सुमारे 45 हजार अंगणवाडयांना स्वत:ची इमारत नसून मुलांच्या गळतीचे प्रमाण कमी व्हावे व मुलांची शैक्षणिक प्रगती व्हावी म्हणून वय वर्ष 3 ते 6 पर्यतच्या मुलांना शिक्षणाची सोय निर्माण करण्याची शालेय शिक्षण मंत्र्यांनी घोषणा करणे व यासाठी राज्याच्या अर्थसंकल्पात फक्त 37 कोटी रुपयांची तरतूद असणे " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर श्री. बरवड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** .....

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते यांनी "एस.एन.डी.टी. विद्यापीठाशी संलग्न वडाळा येथील डी.एड./बी.एड. महाविद्यालयातील विद्यार्थीनी व शिक्षिकांचे संस्थेचे संस्थाचालक लैंगिक शोषण करीत असल्याचे प्रकरण उघडकीस येऊन त्यावर चौकशी समिती नेमून सदर समितीने या संस्थेची मान्यता व संलग्नता रद्द करण्याची केलेली शिफारस " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री प्रकाश शेंडगे, नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर यांनी "राज्यात भटके विमुक्त प्रवर्गात असणारा वडार समाज इतर राज्यात अनुसूचित जमातीत समाविष्ट असून राज्यात हा समाज इतर राज्यांपेक्षा अतिशय दुर्लक्षित जीवन जगत असून या समाजाला मुख्य प्रवाहात समाविष्ट करुन न घेतल्यामुळे निर्माण झालेली सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक विषमता " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

इतर सूचनांना मी दालनात अनुमती नाकारलेली आहे.

---

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, गेल्या आठवड्यात मी आपल्याला भ्रष्टाचाराची जी निवेदने आहेत त्याबाबत पत्र लिहिले होते. आपण म्हणाला होता की यादी देतो. उद्या अधिवेशन संपणार आहे.

**उपसभापती** : निवेदने दिलेली आहेत. मी आज आपल्याला कळवतो.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, डाळीच्या संदर्भातील निवेदन आलेले नाही.

**उपसभापती** : ते निवेदन येणार आहे.

---

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

**पृ. शी.** : धनगर समाजाचा अनुसूचित जमातीत समावेश करण्याची मागणी

**मु. शी.** : धनगर समाजाचा अनुसूचित जमातीत समावेश करण्याची मागणी याबाबत सर्वश्री प्रकाश शेंडगे, नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, रामनाथ मोते, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

डॉ. विजयकुमार गावित ( आदिवासी विकास मंत्री ) : सभापती महोदय, सर्वश्री प्रकाश शेंडगे, नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, रामनाथ मोते यांनी "धनगर समाजाचा अनुसूचित जमातीत समावेश करण्याची मागणी" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, झारखंड, ओरिसा, आंध्रप्रदेश, बिहार या राज्यांना भेटी देऊन महाराष्ट्रातील धनगर हे इतर राज्यातील धनगरांपेक्षा भिन्न आहेत, त्या राज्यात धनगर नव्हे तर धांगड जात एस.टी.मध्ये असल्याचे नमूद करुन संचालक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांची जी समिती नेमली होती त्यांनी अहवाल सादर केला आहे. त्यांना या राज्याचा दौरा करुन अहवाल देण्यास सांगितले होते. त्या समितीने कोणता अहवाल दिलेला आहे ? त्या अहवालामध्ये काय सांगितले आहे ?

डॉ. विजयकुमार गावित : सभापती महोदय, दिनांक 12.7.2005 रोजी माननीय सभापतींच्या दालनामध्ये बैठक झाली होती. त्या बैठकीमध्ये असे ठरले की, ट्रायबल रिसर्च इन्स्टिटट्यूट पुणे यांचे पथक त्या ठिकाणी पाठवावे आणि त्यामध्ये धांगड ही जमात आणि धनगर ही जमात सारखी आहे काय, त्यांच्यामध्ये भिन्नता आहे काय, याबाबतीत त्या पथकाने अभ्यास करावयाचा होता. एप्रिल, 2006 मध्ये पथक त्या ठिकाणी गेले आणि त्यांनी 1 जून, 2006 ला अहवाल सादर केला आहे. त्यामध्ये त्यांनी असे म्हटले आहे की, धांगड आणि धनगर या जमाती भिन्न आहेत. या जमाती एक नाहीत अशा पध्दतीचा अहवाल त्यांनी दिलेला आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, तिकडे धनगरालाच धांगड म्हटले जाते. इंग्रजी शब्दांप्रमाणे वाचले तर त्याचा उच्चार धनगर असाच होतो. त्या ठिकाणी सवलती दिल्या जात असतीत तर महाराष्ट्रातील धनगर त्या सवलतींपासून वंचित राहिलेले आहेत. तो आणि हा धनगर समाज एकच आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील धनगर समाजाचा समावेश यामध्ये करण्याबाबत शासन फेरविचार करील काय ?

डॉ. विजयकुमार गावित : सभापती महोदय, या ठिकाणी धनगर समाज हा आदिवासीमध्ये येतो की नाही याबद्दल वेळोवेळी अभ्यास समित्या नेमलेल्या होत्या. त्यामध्ये कोठेही असे दिसत नाही की, हा समाज ट्रायबलमध्ये मोडू शकतो. कारण हे ठरविण्याचे काही नॉर्म्स आहेत त्या नार्म्समध्ये हे कोठेही बसत नाही. त्यामुळे त्याचे कंसिडरेशन करण्याची गरज नाही. एवढेच नव्हे तर केंद्र शासनाच्या मिनिस्ट्रीने सुध्दा असे म्हटले आहे की, "The Ministry in their reply has stated that in the State of Maharashtra there are two distinct

....4...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. विजयकुमार गावित .......

communities having similar nomenclature, one is 'Dhangad' which is a sub-group of Oraon, a Scheduled Tribe appearing at S.N. 36 of the List of Scheduled Tribes. The traditional occupation of this community is cultivation. There is another community known as 'Dhangar' whose traditional occupation is cattle rearing and weaving of woolens. The 'Dhangad' and the 'Dhangar' are two distinct communities having no ethnic affinity at all. The 'Dhangars' who are shepherds have been notified as Nomadic tribe in the State of Maharashtra. Therefore, there is no printing mistake in the Scheduled Castes and Scheduled Tribes (Amendment) Act, 1976 through which the Constitution (Scheduled Tribes) Order, 1950 was amended." त्यामुळे हा प्रश्न उद्‌भवत नाही.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : राज्यात मराठवाडा व विदर्भातील साठेबाजांवर घालण्यात येत असलेल्या धाडी

**मु. शी.** : राज्यात मराठवाडा व विदर्भातील साठेबाजांवर घालण्यात येत असलेल्या धाडी याबाबत श्री.सुरेश जेथलिया, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.सुनील तटकरे ( अन्न व नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.सुरेश जेथलिया यांनी " राज्यात मराठवाडा व विदर्भातील साठेबाजांवर घालण्यात येत असलेल्या धाडी " या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुरेश जेथलिया : सभापती महोदय, संपूर्ण महाराष्ट्रामध्ये मागील 15 दिवसापासून धाड सत्र सुरु असल्यामुळे सर्व व्यापा-यांमध्ये आणि शेतक-यांमध्ये खळबळ माजली आहे. या व्यापा-यांना कोणतीही पूर्व सूचना न देता किंवा अचानकपणे व्यापा-यांच्या गोदामांमध्ये, घरामध्ये, वेअर हाऊसमध्ये छापे घालण्याचे सत्र सुरु आहे. त्याच्यातून व्यापा-यांना नाहक त्रास दिला जात आहे. त्यामुळे शेतक-यांच्या शेती मालाचे भाव 500 रुपयांनी उतरले आहेत.

**उपसभापती** : यासंदर्भात सभागृहात काल परवा चर्चा झालेली आहे.

श्री.सुरेश जेथलिया : सभापती महोदय, व्यापा-यांनी होलसेल आणि रिटेलसाठी किती माल ठेवला पाहिजे याबाबतचा खुलासा करावा आणि कृषि उत्पन्न बाजार समितीची पुण्यामध्ये बैठक झाली होती त्यावेळी या धाडी बंद करण्याचे आदेश देण्यात आले होते त्याची अंमलबजावणी झ ाालेली नाही. या धाडी बंद करण्यासाठी शासनाकडे उपाययोजना आहे काय ?

श्री.सुनील तटकरे : सभागृहामध्ये महागाईच्या संदर्भात चर्चा झाल्यानंतर साठेबाजांवर शासनाने कठोर कारवाई करावी असे सामुदायिकपणे ठरले किंवा तशी चर्चा झाली होती. त्यानंतर धाडी टाकण्यास सुरुवात झाली आहे. यासंदर्भात केंद्र सरकारने दिनांक 29.8.2006 रोजी अधिसूचना काढली होती. ही अधिसूचना शासनाने दिनांक 12.9.2006 रोजी लागू केली. दर सहा महिन्यांनी त्याला मुदतवाढ दिली जाते. त्याप्रमाणे ती अधिसूचना आताही लागू आहे. सन्माननीय सदस्यांनी रिटेल आणि होलसेल व्यापा-यांनी किती माल ठेवला पाहिजे असे विचारले आहे. महापालिका क्षेत्रामध्ये 3 हजार क्विंटल गहू ठेवता येतो आणि डाळीकरिता त्यांना 1 वर्षासाठी जेवढा स्टॉक लागतो त्याच्या 1.12 हिस्सा ठेवता येतो.

श्री.गोपीकिशन बाजोरिया : सभापती महोदय, या निवेदनात असे म्हटले आहे की, "कोणत्याही व्यापा-यास विनाकारण त्रास देण्यात आलेला नाही. तसेच जिल्हा प्रशासनामार्फत साठेबाजीविरुध्द करण्यात येणा-या कारवाईमध्ये स्थानिक प्रशासन व पोलिसांकडून व्यापा-यांना विनाकारण त्रास देत असल्याची कोणतीही तक्रार शासनास प्राप्त झालेली नाही." सभापती महोदय, श्रीमती दवले नावाच्या महिला तहसीलदार यांनी रात्री 11 वाजता व्यापा-यांच्या घरात, गोदामात छापे घातले आहेत. पोलिसांच्या संमतीने सर्व गोदामांवर छापे घालण्यात आले आहेत. अकोला

3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ MMP/

श्री.गोपीकिशन बाजोरिया....

जिल्हयातील व्यापा-यांनी पोलीस अधिक्षक, जिल्हाधिका-यांकडे धाव घेतली, परंतु त्या व्यापा-यांना सोडले नाही. या व्यापा-यांनी सहा-सहा महिन्यांपूर्वी परवाना मिळण्यासाठी अर्ज केले आहेत. ते प्रलंबित आहेत. नवीन परवाने देत नाहीत आणि परवान्याचे नुतनीकरणही केले जात नाही. सन्माननीय विरोधी पक्ष नेते आकोट तालुक्यामध्ये गेले होते, त्याठिकाणी सुध्दा रात्री 2 वाजता छापे घातले आहेत. इतका अतिरेक या छाप्यांचा झाला आहे. छापे घालणा-या अधिका-यांविरुध्द शासन कारवाई करणार आहे काय आणि ज्या व्यापा-यांनी सहा-सहा महिन्यांपूर्वी परवाने मिळण्यासाठी अर्ज केले आहेत त्यांना ते दिले जातील काय ?

श्री.सुनील तटकरे : ज्यांनी अर्ज केला असेल त्यांना परवाने दिले जातील. अर्ज दाखल करीत असताना त्याची तपासणी करणे भाग आहे. त्यांच्याकडे मर्यादेपेक्षा जास्त साठा आहे किंवा नाही हे पाहण्याचे शासनाचे काम आहे. त्यांनी परवाने मागितले असतील ते का दिले नाही त्याची चौकशी होईल. परंतु दुर्दैवाने त्यांना मिळालेल्या मर्यादेपेक्षा जास्त माल त्याठिकाणी असू शकेल. परवाना घेण्यासाठी ज्यांनी अर्ज केला असेल त्यांना विशिष्ट मुदतीमध्ये परवाना दिला पाहिजे अशा देखील सूचना देण्यात येतील.

नंतर श्री.शिगम

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर : सन्माननीय मंत्री महोदयांनी दिलेले उत्तर मान्य आहे. या व्यापा-यांनी लायसन्स मिळण्यासाठी अर्ज केले होते. अधिका-यांच्या गलथानपणामुळे किंवा निष्काळजीपणामुळे या व्यापा-यांना वेळेवर लायसन्स मिळाले नाहीत. अशा अर्ज केलेल्या व्यापा-यांवर धाडी टाकून त्यांच्यावर केसेस दाखल केलेल्या आहेत. एका बाजूला या व्यापा-यांकडे कृषी उत्पन्न बाजार समितीचे लायसन्स आहे आणि दुस-या बाजूला त्यांनी तहसीलदारांकडे अर्जही केलेला आहे. केवळ पैसे उकळण्यासाठी या व्यापा-यांवर केसेस दाखल केलेल्या आहेत काय ? आकोट तालुक्यातील व्यापा-यांवर पोलिसांनी रात्री 2.00 वाजता धाडी टाकून त्यांच्याकडे पैशाची मागणी केली आणि पैसे दिले नाहीत म्हणून त्या व्यापा-यांना पोलीस स्टेशनमध्ये बसवून ठेवले. माझ ा प्रश्न एवढाच आहे की, ज्या व्यापा-यांनी तहसीलदारांकडे अर्ज केलेला आहे, ज्यांच्याकडे कृषी उत्पन्न बाजार समितीचे लायसन्स आहे, ज्या व्यापा-यांना तहसीलदाराने जाणूनबुजून लायसन्स दिले नाही, अशा ज्या व्यापा-यांवर केसेस टाकलेल्या आहेत त्यांच्याबाबतीत शासन सहानुभूतीपूर्वक विचार करणार आहे काय ?

श्री. सुनील तटकरे : ज्यांनी लायसन्ससाठी अर्ज केलेले असतील त्यांना लायसन्स देण्यामध्ये का विलंब झाला याची चौकशी निश्चितपणे करण्यात येईल. ज्यांच्यावर केसेस दाखल झालेल्या असतील त्यांच्याबाबतीत कोर्टामध्ये निकाल होईल. अन्य व्यापा-यांचा जो साठा जप्त झाला असेल त्याबाबतीत त्यांनी अर्ज करणे, परवाना घेणे याबाबतीत त्या त्या स्तरावर गुणवत्तेनुसार निर्णय घेतला जाईल.

श्री. पांडुरंग फुंडकर : यापूर्वी देखील हा प्रश्न या सभागृहामध्ये उपस्थित झाला होता त्यावेळी या सभागृहाचे नेते श्री. आर.आर.पाटील यांनी अशी घोषणा केली होती की, ज्यांना परवाना देण्याच्या बाबतीत आमच्यामुळे विलंब झाला असेल अशा व्यापा-यांवर केसेस दाखल केल्या जाणार नाहीत. मग एकाच प्रश्नाच्या बाबतीत दोन वेगवेगळी आणि विसंगत उत्तरे कशी काय दिली जातात ? शासनाच्या दोन विभागामध्ये को-ऑर्डिनेशन नाही काय ? सभागृहाच्या नेत्यांनी घोषणा केली असेल तर त्या घोषणेप्रमाणे कार्यवाही केली जाणार नाही काय ?

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. जगदीश गुप्ता)**

श्री. सुनील तटकरे : सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी जो पहिला प्रश्न विचारला त्याला असे उत्तर दिले की, जर केस नोंद झालेली असेल तर त्याबाबतीत कोणी काहीही करु शकत नाही. केस नोंदणी करायची राहिली असेल तर ती केस करायची की नाही हे आम्ही ठरवू.

डॉ. नीलम गो-हे : सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर तसेच सन्माननीय सदस्य श्री. गोपीकिसन बाजोरिया यांनी उपस्थित केलेल्या मुद्यांचे मी समर्थन करते. माननीय मंत्री महोदयांनी राणा भीमदेवी थाटात या ठिकाणी उत्तर दिले. मी उदाहरण देऊन सांगू इच्छिते की, कोल्हापूर जिल्हाधिका-यांनी 450 ठिकाणी छापे मारले. त्यापैकी किती लोकांनी नियमांचे उल्लंघन केल्याचे आढळून आले अशी मी त्यांना विचारणा केली असता एकाही केसमध्ये उल्लंघन झाल्याचे दिसले नाही असे त्यांनी सांगितले. याचा अर्थ तुम्ही नाटक म्हणून हे छापे टाकता काय ? हे छापे टाकल्यानंतर त्या व्यापा-यांना कोणते प्रश्न विचारण्यात आले ?

श्री. सुनील तटकरे : सन्माननीय सदस्यांनी मी राणा भीमदेवी थाटात उत्तर दिल्याचे सांगितले. साठेबाजांविरुध्द सन्माननीय सदस्यांनीच या सदनामध्ये भाषणे केलेली आहेत. असे असताना आज या ठिकाणी विसंगत विधाने का करीत आहेत ? त्यांनी त्यांच्या म्हणण्यामध्ये ताळमेळ घालावा.

-----

...नंतर श्री. गिते..

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : राज्याच्या पुरवठा विभागाने साठेबाजांच्या बाबतीत धडक कारवाई सुरु करणे

**मु. शी.** : राज्याच्या पुरवठा विभागाने साठेबाजांच्या बाबतीत धडक कारवाई सुरु करणे याबाबत सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र.पाटील, प्रा.शरद पाटील, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.सुनील तटकरे ( अन्न व नागरी पुरवठा मंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील, प्रा.शरद पाटील यांनी राज्याच्या पुरवठा विभागाने साठेबाजांच्या बाबतीत धडक कारवाई सुरु करणे या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती ( श्री.जगदीश गुप्ता )** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र.पाटील : खालापूर जि.रायगड येथे 2 कोटी रुपये किंमतीचा गहू छापा टाकून पकडला आहे. छापा टाकण्यापूर्वी तालुका पुरवठा अधिका-याने त्या गोदामाला भेट दिली होती काय ? या छाप्यात 2 कोटी रुपयांचा गहू मिळाला त्या गव्हाचा सेस कृषि उत्पन्न बाजार समितीने घेतला होता काय ? सदरहू धडक कृती कार्यक्रमापूर्वी या गोष्टी अधिका-यांच्या लक्षात आल्या होत्या काय ?

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, शिवाजी रोलर फ्लोअर मिल ऐरोली या ठिकाणी आहे. त्या मिलची क्षमता प्रतिदिन 300 मेट्रिक टनाची आहे. त्यांची मंजूर साठवण क्षमता 9 हजार मेट्रिक टनाची आहे. त्या मिलला परवाना 17.2.07 रोजी देण्यात आला आहे. परंतु मिल मालकाने ज्या ठिकाणी साठवणूक केली. ती साठवणूक त्या ठिकाणी करण्यासाठी 17.10.07 रोजी तहसीलदार यांच्याकडे अर्ज केला होता. तहसीलदारांनी त्यांना 2.11.07 रोजी परवाना फी भरण्यास कळविले होते. त्यानंतर संबंधितांनी परवान्याची आवश्यकता नाही असे कळविले होते. त्याने परवाना घेतला नव्हता ही वस्तुस्थिती खरी आहे. त्यांनी त्या ठिकाणी साठा केला होता, परंतु साठवणुकीचा परवाना दुस-या ठिकाणचा होता. त्यासंदर्भातील आवश्यक तो निर्णय गुणवत्तेवर घेतला जाईल.

श्री. जयंत प्र.पाटील : माझ्या एका प्रश्नाचे उत्तर आले नाही. कृषि उत्पन्न बाजार समितीकडे त्याने धान्य साठ्याचा सेस भरला होता काय ?

श्री. सुनील तटकरे : ही माहिती आता माझ्याकडे उपलब्ध नाही. कृषि उत्पन्न बाजार समिती म्हणजे खालापूर कृषि उत्पन्न बाजार समिती असे अभिप्रेत आहे. यासंबंधीची माहिती घेऊन ती पटलावर ठेवण्यात येईल.

श्री. दिवाकर रावते : आपण राणा भिमदेवी थाटात सन्माननीय सदस्या श्रीमती नीलम गोऱ्हे यांना सांगितले की, साठेदारावर छापे टाका असे आम्ही आपल्याला नेहमी सांगतो आहे. याचा अर्थ अधिका-यांनी सरसकट पैसे घेऊन परवाना देणे असा नाही. आपण महागाईच्या संदर्भात पाऊल उचलले आहे आणि त्या अनुषंगाने साठेदारांवर छापे टाकण्यात येत आहेत. तुम्ही दररोज दूरदर्शनवर छापे टाकण्यासंबंधीचे वातावरण दाखवित आहात. त्यातून जनतेमध्ये जे वातावरण निर्माण झाले आहे त्याची जबाबदारी शासनाला घ्यावी लागेल. ज्यांना ज्यांना धान्य साठा

3...



श्री. दिवाकर रावते....

करण्यासंदर्भात लायसन्स दिलेले आहेत, जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयात त्यांना एकत्रित बोलवा. त्यांच्याकडील कागदपत्राची तपासणी करा. ज्यांचे परवाने आणि साठे व्यवस्थित आहेत त्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

व्यापा-यांना सोडा आणि जे दोषी आढळून येतील त्या व्यापा-यांच्या गोदामावर छापे टाका. या धाडसत्रामुळे व्यापा-यांमध्ये घबराट निर्माण झालेली आहे. अधिका-यांकडून जो काही अतिरेक होत आहे तो थांबेल. हा प्रश्न सन्माननीय सदस्य श्री. जेथलिया यांनी उपस्थित केला होता. मी परवा ग्रामीण भागात होतो. बरेच शेतकरी मला येऊन भेटले. व्यापा-यांनी याचा फायदा घेऊन शेतक-याच्या धान्याची खरेदी बंद केली आहे. लग्नसराईचा मोसम सुरु आहे. शेतक-यांना पेरणीसाठी बी-बियाणे खरेदी करावे लागणार आहे. शेतीसाठी लागणारी खरेदी शेतक-यांना करावयाची आहे. शेतक-यांकडील धान्य खरेदी व्यापाऱ्यांनी बंद केली आहे. शेतक-याचे धान्य अगदी कमी दरात घेतले जात आहे. व्यापाऱ्यांना धाक बसावा, महागाईला जे आमंत्रण देत आहेत त्यांच्यावर शासनाच्या वतीने निर्बंध आले पाहिजेत. ग्रामीण भागात शेतकरी आर्थिक अडचणीत सापडलेला आहे त्यामुळे शेतक-यांकडील धान्य शासनाने हमी भावात खरेदी केले पाहिजे. शेतक-यांकडील धान्य हमी भावाने शासन खरेदी करील काय ?

श्री. सुनील तटकरे : धान्य खरेदी हमी भावाने शासन करीत आहे. हमी भावाचे दर देखील जाहीर करण्यात आलेले आहेत. सन्माननीय सदस्यांनी सांगितली तशी परिस्थिती मार्केटमध्ये काही कालावधीपूरती निर्माण झाली होती. आता धान्य खरेदी विक्रीचे व्यवहार सुरु झालेले आहेत.

--------------

4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



**पृ. शी**. : दौड जि.पुणे येथील शासकीय धान्याचा गैरव्यवहार

**मु. शी.** : दौड जि.पुणे येथील शासकीय धान्याचा गैरव्यवहार याबाबत सन्माननीय सदस्य सर्वश्री नितीन गडकरी, विनोद तावडे, मधुकर चव्हाण, जगदीश गुप्ता वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

( सन्माननीय सदस्य अनुपस्थित. )

-------------

5...

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

**पृ. शी.** : आसे (ता.मोखाडा) प्राथमिक आरोग्य केंद्रात सर्पदंशाने रुग्णाचा झालेला मृत्यू

**मु. शी.** : आसे (ता.मोखाडा) प्राथमिक आरोग्य केंद्रात सर्पदंशाने रुग्णाचा झालेला मृत्यू याबाबत सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत, वि. प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.रणजित कांबळे ( सार्वजनिक आरोग्य राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री दीपक सावंत यांनी आसे (ता.मोखाडा) प्राथमिक आरोग्य केंद्रात सर्पदंशाने रुणाचा झालेला मृत्यू या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती (श्री.जगदीश गुप्ता )** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

6...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, सर्पदंश झालेला मुलाचा मृत्यू डॉक्टरांच्या हलगर्जीपणामुळे आणि तेथे वाहन चालक नसल्यामुळे झालेला आहे. या निवेदनात कबूल केले आहे की, श्री.कृष्णकुमार पांडे हे 4 तारखेपासून गैरहजर होते आणि या मुलाचा मृत्यू 7 तारखेस झाला आहे. श्री. पांडे यांनी कोणत्याही प्रकारचा रजेचा अर्ज न देता ते गैरहजर होते. त्या ठिकाणी कार्यरत असलेले डॉ.आहाळे यांना निलंबित केले आहे. ते रुग्णालयात होते किंवा नाही याचा या निवेदनात कुठेही उल्लेख नाही. त्या विषयी सदनाला माहिती सांगावी. मोखाडा सारख्या अतिसंवेदनशील भागामध्ये अशा प्रकारे मुलाचा मृत्यू होतो. या मुलाचा मृत्यू झाला आहे, तो मुलगा काही परत येणार नाही. यासंदर्भात वैद्यकीय अधिका-यांवर जरब बसावी म्हणून पर्यायी व्यवस्थेच्या बाबतीत शासन काही आदेश काढील काय ?

यानंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, उत्तरामध्ये स्पष्टपणे चूक झाल्याचे मान्य करण्यात आले आहे. यामध्ये बॉंडेड डॉक्टर आहे त्याला बडतर्फ करण्यात आले आहे. दुसऱ्याला निलंबित करुन कडक कारवाई करण्यात येईल. अशा प्रकारच्या घटना घडू नयेत म्हणून रुग्णालय कल्याण समिती गठीत केलेली आहे. त्यामध्ये लोकप्रतिनिधी आहेत. ते समितीचे अध्यक्ष आहेत. या समितीने दर 2/3 महिन्यांनी रुणालयातील एकूण व्यवस्थेचा पाठपुरावा केला पाहिजे. ज्याच्यावर जबाबदारी दिलेली आहे ते बेजाबदार ठरले आहेत. लोकप्रतिनिधींनी सुध्दा या गोष्टींवर थोडयाफार प्रमाणात लक्ष ठेवणे आवश्यक आहे. या घटना घडू नयेत म्हणून काळजी घेण्याची आवश्यकता आहे.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, ही केस झाल्यानंतर मोखाडा तालुक्यात अशा प्रकारची दुसरी केस झाल्याचे मला सामनाच्या प्रतिनिधीने फोन करुन सांगितले. काल रात्री गरोदर महिलेला गाडी नसल्यामुळे एस.टी.बसमध्ये बसवून नेत असताना तिची एस.टी.बसमध्ये डिलीव्हरी झाली. तेथील अधिकाऱ्यांशी मी बोललो असताना ते म्हणाले आम्ही काय करणार गाडीचा ड्रायव्हर नव्हता. लागोपाठ 2/3 दिवसात अशा प्रकारच्या घटना घडल्या आहेत म्हणून याबाबत तातडीने उपाययोजना करणे आवश्यक आहे.

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, संबंधितांवर कडक कारवाई करणार आहोत. बॉंडेड डॉक्टरला बडतर्फ करण्यात आलेले आहे. याबाबतीत शासन कडक धोरण अवलंबिणार आहे. जोपर्यंत रिलीव्हर येत नाही तोपर्यंत डयूटीवर असलेल्या डॉक्टरने कोणत्याही परिस्थितीत रुग्णालय सोडून जाऊ नये अशा प्रकारचे आदेश काढणार आहोत.

श्री. संजय केळकर : सभापती महोदय, ठाणे जिल्हयातील आदिवासी भागाचा अतिशय महत्वाचा असा हा प्रश्न आहे. विक्रमगड तालुक्यात एका आश्रमशाळेतील विद्यार्थ्याला सर्पदंश झाला पण उपचार करण्यासाठी डॉक्टरकडे नेण्यासाठी गाडी नव्हती. शेवटी आंदोलन करण्याची वेळ आल्यानंतर रुग्णवाहिका उपलब्ध झाली. आदिवासी भागामध्ये किती रुग्णवाहिका उपलब्ध आहेत आणि त्यात चालू स्थितीमधील किती रुग्णवाहिका आहेत ? ड्रायव्हर किती उपलब्ध आहेत ? आदिवासी विभाग आहे ही गोष्ट डोळयासमोर ठेवून किती दिवसात रुग्णवाहिका उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत ?

**(सभापतीस्थानी माननीय उपसभापती )**



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रणजित कांबळे :सभापती महोदय, हा प्रश्न वेगळा आहे तरी सुध्दा मी उत्तर देतो. घटना झाली त्यावेळी वाहन उपलब्ध होते पण ड्रायव्हर उपलब्ध नव्हता. सन्माननीय सदस्यांनी जी माहिती मागितली आहे ती आता माझ्याकडे उपलब्ध नाही. ती मी पटलावर ठेवण्यास तयार आहे. आता नॅशनल रुरल हेल्थ मिशन अंतर्गत प्रत्येक ग्रामपंचायत, सबसेंटर्स आणि प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये अनुक्रमे 25000, 10,000 आणि 10,000 रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. ग्रामपंचायतीमध्ये सरपंच आणि अंगणवाडी मदतनीस, सबसेंटरमध्ये एएनएम आणि सरपंच आणि प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये मेडिकल ऑफीसर आणि जिल्हा परिषद सदस्य यांच्या संयुक्त खात्यामध्ये हे पैसे ठेवले जातील. या पैशाचा विनियोग पेशंटला हॉस्पीटलमध्ये पाठविण्यासाठी केला जाईल. पेशंटला हॉस्पीटलमध्ये नेण्याकरिता भाडयासाठी हे पैसे वापरले जाऊ शकतील. याच कामासाठी हे पैसे दिलेले आहेत. रुग्णवाहिका दिल्यानंतर ती खराब आणि नादुरुस्त झाली तर हे पैसे त्यासाठी वापरले जाऊ शकतात. प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये, सबसेंटरमध्ये रक्कम दिलेली आहे. दरवर्षी अशी रक्कम दिली जाईल. हा निधी संपला तर रिइम्बर्स करुन पुन्हा पैसे देणार आहोत.

--------

नंतर श्री. भोगले

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

**पृ. शी.** : अनुकंपा तत्वावर वैद्यकीय अधिकारी पदावर नेमणूक मिळणे

**मु. शी.** : अनुकंपा तत्वावर वैद्यकीय अधिकारी पदावर नेमणूक मिळणे याबाबत सर्वश्री प्रकाश शेंडगे, रामनाथ मोते, संजय केळकर, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.रणजित कांबळे ( सार्वजनिक आरोग्य राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री प्रकाश शेंडगे, रामनाथ मोते, संजय केळकर, वि.प.स. यांनी "अनुकंपा तत्वावर वैद्यकीय अधिकारी पदावर नेमणूक मिळणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ MMP/ KGS/ 12:20

निवेदन क्रमांक-7...........

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, अनुकंपा तत्वावर सामावून घेण्याबाबतचा हा प्रश्न आहे. डॉ.मुकुंद शिंदे यांना अनुकंपा तत्वावर शासकीय सेवेत सामावून घेण्याबाबत न्यायालयाने आदेश दिले होते. परंतु 1998 ते 2001 या काळात डॉक्टरांची अनेक पदे भरली गेली, वैद्यकीय अधिकारी वर्ग.3 ची अनेक पदे भरली गेली. न्यायालयाच्या आदेश असताना आणि शासनाने स्वत: न्यायालयात ॲफिडेव्हीट दाखल केले करताना पदे रिक्त झाल्यानंतर सामावून घेऊ असे कळविले होते. परंतु पदे भरताना सामावून घेतले नाही. 28.5.2001 च्या शासन निर्णयानुसार ही पदे लोकसेवा आयोगाच्या कक्षेत आल्यामुळे अनुकंपा तत्वावर सेवेत घेऊ शकत नाही असे निवेदनात म्हटले आहे. हे प्रकरण त्यापूर्वीचे आहे. लोकसेवा आयोगाच्या कक्षेत ही पदे जाण्यापूर्वीचे हे प्रकरण आहे. न्यायालयाने आदेश दिलेले आहेत. त्यामुळे न्यायालयाच्या आदेशाचा मान राखणे, न्यायालयाच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यासाठी तांत्रिक बाबी उपस्थित न करता संबंधित डॉक्टरांना अनुकंपा तत्वावर सेवेत सामावून घेतले जाईल काय?

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, बीएएमएस डॉक्टरांच्या पदावर अनुकंपा तत्वानुसार सेवेत घेण्याचा हा विषय आहे. सध्या डॉ.मुकुंद शिंदे हे ट्रेझरी विभागात क्लार्क पदावर कार्यरत आहेत. बीएएमएस पदावर त्यांना नियुक्ती देणे शक्य नाही. याचे कारण वैद्यकीय अधिकारी हे पद अनुकंपा तत्वावर भरता येत नाही असे जी.ए.डी.चे आदेश आहेत. सब इन्स्पेक्टर, सेल्स टॅक्स ऑफिसर, मेडिकल ऑफिसर या पदांना अनुकंपा तत्व लागू होत नाही. संबंधित व्यक्ती जी आहे, त्यांना ट्रेझरी विभागात क्लार्क म्हणून नोकरी देण्यात आली आहे.

---------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : लाख डाळीवरील बंदी उठविणे

**मु. शी.** : लाख डाळीवरील बंदी उठविणे याबाबत श्री.दिवाकर रावते, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.बाबा सिद्दीकी ( अन्न व औषध प्रशासन राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते, वि.प.स. यांनी "लाख डाळीवरील बंदी उठविणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

निवेदन क्रमांक-9.............

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, लाख डाळीच्या संदर्भात केंद्र शासनाने कळविले आहे की, लाख डाळीवरील बंदीचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. डॉ.कोठारी यांच्या पत्राच्या संदर्भात 11.3.1991 रोजी केंद्र शासनाने असे कळविले आहे की, राज्यात लाख डाळीच्या संदर्भातील निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. राज्य शासन या संदर्भात निश्चित कोणती भूमिका घेणार आहे?

श्री.बाबा सिद्दीकी : सभापती महोदय, 10 एप्रिल, 2008 रोजीच्या कॅबिनेट बैठकीमध्ये असे ठरले आहे की, हा कायदा केंद्र शासनाचा असल्यामुळे केंद्र शासनाकडे पाठपुरावा करण्यात यावा.

श्री.दिवाकर रावते : निवेदनात स्पष्ट म्हटले आहे की, 20.11.1961 पासून राज्यात लाख डाळीवर बंदी घालण्यात आली आहे. तसेच लाख डाळीची पशुखाद्य म्हणून विक्री करण्यास दिनांक 27.6.1969 पासून बंदी घालण्यात आली आहे. या संदर्भात डॉ.कोठारी यांनी केंद्र शासनास पाठविलेल्या दिनांक 26.2.1991 च्या पत्रान्वये लाख डाळीवरील बंदी उठविण्याबाबत विनंती केली होती. केंद्र शासनाने डॉ.कोठारी यांच्या पत्रासंदर्भात दि.11.3.1991 च्या पत्रान्वये असे कळविले आहे की, राज्यात लाख डाळीवरील बंदीचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. त्यामुळे डॉ.कोठारी यांच्या पत्राबाबत राज्य शासनाने उचित उत्तर पाठवावे. आपण मंत्रिमंडळाच्या बैठकीत हा विषय उपस्थित केला त्याबद्दल धन्यवाद देतो.

(नंतर श्री.जुन्नरे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGJ/ KGS/ SBT/ MMP/ KTG/ प्रथम श्री.भोगले.. 12:25

श्री. दिवाकर रावते ...

डॉ. कोठारी यांच्या उपोषणाचा आज 52 वा दिवस आहे. नॅशनल इंस्टिट्यूट ऑफ न्युट्रिशन या संस्थेकडून लवकरात लवकर लाखी डाळीवरील बंदी उठवण्याच्या संदर्भात अहवाल मागवून घ्यावा. गेल्या 40 वर्षापासून लाखी डाळीवर बंदी आहे त्यामुळे लवकरात लवकर लाखी डाळी वरील बंदी उठवण्याची आवश्यकता आहे. त्यामुळे लाखी डाळीच्या यासंदर्भात काय कार्यवाही केली जाणार आहे?

श्री. बाबा सिद्दीकी : सभापति महोदय, माननीय सदस्य श्री. रावते जी ने नॅशनल इंस्टिट्यूट ऑफ न्युट्रिशन का अहवाल जल्दी मंगाने के बारे में प्रश्न पूछा है. मैं उनको बताना चाहता हूँ कि दिसम्बर 2007 में हमारे पास पत्र आया है. हमारे विभाग के प्रधान सचिव श्री. अमिताभ चंद्र जॉइंट सेक्रेटरी श्री. देवाशीष से मिले हैं. उन्होंनें 6 महीने का समय मांगा है और उनका पत्र हमारे पास आया है.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, डॉ. कोठारी यांचे गेल्या 52 दिवसापासून उपोषण सुरु आहे. त्यांनी उपोषण सोडावे म्हणून या विषयाच्या संदर्भात काय निर्णय घेण्यात आलेला आहे हे त्यांना सांगावे व त्यांचे उपोषण सोडवण्यास मदत करावी.

श्री. बाब सिद्दीकी : सभापति महोदय, मैंने खुद उनसे बात की है और हमारे कमिश्नर ने भी उनसे बात की है. आज उनसे फिर बात करेंगे.

-------------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

. . . .2

**पृ. शी.** : कबुलायत मालमत्तेवर बेकायदा नावे दाखल करणे

**मु. शी.** : कबुलायत मालमत्तेवर बेकायदा नावे दाखल करणे याबाबत सर्वश्री विनोद तावडे, मधुकर चव्हाण, रामनाथ मोते, संजय केळकर, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. नारायण राणे ( महसूल मंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री विनोद तावडे, मधुकर चव्हाण, रामनाथ मोते, संजय केळकर, यांनी "कबुलायत मालमत्तेवर बेकायदा नावे दाखल करणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**निवेदन**

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

... 3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, मौजे पनवेल येथील जमिनीचा हा प्रश्न आहे या विषयाच्या संदर्भात माननीय मंत्रीमहोदयांनी आपल्या लेखी उत्तरात म्हटले आहे की, "प्रस्तुत प्रकरणी मौजे पनवेल येथील वडाळे तळयाच्या पूर्वेकडील 855 व 856 ची मूळ जमीन शासनाची आहे किंवा कसे याबाबत चौकशी करुन आवश्यक तो निर्णय घेण्याबाबत जिल्हाधिकारी, रायगड यांना कळवण्यात आलेले आहे." त्यामुळे या विषयाच्या संर्भात माझा एकच प्रश्न आहे की, ही चौकशी किती दिवसात पूर्ण केली जाणार आहे व त्यासंदर्भातील निर्णय किती दिवसात अपेक्षित आहे? तसेच यासाठी आपण काही टाईमबाऊंड कार्यक्रम दिलेला आहे काय?

श्री. नारायण राणे : सभापती महोदय, एक महिन्यात रिपोर्ट येईल.

-------------

...4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : महानगरपालिका क्षेत्रातील अनुदानित खाजगी प्राथमिक शाळांना गेल्या 8-10 वर्षापासून वेतनेतर अनुदान न मिळणे

**मु. शी.** : महानगरपालिका क्षेत्रातील अनुदानित खाजगी प्राथमिक शाळांना गेल्या 8-10 वर्षापासून वेतनेतर अनुदान न मिळणे याबाबत सर्वश्री गुरुमुख जगवाणी, रामनाथ मोते, श्री. संजय केळकर, प्रतापराव सोनवणे, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

प्रा. वसंत पुरके ( शालेय शिक्षण मंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री गुरुमुख जगवाणी, रामनाथ मोते, श्री. संजय केळकर, प्रतापराव सोनवणे यांनी "महानगरपालिका क्षेत्रातील अनुदानित खाजगी प्राथमिक शाळांना गेल्या 8-10 वर्षापासून वेतनेतर अनुदान न मिळणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**निवेदन**

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

... 5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, महानगरपालिका क्षेत्रातील खाजगी अनुदानित प्राथमिक शाळांना गेल्या 8-10 वर्षापासून वेतनेतर अनुदान मिळालेले नाही. वेतनेतर अनुदान न मिळाल्यामुळे या शैक्षणिक संस्था अडचणीत सापडलेल्या आहेत. निवेदनाच्या उत्तरात म्हटले आहे की, "सन 2003-04 या कालावधीतील महानगरपालिका, नगरपालिका शाळेला 3.85 कोटी रुपये एवढे वेतनेतर अनुदान सर्व संबंधित महानगरपालिका आणि नगरपालिका यांना सन 2006-07 मध्ये वितरीत करण्यात आलेले आहे. आपण जे 3.85 कोटी रुपये या शाळांना वेतनेतर अनुदान दिले आहे त्यापैकी कल्याण महानगरपालिका क्षेत्रातील खाजगी अनुदानित प्राथमिक शाळांना किती अनुदान देण्यात आले ? तसेच ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील खाजगी अनुदानित प्राथमिक शाळांना किती अनुदान देण्यात आलेले आहे? आपण 31.3.2008 रोजी 1,43,47,000 रुपये वितरीत केलेले आहे या रक्कमेपैकी कल्याण महानगरपालिका क्षेत्रातील खाजगी अनुदानित प्राथमिक शाळांना किती अनुदान देण्यात आले व ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील खाजगी अनुदानित प्राथमिक शाळांना किती अनुदान देण्यात आले ?

यानंतर श्री. गायकवाड

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ KGS/ SBT/ MMP/ KTG/ 12=30

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदय, शाळा निहाय माहिती आता माझ्याकडे नाही परंतु ही माहिती सभागृहाच्या पटलावर आज किंवा उद्याच ठेवण्यात येईल. 2004 पर्यंतचे थकीत वेतनेतर अनुदान शासन देत असून त्यासाठी. 3 कोटी 45 लाख रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. पश्चिम महाराष्ट्रातील सगळया नगरपालिकांचा हा प्रश्न आहे. 2004 पर्यंतच्या थकीत रकमेपैकी 1 कोटी 68 लाख रुपयांसाठी जुलै महिन्यात पुरवणी मागण्यांमध्ये तरतूद करण्यात येईल त्यानंतरचे वेतनेतर अनुदान द्यावयाचे किंवा कसे याबाबतीत निर्णय घेण्याकरिता एक समिती गठीत करण्यात आली असून त्यात पाच मंत्री महोदयांचा समावेश आहे व त्या संदर्भात लवकरच निर्णय घेण्यात येईल.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, नंतर माहिती देणार असतील तर कल्याण आणि ठाणे महानगरपालिकेतील ज्या शाळांना थकित रक्कम दिलेली आहे त्या शाळांची नावे आणि थकीत रक्कम किती आहे याची देखील माहिती देण्यात यावी.

प्रा.वसत पुरके : सभापती महोदय,शाळानिहाय रकमेसह माहिती देण्यात येईल.

---

**उपसभापती** : बाकीची नियम 93 ची निवेदने उद्या घेण्यात येतील.

श्री.मधुकर चव्हाण : अजूनही काही निवेदने घ्यावयाची राहिलेली आहेत.

**उपसभापती** : उद्या निवेदने घेण्यात येतील

--

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**<u>लैगिक शिक्षणासंबंधी शिक्षण मत्र्यांनी केलेल्या निवेदनाबाबत</u>**

डॉ.नीलम गो-हे : सभापती महोदय, मला एक मुद्दा असा मांडावयाचा आहे की विधान परिषदेमध्ये शिक्षणाच्या प्रस्तावावर उत्तर देत असतांना सेक्स एज्युकेशनचा अंतर्भात शिक्षणात करण्यात येईल असे म्हटले असल्याचे आम्हाला चॅनल्सच्या माध्यमातून समजले आहे. सभागृहातील सन्माननीय सदस्यांचे असे म्हणणे आहे की, अशा प्रकारचा कोणताही संदर्भ सान्माननीय मंत्री प्रा.वसंत पुरके यांनी दिलेला नव्हता. विधान सभेमध्ये हा मुद्दा उपस्थित करण्यात आला असतांना तेथे हा विषय विथ ड्रॉ करुन संपविण्यात आला आहे परंतु वरच्या सभागृहामध्ये काल पासून आम्ही विनती करीत आहे की या संदर्भातील नेमकी वस्तुस्थिती काय आहे ती आम्हाला सांगण्यात यावी. आज 50- 50 चॅनल्सचे प्रतिनिधी आम्हाला विचारत आहेत की माननीय मंत्री महोदय नेमके काय बोलले आहेत याचा खुलासा करावा परंतु सभापती महोदय, आपण आम्हाला स्पष्टीकरण मागण्यासाठी देखील संधी देत नाही.

**उपसभापती** : मी आपल्याला नंतर संधी देणार आहे.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी : शिवप्रतिष्ठानचे प्रमुख श्री.संभाजी भिडे यांना सांगलीच्या पोलीस अधीक्षकांनी केलेली मारहाण

मु.शी :शिवप्रतिष्ठानचे प्रमुख श्री.संभाजी भिडे यांना सांगलीच्या पोलीस अधीक्षकांनी केलेल्या मारहाणीबाबत सर्वश्री संजय दत्त,गोविंदराव आदिक, एस.क्यु.जामा,राजन तेली, चंद्रकांत रघुवंशी,जैनुद्दिन जव्हेरी नितीन गडकरी,पांडुरंग फुंडकर,विनोद तावडे,श्रीकांत जोशी, पाशा पटेल,गुरुमुख जगवानी,केशवराव मानकर,मधुकर सरपोतदार दिवाकर रावते, डॉ.नीलम गो-हे,सर्वश्री अरविंद सावंत,ॲड.अनिल परब,डॉ.दीपक सावंत,सर्वश्री परशुराम उपरकर,सुरेश जेथलिया, किसनचंद तनवाणी,वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री.राजन तेली ( विधान सभेने निवडलेले ) :सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय उपमुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे अशी विनंती करतो :-

"सांगली शहरात दिनांक 27 फेब्रुवारी, 2008 रोजी "जोधा अकबर" चित्रपट प्रदर्शित करु नये म्हणून शिवप्रतिष्ठानचे प्रमुख श्री. संभाजीराव भिडे व त्यांच्या समर्थकांनी थिएटर मालकांना केलेली विनंती, त्यांची विनंती थिएटर मालकांनी मंजूर करुनही श्री. भिडे गुरुजी यांनी केलेल्या काही वक्तव्यामुळे पोलिसांनी त्यांच्यावर तसेच त्यांच्या सहका-यावर केलेला लाठीहल्ला, या घटनेस हिंसक वळण लागून पोलीस ठाणे, शासकीय रुग्णालय, पोलीस व्हॅन, तसेच दुकानांवर व एस.टी.बसेसवर झालेली दगडफेक, गावातील पोलीस चौकी पेटवून देण्यात येणे या दंगलीत पोलीस प्रमुखासह आठ पोलीस व पन्नास नागरिक गंभीररीत्या जखमी होणे, परिणामी तेथे पसरलेले भीतीचे वातावरण या प्रकरणी राज्य शासनाने सखोल चौकशी करुन दोषींवर तातडीने कारवाई करण्याची आवश्यकता व याबाबत शासनाची उपाययोजना "

श्री.आर.आर.पाटील ( उपमुख्यमंत्री ) :सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

<u>निवेदन</u>

( प्रेस :कृपया सोबत जोडलेले निवेदन येथे छापावे )



( निवेदना नंतर )

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजन तेली : सभापती महोदय, पोलीस अधीक्षक श्री.कृष्ण प्रकाश यांच्या विरुध्द कोणत्या कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे ? श्री.भिडे गुरुजी जखमी झाल्यानंतर त्यांना हॉस्पिटलमध्ये जाऊ दिले नाही ही गोष्ट खरी आहे काय ?

श्री.आर.आर. पाटील : त्यांना हॉस्पिटलमध्ये जाऊ दिले नाही ही गोष्ट खरी नाही.. त्यांना हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले होते मी स्वत: हॉस्पिटलमध्ये जाऊन त्यांच्याबरोबर त्याचप्रमाणे डॉक्टरांबरोबर बोललो होतो. श्री.भिडे यांना हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यासाठी पोलिसांनी कोणत्याही प्रकारचा व्यत्यय आणला नव्हता.

डॉ.नीलम गो-हे : सभापती महोदय, निवेदनामध्ये असे म्हटलेले आहे की, "शिवप्रतिष्ठानचे श्री. हरिदास पडळकर यांनी पोलीस उपनिरीक्षक श्री. घोडके यांना पाठीमागून गळयास आवळून खाली पाडले त्यावेळी त्यांनी हाताला धरुन ठेवलेले संभाजी भिडे हे देखील त्यांच्या समवेत खाली पडले त्यामुळे श्री. संभाजी भिडे यांच्या दंडास खरचटून ते जखमी झाले तसेच इतर कार्यकर्ते यांनी देखील पोलिसांना लाथाबुक्यांनी मारहाण केली" वस्तुस्थिती मात्र यापेक्षा वेगळी आहे माझ्याकडे एक छायाचित्र कोणी तरी पहाण्यासाठी पाठविले आहे.त्यावरुन ही वस्तुस्थिती स्पष्ट होते. श्री.संभाजी भिडे यांची नौटंकी नही चलेगी असे श्री.कृष्णप्रकाश बोलले असे स्वत: श्री. भिडे गुरुजी आणि त्यांच्या बरोबर असलेल्या कार्यकर्त्यांनी सांगितलेले आहे. श्री.संभाजी भिडे यांची नौटंकी नही चलेगी असे स्वत: एस.पी. नी बोलणे योग्य आहे काय ? त्याचप्रमाणे आताच आपण असे सांगितले आहे की हॉस्पिटलमध्ये जाऊन श्री. भिडे यांच्या बरोबर मी स्वत: बोललो आहे परतु श्री.भिडे रक्तबंभाळ होईपर्यत त्यांना मारहाण करण्यासाठी स्वत: एस.पी. उतरले होते आणि पुन्हा माननीय उपमुख्यमंत्री त्याचे समर्थन करीत आहेत हे योग्य नाही. या निमित्ताने मला असे विचारावयाचे आहे की, श्री. भिडे गुरुजीचे कार्यकर्ते असा प्रकार करणार नाहीत असे माननीय मंत्री महोदयांनी सांगितलेले परंतु श्री कृष्ण प्रकाश यांचे संपूर्ण वर्तन योग्य आहे असे जर तुम्हाला वाटत असेल तर तुम्ही तसे म्हणा म्हणजे श्री. भिडे गुरुजींना मारहाण केल्याचे समर्थन आपण करीत आहात हे आपोआपच रेकॉर्डवर येईल. लाथाबुक्यांनी पोलिसांना मारहाण केली होती म्हणून पोलिसांनी कारवाई केली असे सांगण्यात आले आहे परंतु मुळातच श्री.संभाजी भिडे यांच्या बाबत त्यांनी अत्यंत अपमानकारक उद्‌गार काढले असून बूट



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

घालून शिवाजी महाराजांच्या पुतळयाच्या सर्कलमध्ये स्वत: श्री.कृष्ण प्रकाश गेले होते ही वस्तुस्थिती सर्व मिडियांनी पाहिलेली आहे तेव्हा याबाबतीत खुलासा करण्यात यावा.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, नौटंकी नही चलेगी असे ते म्हणाले होते काय, त्याचप्रमाण ते बुट घालून गेले होते काय, छत्रपती शिवाजी महाराजांचा अपमान झाला आहे काय या सर्व मुद्याच्या संदर्भात चौकशी करण्यासाठी आय.जी.ची नेमणूक केलेली आहे.त्याचा अहवाल अंतिम टप्यात असून त्यांच्याकडून अहवाल आल्यानंतरच अशा प्रकारचे वक्तव्य केले होते काय हे स्पष्ट होईल त्याचप्रमाणे व्यक्तिगत मला श्री.भिडे गुरुजीबद्दल नेहमीच आदर वाटत असून त्यांच्या अनेक कार्यक्रमांना मी हजर राहिलो आहे. सांगली जिल्हयातील ते एक आदरणीय असे व्यक्तिमत्व आहे. व सांगली विभागामध्ये ते चांगले काम करीत आहेत. मी सभागृहाला सांगू इच्छितो की, श्री.कृष्ण प्रकाश हे सध्या सांगली येथे असून यापूर्वी बुलढाणा येथे असतांना त्यांनी चांगले काम केले होते. माननीय मंत्री डॉ.पतंगराव कदम यांनी देखील टीका केली होती परंतु मी स्वत: होऊन त्यांची इच्छा नसतांना त्यांना सांगली येथे आणले होते.. सांगली येथे आल्यानंतर एस.टी.चे उत्पन्नात त्यांनी 7 महिन्यात 10 कोटी रुपयांचे उत्पन्न वाढविले आहे.

.श्री.पांडुरंग फुंडकर : एस.टी.चे उत्पन्न वाढविण्यामध्ये ते तरबेज आहेत.

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, मी माननीय विरोधी पक्षनेत्यांना आणि त्यांच्या सहकाऱ्यांना सांगू इच्छितो की, त्यांनी कृपया माझे बोलणे ऐकून घ्यावे. मी आपल्याला असे सांगत होतो की, त्यांनी अवैध दारू बंद केल्यामुळे साडेतीन कोटी रूपयांनी आपले उत्पन्न वाढलेले आहे. म्हणजे काही गोष्टी जमेच्या आहेत. तेव्हा एकंदरीतच हे अवैध धंदे करणारे जे लोक आहेत ते दबा धरून बसले होते, ते नाराज होते पण काही करू शकत नव्हते. या संदर्भात अनेक शिष्टमंडळे मलादेखील येऊन भेटली होती पण मी देखील दखल दिली नव्हती, दाद दिली नव्हती. सभापती महोदय, भिडे गुरूजींसारख्या आदरणीय व्यक्तिमत्त्वावर लाठीहल्ला झाला आहे याचा फायदा घेऊन हे एलिमेंट पुढे घुसले. आजही यातील आरोपींचे विश्लेषण बघितले तर त्यात जुगार अड्डे चालविणारे, मटका चालविणारे, अवैध दारू विकणारे, वेश्या व्यवसाय करणारे असे आहेत. काही लोक या आंदोलनामध्ये आपापल्या एरियामध्ये घुसले. नाव भिडे गुरूजींचे मात्र हात धुवून घेतले या लोकांनी. एक चांगली चाललेली चळवळदेखील बातम्यांमुळे थोडीशी बदनाम झाली. त्याचाही शासनाला खेद आहे. या लोकांना उघडे पाडण्याचे काम निश्चितपणे पुढील काळात केले जाईल. सभापती महोदय, मी हेही लक्षात आणून देईन की, भिडे गुरूजी आणि त्यांचे कार्यकर्ते हे देशभक्ती शिकवित आहेत, चांगले विचार तरूणांवर बिंबविण्याचा ते प्रयत्न करीत आहेत. ते वेल एज्युकेटेड आहेत. त्या परिसरामध्ये ते काम करीत आहेत आणि वेळोवेळी आमच्या त्यांच्या गाठीभेटी होतात. त्यांच्याबाबतीत जे काही घडले आहे त्याबद्दल शासनालाही खेद वाटतो आहे, व्यक्तिगत मलादेखील दु:ख होत आहे. "नौटंकी नही चलेगी" अशा प्रकारची वक्तव्ये एसपींनी करणे, ते बूट घालून आत गेले होते काय ? या बाबतीतील आयजीचा अहवाल येण्याची मी वाट पाहतो आहे.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, हा अहवाल केव्हापर्यंत येईल ? सभापती महोदय, आता माननीय उपमुख्यमंत्र्यांनी सांगितले की, जे काही झाले त्याबद्दल तेही व्यथित झाले आहेत. तसे सगळेच व्यथित झालेले आहेत. पण या व्यथित झालेल्या लोकांना तो अहवाल येईपर्यंत असेच वाऱ्यावर सोडण्यापेक्षा मला असे सुचवावेसे वाटते की, श्री.भिडे गुरूजी, संबंधित शिवप्रतिष्ठानचे लोक, आमच्यासारखे आमदार .. ज्यांना या विषयी आस्था आहे. माननीय उपमुख्यमंत्री म्हणाले की, त्यात नंबर 2 चे धंदेवाले आले आणि त्यांनी हे चांगले चाललेले आंदोलन आपल्यासारखे करून

..... जेजे 2 ..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

घेतले वगैरे. मी हे दोन वेगवेगळे विषय मानते. पण आपण म्हणता त्याप्रमाणे काही वेळेस असेही घडू शकते. अशा प्रसंगी समाजकंटक हे स्वतःचे हात धुवून घेत असतात. त्याचे येथे कोणीही समर्थन करणार नाही. म्हणून माझी अशी सूचना आहे की, आपल्या आयजींचा अहवाल केव्हा येणार आहे ? याची अंदाजित कल्पना तरी आपण आम्हाला देऊ शकाल का ? आम्हाला स्वतः अशोकराव धीवरेंनी सांगितले होते की, 3 ते 4 दिवसात अहवाल येईल. पण मला अशी शंका वाटते आहे की, हे अधिवेशन संपेपर्यंत आपण तो अहवाल थांबवून ठेवला आहे किंवा काय. म्हणून मला असे सुचवावयाचे आहे की, मे महिन्यामध्ये भिडे गुरूजी, आमच्या सारखे काही आमदार आणि तेथील शिवप्रतिष्ठानचे काही लोक यांची, कारण हे जे राष्ट्रप्रेमाचे काम करणारे लोक आहेत त्यांचे नीतीधैर्य खच्ची होऊ नये या दृष्टीकोनातून, आपण सांगलीमध्ये एक बैठक घ्यावी. जेणे करून कार्यकर्त्यांना दिलासा मिळाला पाहिजे की त्यातील जे योग्य लोक आहेत त्यांच्यावर कोठल्याही प्रकारे सूडाचे राजकारण केले जाणार नाही. तसे आपण करणार आहात का ?

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, मी स्वतः या केसमध्ये लक्ष दिले होते. या आंदोलनाचा फायदा घेऊन कोठे तरी समाजकंटक कोठे तरी नुकसान करीत आहेत आणि त्याचा प्रामाणिक कार्यकर्त्यांना त्रास होऊ नये म्हणून व्हीडीओ टेपमध्ये, जबाबातून जेवढी नावे निष्पन्न होतील तेवढ्यांनाच आरोपी करण्यात आले आहे. परंतु यातील कित्येक आरोपी विद्यार्थी आहेत, काय चालले आहे ते पहावयास गेलेले असेही त्यात आहेत तेही त्या टेपमध्ये दिसत आहे. त्यांच्या बाबतीत देखील माझे सहानुभूतीचे धोरण राहील. यामध्ये जे अवैध धंदे करणारे घुसले होते किंवा ज्यांनी नुकसान केले त्यांच्या बाबतीत संयुक्तपणे कठोर कारवाया केल्या जातील आणि ज्यांच्यावर आजपर्यंत कोणतेही गुन्हे नव्हते, भिडे गुरूजींना मारल्यावर तरूणांच्या भावनांचा उद्रेक होणे हे मी समजू शकतो, ते स्वाभाविक होते. म्हणून त्या दंगलीमध्ये कोणाच्या हातून एखादा दगड एसटी बस वर पडला असला तरी मी त्यांना गुन्हेगार मानणार नाही. यापूर्वी ज्यांच्यावर कोठलाही गुन्हा नोंद नव्हता, ज्यांचे वर्तन संशयास्पद नाही आणि जे मुख्य ॲक्टिविटीजमध्ये पुढे पुढे नव्हते अशा लोकांवरील गुन्हे, मी त्यांचे अर्ज घेऊन परत घेईन.

**उपसभापती** : आता यानंतर पुढील लक्षवेधी सूचना घेण्यात येईल.

..... जेजे 3 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## जळगाव जिल्ह्यातील शेतकऱ्याने मुंबईत उपोषण करताना आत्महत्या करण्याचा प्रयत्न केल्या प्रकरणी पॉईंट ऑफ इन्फर्मेशन.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, या निमित्ताने एक पॉईन्ट ऑफ इन्फर्मेशन आहे. सभापती महोदय, पावणेदोन महिन्यांचे हे अर्थसंकल्पीय अधिवेशन चालू आहे. जळगाव जिल्ह्यातील पाचोरा येथील एक शेतकरी श्री.सुभाष पाटील हे मुंबईच्या आझाद मैदान येथे उपोषणाला बसले होते. त्यांच्या उपोषणाकडे दुर्लक्ष झाले. त्यामुळे त्यांनी उपोषणाच्या ठिकाणी आज सकाळी विष घेतले आणि आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. सध्या त्यांना जी.टी.हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले आहे. सभापती महोदय, ही लाजिरवाणी गोष्ट आहे की, आपले हे पावणेदोन महिन्यांचे अधिवेशन चालू असताना, महाराष्ट्रातील सारे लोकप्रतिनिधी येथे आलेले असताना, सरकार येथे असताना, एक शेतकरी उपोषणाला बसतो आणि त्याच्या त्या उपोषणाची कोणी दखल घेत नाही. म्हणून त्याला विष घेण्याची पाळी येते. मला असे वाटते की, या सभागृहामध्ये या संबंधीचे निवेदन झाले पाहिजे. त्यांच्या मागण्या काय होत्या ? त्यांच्या उपोषणाकडे दुर्लक्ष का झाले ? आणि त्या शेतकऱ्याने विष घेऊन आत्महत्या करण्याचा प्रयत्न का केला या संबंधीचे निवेदन आज सभागृहात झाले तर बरे होईल. ....

( यानंतर सौ. रणदिवे .... केके 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, श्री.सुभाष रामलाल पाटील, वय वर्षे 52, रहाणार जळगाव. ते भूसंपादन केलेल्या जमिनीचे पैसे मिळाले नाहीत म्हणून उपोषणासाठी बसले होते. त्यांनी सकाळी 11.00 वाजता ऊंदीर मारण्याचे औषध प्राशन करुन आत्महत्या करण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यांना जी.टी.हॉस्पिटलमध्ये दाखल केले असून, आता त्यांची प्रकृती स्थिर आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, शासन याची दखल घेणार आहे की नाही ? भूसंपादनाचे पैसे मिळाले नाहीत म्हणून संबंधितांना येथे येऊन उपोषण करावे लागत आहे. असे अनेक शेतकरी आहेत की, ज्यांची जमीन घेतली, परंतु त्यांना अजून पैसे दिलेले नाहीत. माननीय मंत्री महोदयांनी जर याबाबतीत ताबडतोब ॲक्शन घेतली नाही तर यापुढे अशा अनेक शेतकऱ्यांना येथे येऊन विष प्राशन करावे लागेल.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, संबंधितांचे पैसे का मिळाले नाहीत ? पैसे देण्यामध्ये प्रशासकीय विलंब झाला आहे की निधी उपलब्ध नव्हता म्हणून दिलेले नाहीत ? या सगळया गोष्टीची चौकशी करण्यात येईल आणि हे पैसे सुध्दा लवकरात लवकर देण्याचा प्रयत्न केला जाईल आणि तशा पध्दतीच्या सूचना दिल्या जातील.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, ज्या अधिकाऱ्यांनी पैसे देण्यासाठी विलंब केलेला आहे, त्यांच्यावर कारवाई करणार आहात का ?

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, मी माननीय विरोधी पक्षनेत्यांच्या लक्षात एक गोष्ट आणून देऊ इच्छितो की, उर्वरित महाराष्ट्रामध्ये जळगावचा समावेश आहे आणि इरिगेशनसाठी पैसेच उपलब्ध होत नाहीत. आपण गेल्या दोन वर्षामध्ये पुनर्वसनासाठी मॅक्झीमम पैसे दिलेले आहेत. तरीसुध्दा संबंधितांची जमीन का घेतली होती ? त्यांना पैसे द्यावयाचे का राहिले आहेत ? कोणी विलंब केला आहे? याबाबतीत आम्ही सर्व चौकशी करु. सभापती महोदय, प्रशासकीय कारणामुळे निधी उपलब्ध असतानाही विलंब लागलेला असेल तर संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई केली जाईल. परंतु जर पैशाची प्रोव्हीजनच नसेल तर अधिकारी कुठून पैसे देणार आहेत ? हा प्रश्न आहे. म्हणून संबंधित शेतकऱ्याचे पैसे लवकर मिळतील यादृष्टीने पैशाचीही तरतूद केली जाईल.

-----

. . . .2 के-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : यवतमाळ,गांधी नगर येथील नगरपालिका शाळेतील सहायक शिक्षिका श्रीमती सुनिता वाढवे यांनी दिनांक 17 मार्च 2008 रोजी केलेली आत्महत्या

मु.शी. : यवतमाळ,गांधी नगर येथील नगरपालिका शाळेतील सहायक शिक्षिका श्रीमती सुनिता वाढवे यांनी दिनांक 17 मार्च 2008 रोजी केलेली आत्महत्या यासंबंधी यासंबंधी सर्वश्री सय्यद मुझफ्फर हुसेन,उल्हास पवार, मोहन जोशी, चंद्रकांत रघुवंशी, शिवाजीराव पाटील, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.मुझफ्फर हुसेन (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"श्रीमती सुनिता श्रीकृष्ण वाढवे, आदिवासी समाजातील सहायक शिक्षिका, न.प.शाळा क्रमांक 10,गांधी नगर,यवतमाळ येथे कार्यरत असणे, केंद्र प्रमुख श्री.सुभाष गावंडे,सहाय्यक शिक्षक, श्री.लक्कडवाड, शिक्षण सेवक श्री.बांबल व परिचर श्री.प्रभाकर बिसेन हे श्रीमती वाढवे यांना गेले 7 महिने सतत प्रचंड मानसिक त्रास देत असणे, सदर प्रकरणी मुख्याध्यापक, शिक्षण अधिकारी (नगरपरिषद), मुख्य अधिकारी (नगरपरिषद), यवतमाळ यांचेकडे तक्रार दाखल करुन सुध्दा त्या तक्रारीची दखल न घेणे, या आरोपींच्या छळास वैतागून श्रीमती सुनिता वाढवे यांनी दिनांक 17 मार्च 2008 रोजी स्वत:ला जाळून आत्महत्या करणे, शिक्षणासारख्या पवित्र क्षेत्रात अशा प्रकारे वरिष्ठांच्या दुर्लक्षामुळे असे प्रकार मोठया प्रमाणात वाढत असणे, अपराध्यास कडक शासन करुन भविष्यात अशा घटना घडू नयेत, याबाबत राज्य शासनाकडून करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका."

श्री.राजेश टोपे (नगरविकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

. . . .2 के-3



**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

<u>निवेदन</u>

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

. . . .2 के-4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



श्री.मुझफ्फर हुसेन : सभापती महोदय, एका आदिवासी शिक्षिकेला मानसिक ताप दिल्यामुळे संबंधित शिक्षिकेने आत्महत्या केलेली आहे.निवेदनामध्ये म्हटलेले आहे की, डाईंग डिक्लरेशनप्रमाणे कारवाई करण्यात आली. श्री. सुभाष शामराव गावंडे यांच्याविरुद गुन्हा नोंदविण्यात आला.

त्याचबरोबर अन्य जे चार आरोपी आहेत. ते फरारी आहेत आणि त्यांनी इंटेरिअम रिलीफ घेतलेला आहे. डाईंग डिक्लरेशन नंतर ज्यांनी संबंधितांचे स्टेटमेंट घेतले, तो जमादार 36 तास गायब झाला होता. त्यामुळे आरोपी फरार झाले. हे आरोपी मिळालेले नाहीत, परंतु त्यांनी इंटेरिअम रिलीफ घेतलेला आहे. परंतु त्यांना इंटेरिअम रिलीफ मिळू नये म्हणून यासाठी पोलीस विभागाने काय कार्यवाही केली होती? दुसरे म्हणजे निवेदनामध्ये म्हटलेले आहे की,"जिल्हाधिकाऱ्यांच्या माध्यमातून बाकीच्या चार आरोपींच्या संदर्भात चौकशी सुरु आहे. ही चौकशी कधी पूर्ण होणार आहे? संबंधितांवर कधी कारवाई करणार आहात ?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, याठिकाणी सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकरसाहेब यांनी नियम 93 अन्वये दिलेल्या सुचनेच्या वेळी जी चर्चा झाली, त्या माध्यमातून या लक्षवेधी सूचनेतील विषयाच्या संदर्भात सविस्तर चर्चा झालेली आहे. मी सन्माननीय सदस्यांना एवढेच सांगतो की, यामध्ये संबंधित पोलीस स्टेशनच्या अधिकाऱ्यांनी त्यांचा सेल लवकर दाखल केला नाही म्हणून सुध्दा संबंधितांना इंटेरिअम बेल लवकर मिळालेला आहे. म्हणून यासंदर्भात सुध्दा निश्चितपणे चौकशी केली जाईल आणि जर पोलीस अधिकारी दोषी असतील, तर त्यांच्यावर सुध्दा उचित कारवाई केली जाईल.

श्री.मुझफ्फर हुसेन : सभापती महोदय, जी चौकशी झालेली आहे, त्यामध्ये मुख्य अधिकारी आणि शिक्षण अधिकारी हे सुध्दा दोषी आहेत असे दिसते. त्यांचा चौकशीमध्ये समाविष्ट करुन, त्यांच्या बाबतीत सुध्दा चौकशी करणार आहात काय ?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, ही चौकशी सुध्दा केली जाईल.

----

. . . .2 के-5

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



लक्षवेधी सूचना क्र.3 बाबत

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, तिसऱ्या लक्षवेधी सूचनेच्या संदर्भातील निवेदन प्राप्त झालेले नाही.

**उपसभापती** : सन्माननीय सदस्यांचे म्हणणे बरोबर आहे. या लक्षवेधी सूचनेच्या संदर्भातील निवेदन प्राप्त झालेले नाही. त्यामुळे आता लक्षवेधी सूचना क्रमांक 4 चर्चेसाठी घेण्यात येईल.

----

. . . .2 के-6

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



पृ. शी. : ठाणे जिल्हयातील मौजे ओवळा येथील सर्व्हे क्र.208, येथील कॉसमॉस स्टोन क्वॉरी कंपनीने ब्रास दगडांचे अनधिकृतपणे केलेले उत्खनन

मु.शी. : ठाणे जिल्हयातील मौजे ओवळा येथील सर्व्हे

क्र.208, येथील कॉसमॉस स्टोन क्वॉरी कंपनीने ब्रास दगडांचे अनधिकृतपणे केलेले उत्खनन या संबंधी सर्वश्री पांडुरंग फुंडकर,जगदीश गुप्ता, अरविंद सावंत,अनिल परब,डॉ.दीपक सावंत,सर्वश्री गोपीकिसन बाजोरिया, जितेंद्र आव्हाड, लक्ष्मण जगताप, भास्कर जाधव,रणजितसिंह मोहिते-पाटील, डॉ.वसंत पवार,सर्वश्री राजेंद्र जैन,रमेश शेंडगे, श्रीमती मंदा म्हात्रे,प्रा.फौजिया खान वि.प.स.यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.पांडुरंग फुंडकर (विरोधी पक्षनेता) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"मौजे ओवळा येथील सर्व्हे नं.208, (जिल्हा ठाणे) येथील कॉसमॉस स्टोन क्वॉरी या कंपनीने 42912 ब्रास दगडांचे अनधिकृतपणे उत्खनन केल्याप्रकरणी जिल्हाधिकारी,ठाणे यांनी तीनपट दंडाची रक्कम वसूल करण्याचे आदेश दिल्यानंतर देखील अद्यापपावेतो आदेशची पूर्तता न होणे,या कंपनीच्या कार्यक्षेत्रातील जागेची मोजणी करण्याचे काम केवळ काही दिवसांचे असताना जाणीवपूर्वक त्या कामासाठी 18 महिन्यांचा कालावधी घेणे, कंपनीच्या मालकास गैरव्यवहार लपविण्यासाठी महसूल अधिकाऱ्यांनी संरक्षण देणे,दंडाची रक्कम वसूल न झाल्यामुळे शासनाचा कोट्यावधी रुपयांचा महसूल बुडणे, ऑगस्ट 2007 पासून या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी व दंडाची रक्कम वसूल करण्यासाठी सातत्याने मागणी करुन देखील याबाबतची कारवाई अद्यापपर्यंत पूर्ण न होणे,त्यामुळे भ्रष्टाचाराला संरक्षण मिळत असल्याची जनमानसात निर्माण झालेली भावना व याबाबत शासनाने करावयाची कारवाई."

. . . .2 के-7



श्री.नारायण राणे (महसूल मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

यानंतर कु.गायकवाड . . . .

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, ओवळा येथील सर्व्हे नं. 208 (ठाणे) येथील कॉसमॉस स्टोन क्वॉरी या कंपनीने 42912 ब्रास दगडांचे अनधिकृतपणे उत्खनन केले. तेथील दंडाधिकारी यांनी 12 कोटी रुपयांचा दंड लावला. महाराष्ट्र महसूल अधिनियम 1966 च्या कलम 48(7) नुसार त्यांना जिल्हाधिकारी कार्यालयाने नोटीस दिली आहे.तसेच ही रक्कम 5 दिवसामध्ये भरण्याचा आदेशही देण्यात आला आहे. त्यानंतर या आदेशाच्या विरोधात ते आयोगाकडे गेले. तेथे त्यांनी अपील केला व त्यास स्टे मिळाला. 8/5/2005 रोजी सुनावणी झाली. हे सर्व होईपर्यंत तेथील अधिकारी झोपले होते काय ? माझा स्पेसिफिक प्रश्न आहे की, त्यांनी अपील कधी केले व ज्या अधिकाऱ्यांच्या कार्यक्षेत्रामध्ये हा प्रकार घडला आहे त्यांची चौकशी करुन त्यांच्यावर कारवाई करण्यात येणार आहे काय ?

श्री. नारायण राणे : कॉसमॉस स्टोन क्वॉरी या कंपनीने सर्व्हे 208, ओवळा, ठाणे येथील जमीन आपली आहे असे समजून उत्खनन केले होते. याबाबत ज्या वेळी तक्रारी प्राप्त झाल्या त्यावेळी तेथील तालुका अधीक्षक व भूमी अभिलेख यांनी ताबडतोब चौकशी केली. या चौकशीमध्ये ही जमीन त्यांच्या मालकीची नसून त्यानी लगतच्या जमिनीमध्ये उत्खनन केलेले असल्याचे आढळून आले. 30.4.05 रोजी नोटीस देण्यात आली होती. 12,84,35,616 रुपयांचा दंड भरण्याची नोटीस त्यांना देण्यात आली. या नंतर त्यांनी अपर आयुक्तांकडे अपील केले. दिनांक 5.5.2008 रोजी सुनावणी आयोजित केली होती. याठिकाणी मोठया प्रमाणात उत्खनन केलेले असताना देखील तहसीलदारांनी तक्रार केली नाही. मुळात ही जमीन कोणाच्या मालकीची आहे या बाबत वाद आहे. तरी देखील यासंबंधी चौकशी करुन दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात येईल. तसेच अपील पूर्ण झाल्यानंतर त्यांच्यावर जो दंड लावलेला आहे त्याबाबत पूर्ण कारवाई करण्यात येईल.

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, कॉसमॉस स्टोन क्वॉरी या कंपनीच्या बाबत प्रश्न उपस्थित झालेला आहे. 1993 च्या दंगलीच्या वेळी नागाव बंदरामध्ये आरडीएक्सचा साठा सापडला होता. यासंदर्भात 28 मार्च 2004 रोजी एक लक्षवेधी सूचना देण्यात आलेली होती. तत्कालीन सदस्य श्री. अनंत तरे यांनी या विषयासंबंधी विशेष उल्लेखाची सूचना दिली होती.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत ..

त्यांच्याकडे अतिरिक्त जिलेटीनचा साठा सापडलेला होता. तेथे 3 लोकांचा मृत्यु देखील झाला आहे. सातत्याने अशा प्रकारच्या घटना घडत आहेत. तेथे राहणा:या लोकांच्या घरांना तडे जात आहेत व जिलेटीनचा साठा सापडत आहे. अजूनही हे प्रकार घडत आहेत. शासनाने त्या मालकास 12,84,35,616 रूपयांचा दंड बसविला आहे. त्यांनी 42,912 ब्रास दगडाचे अनधिकृतरीत्या उत्खनन केल्याचे निदर्शनास आले आहे. माझा स्पेसिफिक प्रश्न असा आहे की, त्यांना दंडाची रक्कम जमा करण्याचा आदेश दिलेला आहे काय, तसेच पुन्हा अशा प्रकारचे काम करण्याची परवानगी त्यांना दिली आहे काय व दंडाची रक्कम कधी वसूल केली जाणार आहे ?

श्री. नारायण राणे : सभापती महोदय, प्रस्तुत प्रकरणी अप्पर आयुक्त, कोकण यांच्याकडे दि.8.5.2008 रोजी सुनावणी आयोजित केली आहे. सुनावणी झाल्यानंतर त्यांच्या विरुध्द निर्णय आला तर दंडाची रक्कम वसूल करण्यात येईल. परंतु या बाबत अपील केलेले असल्यामुळे आताच काही सांगता येणार नाही.

यानंतर श्री. बरवड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नारायण राणे ....

पण ब्रासप्रमाणे जो दंड लावलेला आहे ती रक्कम अपिलामध्ये किती ठरते त्याप्रमाणे ती त्वरित भरुन घेतली जाईल. आताचा जो मुद्दा आहे तो त्यांनी चुकीच्या जागी उत्खनन केल्याबद्दलचा आहे. संबंधित क्वारी चालू आहे की, नाही याबाबतची माहिती मी पाच मिनिटांमध्ये देतो.

----

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ KTG/

**पृ. शी.** : रत्नागिरी जिल्ह्यातील पन्हाळजे चिवेली खाडीपुलाच्या कामाकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष

**मु. शी.** : रत्नागिरी जिल्ह्यातील पन्हाळजे चिवेली खाडीपुलाच्या कामाकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष यासंबंधी श्री. भास्कर जाधव, श्रीमती मंदा म्हात्रे, श्रीमती उषा दराडे, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. भास्कर जाधव (रायगड तथा रत्नागिरी तथा सिंधुदुर्ग स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय सार्वजनिक बांधकाम मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"रत्नागिरी जिल्ह्यातील खेड, चिपळूण, गुहागर, मंडणगड व दापोली परिसरातील सुमारे 140 ते 150 गावांचा कायापालट करणारा पन्हाळजे चिवेली खाडीपुलाचा सर्वे व अंदाजपत्रक तयार करण्याचा आदेश मुख्यमंत्र्यांनी देऊनही त्याकडे दुर्लक्ष करणे, याबाबत तेथील नागरिकांनी निवेदन देऊनही अद्याप याबाबत कोणत्याही हालचाली न झाल्याने परिसरातील ग्रामस्थांमध्ये नाराजी व्यक्त होणे, या पुलामुळे तेथील जेष्ठ नागरिकांना तसेच आजारी असणाऱ्या रुग्णांना हॉस्पीटलला घेऊन जाण्यासाठी या पुलाचा उपयोग होणार असल्यामुळे येथील जनतेने सदर पुलाचे अंदाजपत्रक लवकरात-लवकर न झाल्यास तीव्र आंदोलन करण्यात येईल असा दिलेला इशारा, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

श्री. रविशेठ पाटील ( सार्वजनिक बांधकाम राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, या निवेदनामध्ये सुरुवातीला असे म्हटले आहे की, चिपळूण तालुक्यातील चिवेली गावावरुन हा मार्ग जोडलेला आहे तसेच चिवेली गाव चिपळूण आणि खेड मुख्यालयाला जोडलेले आहे. या उत्तराला माझी हरकत आहे. मुळात चिवेली आणि खेड-पन्हाळजे हा मार्ग कोठून जोडलेला आहे ? हा मार्ग जोडण्यात आलेला नाही. हे उत्तर चुकीचे आहे. चिपळूण, चिवेली ही गावे तसेच खेड, पन्हाळजे, मंडणगड वगैरे जे चार तालुके आहेत त्यांना जोडणारा हा पूल होणार आहे. केवळ एकदोन गावे जोडणारा हा पूल होणार नाही. या पुलाचा अंदाजित खर्च 17 कोटी 25 लाख रुपये आहे म्हणून आणि हा पूल योजनाबाह्य असल्यामुळे घेता येत नाही असे शासनाने सांगितलेले आहे. हा पूल केवळ एक दोन गावे जोडणारा नसून चार तालुके जोडणारा आहे. म्हणून आपल्याला राज्याच्या योजनेतून पैसे देता आले नाहीत तर सी.आर.एफ. मधून हा पूल घेण्याच्या दृष्टीने राज्य शासन पुढाकार घेणार काय ?

श्री. रविशेठ पाटील : सभापती महोदय, पन्हाळजे हे गाव चिंचघर- कोरेगाव- बहिरवली-पन्हाळजे या प्रमुख जिल्हा मार्ग क्रमांक 17 ने जोडलेले आहे. हा रस्ता खेड मुख्यालयाला जोडलेला आहे. तसेच चिवेली हे गाव चिवेली-मनग्रे, कवंडर या इतर जिल्हा मार्ग क्रमांक 56 ने जोडलेले आहे. त्यापुढे तो रस्ता गुहागर-चिपळूणला जोडलेला आहे. हा राज्यमार्ग चिपळूण आणि गुहागर या दोन्ही मुख्यालयाला जोडलेला आहे. मागणी केलेला पूल हा योजनाबाह्य आहे तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारित बसत नाही. या पुलाला जवळजवळ 17 कोटी 25 लाख रुपये खर्च येणार आहे. या परिसरातील गावे पर्यायी रस्त्याने जोडलेली आहेत. हा पूल योजनाबाह्य असल्याने हा खर्च करणे शासनाच्या दृष्टीने बरोबर ठरत नाही. योजनाबाह्य असल्यामुळे हा पूल सीआरएफ मधून सुध्दा घेता येत नाही.

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, शासनाच्या वतीने असे उत्तर देण्यात आले की, सद्यस्थितीत पन्हाळजे आणि चिवेली ही दोन्ही गावे संबंधित तालुका मुख्यालयाला जोडलेली आहेत. महाराष्ट्रातील जेवढे तालुके आहेत ते सर्व मुख्यालयांना जोडलेले आहेत. तालुका मुख्यालये जोडण्याचे सर्व नेटवर्क राज्यामध्ये पूर्ण झालेले आहे. त्यामुळे तालुका मुख्यालयाला जोडण्यासाठी हा पूल नाही. चिवेली, पन्हाळजे अशा प्रकारचा प्रवास करण्याकरिता जवळजवळ

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव ......

42 ते 50 किलोमीटर अंतर तोडावे लागते तसेच संबंधितांना फार मोठा आर्थिक भुर्दंड सोसावा लागतो तो कमी होण्याच्या दृष्टीने आणि या मार्गाने इतर तालुके जोडले जावेत या उद्देशाने ही लक्षवेधी सूचना या ठिकाणी मांडलेली आहे. केवळ मुख्यालये जोडण्याच्या उद्देशाने लक्षवेधी सूचना मांडलेली नाही. जरी हा योजनाबाह्य पूल असला तरी सुध्दा आपल्या राज्याच्या अनुदानातून किंवा राज्याच्या निधीतून पैसे देता येत नसतील तर शासनाच्या वतीने सीआरएफमधून या पुलाबाबतचा प्रस्ताव केंद्र सरकारकडे पाठविण्यामध्ये काय अडचण आहे. त्यादृष्टीने शासन पुढाकार घेऊन प्रयत्न करणार काय ? शासनाने तसा प्रयत्न करावा अशी माझी पुन्हा विनंती आहे.

श्री. रविशेठ पाटील : सभापती महोदय, 1981 ते 2001 आणि 2001 ते 2021 या रस्ते विकास योजनेत हा पूल आणि हे गाव समाविष्ट नाही. त्यामुळे हा पूल सीआएफ मधून सुध्दा प्रस्तावित करता येणार नाही. या पुलाचा खर्च मोठा असल्यामुळे हे काम घेता येणार नाही.

श्री. भास्कर जाधव : हे काम 2021 पर्यंतच्या रस्ते विकास योजनेत समाविष्ट झाले नाही ही चूक शासनाची आहे. वारंवार या पुलाची मागणी करीत असताना या योजनेमध्ये हे काम समाविष्ट करुन घेणे ही शासनाची जबाबदारी आहे. ही संबंधित खात्याची जबाबदारी आहे. ही ग्रामस्थांची जबाबदारी नाही. या पुलाची गरज लक्षात घेता आणि वारंवार होणारी मागणी विचारात घेता तसेच 75 ते 80 गावे आणि

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव....

4 तालुक्यांना जोडणारा, दापोली कृषि विद्यापीठाला जोडणारा हा पूल आहे. या पुलाची 1981-2001 या योजनेत नोंद नसेल तर खास बाब म्हणून त्याची नोंद करुन केंद्र सरकारकडे हा प्रस्ताव पाठविला जाईल काय ?

श्री.रविशेठ पाटील : रत्नागिरी जिल्हयात सद्य:स्थितीमध्ये मंजूर असलेली कामे विचारात घेता नवीन काम घेता येणे शक्य नाही. तरी सुध्दा शासन याबाबत विचार करील.

श्री.भास्कर जाधव : या पुलाचे काम 4 वर्षांनी, 5 वर्षांनी का होईना, परंतु ते योजनाबाहय कामांमध्ये प्रस्तावित केले जाईल काय ?

श्री.रविशेठ पाटील : याबाबत उचित प्रस्ताव करु.

-----

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ SBT/ KTG/

**पृ. शी**. : कोकणात अवेळी पडलेल्या पावसामुळे आंब्याचे कोटयवधी रुपयांचे नुकसान होणे

**मु. शी**. : कोकणात अवेळी पडलेल्या पावसामुळे आंब्याचे कोटयवधी रुपयांचे नुकसान होणे यासंबंधी सर्वश्री मधुकर चव्हाण, अरविंद सावंत, जयंत प्र.पाटील, दिवाकर रावते, गुरुनाथ कुलकर्णी, राजन तेली, भास्कर जाधव, विक्रम काळे , श्रीमती मंदा म्हात्रे, श्रीमती अलका देसाई, सर्वश्री सय्यद मुझफ्फर हुसेन , रमेश शेंडगे, जितेंद्र आव्हाड, डॉ. नीलम गोऱ्हे, सर्वश्री परशुराम उपरकर, सुरेश जेथलिया, सुरेशदादा देशमुख, किसनचंद तनवाणी, गोपीकिसन बाजोरिया, रणजितसिंह मोहिते-पाटील, संजय दत्त, एस.क्यु.जामा, गोविंदराव आदिक, सुभाष चव्हाण, प्रतापसिंह मोहिते-पाटील ,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.मधुकर चव्हाण ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय फलोत्पादन मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"कोकणात विशेषत: सिंधुदूर्ग, रत्नागिरी व रायगडमध्ये अवेळी पडलेल्या मुसळधार पावसामुळे हजारो आंबा बागायतदार शेतकऱ्यांचे कोट्यवधी रुपयांचे झालेले नुकसान, आंब्यावर पडलेल्या अळ्या, बुरशीमुळे आंब्याचे फळ सडू लागणे, नेहमीपेक्षा यावर्षी आंब्याचे उत्पादन मूळातच 50 टक्के येणे व आलेल्या आंब्यापैकी 75 टक्के आंबा खराब निघणे, नुकत्याच वाशीच्या बाजारपेठेत आलेल्या अडीच लाख पेट्यांपैकी सुमारे दीड लाख पेट्यांतील आंबा सडका निघणे, परिणामी आंब्याच्या अंतर्गत निर्यातीवर विपरीत परिणाम होणे, शेतकरी तसेच किरकोळ व्यापाऱ्यांचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाल्यामुळे आंबा उत्पादकांवर तसेच व्यापारी यांना या अस्मानी संकटातून वाचविण्यासाठी त्वरित मदत तसेच उपाययोजना करण्याची आवश्यकता व या प्रकरणी शासनाने केलेली कार्यवाही."

3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ SBT/ KTG/

श्री.विनय कोरे ( फलोत्पादन मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

4....

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ SBT/ KTG/

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, या वर्षी केवळ 50 टक्के आंब्याचे उत्पादन आले आहे. अवेळी पडलेल्या पावसामुळे आंब्याच्या आलेल्या पिकापैकी 75 टक्के पीक खराब झाले आहे. मुळामध्ये आंब्यावर बुरशी पडली आहे ती नंतर लक्षात आली. त्यामुळे दुबई किंवा परदेशामध्ये माल गेल्यानंतर तो नासला. अनेकदा असे शासनाकडून म्हटले जाते की, मोहोर येण्यापूर्वी किंवा मोहोर आल्यानंतर व्यापारी खरेदी करतात ते चुकीचे आहे. अशाप्रकारची खरेदी केवळ 25 ते 30 टक्के होते. यापूर्वी असा रोग पडलेला नव्हता. पाऊस पडल्यामुळे आंब्याचे कोटयवधी रुपयांचे नुकसान झालेले आहे. यापूर्वी 50 रुपयाच्या भावाने आंबा कॅनिंगसाठी जात होता आणि 13 रुपयांमध्ये जातो. त्यामुळे या नुकसानीची त्वरित पाहणी करुन शासन या शेतक-यांना नुकसान भरपाई देणार आहे काय आणि देणार असेल तर किती देणार आहे ?

श्री.विनय कोरे : अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीबाबात या सभागृहात आणि खालच्या सभागृहात चर्चा झाली आहे. या पावसामुळे आंबा उत्पादकांचे नुकसान झाल्याचे शासनाने प्राथमिक स्वरुपात मान्य केलेले आहे. प्रत्यक्षात शेतक-यांचे किती नुकसान झाले आहे त्याचे सर्वेक्षण करण्याचे आदेश शासनामार्फत जिल्हाधिका-यांना दिले आहेत. नुकसानीचा अहवाल घेऊन मदत व पुनर्वसन विभागामार्फत एक महिन्याच्या आत मदत देण्याची घोषणा केली जाईल अशी घोषणा संबंधित मंत्री महोदयांनी या सभागृहात केलेली आहे. त्यामुळे शासन या सर्व विषयाकडे सकारात्मक भूमिकेतून पहात आहे. शासनाचा आंबा उत्पादकांना बाजूला ठेवण्याचा प्रयत्न नाही. सरकार 1 महिन्याच्या आत कार्यवाही करणार आहे.

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : आंब्याच्या नुकसानीबाबत यापूर्वीही सभागृहात चर्चा झालेली आहे. त्यावेळी सुध्दा मंत्रिमहोदयांनी मोघम स्वरुपाचे उत्तर दिले होते की, नुकसानीचे सर्वेक्षण करुन नुकसान भरपाई दिली जाईल. माझ्याकडे "रत्नागिरी टाईम्स" हे वर्तमानपत्र आहे. आंब्याच्या एका पेटीला 1500 रुपये भाव मिळत होता आता 500 रुपये मिळत आहे. सिंधुदुर्ग जिल्हयातून गेल्या वर्षी 50 हजार मे.टन विक्रीसाठी आंबा बाहेर आला होता. यावर्षाचा मोसम संपत आला आहे, आतापर्यंत केवळ 20 हजार मे.टन आंबा विक्रीस आला आहे. म्हणजे निम्म्यापेक्षा कमी आंबा विक्रीसाठी आला आहे. अवेळी पडलेल्या पावसामुळे आंब्यावर बुरशी पडली हे एकमेव कारण

5...

NTK/ SBT/ KTG/

श्री.गुरुनाथ कुलकर्णी....

आहे. त्यामुळे आंब्याला कमी किंमत मिळत आहे, परेदशात जाण्याचा तर प्रश्नच उद्‌भवत नाही. सभापती महोदय, आम्ही या विषयाबाबत दीड तासाची चर्चा मागितली होती. आपणही दीड तासाची चर्चा मान्य केली होती. परंतु त्याऐवजी लक्षवेधी सूचना घेण्याचे मान्य करण्यात आले. त्यामुळे ही लक्षवेधी सूचना चर्चेसाठी आली आहे. या पावसामुळे केवळ आंब्याचे नुकसान झाले आहे असे नाही तर काजूच्या उत्पादनाचेही नुकसान झालेले आहे. सिंधुदुर्ग व रत्नागिरी जिल्हयात काजूचे 50 टक्के नुकसान झालेले आहे.

नंतर श्री.शिगम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. गुरुनाथ कुलकर्णी...)

तेव्हा काजू आणि आंब्याच्या नुकसानीचा सर्व्हे करुन आंबा आणि काजू उत्पादकांना जास्तीत जास्त किती आणि केव्हा नुकसान भरपाई देण्यात येणार आहे ?

श्री. विनय कोरे : मागील चर्चेच्यावेळी काजूच्या नुकसानीचा अहवाल देखील मागविण्याचे ठरले होते. त्याचप्रमाणे सुपारी, नारळ, कोकम यांचे नुकसान झाले असेल तर त्यांचाही अहवाल मागविण्याचे ठरले होते. याबाबतीत मदत देण्याची भूमिका घेण्यात येईल असे स्पष्ट आश्वासन सभागृहामध्ये दिलेले आहे. त्यामुळे यापेक्षा जास्त चर्चा करण्याची गरज आहे असे मला वाटत नाही.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सन 2004मध्ये जेव्हा आंब्याचे नुकसान झाले होते त्यावेळी विधानसभा आणि विधानपरिषदेतील सन्माननीय सदस्यांनी नुकसान भरपाईसंबंधीची मागणी केल्यानंतर किमान हेक्टरी 25 हजार रुपये नुकसान भरपाई देण्यात येईल असे माननीय मंत्री महोदयांनी सभागृहात सांगितले होते आणि बाहेर गेल्यानंतर 25 हजार रु. ऐवजी 15 हजार रुपये नुकसान भरपाई जाहीर करण्यात आली. त्यामुळे काजू आणि आंबा उत्पादक शेतक-यांना निश्चित किती नुकसान भरपाई देण्यात येणार आहे याबाबत स्पष्ट आश्वासन माननीय मंत्री महोदय या सभागृहामध्ये देणार आहेत काय ?

श्री. विनय कोरे : आतापर्यन्त देण्यात आलेली नुकसान भरपाई ही विशेष बाब म्हणून देण्यात आलेली आहे. ज्यावेळी हा प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर जाईल त्यावेळी सभागृहातील सन्माननीय सदस्यांच्या भावना या विभागामार्फत तेथे मांडल्या जातील आणि आंबा उत्पादकांना न्याय देण्याची भूमिका घेतली जाईल.

श्री. राजन तेली : 2006-07मध्ये आंबा उत्पादकांना जी नुकसान भरपाई दिलेली होती त्याचा पहिला हप्ता काही ठिकाणी पोहोचला. परंतु रत्नागिरी जिल्ह्यामध्ये पहिला हप्ता देखील मिळाला नाही. तेव्हा ही नुकसान भरपाई केव्हा देण्यात येईल ? यावर्षी अवेळी पावसामुळे आंब्याचे 70 टक्क्या पेक्षा जास्त आणि काजूचे 60 टक्क्यापेक्षा जास्त नुकसान झालेले आहे. तेव्हा आंबा, काजू, नारळ, कोकम, जांभूळ या पिकांच्या झालेल्या नुकसानीबाबत शासन भरीव नुकसान भरपाई देईल काय ? तसेच या पिकांना पीक विमा योजना लागू करण्यात येईल काय ?

==2==



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनय कोरे : सन्माननीय सदस्य श्री. राजन तेली यांनी मागील वर्षीच्या नुकसान भरपाईचे काय झाले अशी विचारणा केली. 33 कोटी पैकी साडेअठ्ठावीस कोटीचे वाटप पूर्ण झालेले आहे. कालच कोकणातील सन्माननीय आमदारांची बैठक घेऊन त्या ठिकाणी आलेल्या अडचणी सोडविण्याच्या संदर्भात मार्ग काढण्याचा निर्णय घेतला आहे. 7/12वर अनेक नावे असल्यामुळे ज्यांचे वाटप थांबलेले आहे त्याबाबतीत जबाबदार असलेल्या व्यक्तीच्या नावे 20 रु.च्या स्टॅम्पपेपरवर लिहून घेऊन त्यांना पैसे वाटप करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. नेमकी किती नुकसान भरपाई द्यावयाची यासंबंधीचा निर्णय कॅबिनेटमध्ये होणार असल्यामुळे तो आकडा मी सांगू शकत नाही. परंतु आमचा विभाग आंबा उत्पादकांना जास्तीत जास्त मदत देण्याच्या दृष्टीने प्रयत्नशील आहे.

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य आपापल्या जागी उभे राहून एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

श्री. अरविंद सावंत : आंबा उत्पादकांना द्यावयाच्या नुकसानाबाबत माननीय मंत्री महोदयांनी दिलेले उत्तर असमाधानकारक असून त्याचा निषेध म्हणून आम्ही सभात्याग करीत आहोत.

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य बहिर्गमन करतात.)

----

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ KTG/ SBT/ प्रथम श्री. शिगम 13:05

**लक्षवेधी सूचना क्र.3 बाबत**

**उपसभापती** : आता लक्षवेधी सूचना क्रमांक 3 चर्चेला घेण्यात येईल.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, सदरहू लक्षवेधी सूचनेसंदर्भातील निवेदन आम्हाला सभागृहात नुकतेच प्राप्त झाले आहे. ते निवेदन अजून मी वाचले देखील नाही. म्हणून थोडया वेळेनंतर सदर लक्षवेधी सूचना घेण्यात यावी अशी माझी विनंती आहे.

**उपसभापती** :ठीक आहे. ही लक्षवेधी सूचना नंतर घेण्यात येईल.

श्री. मधुकर सरपोतदार : ठीक आहे.

----------

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: लक्षवेधी सूचनेवरील अधिक माहिती सभागृहासमोर ठेवणे.

श्री. बाबा सिद्दीकी ( अन्न व नागरी पुरवठा राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने परभणी व राज्याच्या अन्य जिल्हयांमध्ये रेशन यंत्रणेवरुन निकृष्ट दर्जाचा गहू वितरण करणे या विषयावरील सर्वश्री. सुरेशदादा देशमुख व इतर वि.प.स. यांनी उपस्थित केलेल्या नियम 101 अन्वये सूचनेच्या चर्चेच्यावेळी दिनांक 24 जुलै, 2007 रोजी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आली आहे.

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे. )

---------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

3...

<u>**विशेष उल्लेख**</u>

**पृ. शी.** : धाकटे,वेणगाव ता.कर्जत येथील दगडी बंधाऱ्याची दुरुस्ती करणेबाबत

**मु. शी.** : धाकटे,वेणगाव ता.कर्जत येथील दगडी बंधाऱ्याची दुरुस्ती करणेबाबत

याबाबत सन्माननीय सदस्य श्री. संजय केळकर वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : मा□□य सदस्य श्री. संजय केळकर यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री.संजय केळकर ( कोकण विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडतो.

" मौजे धाकटे,वेणगाव, ता.कर्जत,जि.रायगड येथे ग्रामस्थांना पिण्याचे पाणी पुरविण्यासाठी सुमारे 125 वर्षापूर्वी बांधण्यात आलेला दगड बंधारा नादुरुस्त झाला असून त्यातून फार मोठया प्रमाणात पाणी गळती होत असल्याचे रायगड जिल्हा परिषदेच्या लक्षात आणून दिल्यावर सदर बंधाऱ्याच्या दुरुस्तीचा अहवाल सादर करण्यासाठी रायगड जिल्हा परिषदेने कर्जत उप विभागास जून, 2003 मध्ये कळविले. कर्जत उप विभागाने मार्च, 2006 मध्ये रुपये 1,74,703 रुपयांचे अंदाजपत्रक जिल्हा परिषदेला सादर केले. त्यानंतर अद्याप कुठलीही प्रशासकीय वा तांत्रिक मंजुरीची कार्यवाही करण्यात आलेली नसल्याने धाकटे वेणगाव येथील नागरिक पिण्याच्या पाण्यापासून गत 15 वर्षापासून वंचित आहेत. शासनाच्या उदासीन धोरणामुळे बंधारा मंजुरीचे प्रकरणात दिरंगाई होत असल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र असंतोष पसरला असून त्याचा केव्हाही स्फोट होण्याची शक्यता असल्याने शासनाने प्राधान्यक्रमाने बंधारा दुरुस्ती करावी " म्हणून सदर बाब विशेष उल्लेखाव्दारे शासनाच्या निदर्शनास आणत आहे. तरी तातडीने कार्यवाही व्हावी ही विनंती.

---------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : नांदेड जिल्हा मध्यवर्ती बँकेत ठेवीदारांचे पैसे अडकून पडणे

**मु. शी.** : "नांदेड जिल्हा मध्यवर्ती बँकेत ठेवीदारांचे पैसे अडकून पडणे" याबाबत श्री.दिवाकर रावते, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

" नांदेड जिल्हा मध्यवर्ती बँकेचे आर्थिक व्यवहार बंद पडले असून सुमारे नऊ लाख ठेवीदाराचे सुमारे 625 कोटी रुपये बँकेत अडकले आहेत. ठेवीदारांच्या ठेवी सदर बँकेच्या दिवाळखोरीमुळे अडकून पडल्याने मुलांचे विवाह अडून आहेत. सदर बँकेच्या भ्रष्ट संचालकांच्या संपत्ती जप्त करण्याबाबत सहकार अधिनियम 88 अन्वये देण्यात आलेल्या दोन वेळा नोटिसा, परंतु सहकार मंत्र्यांनी त्यांना अभय दिल्यानेसंचालक मंडळाची जप्ती टळली आहे. सदर बँकेच्या आर्थिक घोटाळयाबाबत व आर्थिक गैरव्यवहाराची सखोल चौकशी करुन त्यांच्यावर खटले भरण्याबाबत शासनण करीत असलेली टाळाटाळ, हजारो खातेदार ठेवीदार यांचेकोटयावधी रुपयांच्या ठेवी थकल्याने त्यांची होत असलेली उपासमार लक्षात घेता सदर बँकेबाबत वस्तुनिष्ठस्थिती काय आहे याबाबत शासनाने तातडीने निवेदन करावे व तसे आदेश द्यावेत.

सभापती महोदय, नांदेड जिल्हा मध्यवर्ती बँकेचा व्यवहार गेल्या तीन वर्षापासून बंद आहे. प्रत्येक अधिवेशनात मी नांदेड जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या संदर्भात विषय उपस्थित करतो, परंतु याबाबतीत सरकारने "अळी मिळी गुप चिळी" अशी भूमिका घेतलेली आहे. शेतक-यांचे कैवारी म्हणवून घेणारे हे सरकार या बँकेच्या बाबतीत काहीही निर्णय घेत नाही ही दुर्देवाची गोष्ट आहे. नांदेड जिल्हा मध्यवर्ती बँकचे 9 लाख ठेवीदार आहेत. त्या ठेवीदारांचे 625 कोटी रुपये बँकेत अडकून पडले आहेत. ठेवीदारांच्या ठेवींचा बट्टयाबोळ करण्यात आलेला आहे. ठेवीदारांच्या ठेवी

5...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

परत मिळत नाहीत म्हणून 141 ठेवीदारांनी आत्महत्या केल्या आहेत. या बँकेत 22 हजार सेवानिवृत्त कर्मचा-यांचे या बँकेत खाते आहे. ते खातेदार देखील आर्थिक अडचणीत सापडले आहेत. हे खातेदार अर्धपोटी उपाशी राहून जीवन जगत आहेत. या बँकेतील ठेवीदार पूर्णपणे बुडालेले आहेत. या बँकेत 250 कोटी रुपयांचा भ्रष्टाचार झालेला आहे. विधानसभेत या विषयावर चर्चा झाली त्यावेळी सदरहू भ्रष्टाचाराची लक्तरे टांगली गेली. नांदेड जिल्हा मध्यवर्ती बँक पुनरुज्जीवीत करण्यासाठी शासनाने 100 कोटी रुपये उपलब्ध करुन दिले आहेत. ते पैसे तसेच पडून आहेत. 100 कोटी रुपयांमध्ये सदर बँक पुनरुज्जीवीत होऊ शकत नाही....

यानंतर श्री. कानडे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ SBT/ KTG/ 13:10

श्री. दिवाकर रावते....

सभापती महोदय, 625 कोटी रुपयांच्या ठेवींमध्ये 100 कोटींचा भ्रष्टाचार झालेला आहे. भ्रष्टाचाराची परिसीमा अशी आहे की, एप्रिल 2000 ते 2001 या कालावधीत चहापाण्यावर 21 लाख 6 हजार 313 रुपये, इमारत दुरुस्तीवर 25 लाख 34 हजार 657 रुपये, भाडयाने घेतलेल्या जीपचा खर्च 36 लाख 59 हजार 788 रुपये, टेलिफोनचा खर्च 22 लाख 23 हजार 369 रुपये, छपाईचा खर्च 35 लाख 1 हजार 78 रुपये अशा विविध कारणांसाठी खर्च करण्यात आलेले आहेत. बँकेच्या दुरुस्तीचा खर्च 19लाख 16 हजार 527 रुपये झाला आहे. अशा विविध प्रकारे भ्रष्टाचार स्पष्ट झालेला असताना कलम 88 खाली बँकेच्या संचालक मंडळाला नोटीस दिली होती त्यानुसार करण्यात येणाऱ्या चौकशीला स्थगिती देऊन ठेवीदारांचा आणि शेतकऱ्यांचा घात केलेला आहे. यासंदर्भात माझ ी मागणी अशी आहे की ही स्थगिती ताबडतोब उठविण्यात यावी. अक्षरश: हजारो ठेवीदारांuk आणि शेतकऱ्यांना उद्वस्त करणाऱ्या आणि 250 कोटी रुपयांचा भ्रष्टाचार करणाऱ्या बँकेच्या संचालकांवर तातडीने चौकशीची कारवाई करण्याच्या दृष्टीने पावले उचलावीत. त्यांना योग्य ती शिक्षा व्हावी. बॅकेला दिलेले 100 कोटी पुरणार नाहीत आणखी 200 कोटी रुपयांची गरज आहे. यासंदर्भात माननीय सदस्य श्री. श्रीकांत जोशी यांनी देखील प्रश्न मांडला होता. या सर्व गोष्टींचा विचार करावा अशी मी विशेष उल्लेखाच्या माध्यमातून शासनाला विनंती करतो.

-------

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : वांद्रा(प) येथील सेंट जोसेफ कॉन्व्हेंट शाळेतील मुलींना दिलेली वागणूक.

मु.शी. : "बांद्रा(प) येथील सेंट जोसेफ कॉन्व्हेंट शाळेतील मुलींना दिलेली वागणूक" याबाबत डॉ.दीपक सावंत, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे.त्यांनी ती मांडावी.

डॉ. दीपक सावंत ( मुंबई विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

सभापती महोदय, काल-परवा पर्यंत कॉन्व्हेंट स्कूलमध्ये गणवेष कसा असावा यासंबंधी आचारसंहिता होती. परंतु परवा एक गोष्ट घडली. वांद्रे येथील सेंट जोसेफ कॉन्व्हेंट स्कूलमध्ये मुलीने घरच्या विवाहानिमित्त मेहंदी लावली आणि तशी ती शाळेत आली म्हणून त्या मुलीला शाळेतून घरी पाठविण्यात आले. अशा गोष्टी सर्रास घडत आहेत आणि मेहंदी लावलेल्या मुलींना शाळेत घेत नाहीत. माझ्या घरी असाच एक प्रसंग होता. परंतु त्यावेळी मुलीने मेहंदी लावण्यास नकार दिला कारण तिला दुसऱ्या दिवशी शाळेत जायचे होते. वांद्रा येथील शाळेतील जी गोष्ट सांगितली त्या मुलीचा परीक्षेचा पेपर होता तरीसुध्दा तिला घरी पाठविण्यात आले. शीख समाजाची मुले कडे घालून येतात. ही गोष्ट फार सिरीयसली घेतली पाहिजे. प्रत्येकाला आपल्या धर्माचा अभिमान आहे. मेहंदी लावणे, टिकली लावणे, बांगडया घालणे या गोष्टींना कॉन्व्हेंट स्कूलमध्ये बंदी असेल तर ते ताबडतोब बंद झाले पाहिजे. त्यांना जर त्यांच्या धर्माचा अभिमान असेल तर आम्हांला देखील आमच्या धर्माचा अभिमान आहे. यासंबंधात शिक्षणमंत्र्यांनी माहिती घ्यावी आणि ही बाब तपासून संबंधित शाळेवर ताबडतोब कारवाई करावी अशी मी विशेष उल्लेखाच्या माध्यमातून शासनाला विनंती करतो.

------

......3



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: रायगड जिल्हयातील खोरा बंदरात प्रवासी वाहतूक सुरु करणे

मु.शी. : रायगड जिल्हयातील खोरा बंदरात प्रवासी वाहतूक सुरु करणे याबाबत सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र.पाटील यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र.पाटील यांनी एक विशेष उल्लेखाची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. जयंत प्र.पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

रायगड जिल्हयातील खोरा बंदरामधून मुरुड शहरात जाण्यासाठी एकदरा ते मुरुड हा होडीने प्रवास होता. गेली कित्येक वर्षे मात्र या बंदराची पूर्णत : दुर्दशा झाली आहे. सर्व इमारत, कार्यालयाची जागा, अल्पोपहार गृह, विश्रामस्थान तुटून पडून खोरा बंदराची जेट्टी आता जलसमाधी घेण्याच्या बेतात आहे. मुरुडमधील पर्यटन विकासाकरिता खोरा बंदराचा उपयोग अत्यंत फायदेशीर होऊ शकेल. तसेच छोटया मच्छिमारासाठी या जेट्टीचा वापर करता येईल. त्यादृष्टीने येथील रस्ता व जेट्टी दुरुस्तीचे काम करणे आवश्यक आहे. सबब या निसर्गरम्य जेट्टीची दुरुस्ती करण्यासाठी व पर्यटन विकासाचे एक चांगले ठिकाण निर्माण होण्यासाठी शासनाचे या विशेष उल्लेखाद्वारे लक्ष वेधीत आहे.

-------

नंतर श्री. भोगले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत ...

सभापती महोदय, राज्यशासनाने ब्रिमस्टोवॅड हा प्रकल्प आणलेला आहे. या प्रकल्पामुळे मुंबईमध्ये अनेक ठिकाणी पाण्याची कोंडी होते व पयार्याने वाहतुकीची कोंडी होऊन अनेक भाग जलमय होत असतात. मुंबईमधील 8 ठिकाणी मोठया प्रमाणात पाणी जमा होत असते. या आठ ठिकाणांमध्ये मिलन सबवे, परेल, हिंदमाता, सांताक्रुज येथील गजधरबांध, कालिना येथील एअरइंडिया कॉलनी, कुर्ला, दादर टी.टी., चेंबुर, मिठी रिव्हर, माटुंगा आणि किंगसर्कल या ठिकाणी मोठया प्रमाणात पाणी साचून वाहतुकीची कोंडी होत असते. राज्य शासनाने आणि मुंबई महानगरपालिकेने रेल्वेच्या कलवडस्ला जे नाले जोडले आहेत त्याची सुध्दा दुरुस्ती केलेली नाही. पावसाळा आता एक महिन्यावर आलेला आहे. त्यामुळे मुंबईतील या आठ जागी कोणत्या प्रकारची उपाययोजना राज्य शासन आणि मुंबई महानगरपालिका करणार आहे ? ब्रिमस्टोवॅड प्रकल्पाचा या वर्षी आपल्याला फायदा होणार नसल्यामुळे यावर्षी पुन्हा मुंबईत पाणी साचणार आहे त्यामुळे इमर्जन्सी म्हणून कोणती सेवा दिली जाणार आहे व पाणी साठणार नाही याची कशी काळजी घेतली जाणार आहे यासंदर्भातील लेखी निवेदन व्हावे, अशी मी विशेष उल्लेखाद्वारे मागणी करीत आहे.

----------------

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : बीड जिल्हयातील परळी येथील रेल्वे पटरीवरील पुलाचे मजबूतीकरण करणे

**मु. शी.** : बीड जिल्हयातील परळी येथील रेल्वे पटरीवरील पुलाचे मजबूतीकरण करणे याबाबत श्रीमती उषा दराडे, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : मा□□य सदस्या श्रीमती उषा दराडे यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्रीमती उषा दराडे ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडते.

सभापती महोदय, बीड जिल्हयातील परळी येथेच फक्त रेल्वे जाते. या रेल्वेच्या पटरीवर सार्वजनिक बांधकाम खात्याने एक पूल बांधलेला असून या पुलाच्या बाबत मी तारांकित प्रश्न उपस्थित केला होता त्यावेळी या पुलाची डागडुजी करण्यात आलेली आहे असे उत्तर मला देण्यात आलेले आहे. या पुलाची किरकोळ डागडुजी करुन हा पूल लोकांच्या वाहतुकीसाठी सुरक्षित राहिलेला नाही. या गावात थर्मल पॉवर स्टेशन असल्यामुळे या पुलाच्या कपॅसीटीपेक्षा जास्त वाहतूक या पुलावरुन होत असते. पुलाला सांधी पडलेल्या असून या सांधीतून खालचे सर्व दळणवळण दिसते. या पुलावरुन रिक्षावाला रिक्षा नेण्यास तयार नसतो. त्यामुळे या पुलाचे मजबूतीकरण करण्यासाठी एस्टिमेट करुन ताबडतोब हा पूल दुरुस्त करणे, वाहनांची देखभाल करणे तसेच लोकांचे आरोग्य राखणे गरजेचे आहे या सार्वजनिक महत्वाच्या विषयावर मी आपल्या अनुमतीने माननीय सार्वजनिक बांधकाम मंत्रीमहोदयांचे विशेष लक्ष वेधलेले आहे.

----------------

....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : दोन कार्यकर्ते जामिनावर मुक्त झाले असल्यामुळे त्यांच्यावरील नक्षलवादाचा आरोप मागे घेणे

**मु. शी.** : दोन कार्यकर्ते जामिनावर मुक्त झाले असल्यामुळे त्यांच्यावरील नक्षलवादाचा आरोप मागे घेण्याबाबत श्री. कपिल पाटील, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. कपिल पाटील ( मुंबई विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

" नागपूरच्या तुरुंगात नक्षलवादाच्या आरोपाखाली तुरुंगात असलेल्या उपोषणाबाबत मी या सभागृहात दोनदा मुद्दा उपस्थित केला होता. माननीय सभापती महोदय, तसेच माननीय सभागृहाने आणि माननीय उपमुख्यमंत्र्यांनी त्याची दखल घेतलेली आहे. बाबासाहेब सायमोते आणि अनिल ममाणे या कार्यकर्त्यांबाबत मी सातत्याने सभागृहाचे लक्ष वेधले होते. त्यांच्यावरील नक्षलवादाचा आरोप मागे घेण्याची भूमिका शासनाने घेतल्यामुळे त्या दोघांना कालच कोर्टात जामीन मंजूर होऊ शकला. त्याबद्दल सभापती महोदय मला आपले आणि माननीय उपमुख्यमंत्र्यांचे आणि सभागृहाचेही आभार मानायचे आहेत. हे दोन कार्यकर्ते आणि त्या आधी जामीनावर मुक्त झालेले त्यांचे दोन मित्र या चौघांवरील सर्व आरोप मागे घेण्याची कार्यवाही माननीय उपमुख्यमंत्री लवकरात लवकर करतील, अशी मला नक्कीच आशा आहे. तसेच अंधश्रध्दा निमुर्लन समितीचे दोन कार्यकर्ते नरेश बनसोड आणि पत्रकार धनेंद्र भुराळे हे निरपराध असून त्यांच्याबाबतही शासनाने अशीच सहानुभुतीची भूमिका घ्यावी, ही विनंती. श्री. बनसोड यांचे पत्रच यासंबंधात खूप बोलके आहे. अन्य जे आरोपी आहेत, ज्यांच्यावर गंभीर स्वरुपाचे गुन्हे आहेत असे शासनाचे जे म्हणणे आहे, त्यांनाही आपण समजून घ्यावे. कायदा व कोर्ट आपले काम करील. परंतु हिंसेचा मार्ग सोडून संसदीय लोकशाहीच्या प्रक्रियेत सामावून घेण्याची प्रक्रिया शासनाने थांबवता कामा नये. मानवी हक्कांचे तेही हक्कदार आहेत. एवढेच मला या निमित्ताने नमूद करायचे आहे.

सभापती महोदय, नागपूरच्या तुरुंगात नक्षलवादाच्या आरोपाखाली तुरुंगात असलेल्या

...4..

अप्रकाशित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील....

तरुणानी उपोषण सुरु केले होते, त्याबद्दल मी या सभागृहात दोनदा मुद्दा उपस्थित केला होता. माननीय सभापती महोदय, आपण स्वत: आणि या सभागृहाने तसेच माननीय उपमुख्यमंत्र्यांनी याबद्दलची दखल घेतली आणि ज्या दोन निरपराध म्हणजे श्री. बाबासाहेब सायमोते आणि अनिल ममाणे या तरुण विद्यार्थी कार्यकर्त्यांबद्दल मी सातत्याने मुद्दा मांडला होता. त्याबद्दल शासनाने सहानुभुतीची भूमिका घेतली, त्यांना सोडून देण्याची भूमिका घेतली व त्यांच्यावरील नक्षलवादाचे आरोप मागे घेण्याची भूमिका घेतलेली आहे. काल या दोन्ही तरुणांना जामीन मंजूर झाला. याबद्दल मी सभागृहाचे, आपले आणि माननीय उपमुख्यमंत्री यांचे आभार मानतो.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, जामीन देणे न देणे हा न्यायालयाचा विषय आहे. त्या विद्यार्थ्यांना जामीन मंजूर झाला म्हणून सन्माननीय सदस्य माननीय उप मुख्यमंत्र्यांचे कशासाठी आभार मानत आहेत, हा कोर्टाचा अवमान आहे. जामीन मंजूर करण्याची नवीन काय पध्दत आहे ती आम्हाला कळली पाहिजे.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, कोर्टाने जामीन मंजूर केलेला आहे, असे मी म्हणालो आहे. मी आभार यासाठी मानले आहे की, या दोन विद्यार्थ्यांवरील नक्षलवादाचे आरोप मागे घेण्यासाठी शासनाने, माननीय सभापती यांनी, माननीय सभागृहाने तसेच माननीय उपमुख्यमंत्र्यांनी माझ्या म्हणण्याची दखल घेतली व आरोप मागे घेण्याची प्रक्रिया सुरु केली त्यामुळे मी या सर्वांचे आभार मानलेले आहे. हे तरुण विद्यार्थी निरपराध असून त्यांचा नक्षलवादाशी काही संबंध नाही. त्यांच्याबद्दल सभागृहाने चांगली भूमिका घेतल्यामुळे मी पहिल्यांदा सभागृहाचे आभार मानले, माननीय सभापती महोदयांचे आभार मानले व मग शासनाचे आभार मानले. एवढी कृतज्ञता व्यक्त करण्यामध्ये मला काहीही अडचण नाही.

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील ..

आणखी दोन कार्यकर्ते या तुरुंगात आहेत त्यापैकी श्री.नरेंद्र बनसोड नावाचे अंधश्रध्दा निर्मूलन समितीचे एक कार्यकर्ते असून दुसरे श्री.बोरुले नावाचे एक पत्रकार आहेत. त्याच्या संदर्भात मी माहिती घेतली असून त्यांच्याविरुध्द कोणताही पुरावा नाही तेव्हा त्याच्या बाबतीत देखील शासनाने अशाच प्रकारची भूमिका घ्यावी अशी मी विनंती करतो.

सभापती महोदय, आणखी एका मुद्याकडे मला शासनाचे लक्ष वेधावयाचे आहे. ज्यांच्यावर गंभीर स्वरुपाचे आरोप आहेत असे शासनाचे म्हणणे आहे त्यांनासुध्दा शासनाने समजावून घेतले पाहिजे कायदा व कोर्ट त्यांचे काम करील परंतु हिंसेचा मार्ग सोडून संसदीय लोकशाहीच्या प्रक्रियेत सामावून घेण्याची प्रक्रिया शासनाने थांबविता कामा नये. मानवी हक्काचे ते सुध्दा एक हत्यार आहे असे मला नमूद करावयाचे असून शासन त्याही बाबतीत योग्य ती पावले उचलील अशी मी अपेक्षा व्यक्त करतो आणि सभागृहाने मानवी हक्कासाठी साथ द्यावी असे आवाहन करतो.

------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



24-04-2008 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) TT 2

पृ.शी .: पुस्तक दिनानिमित्त ज्ञान संवर्धनासाठी विविध उपक्रम राबविणे

मु.शी : पुस्तक दिनानिमित्त ज्ञान संवर्धनासाठी विविध उपक्रम राबविण्याबाबत डॉ.नीलम गो-हे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

**उपसभापती** : यानंतर माननीय सदस्या डॉ. नीलम गो-हे यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

डॉ.नीलम गो-हे (विधान सभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडते.

सभापती महोदय, 23 एप्रिल हा दिवस जगामध्ये व महाराष्ट्रामध्ये पुस्तक दिन म्हणून साजरा झाला असून वेगवेगळी पुस्तके उपलब्ध व्हावीत या दृष्टीने अनेक वेगवेगळया प्रकाशकांनी उपक्रम राबवले होते. मंबईमध्ये हुतात्मा चौका जवळ एक खास रस्ता असून त्या रस्त्यावर दुर्मिळ पुस्तके मिळत असतात. हा भाग बूक स्ट्रीट म्हणून ओळखला जातो पुस्तके उपलब्ध व्हावीत म्हणून महाराष्ट्र शासनाने चालना दिली पाहिजे. त्याचबरोबर 23 एप्रिलच्या दिवशी ज्ञान संवर्धनाच्या दृष्टीकोनातून विविध उपक्रम राबवले पाहिजेत तसेच बुक स्ट्रीटला "पुस्तक पथ" किंवा "पुस्तक गल्ली " असे नाव देऊन त्या परिसरात पुस्तके उपलब्ध होण्याच्या दृष्टीकानातून पुस्तक विक्रेत्यांना चांगल्या प्रकारच्या सुविधा उपलब्ध करुन दिल्या पाहिजेत त्याचप्रमाणे मुंबई प्रमाणेच इतर ठिकाणच्या पुस्तक प्रकाशन करणा-या संस्थाना बळकटी देण्याचे धोरण स्वीकारावे अशी मी विशेष उल्लेखाव्दारे विनंती करीत आहे.

श्री.कपिल पाटील :सभापती महोदय, जगातील सर्वात महान साहित्यिक असलेल्या शेक्सपिअरजींचा आज स्मरण दिवस असून या विषयाकडे शासनाचे लक्ष वेधल्याबद्दल मी माननीय सदस्या डॉ.नीलम गो-हे यांचे आभार मानतो. आजचा दिवस ग्रंथदिन म्हणून सगळीकडे साजरा केला जात आहे. केवळ मुंबईतच नव्हे तर या राज्यातील प्रत्येक जिल्हयात बुक स्ट्रीट निर्माण करण्यात आले पाहिजेत. चर्चगेट जवळचा परिसर बुक स्ट्रीटसाठी राखून ठेवण्यात आला पाहिजे अशा प्रकारची मागणी त्यांनी केलेली असून त्यांच्या मागणीला मी समर्थन देतो. धन्यवाद .

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी : वांगेपल्ली, ता.अहेरी, जि.गडचिरोली येथील सामूहिक विवाह सोहळयात वधूंना सोन्या ऐवजी पितळाचे मंगळसूत्र देणे

मु.शी : वांगेपल्ली, ता.अहेरी जि.गडचिरोली येथील सामूहिक विवाह सोहळयात वधूंना सोन्या ऐवजी पितळाचे मंगळसूत्र देणे याबाबत श्री.जैनुद्दीन जव्हेरी,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

**उपसभापती** : यानंतर माननीय सदस्य श्री.जैनुद्दीन जव्हेरी यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.जैनुद्दीन जव्हेरी ( वर्धा -चंद्रपूर-गडचिरोली स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो :-

" वांगेपल्ली ( ता,अहेरी,जि.गडचिरोली) येथे माहे एप्रिल, 2008 रोजी घेण्यात आलेल्या सामूहिक विवाह सोहळयासाठी वधूंना घालण्यासाठी लागणा-या मंगळसूत्रांची निविदा न काढताच मंगळसूत्रांची खरेदी करण्यात आल्याचे प्रकरण उधडकीस येणे, या मंगळसूत्रांची पाहणी केली असता सदर मंगळसूत्रे पितळाचे असल्याचे आढळून आले आहे, शासनाच्या नियमाप्रमाणे वधूना सहा हजार रुपये किंमतीचे सोन्याचे मंगळसूत्र देणे बंधनकारक आहे. या सामूहिक विवाह लग्नसोहळयासाठी राज्य शासनाने 7 कोटी 87 लाख रुपयांचा निधी देऊनही सोन्याच्या ऐवजी पितळाचे मंगळसूत्र खरेदी करुन प्रकल्प अधिका-यांनी कोटयावधी रुपयांचा भ्रष्टाचार केल्याचे उघड झाले आहे तसेच या सामूहिक विवाह सोहळयातील 50 जोडप्यांना गृहोपयोगी वस्तूंचे वाटपसुध्दा करण्यात न येणे अशा अत्यंत गंभीर व सार्वजनिक महत्वाच्या विषयाबाबत मी विशेष उल्लेखाची सूचना देत आहे "

श्री.दिवाकर रावते :सभापती महोदय, हा अतिशय गंभीर विषय आहे.

**उपसभापती** : सन्माननीय सदस्यांनी आता जी विशेष उल्लेखाची सूचना मांडली आहे त्या संदर्भात कसून पोलीस चौकशी करुन अशा प्रकारे त्यांनी लबाडी केलेली आहे असे जर त्या चौकशीत आढळून आले तर त्यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करुन योग्य ती कारवाई करावी.

श्री.दिवाकर रावते :सभापती महोदय, हा गंभीर विषय असून गरीब लोकांच्या योजनेचा लाभ घेऊन कोणी जर त्यांना फसवत असेल तर ती बाब अत्यंत गंभीर आहे.तेव्हा याबाबतीत आज किंवा उद्या निवेदन करण्यास शासनाला सांगण्यात यावे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : ही बाब अत्यंत गंभीर आहे. तेव्हा माननीय मंत्री महोदयांना मी सांगू इच्छितो की, या संदर्भात तातडीने चौकशी करण्यात येऊन शक्यतो आज संध्याकाळी किंवा उद्या निवेदन करावे.

श्री.बाळासाहेब थोरात : ठीक आहे.

------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



पृ.शी : एस.आर.ए. योजनेमध्ये विकासकांनी सुरु केलेला गैर मार्गाचा

अवलंब

मु.शी : एस.आर.ए. योजनेमध्ये विकासकांनी सुरु केलेला गैर मार्गाचा अवलंब याबाबत सर्वश्री मधुकर सरपोतदार,दिवाकर रावते डॉ.दीपक सावंत, सर्वश्री अनिल परब,अरविंद सावंत,वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री.मधुकर सरपोतदार ( विधान सभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे अशी विनंती करतो

"मुंबई शहर व उपनगरातील झोपडपट्टयाच्या पुनर्वसनासाठी शासनाद्वारे राबविण्यात येणारी झोपडपट्टी पुनवर्सन योजना (एस.आर.ए. स्कीम) गरीब झोपडीवासियांच्या कल्याणासाठी मंजूर केली असली तरी मुंबईतील जागांचे भाव वाढल्याने ही योजना विकासकांचा फायदा करणारी असणे, झोपडपट्टयांमध्ये सहकारी गृहनिर्माण संस्था स्थापन करण्यासाठी विकासकांनी गैरमार्गाचा अवलंब सुरु केलेला असणे,झोपडपट्टीतील झोपडीधारकांची पात्रता ठरविण्यासाठी उप-जिल्हाधिकारी किंवा तत्सम अधिकाऱ्यांकडून सन १९९५ पूर्वीच्या झोपडीधारकांना पुराव्याअभावी अपात्र ठरविले जाणे, अलीकडच्या काळात सन १९९५ पूर्वीच्या वास्तव्याचा पुरावा म्हणून शिधापत्रिका (रेशनकार्ड) किंवा तत्सम पुरावे न स्वीकारण्याबाबत शासनाने निर्गमित केलेले शासन परिपत्रक, मुंबई शहर आणि उपनगरांमध्ये जवाहरलाल नेहरु अर्बन रिन्युअल योजनेअंतर्गत (जेएनयुआरएम) झोपडपट्टी पुनर्विकासामध्ये राष्ट्रीय गृहनिर्माण धोरणांतर्गत ३६० चौ.फूट क्षेत्रफळाच्या धर्तीवर मुंबई शहर व उपनगरातील झोपडपट्टी पुनर्वसन विकास योजनेअंतर्गत ४०० ते ५०० चौ. फूट क्षेत्रफळाच्या सदनिकांची तरतूद करण्याची असलेली आवश्यकता, त्यासाठी पर्यायी निधी उपलब्ध करुन बी.डी.डी. चाळ, बी.आय.टी. चाळ, गावठाण, धारावी विकास, जुन्या मोडकळीस आलेल्या हजारो इमारतींच्या पुनर्निमाणाबाबतचे प्रश्न आणि विमानतळ परिसरातील झोपडयांच्या पुनर्वसनाची निर्माण झालेली आवश्यकता, याकडे शासनाने केलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी जनतेत पसरलेला तीव्र असंतोष, या प्रकरणी शासनाने तातडीने केलेली वा करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. प्रीतमकुमार शेगावकर ( गृहनिर्माण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**<u>निवेदन</u>**

( प्रेस : कृपया सोबत जोडलेले निवेदन येथे छापावे )

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, आता माननीय गृहनिर्माण राज्यमंत्र्यांनी माझ्या लक्षवेधी सूचनेवर 'निवेदन वितरित केल्याप्रमाणे' असे उत्तर दिलेले आहे. मला त्यांना प्रथमत: असे विचारावयाचे आहे की, आम्ही दिलेली ही लक्षवेधी सूचना त्यांनी काळजीपूर्वक वाचली आहे काय? आता जी एसआरए योजना चालली आहे त्यामध्ये लोकांवर किती अन्याय होतो आहे त्याबाबत प्रश्न विचारला आहे त्याचे उत्तर आपण दिलेले आहे की, शासनाकडे त्याबाबत काही तक्रारी नाहीत. सभापती महोदय, आपल्याला माहिती आहे की, माननीय राज्यमंत्र्यांना बरोबर घेऊन अशा 2-3 योजनांना आपण भेट दिलेली आहे आणि तेथील वस्तुस्थिती पाहूनही आपण अशा प्रकारचे उत्तर देत आहात ही गंभीर बाब आहे. माननीय राज्यमंत्री हे दलितांचे मित्र आहेत आणि मी त्यांना त्यावेळी दलितांच्या झोपड्या मुद्दाम दाखविल्या. तेथे जे गाळे बांधले आहेत तेही कमी उंचीचे आहेत हेही मी माननीय राज्यमंत्र्यांना दाखविले आहे तसेच त्याबाबत पत्रदेखील दिलेले आहे. सभापती महोदय, नागपूर अधिवेशनापूर्वी ही भेट राज्यमंत्र्यांसमवेत दिली होती आणि आजपर्यंत त्या संदर्भात काय कारवाई केली आहे त्याचा उल्लेख देखील या निवेदनात किंवा अन्यत्र कोठेही त्यांनी केलेला नाही. एवढे ते दलित मित्र आहेत का ? खरे तर त्यांच्याकडे गृहनिर्माण राज्यमंत्री म्हणून खूप मोठी जबाबदारी माननीय मुख्यमंत्र्यांनी दिलेली आहे. पण ते त्याकडे दुर्लक्ष करीत आहेत असे वाटते. अधिकारी त्यांना जे सांगतात तेच ते येथे येऊन सांगत आहेत. त्यांच्या अधिकाऱ्यांनी तेथे जो अन्याय चालविला आहे तो अगदी उघडा नागडा आहे. किती भयानक प्रकार या एसआरए योजनेत चालले आहेत याची त्यांना कल्पना तरी आहे काय ? सभापती महोदय, खरे तर या लक्षवेधी सूचनेवर उत्तर देण्यासाठी माननीय मुख्यमंत्रीच स्वत: सभागृहात यायला पाहिजेत. माननीय राज्यमंत्री इनोसंटली दाखवितात की, त्यांना या योजनेमध्ये काय गैर चालले आहे त्याची माहिती नाही. पण मी त्यांना सांगू इच्छितो की, या एसआरए योजनेमध्ये प्रचंड प्रमाणात गैरप्रकार, गैरव्यवहार चालले आहेत. आपलेच अधिकारी ते करीत आहेत. लोकांवर ते अन्याय करीत आहेत. आज जी काही एसआरए योजना चालली आहे त्याबाबतीतील प्रश्न आम्ही या लक्षवेधी सूचनेतून विचारले आहेत. मी माननीय राज्यमंत्र्यांना विचारू इच्छितो की, आपले अधिकारी श्री.श्रीकांत सिह हे या संदर्भात आपल्याकडे आलेले नाहीत का ? सभापती महोदय, साधारणत: सदनाच्या अधिकारी कक्षामध्ये, ज्याला आपण 'अदृश्य गॅलरी' म्हणून ओळखतो त्या ठिकाणी सभागृहात येणाऱ्या

..... यूयू 2 ..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सरपोतदार .....

विषयांशी संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित राहतात आणि ते त्या त्या मंत्र्यांना त्या त्यावेळी उपस्थित केल्या जाणाऱ्या मुद्यांसंबंधात माहिती उपलब्ध करून देत असतात. पण त्या अदृश्य गॅलरी मध्ये गृहनिर्माण विभागाचे अथवा म्हाडाचे कोणीही अधिकारी आता उपस्थित असल्याचे दिसत नाही. ...

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, आम्ही माननीय राज्यमंत्र्यांना सभागृहात त्यांचा विषय आला की, नेहमी सांभाळून घेत असतो, याचा अर्थ असा नाही की, नेहमीच तसे होईल. विशेषत: अशा गंभीर प्रश्नासंबंधात ...

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, म्हाडाच्या श्री.श्रीकांत सिह यांना एक आठवड्यापूर्वीच मी पत्र दिलेले आहे आणि अन्याय होणाऱ्या सोसायटींची नावे देखील दिलेली आहेत. एका सोसायटीत तेथील सर्व सदस्य रहावयास गेले परंतु इमारतीतील 7 व्या मजल्यावरून लोकांना आजही खाली जमिनीवर येऊन पाणी भरावे लागते आहे. ...

ॲड. प्रीतमकुमार शेगावकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी ज्या सोसायटीचा उल्लेख केला तेथे आपण भेट दिली होती आणि त्या विकासका विरूद्ध कारवाई करण्यात येत आहे. ...

श्री. मधुकर सरपोतदार : आतापर्यंत त्यांच्यावर काय कारवाई आपण केली आहे ? या प्रकरणाला चार महिने झालेले आहेत ...

ॲड. प्रीतमकुमार शेगावकर : सभापती महोदय, त्यात थोडी तांत्रिक बाब असल्याने इमारत पाडण्याचे आदेश दिलेले नाहीत. मात्र त्याची दखल आपण घेतलेली आहे. ..

ॲड. अनिल परब : सभापती महोदय, या निवेदनात माननीय राज्यमंत्र्यांनी म्हटलेले आहे की, ".... विकासकाने गैरमार्गाचा अवलंब सुरू केल्याच्या बाबी प्राधिकारणाच्या निदर्शनास आलेल्या नाही. ..." खरे तर या संबंधात हायकोर्टाने यांच्यावर ताशेरे मारलेले आहेत. त्यासाठी स्कृटिनी समिती देखील बसविण्यात आली. तुमचेच लोक त्या समितीसमोर उत्तर देण्यासाठी रोज जात आहेत तरीही माननीय राज्यमंत्री म्हणतात की, त्यांना काहीच माहिती नाही. यामध्ये कोण अधिकारी आहेत, ते आपण सांगावे. जवळ जवळ 56 प्रकरणे या स्कृटिनी कमिटीपुढे पेंडींग आहेत. त्या प्रकरणांमध्ये तुमच्या अधिकाऱ्यांना समितीकडून जाब विचारला जातो आहे. त्यावर रिमार्कस् देखील पास झालेले आहेत. त्यामध्ये गुन्हे दाखल करा म्हणून कोर्टाने सांगितले आहे ...

..... यूयू 3 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मला वाटते की, ही लक्षवेधी सूचना आपण रोखून धरावी आणि यावर उत्तर देण्यासाठी माननीय मुख्यमंत्र्यांना बोलाविण्यात यावे.

**उपसभापती** : मी माननीय राज्यमंत्र्यांना सांगू इच्छितो की, सन्माननीय श्री.मधुकर सरपोतदार यांच्या सारख्या ज्येष्ठ सदस्यांनी ही लक्षवेधी सूचना मांडलेली आहे. त्यातील कंटेंटस् पाहिल्यास ते निश्चितपणे गंभीर आणि महत्त्वाचे आहेत. असे असताना आपण या संबंधात उत्तर देण्यासाठी आला आहात. परंतु या ठिकाणी आयत्या वेळी जे प्रश्न सदस्यांकडून विचारले जातील तेव्हा त्याबाबत आपल्या मदतीसाठी कोणी अधिकारी वर्ग उपस्थित आहे का ? कारण मला देखील जाणवते आहे की, ....

( यानंतर सौ. रणदिवे ....2व्ही 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** . . . .

परंतु एकतर याठिकाणी माननीय मंत्री महोदय उत्तर देण्यासाठी सक्षम आहेत याबद्दल माझ्या मनामध्ये कोणत्याही प्रकारची शंका नाही. परंतु अशा वेळी आपल्याला सहाय्य करण्यासाठी गॅलरीमध्ये जे अधिकारी उपस्थित असतात, ते आता येथे उपस्थित नाहीत ही देखील वस्तुस्थिती आहे. हे आपल्याला मान्य आहे का ? जर तसे असेल तर ते योग्य आहे काय ? एवढेच मला सांगावे.

ॲड.प्रितमकुमार शेगावकर : सभापती महोदय, मी या विषयाच्या बाबती उत्तर देण्यास निश्चितपणे समर्थ आहे. त्यामध्ये काही प्रश्न नाही. माझ्याकडे जी माहिती आहे, त्याप्रमाणे मी उत्तर देणार आहे.

ॲड.अनिल परब : सभापती महोदय, मी माननीय मंत्री महोदयांना एक प्रश्न विचारु इच्छितो. त्यांनी त्याचे उत्तर द्यावे.

ॲड.प्रितमकुमार शेगावकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांना जे अपेक्षित आहे, तेच मी उत्तर द्यावे असे असेल तर ते शक्य नाही.

ॲड.अनिल परब : सभापती महोदय, मी याठिकाणी विषयाच्या बाहेरचा एकही प्रश्न विचारलेला नाही.

ॲड.प्रितमकुमार शेगावकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांना जे उत्तर पाहिजे, तेच मी सांगावे असे त्यांना अपेक्षित आहे काय ?

ॲड.अनिल परब : सभापती महोदय, याठिकाणी निवेदनामध्ये जे म्हटलेले आहे, ते चुकीचे आहे. मी आपल्याला नावे देतो. त्या नावांच्या बाबतीत चौकशी सुरु आहे की नाही ते आपण तपासून पहावे.

ॲड.प्रितमकुमार शेगावकर : आपण माझ्याकडे माहिती द्यावी. मी याबाबतीत चौकशी करतो.

ॲड.अनिल परब : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी मला पाहिजे तसे उत्तर द्यावे असे माझे म्हणणे नाही. मात्र मी येथे जबाबदारीने माहिती देत आहे. जर ती माहिती खोटी ठरली तर मी माझ्या पदाचा राजीनामा देईन अन्यथा माननीय मंत्री महोदयांनी त्यांच्या पदाचा राजीनामा द्यावा.

. . . .2 व्ही-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

काही सन्माननीय सदस्य (खाली बसून) : सभापती महोदय, याठिकाणी अधिकाऱ्यांच्या गॅलरीमध्ये जे दोन अधिकारी बसले होते, ते देखील आता बाहेर गेलेले आहेत.

ॲड.अनिल परब : सभापती महोदय, मी सभागृहासमोर ऑथेन्टीक माहिती देतो.

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, एक गोष्ट स्पष्ट आहे की, याठिकाणी गॅलरीमध्ये जो अधिकारी वर्ग उपस्थित असतो, तो व्हिजीबल नसतो.

**उपसभापती** : माझे तसे म्हणणे नाही. तर माननीय मंत्री महोदयांना सहाय्यभूत व्हावे म्हणून अधिकारी वर्ग येथे असतो.

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलतात.)

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, आपल्याला तसा मुद्दा उपस्थित करता येणार नाही. येथे अधिकारी वर्ग उपस्थित ठेवण्याच्या बाबतीत मुद्दा उपस्थित करता येणार नाही.

**उपसभापती** : तो प्रश्न महत्वाचा नाही.

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलतात.)

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, हे काय चालले आहे ? माननीय मंत्री महोदय सक्षम आहेत ना. मग त्यांनी फाईलवरुन माहिती द्यावी आणि सदनातील अधिकाऱ्यांसाठी असलेली गॅलरी बंद करावी

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलतात.)

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, दुसरे म्हणजे माननीय राज्यमंत्री स्पष्टपणे सांगत आहेत की, मी उत्तर देण्यास तयार आहे. अशा वेळी सन्माननीय सदस्यांनी स्पष्टपणे प्रश्न विचारावेत. मग माननीय राज्यमंत्री महोदय त्याचे उत्तर देतील.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. या सदनामध्ये अधिकाऱ्यांची गॅलरी अदृश्य असली तरी देखील आपण येथे अधिकारी का बसवितो. तर माननीय मंत्री महोदयांना ऐनवेळी येणाऱ्या प्रश्नांची उत्तरे देण्यासाठी मदत व्हावी म्हणून. आम्ही जेव्हा सदनामध्ये माहिती देतो, तेव्हा आमच्याकडे अशी कोणतीही यंत्रणा नसते. परंतु माननीय मंत्री महोदयांकडे ही यंत्रणा असते.आम्हाला त्या-त्या विषयामध्ये खूप माहिती गोळा करावी लागते आणि प्रचंड व्याप केल्यानंतर मग आम्हाला त्यातून एखादा प्रश्न येथे उपस्थित करता येतो. या सदनातील सन्माननीय सदस्यांना प्रश्न विचारण्यासाठी बरीच मेहनत घ्यावी लागते. पण माननीय

. . . . 2 व्ही-3



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

मंत्री महोदयांना सर्व माहिती रेडीमेड उपलब्ध होते. माझे असे म्हणणे आहे की, यापुढे सदनातील अधिकाऱ्यांसाठी असलेली गॅलरी बंद करावी. माननीय मंत्री महोदयांनी सक्षमपणे आपल्या फाईलीमधील माहितीनुसार उत्तरे द्यावीत. आमचे काही म्हणणे नाही. पण आमच्या श्रमाचा अनादर करु नका. आज हे सत्य आहे की, अधिकाऱ्यांची गॅलरी जरी अदृश्य असली तरी, ती दृश्य आहे, ती आम्हाला दिसत आहे. याठिकाणी जे अधिकारी उपस्थित होते, आता ते देखील पळून गेले आहेत. आपल्या खात्याच्या माननीय मंत्री महोदयांना एका बाजूला टाकून निघून जाणे हे खात्याच्या दृष्टीने कितपत बरोबर आहे.

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, याठिकाणी अशी चर्चा करता येणार नाही. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते हे देखील माननीय मंत्री होते, तेव्हा देखील अधिकाऱ्यांची गॅलरी अस्तित्वात होती.

**उपसभापती** : सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारावा.

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलतात.)

ॲड.अनिल परब : सभापती महोदय, माझा प्रश्न असा आहे की, कोर्टाने एस.आर.ए.च्या पुर्नरचनेच्या ज्या योजना आहेत, त्या स्क्रुटीनीसाठी कमिटीकडे पाठविलेल्या आहेत. त्या योजना स्क्रुटीनी समितीसमोर आहेत काय ? याबद्दल माननीय मंत्री महोदयांना काही माहिती आहे काय ? याबाबतीत जी चौकशी सुरु आहे, त्याबाबत माननीय मंत्री महोदयांकडे अहवाल आलेला आहे काय?

ॲड.प्रितमकुमार शेगावकर : सभापती महोदय, कोर्टासमोर ज्या केसेस होत्या, त्या कमिटीकडे वर्ग केलेल्या आहेत. या कमिटीने त्याची चौकशी करावयाची आहे.

ॲड.अनिल परब : सभापती महोदय, याचा अर्थ आपण चुकीचे उत्तर दिलेले आहे काय ?

ॲड.प्रितमकुमार शेगावकर : सभापती महोदय, उत्तर बरोबरच दिलेले आहे. आपण जो प्रश्न विचारला आहे, त्याबद्दल मी सांगत आहे. आता कोर्टातील सर्व केसेस विड्रॉ झालेल्या आहेत आणि त्या हाय पॉवर कमिटीकडे तपासण्यासाठी दिलेल्या आहेत. तेथे हिअरींग होईल आणि मग कारवाई होणार आहे. एस.आर.ए.योजनेच्या बाबतीत जेवढया तक्रारी आहेत, त्याबाबतीत हाय पॉवर कमिटी नेमलेली आहे.

. . . .2 व्ही-4



श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी शांतपणे ऐकून घ्यावे. लक्षवेधीच्या निवेदनातील पान क्र.2 वर जे उत्तर दिलेले आहे, ते वाचावे. त्यामध्ये असे म्हटलेले आहे की,"याप्रमाणे विकासक मोफत सदनिका झोपडीधारकांना शासनाच्या प्रचलित धोरणानुसार

पुरवित असल्याने विकासकाने विक्री घटकातून फायदा मिळविणे स्वाभाविक आहे. पुढे असेही म्हटले आहे,

यानंतर कु.गायकवाड . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत..

फायदा डोळयासमोर असल्याने झोपडपट्टयांमध्ये सहकारी गृहनिर्माण संस्था स्थापन करण्यासाठी विकासकाने गैरमार्गाचा अवलंब सुरु केल्याच्या बाबी प्राधिकरणाच्या निदर्शनास आलेल्या नाहीत. " असे आपण ठामपणे म्हणत आहे. मग हे प्रकरण कोर्टामध्ये कशासाठी गेले होते ? येथे काही बाबी निदर्शनास आल्या होत्या म्हणूनच ही प्रकरणे कोर्टात गेली होती. मग गैरमार्गाचा अवलंब केला नाही असे विकासकाच्या बाजूने उत्तर देण्यात येत आहे. हे योग्य आहे काय ?

ॲड.प्रितमकुमार शेगांवकर : सभापती महोदय, विकासकांच्या तक्रारी आमच्याकडे आलेल्या नसून त्या तक्रारी कोर्टाकडे आलेल्या आहेत. ज्या तक्रारी आलेल्या आहेत त्यांची चौकशी करण्यात येत आहे.

ॲड. अनिल परब : एसआरए स्कीम रद्द केली होती.

ॲड.प्रितमकुमार शेगांवकर : सभापती महोदय, मी आपणास सांगू इच्छितो की, एसआरए स्कीम रद्द केली नव्हती. गृह निर्माण धोरण जाहीर करणार होते. त्यामुळे केवळ खाजगी जागेवर असलेल्या विकासकाच्या संदर्भात एसआरए स्कीम होती. महानगरपालिकेच्या व म्हाडाच्या जागेवर विकासक नेमायचे होते. नवीन गृह निर्माण जाहीर करावयाचे होते म्हणून ते थांबविले होते. आता नवीन गृह निर्माण धोरण जाहीर करण्यात आले आहे.

ॲड. अनिल परब : सभापती महोदय, काही विकासकांच्या विरोधी कारवाई झालेली आहे व त्यांचे प्रकल्प रद्द केलेले आहेत हे आपल्याला माहीत आहे काय ?

ॲड.प्रितमकुमार शेगांवकर : नाही. हे मला माहीत नाही.

( काही सन्माननीय सदस्य एकत्र बोलतात. )

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, ही लक्षवेधी सूचना राखून ठेवावी व माननीय मुख्यमंत्र्यांना उत्तर देण्यासाठी बोलवावे.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार यांनी प्रश्न विचारलेला आहे. परंतु त्याचे उत्तर परस्पर विसंगत व शासनाच्या धोरणाला हरताळ फासणारे असे देण्यात आले आहे. सन 2002 नंतरच्या झोपडपट्टयांना एसआरए योजनेचा लाभ मिळणार आहे.असे माननीय मंत्री महोदयांनी सांगितले होते. परंतु याठिकाणी असे म्हटलेले

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण ..

आहे की, 1995 नंतरच्या झोपडपट्टयांना ही योजना लागू करण्यात येणार आहे. असे असताना त्यांनी जे धोरण जाहीर केलेले आहे ते खरे आहे की, आता जे सांगितले जात आहे ते खरे आहे ? निवेदनाच्या पान क्र. 3 वर शासनाची चिरफाड होईल असे उत्तर दिलेले आहे. या वरुन हल्लकल्लोळ होण्याची शक्यता आहे. त्या निवेदनात असे म्हटले आहे की, " पूर्वी 225 चौ. फूटाच्या सदनिका देण्यात येत होत्या. आता 269 चौ. फूटाच्या सदनिका देण्यात येतील " समजा एखादी योजना जाहीर केली त्या नुसार 2.5 एफएस आय मला मिळणार असेल. समजा 100 सदनिकांचे पुनर्वसन करावयाचे असेल, व 200 सदनिका रिसेल करायच्या असतील तर त्यासाठी 269 एफएसआय केलेला आहे. यांना एफएसआय वाढवून दिला जाणार आहे काय ? तसेच निवेदनामध्ये असे म्हटले आहे की, " 2004 मध्ये याबाबत आवश्यक ते सर्व आदेश दिलेले आहेत " मी विचारु इच्छितो की, शासनाने एफएसआय वाढविण्याच्या बाबत निर्देश दिलेले आहेत काय ?

ॲड.प्रितमकुमार शेगांवकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी आता जे सांगितले आहे ते धोरण 225 चौ.फूटाच्या संदर्भात शासनाने जाहीर केलेले हे धोरण आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी राष्ट्रीय धोरणाप्रमाणे 269 चौ फूटाच्या सदनिका देण्यात येतील असे जाहीर केले आहे. या बाबत शासनाने आदेश दिलेले आहेत. सन 2000 पर्यत झोपडपट्टयांना संरक्षण देण्यात येईल याबाबतचे आदेश वितरित केलेले नसल्यामुळे दाखविण्यात आले नाही. हे धोरण शासनाने मान्य केलेले आहे. परंतु त्याबाबत आदेश काढण्यात आलेले नाही. या बाबत कोणतीही शंका असण्याचे कारण नाही. माननीय मुख्यमंत्र्यांनी जाहीर केले आहे की, ज्या विकासकाने कामे सुरु केलेली आहेत, सदनिका बांधलेल्या आहेत त्यांना 225 चौ. फुटाची घरे बांधून देण्यात येतील.

यानंतर श्री. बरवड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. प्रितमकुमार शेगावकर .....

ज्या जुन्या विकासकांनी काम सुरु केले आणि पूर्ण केले आहे त्यांनी 225 चौ.फुटाचे घर द्यावयाचे आहे. परंतु ज्या विकासकांनी अद्याप काम सुरु केलेले नाही, ज्यांना एल.ओ.आय. दिलेले नाही अशा विकासकांच्या बाबतीत 269 चौ. फुटाचे बंधन राहणार आहे. म्हणून सन्माननीय सदस्यांची जी शंका आहे त्याबाबत सांगू इच्छितो की, नवीन आणि जुन्या विकासकांच्या बाबतीत ज्यांना एल.ओ.आय. दिलेला आहे ते 225 चौ. फुटाचे घर देतील आणि ज्यांना एल.ओ.आय दिलेला नाही आणि ज्यांनी काम सुरु केलेले नाही अशा विकासकांवर 269 चौ. फुटाची घरे देण्याचे बंधन राहणार आहे. तसेच नवीन धोरणाप्रमाणे त्यांना 25 टक्के प्रिमियम द्यावा लागणार आहे. त्यामुळे शासनाला 1 हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त रक्कम या विकासकांकडून मिळणार आहे. त्यामुळे सन्माननीय सदस्यांनी शंका घेण्याचे काही कारण नाही. सन्माननीय सदस्यांना जे अपेक्षित आहेत तेच शासन करीत आहे.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांना मी असा प्रश्न विचारु इच्छितो की, आपण आता जे उत्तर दिले ते या लक्षवेधी सूचनेतील कोणत्या प्रश्नाला दिले हे आपण सांगू शकाल काय ? या लक्षवेधी सूचनेमध्ये जे विचारले गेले आहे त्यातील कोणत्या पोर्शनला आपण उत्तर दिलेले आहे हे सांगावे.

ॲड. प्रितमकुमार शेगावकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी 1995 पूर्वीच्या झोपड्यांच्या बाबतीत विचारले.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, आम्ही तसे विचारलेले नाही. एल.ओ.आय. चा विषय यामध्ये कोठे आहे ? माझा दुसरा प्रश्न असा आहे की, सिध्देश्वर सहकारी सोसायटी तसेच परिश्रमालय सोसायटी, शास्त्रीनगर जी आपण स्वत: पाहिली, या सोसायट्यांमधील सद्य:स्थिती काय आहे ? सिध्देश्वर सोसायटीमध्ये लोकांना अलॉटमेंट दिली. त्या ठिकाणी लोक राहावयास आले. पंधरा पंधरा दिवस त्यांचा पाणीपुरवठा आणि विजेचा पुरवठा बंद करतात. त्यांच्या लिफ्टस चालू नाहीत. सातव्या मजल्यावरील लोक खाली येऊन पाणी भरत आहेत हे माननीय मंत्रिमहोदयांना माहीत आहे काय ? त्या ठिकाणी आपण या गरिबांचे असे हाल करीत आहात. आपण स्वत: दलित आहात ना ?

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. प्रितमकुमार शेगावकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, याबाबतीत आपण भेट दिली होती हे आपल्याला माहीत आहे. त्यांना आदेशही दिलेले होते हेही आपल्याला माहीत आहे. त्यांच्या विरुध्द काय कारवाई करावयाची ती करणार आहोत.

श्री. मधुकर सरपोतदार : तेथील लोक खाली येऊन पाणी भरतात याबाबत आपण काय करणार आहात ?

ॲड. प्रितमकुमार शेगावकर : सभापती महोदय, निश्चितपणे कारवाई होईल.

श्री. मधुकर सरपोतदार : तक्रार आली नाही असे आपण म्हणता. यासंदर्भातील त्यांचे पत्र श्री. श्रीकांत सिंह यांच्याकडे दिलेले आहे. हे अधिकाऱ्यांना माहीत नाही काय ?

ॲड. प्रितमकुमार शेगावकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार यांच्या भावना मी समजू शकतो. मी स्वत: भेट दिलेली आहे. मी त्याबाबतीत अतिशय कठोरपणे कारवाई करण्याच्या संदर्भात....

श्री. मधुकर सरपोतदार : अशा प्रकारच्या परिस्थितीबाबत या सदनाला लाज वाटली पाहिजे. दलित माणसांसाठी हे करावयाचे आहे. दलितांचे प्रतिनिधी म्हणून यांना मंत्री बनवले आहे.

ॲड. प्रितमकुमार शेगावकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार यांनी इतके रागावण्याचे कारण नाही. मी किती काम करतो हे आपल्याला माहीत आहे. मी किती ठिकाणी जातो हेही आपल्याला माहीत आहे. एवढेच नव्हे तर सर्व अधिकाऱ्यांच्या विरोधात कारवाई करण्याचे काम मीच करतो हे आपल्याला माहीत आहे. यामध्ये सुध्दा कारवाई होईल. परंतु कोणतीही गोष्ट नियमाप्रमाणे करावी लागते. अधिकाऱ्यांच्या विरुध्द काही करावायचे असेल तर आपल्यावर नियमांचे बंधन आहे. एकदम सांगितल्याबरोबर लगेच कारवाई होईल असे नाही. आपल्या तक्रारीची दखल आम्ही घेतलेली आहे. आपण सांगितले त्याप्रमाणे मी त्या ठिकाणी भेट दिली आहे आणि अधिकाऱ्यांच्या विरुध्द आपली कारवाई चालू आहे. ती प्रोसीजर पूर्ण झाल्यानंतर कारवाई होईल.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, ही लक्षवेधी सूचना राखून ठेवावी लागेल. याचे कारण असे की, निवेदनाच्या पहिल्या पानावर मुंबई शहराकरिता पुनर्वसन घटक आणि विक्री

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MMP/ KGS/

श्री. दिवाकर रावते .....

घटकाच्या बाबतीत चटईक्षेत्राची माहिती दिलेली आहे. त्यामध्ये धारावी किंवा तत्सम कठीण क्षेत्रामध्ये पुनर्वसन घटकासाठी 1 एफएसआय आणि विक्री घटकासाठी 1.33 एफएसआय म्हणजे 2.33 एफएसआय असे आपण म्हटले आहे. तसेच या निवेदनात पुढे असे म्हटले आहे की, धारावी पुनर्विकास प्रकल्प 5 सेक्टर्समध्ये पूर्ण करण्याचे नियोजन आहे. सदर योजनेंतर्गत पात्र झोपडपट्टीवासियांचे त्याच ठिकाणी पुनर्वसन करण्यात येणार आहे. त्याकरिता 4.00 पर्यंत चटईक्षेत्र निर्देशांक वापरण्याची मुभा देण्यात आलेली आहे. या निवेदनामध्ये या दोन विसंगती आहेत. याबाबतीत नक्की काय धोरण आहे ? सुरुवातीला एक धोरण सांगितले आहे आणि चौथ्या पानावर 4.00 एफएसआय बाबत सांगितले आहे.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ MMP/ श्री.बरवडनंतर 13:50

श्री.दिवाकर रावते....

त्याच्या वर असे दिले आहे की, " विहित अटींवर व शर्तीवर 2.5 च्या क्षेत्राच्या मर्यादेस अधिन राहून योजनेस मंजुरी दिली जाते." ही विसंगती बदलावी लागेल. पुढे असे म्हटले आहे की, "लाभार्थ्यांचे प्रवर्गानुसार (मागासवर्गीय व सर्वसाधारण) अनुक्रमे 10/12 टक्के इतके अंशदान व उर्वरित वाटा राज्य शासन/स्थानिक स्वराज्य संस्था यांचा असेल. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक तत्वानुसार प्रत्येक सदनिकांचे बांधकाम क्षेत्र कमीत कमी 25 चौ.मी.क्षेत्र (269 चौ.फू.) असावे व प्रत्येक सदनिकेमध्ये दोन खोल्या, स्वयंपाक घर व स्वतंत्र शौचालयाचा अंतर्भाव असावा असे स्पष्ट केलेले आहे." हे मागासवर्गीयांसाठी म्हटलेले आहे. पुढे असे म्हटले आहे की, "राष्ट्रीय गृहनिर्माण धोरणामध्ये लाभधारकांना 269 चौ.फू.ची सदनिका देण्यात येणर आहे. राष्ट्रीय गृहनिर्माण धोरणाशी अनुरुप असे राज्य शासनाचे धोरण असल्याने माननीय मुख्यमंत्र्यांनी दि.16.4.2008 रोजी झोपडपट्टी पुनर्वसन योजनेंतर्गत 269 चौ.फू.ची सदनिका देण्यात येईल, असे सभागृहात घोषित केले आहे." हे धोरण सर्वांसाठी नाही. त्यामध्ये अंशदान असे म्हटले आहे. आता शासनाने संपूर्ण झोपडपट्टयांमध्ये हे धोरण लागू केले आहे. वाल्मीकी आंबेडकर आवास योजना बंद केली त्याऐवजी जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय शहरी पुनरुत्थान अभियान नावाची योजना सुरु केली आहे. या देशामध्ये आंबेडकर मोठे आहेत की नेहरु ते स्पष्ट करुन सांगावे. मंत्रिमहोदय आपण याठिकाणी आंबेडकरांचे प्रतिनिधी म्हणून बसला आहात. तेव्हा माझ्या प्रश्नाचे उत्तर द्यावे.

ॲड.प्रितमकुमार शेगांवकर : सभापती महोदय, शासनाच्या योजना बदलत राहतात त्यानुसार योजनांची नावे सुध्दा बदलतात.

श्री.दिवाकर रावते : शासनाने आंबेडकर यांच्या नावाची योजना होती ती बंद करुन नेहरुंच्या नावाची योजना आणली आहे. नेहरुंनी आंबेडकरांना घरी पाठविले होते हा इतिहास आहे.

ॲड.प्रितमकुमार शेगांवकर : सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांना सांगू इच्छितो की, येथे आंबेडकर किंवा नेहरु यांची तुलना करण्याची आवश्यकता नाही. शासकीय योजना बदलत राहतात. त्याप्रमाणे योजनेचे नावही बदलत राहते. केंद्र सरकारने दोन योजना क्लब

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.प्रितमकुमार  शेगांवकर...

करुन जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय शहरी पुनरुत्थान नावाची योजना देश पातळीवर सुरु केलेली आहे. त्यामुळे या योजनेला त्यांनी प्राधान्य दिले आहे. आंबेडकरांच्या नावाने अनेक संस्था आहेत, अनेक योजना आहेत. शासनाच्या धोरणानुसार ही योजना केलेली आहे. नेहरु पुनरुत्थान योजनेमध्ये दलित वस्तीसाठी जास्तीत जास्त निधी उपलब्ध करुन देण्यात येत आहे. त्यामध्ये सर्व प्रकारचे इन्फ्रास्ट्रक्चर, सुविधा उपलब्ध करुन दिल्या जात आहेत.

श्री.मधुकर सरपोतदार : ज्या इमारती बांधून तयार झाल्या आहेत. परंतु निकषाप्रमाणे न बांधल्यामुळे माणसे राहण्यासाठी जाऊ शकत नाही. बाहेरची त्यांची भाडे देण्याची मुदत संपलेली आहे. ही इमारत व्यवस्थित होत नाही तोपर्यंत या सर्व झोपडपट्टीवासियांचे पेमेंट चालू ठेवण्याचे आदेश देणार आहात काय ?

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, मंत्रिमहोदय बसूनच नाही असे उत्तर देत आहेत, मग त्या झोपडपट्टीवासियांनी काय करावयाचे ? या निवेदनामध्ये अनेक विसंगती असल्यामुळे ही लक्षवेधी सूचना राखून ठेवण्यात यावी अशी मी विनंती करतो.

**उपसभापती** : ही लक्षवेधी सूचना राखून ठेवण्यात येत आहे.

आता सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी स्थगित होईल आणि दुपारी 2.30 वाजता पुन: भरेल.

( दुपारी 1.54 ते 2.30 पर्यंत मध्यंतर )

------

नंतर श्री.शिगम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**मध्यंतरानंतर**

**सभापतीस्थानी माननीय उपसभापती**

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, शेतक-यांच्या कर्जमाफीच्या संदर्भातील महत्वाच्या प्रस्तावावर चर्चा होणार आहे. संबंधित खात्याचे मंत्री महोदय सभागृहामध्ये उपस्थित नाहीत. तेव्हा आपण 10 मिनिटांकरिता सभागृहाची बैठक तहकूब करावी अशी माझी आपणास विनंती आहे.

**उपसभापती** : सभागृहाची बैठक आता स्थगित करण्यात येत असून दुपारी 2.45 वाजता पुर: भरेल.

(दुपारी 2.31 ते 2.45 वाजेपर्यन्त सभागृहाची बैठक स्थगित झाली.)

----

...नंतर श्री. गिते....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**स्थगितीनंतर**

**सभापतीस्थानी माननीय उपसभापती**

**पॉईट ऑफ इन्फर्मेशनसंबंधी**

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, आज मी नांदेड जिल्हा मध्यवर्ती बँकेसंदर्भात विशेष उल्लेखाची सूचना उपस्थित केली होती. त्यावेळी माननीय सहकार मंत्री सभागृहात उपस्थित नव्हते. आता ते सभागृहात उपस्थित आहेत. नांदेड मध्यवर्ती सहकारी बँकेत मोठया प्रमाणात भ्रष्टाचार झाला असून त्यासंबंधीच्या चौकशीला दोन वेळा स्थगिती दिली आहे. माननीय सहकार मंत्री मला नेहमी सांगतात की, तुम्ही प्रश्न विचारा, तुमच्या प्रश्नाचे उत्तर देण्यास मी तयार आहे. या ठिकाणी मंत्रीमहोदयांनी उत्तर दिले तर विशेष उल्लेखाच्या सूचनेवरील उत्तर येईपर्यंत मला वाट बघावयास नको.

डॉ. पतंगराव कदम : सभापती महोदय, नांदेड बँकेच्या संदर्भात दोन,तीन सुनावण्या झाल्या आहेत. कुठल्या सुनावणी संदर्भात सन्माननीय सदस्यांना माहिती हवी आहे याची मला कल्पना नाही.

श्री. दिवाकर रावते : कलम 88 च्या चौकशीला स्थगिती देण्यात आली आहे.

डॉ. पतंगराव कदम : कलम 88 च्या चौकशीची स्थगिती उठविली जाईल.

-----------

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: पॉईंट ऑफ इन्फरमेशनसंबंधी.

श्री. जितेंद्र आव्हाड : या सदनातील सर्व सन्माननीय सदस्यांच्या भावना दुखावल्या गेल्या आहेत अशा विषयाकडे या सभागृहाचे लक्ष मी वेधू इच्छितो. वृत्तपत्राच्या माध्यमातून स्व.प्रमोद महाजन यांच्या बाबतीत ते पक्षातून गेले असते, त्यांना पक्षातून काढले असते असे छापून आले आहे. त्यांची निर्घृण हत्या झाल्यानंतर या सभागृहात शोक प्रस्ताव मांडण्यात आला होता. त्या शोक प्रस्तावावर बोलत असताना आम्ही त्यांना देशाचे नेते, या देशाचे भाग्यविधाते, महाराष्ट्रातील राजकारणात एक स्वतंत्र प्रतिमा निर्माण करणारे नेते अशी वेगवेगळी विभुषणे लावली होती. ती विभुषणे त्याच्या एकंदर व्यक्तीमत्वास अभिप्रेत होती. महाराष्ट्राच्या राजकारणातील एक मोठा पराक्रमी असा योध्दा असे स्व.प्रमोद महाजन होते, जो दिल्लीच्या तख्तावर स्वत:चे पाय रोवून उभा राहिला होता. अशा या व्यक्तीमत्वाच्या बाबतीत मृत्यू होऊन दोन वर्षाचा कालावधी होऊन गेल्यानंतर अशा प्रकारचे संशयास्पद विधान प्रसिध्दीला येणे म्हणजे सदनातील सदस्यांच्या भावना दुखावण्यासारखे आहे. आम्ही आपणास एवढीच विनंती करतो की, आम्ही आदरांजली वाहिली, पुष्पांजली वाहिली, शब्दसुमनांचा या ठिकाणी वर्षाव झाला, त्या व्यक्तीच्या एकंदर व्यक्तीमत्वाबाबत संशयास्पद चित्र निर्माण होणे म्हणजे या सभागृहाच्या भावना दुखावण्यासारखे आहे. सभापती महोदय, आपण याबाबतीत योग्य ते निदेश द्यावेत. यात सत्य काय आहे यासंबंधीची माहिती आम्हाला मिळावी. खरोखरच त्यांचे चारित्र्य संशयास्पद होते काय? त्यांना पक्षातून काढून टाकणार होते काय ? पक्षाला त्यांची गरज नव्हती काय ? जर एवढेच होते तर ज्यांनी ज्यांनी या सभागृहात शोक प्रस्तावाच्या अनुषंगाने भाषणे केली ती असत्य होती काय ? या सभागृहात येऊन असत्य बोलत असतील तर ती बाब गंभीर आहे. या गोष्टीची आपण गांभीर्याने नोंद घ्यावी.

**उपसभापती** : स्व.प्रमोद महाजन यांच्या बाबतीत जे काही वृत्त छापून आले आहे, त्याबाबतीत आपल्या भावना व्यक्त करण्याचे हे ठिकाण नाही. आपण ही बाब निदर्शनास आणून दिली ते ठीक झाले. अशा प्रकारचा आक्षेपार्ह मजकूर छापून येणे योग्य नाही. हा विषय सभागृहाच्या कक्षेबाहेरचा असल्यामुळे त्याबाबतीत सभागृहात चर्चा करावी की न करावी हा वेगळा मुद्दा आहे. सन्माननीय सदस्यांनी ज्या भावना व्यक्त केल्या त्याच्याशी निश्चितपणे महाराष्ट्रातील

3...



ABG/ KTG/ SBT/ प्रथम श्री.शिगम 14:45

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती.....

प्रत्येक माणूस स्व.प्रमोद महाजन यांच्याबद्दल आदर राखणारा आहे. अशा प्रकारचे आक्षेपार्ह छापून येणे हे योग्य नाही. सन्माननीय सदस्यांनी ज्या भावना व्यक्त केल्या. त्या भावना योग्य आहेत.

यानंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ SBT/ KTG/ 14:50

**उपसभापती**.....

मला असे वाटते की, वृत्तपत्रात जो मजकूर छापून आलेला आहे तो तितकासा योग्य वाटत नाही. सन्माननीय सदस्य श्री. जितेंद्र आव्हाड यांनी ज्या भावना व्यक्त केलेल्या आहेत त्या योग्य आहेत.

श्री. जगदीश गुप्ता : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. जितेंद्र आव्हाड यांनी सांगितले की, कै.प्रमोद महाजनांच्या बाबतीत शोक प्रस्तावाच्या निमित्ताने जी आदरांजली व्यक्त करण्यात आली त्याबद्दल साशंकता निर्माण झाली आहे...

श्री. जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, मी असे म्हणालो की आमच्या भावना दुखावल्या गेल्या आहेत. आजही आम्ही म्हणतो की ते देशाचे नेते होते. पंतप्रधान झाले असते.

**उपसभापती** : आता हा चर्चेचा विषय होऊ शकत नाही. सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी नियम 260 अन्वये जो प्रस्ताव दिला आहे त्यावर आता चर्चा सुरु करु या. या प्रस्तावावर मंत्र्यांच्या उत्तरासहित दीड तासांचा वेळ दिलेला आहे. अर्धा तास सत्ताधारी आणि अर्धा तास विरोधी पक्षाच्या माननीय सदस्यांना भाषण करण्यासाठी दिलेला आहे आणि अर्धा तासात मंत्र्यांचे उत्तर पूर्ण होईल. एकूण दीड तासात सगळी चर्चा पूर्ण होईल. आता सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते हे चर्चेला सुरुवात करतील.

------

.......2

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. जगदीश गुप्ता )**



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : केंद्र शासनाने शेतकऱ्यांना जाहीर केलेली कर्जमाफी

मु.शी. :केंद्र शासनाने शेतकऱ्यांना जाहीर केलेली कर्जमाफी या विषयावर सर्वश्री पांडुरंग फुंडकर, मधुकर सरपोतदार, नितीन गडकरी, दिवाकर रावते, डॉ.दिपक सावंत, सर्वश्री.अरविंद सावंत, पाशा पटेल, अरुण गुजराथी, गुरुनाथ कुलकर्णी, भास्कर जाधव, राजन तेली, प्रा.सुरेश नवले, श्री.कपिल पाटील, वि.प.स. यांचा प्रस्ताव

श्री. दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 260 अन्वये पुढील प्रस्ताव मांडतो.

" केंद्रीय वित्त मंत्र्यांनी दिनांक 29 फेब्रुवारी 2008 रोजी शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबाव्यात यासाठी 60 हजार कोटी रुपयांच्या कर्जमाफीची घोषणा करणे, केंद्र शासनाने केलेली ही कर्जमाफीची घोषणा पाच एकर शेती असलेल्या शेतकऱ्यांसाठीच असल्यामुळे विदर्भातील बहुसंख्य कोरडवाहू शेतकऱ्यांना त्याचा लाभ न मिळणे, त्यामुळे पाच एकर शेतीची ही अट शिथील करुन 15 एकर शेती असलेल्या शेतकऱ्यांनाही कर्जमाफीचा लाभ देण्यात यावा तसेच कर्जफेडीसाठी 31 मार्चची मुदत वाढविण्यात यावी यासाठी विरोधी पक्ष सदस्य तसेच सत्ताधारी पक्षाच्या सदस्यांनीही आग्रह धरणे तथापि ही मागणी मान्य करण्याऐवजी केंद्रीय कृषी मंत्र्यांनी दिनांक 21 एप्रिल, 2008 रोजी ठरवून दिलेल्या 5 एकरच्या मर्यादेपेक्षा अधिक जमीन असलेल्या कोणत्याही शेतकऱ्याच्या कर्जमाफीची हमी सरकार घेणार नसल्याचे लोकसभेत जाहीर करणे, केंद्रीय कृषी मंत्र्यांनी केलेल्या या घोषणेमुळे राज्यातील 5 एकरपेक्षा जास्त जमीन असलेल्या सर्व शेतकऱ्यांची उरली सुरली आशाही संपुष्टात येणे, त्यांच्या आत्महत्यात वाढ होण्याची निर्माण झालेली शक्यता व याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना "

सभापती महोदय, अत्यंत क्लेषकारक भावनेतून या प्रस्तावावर बोलण्यासाठी मी उभा आहे. कर्जमाफी संपूर्ण देशातील शेतकऱ्यांसाठी झाली. 60 हजार कोटी रुपयांची कर्जमाफी केंद्र शासनाने जाहीर केली. परंतु त्यानंतर या महाराष्ट्रामध्ये ज्यांना कर्जमाफी झाली त्यांच्या भावना काय आहेत यापेक्षा कर्जमाफी कोणामुळे झाली याकरिता एक प्रचंड असा जत्रोत्सव आणि अहमहमिका लागली होती. कर्जमाफी कोणामुळे झाली यासंदर्भात आगळावेगळा असा संघर्ष पहावयास मिळाला. सत्तेमधील दोन्ही पक्षांनी हातात हात घालून शेतकऱ्यांच्या भावनांचा आदर करुन या कर्जमाफीबाबत चिंतन आणि मनन केले असते .... (नंतर श्री. भोगले

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.........

आणि आम्ही आता जे काही दिले आहे त्याबाबत शेतकऱ्यांना काय वाटते हे पाहण्याची जबाबदारी सरकारची होती. कारण सरकार हे मायबाप असते. या भावनेतून या घटनेकडे पाहिले असते तर मला वाटत नाही की या महाराष्ट्रामध्ये कृतज्ञता मेळावे, स्वागत मेळावे, आनंद मेळावे घेत फिरावे लागले असते. हे सर्व सुरु असताना या सभागृहात चर्चा झाली. ती अभिप्रेत होती. या सभागृहात मोठया प्रमाणावर टिकाटिप्पणी होण्याचा प्रश्न निर्माण झाला. मी नम्रपणाने आपल्या माध्यमातून सर्व सन्माननीय सदस्यांच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, कोणत्याही व्यक्ती द्वेषातून, व्यक्ती अभिनिवेषातून संदर्भ देणार नाही. माननीय श्री.शरद पवार हे या देशाचे कृषि मंत्री असल्याकारणाने आणि कृषि धोरणाच्या संदर्भात त्यांनीच निर्णय घ्यायचा असल्यामुळे त्याबाबत चर्चा करताना त्यांचे नाव तुमच्या पक्षाचे प्रमुख म्हणून नव्हे तर कृषि मंत्री या नात्याने घेतले जाणार आहे. योगायोगाने श्रीमती सोनिया गांधी यांचे नाव आले तरी त्या तुमच्या पक्षाच्या ज्येष्ठ सन्माननीय नेत्या असल्या तरी त्या राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या अध्यक्षा आहेत, त्यामुळे धोरण ठरविण्याचा त्यांचा मुख्याधिकार लक्षात घेऊन त्या संदर्भात त्यांच्या नावाचा उल्लेख होईल. म्हणून मी सर्वच सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, द्रष्टेपणाने आणि शेतकऱ्यांबद्दल असलेली आपली जबाबदारी ओळखून मी बोलणार आहे. लोकप्रतिनिधी या नात्याने आपल्या सर्वांची ही जबाबदारी आहे. आपण कोणत्या पक्षाचे आहोत यापेक्षा या महाराष्ट्राचे लोकप्रतिनिधी या अपेक्षेने ग्रामीण भागातील शेतकरी आपल्याकडे पहात असतो. त्याच्याकरिता जो लढतो त्याच्यामागे जायचे की नाही हे तो ठरवित असतो. मी सुरुवातीला म्हटले आहे की, हा प्रस्ताव मांडताना मला क्लेष होतो. 5 एकरपर्यंतच्या शेतकऱ्यांना कर्जमाफी देणे म्हणजे आभाळ ठेंगणे झाले असे वक्तव्य करणारी मंडळी याठिकाणी उपस्थित असणे आवश्यक होते. मला याठिकाणी अभिमानाने सांगावे लागेल. कारण सन्माननीय श्री.उध्दवजी ठाकरे यांच्याबाबत टिकाटिप्पणी झाली, त्यांना शेतीतले काय कळते असे सांगितले गेले. सन्माननीय श्री.उध्दवजी ठाकरे यांनी कर्जमाफी झाल्यानंतर मराठवाडा आणि विदर्भातील शेतकरी दु:खी झाला म्हणून त्यांच्या विवंचना जाणून घेण्याकरिता गेले होते. त्यांच्याशी त्यांनी संवाद साधला. त्यांच्या पाठीवर मायेचा हात ठेवून 7/12 कोरा झाल्याशिवाय आम्ही स्वस्थ बसणार नाही हे सांगितले. पश्चिम महाराष्ट्रात त्यांनी दौरा केला. शेतकऱ्यांचा 7/12 कोरा झालाच पाहिजे यादृष्टीने शेतकऱ्यांना मानसिक आधार देण्याचे काम केले.



24-04-2008 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) 3C.2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...........

हा वेगळ्या जाणिवेचा भाग होता. मला मान्य आहे. टीका झाली. आपण टीका करण्यासाठीच टीका करतो. त्यामध्ये चिमटे काढले जातात, कुत्सितता असते, राजकीय अभिनिवेषाचा भाग असतो. हे करण्यासाठीच आपण राजकारणामध्ये असतो. सन्माननीय श्री.उध्दवजी ठाकरे यांना शेतीतील काय कळते? अशी टीका करण्यात आली. कोल्हापूरच्या बिंदू चौकातील सभेत त्यांनी सांगितले, मला शेतीतील काही कळत नाही. परंतु शेतकऱ्यांचे अश्रू मला पुसायचे आहेत. त्यांच्या जाणिवा मला कळतात. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांकडे विविध नेत्यांनी कोणत्या जाणिवेतून पहावे हे जाणीवपूर्वक लक्ष देऊन त्यांच्या विचारांचे चिंतन करुन मत प्रदर्शित करावे हे महत्वाचे असते. सगळीकडे राजकारण करुन चालणार नाही. कर्जमाफी जाहीर झाल्यानंतर 251 आत्महत्या झाल्या. माझ्याकडे नावानिशी यादी आहे. यादी वाचायला गेलो तर दोन-अडीच तास लागतील. नाव व गावासहित यादी उपलब्ध आहे.

डॉ.पतंगराव कदम : (जागेवर बसून) यादी आमच्याकडे द्या.

श्री.दिवाकर रावते : त्याबद्दल मी नंतर बोलतो. यादीचा उल्लेख यासाठी केला की, या सभागृहात दोन दिवसापूर्वी मी म्हणालो होतो की, कर्जमाफी झाल्यानंतरही जर आत्महत्या होत असतील तर हे कोणाचे पाप आहे हे न शोधता तुम्ही आम्ही चिंतन केले पाहिजे. आजही शेतकरी आत्महत्या का करीत आहेत? असेही मी म्हणालो होतो.

(नंतर श्री.जुन्नरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ....

शेतक-यांच्या आत्म हत्येमुळे मी फार व्यथित झालो आहे. आता पाच एकराच्या वरील शेतकरी सुध्दा आत्महत्या करावयास लागले आहेत. शेतकरी गळफास घेऊन, टीक टव्हेंटी घेऊन आत्महत्या करीत आहेत. एक शेतकरी न्याय मागण्यासाठी राज्याच्या राजधानीत आला परंतु त्याला न्याय न मिळाल्यामुळे त्याने मुंबईत टीक टव्हेंटी घेऊन आत्महत्या केलेली आहे. या शेतक-यावर आत्महत्या करण्याची परिस्थिती का आली याचाही विचार करण्याची आवश्यकता आहे. हा प्रकार चिंताजनक आहे. यासंदर्भात एका शेतक-याने स्वत:ला जाळून घेऊन आत्महत्या केलेली आहे. त्याच्या आत्महत्येमुळे मी फार व्यथित झालेलो आहे. या शेतक-याच्या घरी मी परवा गेलो होतो. बुलढाणा येथील मौजे. वरवंड गावात मी गेलो होतो. या शेतक-याचे नाव बबनराव, उत्तमराव जेऊघाले असून त्याचे वय 42 वर्षाचे होते. या कर्जबाजारी शेतक-याने कडब्याच्या गंजीत स्वत:ला बसवून आतल्याआत गंजीला आग लावून स्वत:ला जाळून आत्महत्या केल्याचे अत्यंत हृदयद्रावक व मन सुन्न करणारी घटना घडलेली आहे. आत्महत्या करण्यापूर्वी त्याने जे निवेदन लिहिले आहे ते माझ्याकडे आहे. या निवेदनामध्ये त्याने माननीय सोनिया गांधी, माननीय श्री. शरद पवार, माननीय मुख्यमंत्री, माननीय उपमुख्यमंत्री, मानननीय सहकार मंत्री तसेच माननीय अर्थमंत्री श्री. जयंत पाटील यांना निवेदन पाठवले होते. कर्ज माफीच्या संदर्भात कोणाकोणाला बोलले पाहिजे याची त्याला माहिती होती म्हणून त्यांनी वरील सर्वांना निवेदन दिलेले होते. त्याने हे निवेदन 4.3.2008 रोजी लिहिलेले असून 11 एप्रिल 2008 रोजी या शेतक-याने आत्महत्या केलेली आहे. म्हणजे मार्च महिन्याच्या 4 तारखेनंतर एकूण दीड महिने वाट बघितल्यानंतर या शेतक-याने न्याय मिळत नाही म्हणून आत्महत्या केलेली आहे. अमरावतीच्या शेतक-याने आत्महत्या करण्यापूर्वी त्याने सर्व शेतक-यांना एकत्र बोलावून सावकारीच्या संदर्भात आपण एकत्र लढले पाहिजे असे त्यांने सांगितले होते. मी या शेतक-याच्या घरी जाऊन आलेलो आहे. त्याच्या घरच्या प्रश्नाची मला पूर्ण माहिती आहे, त्याच्या मुलांचा प्रश्नां संबंधी तसेच मुलीच्या लग्नाच्या प्रश्नांची सुध्दा मला चांगली माहिती असून त्याची पत्नी मला भाऊ मानते त्यामुळे माझी बहीण आठवडयातून एकदा का होईना मला फोन करीत असते. ठीक आहे मी पहिल्या विषयावर माझे विचार आता मांडतो.

सभापती महोदय, त्यांनी माननीय जयंत पाटील साहेबांना जे पत्र लिहिले आहे तेच मी या ठिकाणी वाचून दाखवतो.

...2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते....

"**विषय** : आत्महत्याग्रस्त विदर्भातील संपूर्ण कर्जबाजारी शेतक-यांना संपूर्ण कर्ज माफी मिळणे बाबत.

महोदय, आम्ही खालील सहया करणारे शेतकरी विनंती पूर्वक अर्ज सादर करतो की, केंद्र सरकारने जाहीर केलेली कर्ज माफी योजना ही ख-या अर्थाने कर्जबाजारी असलेल्या विदर्भातील शेंतक-यांवर अन्याय करणारी आहे. कारण विदर्भात सिंचनाचा अभाव असल्यामुळे व निसर्गाच्या अवकृपेमुळे गेल्या काही वर्षापासून नापीकी होत असून शेतक-यांच्या आत्महत्या होत आहेत तेव्हा विदर्भातील संपूर्ण शेतक-यांना संपूर्ण कर्जमाफी मिळणे अत्यावश्यक आहे. परंतु जाहीर झालेल्या कर्ज माफी मध्ये फक्त पाच एकराची अट टाकल्यामुळे विदर्भातील मूठभर शेतक-यांनाच या योजनेचा अल्प लाभ मिळणार असून पाच एकरावरील बहुसंख्येने असलेल्या शेतक-यांना या योजनेचा काहीही लाभ मिळणार नाही. हालाखीची परिस्थती असलेल्या शेतक-यांना या योजनेचा काहीही लाभ मिळणार नाही. त्यामुळे विदर्भातील शेतक-यांच्या आत्महत्या सत्राने संपूर्ण देश चिंतीत झाला असतांना कर्जमाफीचा लाभ मात्र विदर्भातील शेतक-यांना न मिळता समृध्द भागातील शेतक-यांनाच मिळाला आहे. तरी आपण कर्ज माफीच्या संदर्भात विदर्भातील भौगोलिक परिस्थितीचा व समस्यांचा वेगळा विचार करुन येणा-या राज्यशासनाच्या अर्थसंकल्पात विदर्भातील आत्महत्या ग्रस्त किमान 6 जिल्हयातील शेतक-यांचे सरसकट कोणतेही निकष न लावता संपूर्ण कर्ज माफी द्यावी ही विनंती.

सोबत : ग्रा.पं. ठराव व शेतक-यांच्या सहयांचे निवेदन जोडले आहे.

आपले विनित
समस्त शेतकरी बांधव,वरवंड
ता.जि. बुलडाणा (विदर्भ)"

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते ..

सभापती महोदय, या पेक्षा विदर्भातील कास्तकाराने आणखी कोणती भावना व्यक्त करावी? .मंत्रालयापासून ते दिल्लीपर्यंत त्यांनी हे निवेदन पाठविलेले आहे. दिनांक 10 मार्च 2008 पासून आपले अधिवेशन सुरु झाले असून 4.3.2008 रोजी त्यानी हे निवेदन सर्वाना पाठविले आहे. 6 जिल्हयाकरिता पॅकेज दिले गेले, 6 जिल्हयाकरिता पंतप्रधानांचे पॅकेज जाहीर
झाले, कर्ज माफी जाहीर करण्यात आली होती व संपूर्ण देशात गोंधळ निर्माण झाला होता त्या सहा जिल्हयाकरिता पूर्णपणे कर्ज माफी केली जाईल अशी अपेक्षा या सरकारकडून व्यक्त केली होती परंतु कर्ज माफी कोणी केली ? याबाबतीत वर्तमानपत्रातून बातम्या प्रसिध्द करण्यात आल्या, ठीक ठिकाणी मेळावे घेण्यात आले, सभेच्या ठिकाणी गर्दी जमा करुन कोण श्रेष्ठ आहे व कोण कनिष्ठ आहे हे दाखविण्याचा प्रयत्न झाला व आम्हीच कर्ज माफी केले याचे तुंबळ युध्द आम्हाला पहावयास मिळाले ही अत्यंत दुर्दैवाची गोष्ट आहे. विदर्भातील शेतक-यांनी मांडलेली भूमिका जेव्हा शासनापर्यत पोहोचविण्यात येते तेव्हा आपल्याकडून कोणतीही कार्यवाही केली जात नाही. ही गोष्ट बरोबर नाही. या शेतक-याने दिनांक 11 एप्रिल 2008 रोजी आत्महत्या केली आहे. अधिवेशन सुरु होऊन एक महिन्यानंतर आत्महत्या केली आहे. कर्ज माफी सबंधीची घोषणा करण्यात आल्यानंतर आणि खालच्या व वरच्या सभागृहात आपआपल्या नेत्यांचे गोडवे गायल्यानंतर उद्ध्वस्त मानसिकतेतून या शेतक-याने आत्महत्या केलेली आहे. एखादा शेतकरी जेव्हा जाळून घेत असेल तेव्हा तो किती उद्विग्न झाला असेल.? मी त्या शेतक-याच्या घरी गेलो होतो आणि घरातील इतर व्यक्तींची भेट घेतली होती. या शेतक-याकडे 15 एकर जमीन होती. त्याच्यावर 60 हजार रुपयांचे कर्ज होते. मुलांना शिक्षणासाठी घेतलेले काही कर्ज होते, त्याच्या एका मुलीने दोन वर्षापूर्वी आत्महत्या केली होती. ही आत्महत्या करीत असतांना तिने अशी चिठ्ठी लिहून ठेवली होती की, कर्जामध्ये बुडालेल्या घरामध्ये माझ्या लग्नामुळे आणखी प्रश्न निर्माण होणार आहे तेव्हा लग्नाच्या खर्चामुळे आणखी कर्ज वाढता कामा नये. दुसरी एक मुलगी बी.एड.च्या परीक्षेत एक मार्काने नापास झाली होती. एका मुलाचे शिक्षण सध्या चालू असून त्याकरिता दीड लाख रुपयांचे कर्ज काढलेले आहे. अशा स्थितीत हे सर्व कर्ज कसे फेडावयाचे या मानसिक विवंचनेत असलेल्या या शेतक-याने जाळून घेऊन आत्महत्या केलेली आहे. कर्ज माफी केली म्हणून



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते..........

शाबासकी घेत फिरणा-या सर्व नेत्यांना आणि त्यांच्या समर्थकांना या शेतक-यांनी चपराक दिलेली आहे तसेच स्वत:ला जाळून घेऊन तुमच्या प्रवृत्तीला आणि विचाराला त्याने मुठमाती देण्याचे काम केलेले आहे. मी स्वत: त्याच्या घरी जाऊन त्या कुटुंबाची स्थिती पाहून आलो आहे. तुम्ही देखील त्यांच्या कुटुंबियाकडे जाऊन आला असाल. मी देखील जाऊन आलो आणि त्या महिलेला साडी चोळी दिली , त्याच्या कुटुंबियाना थोडी आर्थिक मदत दिली श्री.उध्दवजी ठाकरे आणि माननीय शिवसेना प्रमुखांच्या वतीने सांत्वन केले . या पेक्षा आम्ही आणखी काय करु शकतो ?

सभापती महोदय, आजची चर्चा उपस्थित करण्यामागचा मूळ गाभा शेतक-यांच्या आत्महत्या हा आहे. केवळ या एकाच शेतक-याने आत्महत्या केलेली आहे असे नाही तर इतर अनेक शेतक-यांनी आत्महत्या केली असून आत्महत्याग्रस्त शेतक-यांचे मी सातत्याने मॉनिटरींग करीत असतो. परवाच्या दिवशी 289 चा प्रस्ताव घेण्यात यावा अशी विनंती मी जेव्हा करीत होतो तेव्हा मी असे म्हणालो की, कर्ज माफी जाहीर केल्यानंतर 213 आत्महत्या झाल्या आहेत. दुर्देवाने आता माझ्याकडे जी यादी आलेली आहे त्यानुसार 229 शेतक-यांनी आत्महत्या केलेल्या आहेत.

सभापती महोदय, 229 वी आत्महत्या या यादीत नोंदविण्यात आली असून अमरावती मधील श्री.विलास प्रभाकर डहाळे नावाच्या शेतक-याने आत्महत्या केलेली आहे. कर्ज माफी जाहीर झाल्यानंतर विदर्भातील सहा जिल्हयात 229 शेतक-यांच्या आत्महत्या झाल्या आहेत तेव्हा या कर्ज माफीचे श्रेय कोणाला घ्यावयाचे आहे ? माझ्या नेत्याने कर्ज माफी केली अशा प्रकारचे ढोल कोणाला बडवावयाचे आहेत ? कोणाला स्वागत आणि कृतज्ञता मेळावे भरवावयाचे आहेत ? या संदर्भात आपण सर्वांनी आत्मचिंतन करावयास पाहिजे असे मी सांगितले आहे.अधिवेशन संपल्यानंतर मी तर प्रत्येक कुटुंबियांना भेटण्यासाठी जाणार आहे. परतु कर्ज माफी जाहीर झाल्यानंतरसुध्दा लोक आत्महत्या का करीत आहेत ? या आत्महत्या का थांबत नाही ? याचे असे उत्तर आहे की, विदर्भ आणि मराठवाडयातील शेतक-यांची आशा नाहीशी झालेली आहे.पाच एकरच्या आतील शेतक-यांना कर्ज माफी केल्यानंतर माननीय मुख्यमंत्री असे म्हणाले की,

नंतर श्री.सुंबरे

अध्यक्षीय प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

KBS/ SBT/ KTG/ श्री. गायकवाड नंतर --- 15:00

श्री. रावते ....

आम्हाला कल्पना आहे, या निर्णयामुळे काही ठिकाणी लोकांवर अन्याय झाला असता ....

**तालिका सभापती** (श्री.जगदीश गुप्ता) : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, आपण वेळेची मर्यादा लक्षात घ्यावी. आपल्याला अर्धा तास ...

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, ही चर्चेची वेळ आम्हीच ठरविली आहे आणि आम्ही आमचा वेळ बरोबर वाटून घेऊ. प्रसंगी आमचे सगळे सदस्य या विषयावर बोलणार नाहीत. परंतु काही गोष्टी येथे मांडणे आम्हाला अत्यावश्यक वाटत असल्याने मला त्या गोष्टी येथे मांडणे भाग आहे. अत्यंत गंभीर घटना आहेत. या संपूर्ण दीड महिन्यांच्या अधिवेशनामध्ये या विषयावर विरोधी पक्षाकडून प्रस्ताव मांडण्यास वेळ लागला, सारखे हा विषय पुढे पुढे घेऊ म्हणून सांगितले गेले. पण सुदैवाने माननीय श्री.शरद पवार यांनी आम्हाला संधी दिली आणि त्याबद्दल त्यांना जरूर आम्ही धन्यवाद देतो. त्यांच्यामुळेच आम्हाला आज या विषयावर चर्चा करण्यास संधी मिळाली आहे. सभापती महोदय, मला बोलावयास दिलेल्या वेळेतील एकही मिनिट मी इकडचे तिकडचे बोलण्यात घालविलेले नाही आणि घालविणारदेखील नाही. शेतकऱ्यांना कर्जमाफी दिल्यानंतर देखील 230 आत्महत्या झालेल्या आहेत. या कर्जमाफीच्या संदर्भात माननीय मुख्यमंत्री असे म्हणले की, याबाबत विचार झाला पाहिजे, यामध्ये काही लोकांवर अन्याय झाला आहे याची आम्हाला जाणीव आहे. सभापती महोदय, आमच्या मायबाप सरकारला असे वाटले त्यामुळे शेतकऱ्यालादेखील सरकारचा आधार वाटला. पण हे अधिवेशन संपायला आले मात्र यासंबंधातील धोरण सरकारकडून काही जाहीर होईना. मग शेतकऱ्यांनी कोणाकडे पहायचे ? केंद्रीय मंत्री श्री.शरद पवार यांनी सांगितले की, सावकाराचा एकही पैसा देऊ नका. पण पुढे काहीही नाही. शेवटी मी परवा कंटाळून विशेष उल्लेख आणला आणि कोपरापासून ढोपरापर्यंत सोलण्याची भाषा बोलणाऱ्या आमच्या उपमुख्यमंत्र्यांनी सांगितले की, आम्ही याबाबतचा कायदा आणतो आहोत. पण तो कायदा केव्हा आणला जाणार आहे ? या संबंधात कायदा आणण्याची भाषा केल्यानंतरचे हे सहावे अधिवेशन आहे. मग या मधल्या काळात आपण का हा कायदा आणला नाहीत ? कायदा येत नाही हे पाहिल्यानंतर आम्ही विनंती केली की, कायदा येईल तेव्हा येईल. पण हे अधिवेशन संपल्यानंतर सरकारने याबाबत अध्यादेश तरी काढावा आणि त्याची अमलबजावणी सुरू करावी. म्हणजे मग पुढील अधिवेशनामध्ये आम्ही त्या कायद्यावर बोलू शकू. तुमच्या 7व्या अनुसूचीमध्ये 56 वे कलम हे

..... 3एफ 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रावते .....

खाजगी सावकारांच्या विरोधात आहे. पण तरीही रोज बोलले जायचे की, आम्ही कोपरापासून ढोपरापर्यंत सोलून काढू. खरे तर ही विरोधी पक्षांनी वापरायची भाषा आहे, ती भाषा सत्ताधाऱ्यांनी विशेष करून मंत्र्यांनी करायची नसते. सत्ताधाऱ्यांनी कार्यवाही करायची असते, अमलबजावणी करायची असते. सभापती महोदय, संपूर्ण ग्रामीण भागामध्ये काय आहे ते आपल्याला माहिती आहे, कारण आपण ग्रामीण भागामध्ये काम करता. हे सरकार शेतकऱ्यांचे मारेकरी ठरले आहे. एकीकडे केंद्रीय मंत्री सांगतात की, सावकाराचे पैसे देऊ नका त्यामुळे सावकारांनी देखील आपले हात आखडते घेतले. परिणामी शेतकऱ्याला सहजगत्या पैसा मिळेनासा झाला. साऱ्या जिल्हा बँका तुमच्याच ताब्यात, पण त्या बँकादेखील शेतकऱ्यांना कर्ज देत नाहीत. तुमच्या इतर संस्थांकडूनही मिळत नाही. कारण अजूनही तुमच्या ग्रामीण बँकांपासून सर्वच संस्था म्हणतात की, आम्हाला अशी कर्जमाफी झाल्याचे माहितीच नाही. कर्जमाफी म्हणजे नेमके काय आहे ? आपणही त्यांना सांगितले नाही. तुम्ही जोपर्यंत आदेश काढत नाही तोपर्यंत कोठलीही सिस्टीम ऐकणार नाही आणि मग या शेतकऱ्याचा कोणीही वाली नाही. त्याचे कर्ज अकौंटवर दिसते. कर्जमाफीची घोषणा झाल्यामुळे येथपर्यंत कर्ज फेडले आहे तर पुढील आदेश येईपर्यंत पहिले कर्ज फेडले म्हणून पुढील कर्ज दिले पाहिजे ते कोणी देतच नाही. कारण तुमचे आदेश त्यांच्यापर्यंत पोहोचलेच नाहीत. नामदार शरद पवारांनी घोषणा केल्यामुळे सावकारांनी हात आखडता घेतला. त्याचवेळी महागाईने साऱ्या देशात संपूर्ण मर्दन केले आहे. सकाळीच एका लक्षवेधी सूचनेवरील चर्चेत आमचे मित्र श्री.जेथलिया यांना सांगितले की, आमच्या लोकांनी साठेबाजांवर धाडी घातल्या. आता काळाबाजार हा आजच आलेला आहे काय ? साठेबाजी ही आजच होते आहे का ? महागाई आटोक्यात आणण्यासाठी एवढ्या धाडी टाकल्या असे सांगितले जाते. परिणामी अशी खरेदी बंद झाली. लग्नाचा मोसम असल्याने अशावेळी पैशाची गरज लागते तेव्हा व्यापाऱ्यांनी, सावकारांनी हात आखडता घेतला आहे. त्यामुळे आपल्याकडे जे काही आहे ते मिळेल त्या भावाने लोक विकू लागले आहेत. ....

( यानंतर सौ. रणदिवे .... 3जी 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते . . . .

तुमच्या धोरणामुळे त्याची भिकाऱ्यासारखी अवस्था झालेली आहे. सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे म्हणाल्या की, कलेक्टर यांनी 450 लोकांचे लायसन्स तपासले. पण कुठेही हेराफेरी सापडली नाही. पण वातावरण निर्माण झाले. व्यापाऱ्यांचे म्हणणे आहे की, आम्हाला काय करावयाचे आहे ? कारण व्यापारी उपाशी मरणार नाहीत आणि त्यांच्या पुढच्या चार पिढयाही उपाशी मरणार नाहीत, एवढे त्यांनी कमावलेले आहे. पण तुमच्या धोरणामुळे शेतकरी मात्र मातीमोल झाला आहे. तुम्ही महागाई आटोक्यात आणण्यासाठी नाटके सुरु केलेली आहेत. मी याला नाटकच म्हणतो, कारण तुम्हाला एवढे वर्षे समजले नाही काय ? याचे परिणाम फार गंभीर झालेले आहेत. मी मध्यंतरी बुलढाणा येथील देऊळगाव राजा येथे गेलो होतो. त्यावेळी रेस्ट हाऊसच्या समोर बाजार भरलेला होता. तेव्हा शेतकऱ्यांनी मला घेराव घातला. मी त्यांना सांगितले की, मी सरकार नाही. तेव्हा ते म्हणाले की, नाही, साहेब, आम्हाला तुम्हाला सांगावे लागेल.शेतकऱ्यांची काय परिस्थिती झाली आहे हे आपण लक्षात घ्यावे. एकीकडे माननीय कृषी मंत्री श्री.शरद पवार हे सावकारांच्या बाबतीत शेतकऱ्यांचे मारेकरी ठरले आहेत. दुसरीकडे आम्ही महागाई आटोक्यात आणत आहोत असा जो नाटकीपणा केला जात आहे, त्यामध्ये शेतकऱ्यांच्या मालाची कवडीमोल किंमत झाली. आज त्याला कोणतेही कर्ज उपलब्ध होत नाही. कारण याबाबतीत शासनालाच अजून काही माहिती नसल्याने आदेश देण्यात आलेले नाहीत. अशा या गर्तेमध्ये सापडलेला शेतकरी उद्ध्वस्त आयुष्य जगत आहे. मघाशी मी एका आत्महत्येबाबत उल्लेख केला. बुलढाणा येथील श्री.बबनराव उत्तमराव जेऊधाले याची आत्महत्या ही शासनाच्या धोरणाबाबत फार बोलकी आहे. मघाशी मी माननीय श्री.उद्धवजी ठाकरे यांचा उल्लेख जाणीवपूर्वक केला आहे. त्यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधला.आम्ही संपूर्ण कर्जमुक्ती केल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही. त्यासाठी आम्ही आंदोलन देखील करु असा त्यांनी शेतकऱ्यांना धीर दिला. याठिकाणी त्यांच्या बाबतीत उल्लेख करण्यात आला. पण याकडे वेगळया दृष्टीकोनातून पाहू नका. उलट त्यांची जी भावना आहे, ती तुम्ही सन्मानित करावयास हवी होती. पण तसे न करता, तुम्ही ढोल पिटत फिरलात. मग काल काय झाले ? एकाएकी अशी बातमी आली की, नव्याने कर्जमाफी नाही. आणखी कर्जमाफी मिळणार नाही. या बातमीमुळेच संपूर्ण महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या मनामध्ये अंगार पेटलेला आहे. आता आपले काय होणार आहे ? असा त्यांच्या मनामध्ये प्रश्न निर्माण झालेला आहे. मी कर्जमाफी झाल्यानंतर आत्महत्याग्रस्त झालेल्या ...

. . . .3 जी-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते . . . .

शेतकऱ्यांच्या गावामध्ये गेलो. आम्ही तीन आमदार तेथे होतो. त्यावेळी आमच्यासमोर तेथील सर्व ग्रामपंचायत गोळा झाली होती. त्यांनी एवढेच सांगितले की, या कर्जमाफीमुळे आमच्या गावातील फक्त 7 कुटुंबांना लाभ मिळणार आहे. बाकी कोणालाही मिळणार नाही. सभापती महोदय, कर्जमाफीच्या बाबतीत नक्की काय परिस्थिती निर्माण झालेली आहे. माननीय सहकार मंत्री डॉ.पतंगराव कदम येथे उपस्थित आहेत. पश्चिम विदर्भामध्ये एकूण कोरडवाहू शेतकरी 16 लाख 60 हजार आहेत. माननीय मुख्यमंत्र्यांनी कोरडवाहू शेतकऱ्यांच्या बाबतीत विषय उपस्थित केलेला होता की, 15 एकर, 20 एकरापर्यंतच्या कोरडवाहू शेतकऱ्यांना लाभ मिळाला पाहिजे असे त्यांचे स्पष्ट संकेत होते. आम्हाला माननीय मंत्री महोदयांकडून याबाबतीतील भूमिका स्पष्ट व्हावयास हवी आहे. तुमच्याकडून गोलमाल उत्तर नको आहे. आज जे शेतकरी आत्महत्या करीत आहेत, त्यांना तू आत्महत्या करु नको असे सांगत असताना मायबाप सरकार काय करणार आहे ? हे समजले पाहिजेत. आज ग्रामीण भागामध्ये अंगार पेटलेला असून, तुम्ही सर्व शेतकऱ्यांना त्यामध्ये घेरलेले आहे. त्यामुळे कर्जमाफीच्या घोषणेमुळे जल्लोष होण्याऐवजी शेतकऱ्यांना आता सरणावर चढण्याची वेळ आली आहे. कोरडवाहू शेतकऱ्यांची संख्या 12 लाख 64 हजार आहे आणि 16 लाख 92 हजार शेतकरी हे बँकेचे थकबाकीदार आहेत. तसेच आजही 10 लाख 62 हजार शेतकऱ्यांकडे थकबाकी आहे. अशा प्रकारे थकीतदार असलेल्या शेतकऱ्यांची संख्या 2 लाख 22 हजार इतकी आहे. कर्जमुक्तीची घोषणा केल्यानंतर दोन हेक्टरच्या आत शेती असलेले शेतकरी 31 मार्च 2007 रोजी थकीतदार असलेल्या शेतकऱ्यांची संख्या फक्त 1 लाख 18 हजार आहे. विदर्भातील कर्जमुक्ती साठी सध्या उपलब्ध असलेल्या 60 हजार कोटीच्या बाबतीत सतत अशा प्रकारे सांगितले जात आहे की, जणुकाही 60 हजार कोटी रुपये महाराष्ट्रालाच मिळालेले आहेत. यासंदर्भातील सन्माननीय सदस्यांची भाषणे ऐकत असताना मला हसूही येत होते आणि रडू देखील येत होते. खरे म्हणजे संपूर्ण देशासाठी 60 हजार कोटी इतकी रक्कम आहे, त्यामध्ये आपल्या राज्यासाठी थेंबभर वाटा होता. पण येथे 60 हजार कोटी रुपयांचे कौतुक अशा प्रकारे चालू होते की, जणुकाही ही सगळी रक्कम महाराष्ट्रालाच मिळालेली आहे. विदर्भातील ज्या शेतकऱ्याच्या बलिदानातून संपूर्ण देशासाठी कर्जमुक्ती मिळालेली आहे, त्या विदर्भाच्या वाटयाला फक्त 1120 कोटी रुपये येणार आहेत. पश्चिम महाराष्ट्रातील पुणे, नाशिक आणि महसूल विभागामध्ये कर्ज....

. . . .3 जी-3



APR/ SBT/ KTG/ 15:15

मुक्तीचा लाभ एकंदर 8 लाख 64 हजार शेतकऱ्यांना मिळणार आहे. त्यावेळी अशी चर्चा झाली होती की, तिकडे पाच एकरातील शेतकऱ्यांची संख्या कमी का आहे ? इकडे ही संख्या जास्त का आहे ? या सगळया तीन महसूलामधून पश्चिम महाराष्ट्रासाठी किती रक्कम मिळणार आहे ? तर 7680 कोटी रुपये मिळणार आहेत. म्हणून कर्जमुक्तीच्या घोषणेनंतर आत्महत्येचे सत्र सतत सुरु आहे. याठिकाणी माझ्यावर 229 व्या आत्महत्येबाबत मुद्दा उपस्थित करण्याची वेळ यावी ही गोष्ट मनाला वेदना देणारी आहे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते..

मी मांडलेली परिस्थिती चालू असतानाही आदरणीय केंद्रीय कृषी मंत्री श्री शरद पवार यांनी सावकारांच्या बाबतीत केलेल्या घोषणामुळे ते आज शेतकऱ्यांसाठी मारेकरी ठरत आहेत. भाववाढ रोखण्याकरिता व्यापा-यांवर धाडी घातल्या जात आहेत या धाडीच्या सत्रामुळे व्यापारी शेतकऱ्याकडील धान्य विकत घेत नाहीत शेतकऱ्याना पैशाची गरज आहे परंतु त्याच्याकडील धान्य व्यापारी विकत घेत नसल्यामुळे शेतक-यांना पूर्णपणे उद्ध्वस्त केले गेलेले आहे. माननीय कृषी मंत्री श्री. शरद पवार यांनी लोकसभेमध्ये घोषणा दिली होती. त्याचे पडसाद उमटले होते. काय होते, काय होते, येथेही सांगण्यात आले होते की, " ते असे म्हणाले होत ", परंतु ते तसे म्हणाले नाहीत. Starred Question Number 383 to be answered on the 21st April, 2008 श्री.सत्यनारायण जतिया व श्री.एस के. खनवंतनाथ यांनी हा प्रश्न waiving of the loans of farmers यासंदर्भात विचारला होता. प्रश्न असा होता की, “Will the Minister of Agriculture be pleased to state- (a) the details of the number of farmers likely to be benefited under the scheme for waiving of the loans of farmers category-wise and state-wise; (b) Whether the Government proposes to increase the existing limit of two hectares to cover more farmers within the purview of the scheme;” हा महत्वाचा प्रश्न आहे.

“(c) If so, the details thereof and action taken thereon; (d) Whether along with the loan waiver scheme, the Government proposes to provide quality seeds, pesticides, fertilizers and other inputs free of cost to small and marginal farmers; and (e) if so, details thereof.” सभापती महोदय, आज मला हे सांगायला आनंद होत आहे की, लोकसभेमध्ये सन्माननीय सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नाला इतके सविस्तर उत्तर दिले जाते. आम्ही विचारलेल्या प्रश्नांना केवळ "नाही", "प्रश्न उद्भवत नाही " असेच उत्तर दिले जाते. हे उत्तर वाचायला मला 20 मिनिटे लागतील. एवढे सविस्तर उत्तर त्यांनी दिलेले आहे. आता येथे सन्माननीय सदस्य श्री. फुंडकर आहेत, दादा आहेत. हा प्रश्न महत्वाचा आहे. प्रश्नाच्या उप प्रश्नालाही उत्तर दिले आहे. त्या उत्तरामध्ये अमूक दिले, तमूक दिले, कोणाला

2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते..

दिले, किती टक्के व्याज दराने दिले, 5 हेक्टर जमीन असणाऱ्यांना किती कर्ज दिले हे सर्व मी आता येथे वाचत नाही. हे सगळे गोल गोल आहे. "Whether the Government proposes to increase the existing limit of two hectares to cover more farmers within the purview of the scheme;" यास आदरणीय श्री. शरद पवार साहेबांनी एका वाक्यात उत्तर दिले आहे. ते उत्तर असे आहे की, " इसके बारेमे क्रेडीट सिस्टीम की क्या स्थिती है वो सब हम देखेंगे, आज काय परिस्थिती आहे,आज कोई नयी जिम्मेदारी लेने की स्थिति सरकार में नहीं है." असे हिंदीत स्पष्ट शब्दात उत्तर दिले आहे. आपल्याला दाखविण्यासाठी मी दादांकडून मार्कींग करुन घेतले. उगाच गडबड नको. तुमचा क्रेडीट सोसायटीचा विषय मी तुम्हाला दाखवला होता पण तुम्ही वाचण्याचे श्रम घेतले नाही. मी गंमत बघत होतो. आपला प्रश्न जरी सुटला असला तरी देखील माझ्या शेतकऱ्यांचा प्रश्न अजूनही सुटलेला नाही. बाकीच्यांना कर्ज देणार काय ? या प्रश्नाला नामदार केंद्रीय कृषी मंत्री यांनी स्पष्ट शब्दात सांगितले आहे की, "आज कोई नयी जिम्मेदारी लेने की स्थिति में सरकार नहीं है." या वरुन वर्तमानपत्रात असे छापून आले की, आता नव्याने कोणतीही कर्ज माफी होणार नाही. हा प्रश्न आम्ही गांभीर्याने आणलेला आहे, केवळ टीका करण्यासाठी आणलेला नाही. माननीय केंद्रीय कृषी मंत्री श्री. शरद पवार आमच्या शेतकऱ्यांचे मारेकरी ठरले . तेच कृषी मंत्री "मी केले, मी केले" असे म्हणतात. माननीय महसूल मंत्री श्री. नारायण राणे असे म्हणाले होते की, " खासदाराच्या माणसाला लोन देता येते काय ?" त्यावेळी कोणीही उठले नाही. परंतु आम्ही नुसते नाव घेतले तरी सन्माननीय सदस्य उठतील आणि ते आल्यावर बोला असे बोलतील. आम्ही त्यांना सांगणार आहोत की, त्यांनी हे सर्व आपल्यासमोर बोलावे.

यानंतर श्री. बरवड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

सभापती महोदय, हा विषय आता फार गंभीर झालेला आहे. पाच एकरावरील शेतकऱ्यांना कर्जमाफी मिळणार नाही. हा प्रश्न मांडत असताना मी एवढेच सांगतो की, माननीय गृहमंत्री श्री. आर. आर. पाटील अकोला येथे आले होते. त्यानंतर ते अनेक ठिकाणी गेले. माननीय श्री. शरद पवार बीड येथे आले होते. त्यावेळी माननीय उपमुख्यमंत्री श्री. आर. आर. पाटील यांनी जे एक वाक्य उच्चारले होते. ते वाक्य माननीय मुख्यमंत्र्यांचे नव्हते. माननीय उपमुख्यमंत्री श्री. आर. आर. पाटील यांचे वाक्य असे होते की, सरकारची तिजोरी तुमच्या शेतकऱ्यांसाठी रिकामी केल्याशिवाय आम्ही स्वस्थ बसणार नाही. आम्ही शेतकऱ्यांना मरु देणार नाही. तिजोरी भरली आहे की, नाही हे त्यांनी सांगितले नाही परंतु तिजोरी रिकामी करु असे त्यांनी सांगितले. आता शेतकरी हतबल झालेला आहे. शेतकरी हवालदिल झालेला आहे. जगायचे कसे हा प्रश्न त्यांच्यासमोर निर्माण झालेला आहे. 5 एकरच्या पुढे कर्जमाफी मिळण्याची शक्यता मावळलेली आहे. सावकार कर्ज देत नाहीत. आपल्या धाडसत्रामुळे व्यापारी त्यांचे धान्य घेत नाहीत. अशा उद्ध्वस्त शेतकऱ्याला सांभाळण्याकरिता जबाबदारी घेत असताना नागपूरच्या अधिवेशनामध्ये माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले होते की, कर्जमाफीचे जे काही होईल त्यानंतरची जबाबदारी राज्य सरकारची असेल आणि ती जबाबदारी घेतल्याशिवाय आम्ही स्वस्थ बसणार नाही. आज या उद्ध्वस्त शेतकऱ्यांकरिता काय करणार ते सांगावे. अन्यथा शेतकऱ्यांना बरोबर घेऊन आपल्याला जेरीस आणल्याशिवाय आम्ही स्वस्थ बसणार नाही. हा इशारा या निमित्ताने देतो. माननीय श्री. उद्धवजी ठाकरे यांनी जाहीर केल्याप्रमाणे 7/12 कोरा ही माननीय शिवसेनाप्रमुखांची घोषणा अंमलात आणण्याकरिता सरकारला भाग पाडल्याशिवाय आम्ही स्वस्थ बसणार नाही. त्यांच्या नेतृत्वात आंदोलन पेटल्याशिवाय राहणार नाही असे ऐलान करतो आणि माझे भाषण संपवितो.

प्रस्ताव प्रस्तुत झाला

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ KTG/ MMP/ SBT

श्री. भास्कर जाधव ( रायगड तथा रत्नागिरी तथा सिंधुदुर्ग स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदय, मी माझे भाषण सुरु करण्यापूर्वी एक गोष्ट आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, या सभागृहाचे ज्येष्ठ नेते आदरणीय श्री. दिवाकरजी रावते साहेब यांनी 34 मिनिटे भाषण केलेले आहे याची आपल्याकडे नोंद राहावी म्हणून मी हे लक्षात आणून देत आहे.

**तालिका सभापती (श्री. जगदीश गुप्ता)** : या ठिकाणी बसून मी त्याची नोंद घेतलेली आहे.

श्री. दिवाकर रावते : सभागृहाचे कामकाज बंद पाडून नियम 289 चा प्रस्ताव मूव्ह करणार होतो परंतु आपण सर्वांनी चर्चा घेण्याचे ठरविले त्यामुळे तो प्रस्ताव मूव्ह केला नाही.

श्री. भास्कर जाधव : त्याबद्दल मला काही म्हणावयाचे नाही. आपण अर्धा-अर्धा वेळ वाटून घेतलेला आहे. त्यापैकी 34 मिनिटे आपण घेतलेली आहेत एवढी नोंद करतो.

श्री. पांडुरंग फुंडकर : आपण वेळ वाढवून घेऊ.

श्री. भास्कर जाधव : आमची तेवढीच विनंती आहे. सभापती महोदय, केंद्र शासनाने जवळजवळ 4 कोटी शेतकऱ्यांकरिता 60 हजार कोटी रुपयांच्या कर्जमाफीचा निर्णय केला आणि त्या कर्जमाफीची जी कमाल मर्यादा जाहीर केली आहे त्याप्रमाणे पाच एकर पर्यंतच्या ज्या शेतकऱ्यांनी कर्ज घेतलेले आहे त्यांची कर्जमाफी होईल अशी प्राथमिक स्वरुपाची घोषणा केंद्र सरकारने केलेली आहे आणि या घोषणेमुळे महाराष्ट्रामध्ये शेतकऱ्यावर फार मोठे संकट कोसळले आहे, शेतकरी फार मोठ्या अडचणीमध्ये आलेले आहेत आणि शेतकऱ्यांना खऱ्या अर्थाने मदत होईल की नाही अशा प्रकारची भीती निर्माण झाली आहे म्हणून हा ठराव या सभागृहामध्ये आलेला आहे. त्याचा जो आधार घेतला गेला त्यामध्ये या देशाचे केंद्रीय कृषी मंत्री आणि आमचे नेते आदरणीय श्री. शरद पवार साहेब यांनी चार दिवसांपूर्वी पार्लमेंटमध्ये एका प्रश्नाला उत्तर देत असताना जे उत्तर दिले त्याचा आधार घेऊन या सभागृहामध्ये ही चर्चा उपस्थित करण्यात आलेली आहे. ही चर्चा उपस्थित करीत असताना या सभागृहाचे ज्येष्ठ नेते श्री. दिवाकरजी रावते यांनी श्री. शरद पवार साहेब हेच शेतकऱ्यांचे मारेकरी आहेत आणि या सगळ्या आत्महत्यांना श्री. शरद पवार जबाबदार आहेत असा शब्दप्रयोग केलेला आहे. ज्यावेळेला ही कर्जमाफी व्हावी याकरिता महाराष्ट्रामध्ये सगळ्या बाजूने मागणी व्हावयास लागली त्यावेळी श्री. पवार साहेब सूचकपणे म्हणाले होते की, हे काम फार अवघड आहे.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव...

त्यांचे संपूर्ण राजकीय जीवन पाहिले तर ते नेहमी सूचक बोलतात. मी येथे नाही पण खालच्या सभागृहाचा सदस्य असताना विरोधी पक्षामध्ये होतो. त्यावेळी आपल्याकडून आमच्यावर नेहमी आरोप केला जात असे की, श्री.शरद पवार हे ज्या अर्थी होय म्हणतात त्याचा अर्थ नाही असा घ्यावयाचा असतो आणि नाही म्हणतात तेव्हा होय असा अर्थ घ्यावयाचा असतो. परंतु सत्ताधारी पक्ष हा आरोप विसरला आहे आणि विरोधी पक्षाने मात्र डोक्यामध्ये ठेवले आहे की, माननीय श्री.शरद पवार नाही म्हणतात याचा अर्थ होय असा आहे. आता महाराष्ट्र शासन कर्ज माफ करणार आहे असे समजल्यावर काही जण संपूर्ण छोटे मोठे दौरे करु लागले. ज्यावेळी प्रत्यक्षात कर्ज माफ झाली त्यावेळी आमच्यावर आरोप करण्यात आला की, आम्ही कर्जमाफीचा आनंद कशाप्रकारे व्यक्त केला, कशाप्रकारे सभा घेतल्या आहेत. परंतु सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनाही कबूल करावे लागेल की, ज्या पध्दतीने आम्ही आनंद व्यक्त केला त्याच पध्दतीने तुमच्या पक्षाच्यावतीने अतिशय पोरकटपणे केविलवाणे साखर, पेढे वाटण्याचा प्रयत्न केला. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते त्यांनी त्यांच्या भाषणाची सुरुवात करीत असताना त्यांच्या पक्षाचे कार्याध्यक्ष सन्माननीय श्री.उद्ध्व ठाकरे यांचे नाव घेऊन केली आणि भाषणाचा समारोपही त्यांचे नाव घेऊनच केला. संपूर्ण कर्ज माफीच्या मागणीबरोबर शेतक-यांचा 7/12 कोरा करण्याची मागणी केली.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, शेतक-यांचा 7/12 कोरा झाला पाहिजे अशी आमच्या पक्षाची पहिल्यापासून मागणी आहे. सन्माननीय सदस्यांना माहीत नसेल तर आपण माहीत करुन घ्यावे.

श्री.भास्कर जाधव : सन्माननीय सदस्या श्रीमती गो-हे यांना सांगू इच्छितो की, आपण आता उभे राहून जे बोललात त्याची बातमी ज्यांना जायला पाहिजे ती एव्हाना गेली असेल. सभापती महोदय, आता विरोधी पक्षाच्यावतीने शेतक-यांचे कर्ज माफ झाले असले तरी त्यांचा 7/12 कोरा करावा अशी मागणी केली जात आहे. विरोधी पक्षाने आता नवीन घोषवाक्य सुरु केले आहे. "शेतक-यांचा 7/12 कोरा केल्याशिवाय राहणार नाही." शेतक-यांचे कर्ज माफ व्हावे म्हणून यांनी महाराष्ट्रात आसूड आंदोलन सुरु केले आणि कर्ज माफ झाल्यानंतर ही कर्जमाफी आमच्यामुळे

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KTG/ SBT/

श्री.भास्कर जाधव.....

झाली असे सांगू लागले. तुम्हाला आसूडच उगारावयाचा आहे तर मग तुमची शक्ती, तुमची निर्णय क्षमता 7/12 कोरा करण्यासाठी वापरावी. आज संपूर्ण महाराष्ट्रामध्ये तुम्ही दौरे करीत आहात. हेलिकॉप्टरमधून, विमानाने दौरे केले जात आहेत. याच्यावर खर्च करण्यापेक्षा आत्महत्या करणा-या शेतक-यांच्या कुटुंबियांना 25 हजार रुपये खर्च केले असते, 20 हजार रुपये खर्च केले असते तर ते सार्थकी लागले असते. तुम्हाला शेतक-याबद्दल कळवळा आहे, कणव आहे, शेतक-यांचा 7/12 कोरा करावयाचा असेल तर, शेतक-यांचे कर्ज माफ करावयाचे असेल तर तुमच्या पक्षाकडून प्रयत्न का करीत नाही ? महाराष्ट्रातील विशेषत: विदर्भातील 6 जिल्हयांमध्ये, मराठवाडयातील जिल्हयामध्ये ज्या ज्या जिल्हयातील शेतक-यांनी 25 हजार कर्ज घेतले असेल त्या कर्जाची परतफेड तुमच्या पक्षाच्यावतीने करावी. अशाप्रकारचे औदार्य तुमचा पक्ष का दाखवित नाही ?

ॲड.अनिल परब : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.भास्कर जाधव यांच्या माहितीसाठी सांगू इच्छितो की, आमच्या पक्षाच्यावतीने आमच्या पदाधिका-यांनी आत्महत्या केलेल्या शेतक-यांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत केलेली आहे. त्याचप्रमाणे आमच्या पक्षाचे कार्याध्यक्ष सुध्दा आत्महत्या केलेल्या शेतक-यांच्या कुटुंबियांना मदत देण्यासाठी गेले आहेत. तुमच्या पक्षाने आत्महत्या केलेल्या शेतक-यांच्या कुटुंबियांना किती मदत केली त्याची यादी जाहीर करावी.

श्री.पांडुरंग फुंडकर : सन्माननीय सदस्य श्री.भास्कर जाधव यांनी या प्रस्तावावर राजकीय भाषण करु नये.

श्री.भास्कर जाधव : सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी राजकीय भाषणच केले होते.

नंतर श्री.शिगम

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ पूर्वी श्री. खंदारे 15:35

(श्री. भास्कर जाधव....)

शेतक-यांच्या कर्जमाफीसाठी केन्द्रीय कृषी मंत्र्यांनी 60 हजार कोटी रुपये मंजूर केले त्याबद्दल त्यांचे अभिनंदन करायला विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य तयार होत नाहीत...

**तालिका सभापती** : कोणत्या पक्षाची काय भूमिका असावी हे पक्षप्रमुख ठरवित असतो. याठिकाणी शासनाच्या धोरणावर चर्चा सुरु आहे. सन्माननीय सदस्यांनी त्यावर बोलावे अशी माझी त्यांना विनंती आहे.

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, 60 हजार कोटी रु.चे कर्ज माफ केलेले आहे. या 60 हजार कोटीवर किती शून्य आहेत हे सुध्दा त्यांना शोधावे लागतील. केन्द्रीय कृषी अर्थमंत्र्यांनी 60 हजार कोटी रुपये ज्या शेतक-यांना कर्जमाफीसाठी दिले ती 60 हजार कोटी रु. रक्कम इतकी लहान आहे काय ? इतकी छोटी आहे काय ?

श्री. मधुकर सरपोतदार : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, या सदनामध्ये बसणरे सर्व लोकप्रतिनिधी आहेत. त्यांना 60 हजारावर किती शून्य द्यावेत हे कळत नाही असे म्हणणे उचित नाही. अशा त-हेने सन्माननीय सदस्यांनी वाक्यप्रयोग करु नये. सर्व लोकप्रतिनिधी जागरुक आहेत, काम करणारे आहेत, एवढेच मला सन्माननीय सदस्यांना सांगावयाचे आहे.

श्री. भास्कर जाधव : 60 हजारावर किती शून्य द्यावेत हे कळत नाही असे मी म्हणालो नाही, माझ्या तोंडून तसे शब्द निघाले नाही आणि त्या भावनेप्रती मी बोललो नाही हे मी नम्रपणे सांगू इच्छितो.

सभापती महोदय, ज्यावेळी हे 60 हजार कोटीचे कर्ज माफ झाले त्यावेळी आदरणीय केन्द्रीय कृषी मंत्री श्री. शरद पवार म्हणाले होते की, अशा प्रकारचा निर्णय घेण्याची ही शेवटची वेळ असेल आणि यानंतरच्या काळात अशा प्रकारचा धाडसी निर्णय घेणे अवघड आहे. या ठिकाणी विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य असे म्हणतात की, 5 एकरावरील शेतक-याच्या कर्ज माफीचे काय ? 5 एकरापर्यन्तच्या शेतक-यांना जेव्हा कर्जमाफी जाहीर झाली त्यावेळी श्री. शरद पवारसाहेब म्हणाले होते की, 5 एकरापर्यन्त जमीन असलेल्या शेतक-यांच्या कर्जमाफीचे धोरण जाहीर झालेले असले तरी त्याचा मसुदा तयार करण्याचे काम चाललेले आहे. तो तयार

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. भास्कर जाधव...)

झाल्यानंतर निश्चित धोरण आणि आकडे काय आहेत हे कळेल आणि त्यानंतर जे 5 एकरावरचे शेतकरी आहेत त्यांचे, वन टाईम सेटलमेंटच्या माध्यमातून स्कीम तयार करुन, किती कर्ज माफ करता येईल यासंबंधीचा विचार करता येईल. ते असेही म्हणाले की, मत्स्य दुष्काळाच्या बाबतीतही विचार करता येईल, ते असेही म्हणाले की, पतपेढी आणि अर्बन बँकांनी देखील जी कर्जमाफीची मागणी केलेली आहे त्यासंदर्भात देखील विचार करता येईल, त्या संदर्भात देखील केन्द्र सरकार विचार करीत आहे. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी संसदेत झालेल्या प्रश्नोत्तराचा संदर्भ येथे दिला. ते असे म्हणाले की, केन्द्रीय कृषी मंत्री श्री.शरद पवार यांनी कर्जमाफीच्या संदर्भातील एका प्रश्नाला "आज नई जिम्मेदारी लेने की सरकार की स्थिति नही है." असे उत्तर दिलेले आहे. सभापती महोदय, केन्द्रीय कृषी मंत्री श्री. शरद पवारसाहेब असे म्हणाले की, ज्या परिस्थितीमध्ये एक नवीन जबाबादारी आपण घेतलेली आहे ती कदाचित 60 हजार कोटी रुपयावरुन 1 लाख हजार कोटी रु. पर्यन्त जाईल अशा प्रकारची स्थिती निर्माण झालेली आहे. याचा अर्थ श्री. शरद पवारसाहेबांच्या बोलण्यातून, 5 एकरवरच्या शेतक-यांच्या कर्जमाफीच्या संदर्भातील विचार करणार नाही, असा अर्थ अजिबात निघत नाही. त्यावेळच्या प्रश्नाला दिलेले ते तूर्तास उत्तर होते. कृषी मंत्री असे म्हणाले नाहीत की यासंदर्भात अजिबात विचार करणार नाही. "विचार करणार नाही" असा शब्द प्रयोग त्यांनी केलेला नाही. त्यांनी असे सांगितले की, या क्षणाला होय म्हणणे शक्य नाही, अशा प्रकारचे त्यांचे वाक्य आहे. असे असताना केन्द्रीय कृषी मंत्री हे शेतक-याचे मारक आहेत अशा प्रकारचे आरोप सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी त्यांच्यावर केले. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांना मी सांगू इच्छितो की, देशाच्या इतिहासामध्ये एवढे मोठे कर्ज माफ करण्याचे धाडस आघाडी सरकार व्यतिरिक्त, केन्द्रीय कृषी मंत्री श्री. शरद पवारसाहेब यांच्या व्यतिरिक्त, पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांच्या व्यतिरिक्त कुणीही दाखविले नव्हते. आपण देखील आपल्या कारकिर्दीमध्ये घोषणा केल्या. परंतु मी आता त्याच्या खोलात जाऊ इच्छित नाही. म्हणून मला हे सांगावयाचे आहे की, शेतक-यांच्या कर्जमाफीच्या संदर्भात जो उल्लेख याठिकाणी केला जात आहे तो चुकीचा आहे. पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांनी 3750 कोटी पॅकेजच्या माध्यमातून विदर्भातील शेतक-यांना मदत केली.

...नंतर श्री. गिते...

अप्रधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव....

राज्य शासनाने 1250 कोटी रुपये दिले. शेतक-यांच्या पुनर्बांधणी कर्जावरील व्याज होते ते राज्य सरकारने आणि केंद्र सरकारने 828 कोटी रुपये भरले. त्यातील 414 कोटी रुपयांचा राज्य सरकारचा हिस्सा होता. राज्यातील शेतक-यांसाठी कोणी काही करीत नाही अशा प्रकारचा या ठिकाणी संभ्रम निर्माण केला जातो आहे. आपल्या राजकारणासाठी समाजामध्ये अशा प्रकारच्या संभ्रम निर्माण करण्याचा या ठिकाणी प्रयत्न केला जात आहे. हा राजकीय विषय नाही असे सांगितले जाते. हे सगळे तुमचे जे काही चालले आहे ते राजकारणासाठी चालले आहे. मला माहिती आहे की,शेतक-यांना संपूर्ण कर्जमाफी दिल्यामुळे आज आपल्याला सभा घेण्यासाठी माणसे मिळत नाही. ज्यांचा या ठिकाणी वारंवार उल्लेख केला. दोन चार दिवसापूर्वीचा सामना पेपर आपण बघा. कार्यकारी अध्यक्ष श्री. उध्दवजी ठाकरे हे फलटण येथे रात्री 12.30 वाजता गेले. तेथे सभा घेतली, त्या सभेत मोजून 50 माणसे होती. या बैठकीच्या संदर्भात सामना या वृत्तपत्रात अशी बातमी दिली आहे की, रात्री 12.30 वाजता माननीय श्री.उध्दवजी ठाकरे यांच्या सभेला प्रचंड जनसमुदाय जमला आहे. रात्री 12.30 वाजता प्रचंड जनसमुदाय जमला याचा अर्थ शेतक-यांनी या लोकांकडे पाठ फिरविल्यामुळे असे वृत्त देण्याची वेळ आली आहे.

**तालिका सभापती** ( श्री.जगदीश गुप्ता ) : या प्रस्तावाचा आणि त्या सभेचा काय संबंध आहे ?

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, आपण सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांचे भाषण वाचून बघा. श्री. उध्दवजी ठाकरे यांच्यामुळे सर्व काही होत आहे...

श्रीमती नीलम गोऱ्हे : सन्माननीय सदस्यांच्या बोलण्यावर माझी हरकत आहे.

श्री. भास्कर जाधव : मी माझ्या भाषणात एकही असंसदीय शब्दाचा वापर केलेला नाही. त्यामुळे माझ्या बोलण्यावर हरकत घेण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. रावते म्हणाले की, राज्यातील शेतकरी हवालदिल झाला आहे. परंतु मी या ठिकाणी सांगतो की, राज्यातील शेतकरी हवालदिल झालेला नाही तर 2009 मध्ये होणा-या निवडणुका डोळयासमोर ठेवल्यामुळे ही सर्व मंडळी हवालदिल झालेली आहे. उरली सुरली जी काही हवा होती ती श्री. मुंडे साहेबांनी परवाच्या दिवशी काढून घेतली. माझे मित्र श्री. मधुकर चव्हाण यांच्या

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव...

निमित्ताने पूर्णपणे हवा निघून गेली आहे. यांचे हवेमध्ये फिरणारे हेलिकॉप्टर माननीय पंतप्रधान आणि श्री. शरद पवार यांच्या कर्जमाफीच्या निर्णयामुळे जमिनीवर आले आहे. केंद्र सरकार आणि राज्य सरकार राज्यातील शेतक-यांच्या पाठिमागे खंबीरपणे उभे राहील असा विश्वास व्यक्त करतो आणि माझे भाषण पूर्ण करतो.

----------

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र.पाटील ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, आज महाराष्ट्रातील शेतकरी संभ्रमावस्थेत आहे. मी या चर्चेत राजकारण आणणार नाही. मी राजकीय बोलणार नाही. शेतक-यांना लाभ मिळावा यासाठी काय करावे लागणार आहे आणि काय करावयास पाहिजे या अनुषंगाने आजची चर्चा उपस्थित करण्यात आलेली आहे. या देशाचे कृषि मंत्री आदरणीय श्री.शरद पवार साहेब शेतक-यांवरील कर्जमाफीच्या संदर्भात बोलले. त्याच्या आधी वेगवेगळया वक्त्यांनी या संदर्भात वेगवेगळी वक्तव्ये केली आहेत. महाराष्ट्रातील जनता शेतक-यांवरील कर्जमाफीच्या बाबतीत संभ्रमामध्ये आहे. प्रत्यक्ष या ठिकाणी काय घोषणा झाल्या. ही चर्चा आज सभागृहामध्ये करण्यासाठी सर्व सदस्य आग्रही का राहिले ? हे अधिवेशन संपण्यापूर्वी केंद्र सरकारचा निर्णय येईल. केंद्र सरकारने काही अपूर्ण मदत केली तर राज्य शासन त्यामध्ये भर घालेल, असे आम्हाला बजेटच्या भाषणाच्या वेळी सांगण्यात आले आहे. मी चार मुद्दे मांडून माझे भाषण संपविणार आहे. महाराष्ट्राची भौगोलिक परिस्थिती बघून शेतक-यांना कर्जमाफीचे धोरण ठरविले पाहिजे मला असे वाटते. कोकणामध्ये 100 एकर जमीन असलेला एकही शेतकरी नाही. 10 एकर पेक्षा जास्त शेती असलेला एकही शेतकरी आमच्या भागात नाही. त्याला कारण आहे. कूळ कायद्याची चळवळ कोकणात झाली, ती चळवळ माझ्या आजोबांनी सुरु केली. रायगड जिल्हयामध्ये 5 ते 7 एकरापेक्षा जास्त शेती असलेला एकही शेतकरी नाही. कूळ कायद्याचे आंदोलनाचे नेतृत्व कोकणामध्ये होते. या आंदोलनात भाई चित्रे होते. माझे आजोबा नानासाहेब पाटील होते. डॉ.बाबासाहेब आंबेडकर होते. कोकणामध्ये मोठा शेतकरी नाही....

यानंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ MMP/ KGS/ 15:45

श्री. जयंत प्र.पाटील....

विदर्भाचा भाग त्यावेळी मध्यप्रदेशात होता. आम्ही जन्माला देखील आलो नव्हतो. विदर्भातील भौगोलिक परिस्थिती वेगळी आहे. 50 एकर आणि 100 एकर जमीन असणारे शेतकरी त्याठिकाणी आहेत. पश्चिम महाराष्ट्रातील परिस्थिी वेगळी आहे. पश्चिम महाराष्ट्रामध्ये काही भाग सुपीक आहे. सांगोला तालुका दुष्काळी आहे. तेथील शेतकरी 25/50एकर जमिनीचे मालक असले तरी उत्पन्न एक एकरावर सुध्दा येत नाही. या सर्व परिस्थितीचा विचार केला पाहिजे. चर्चेला सुरुवात करताना मी सांगितले होते की राज्यातील शेतकरी आज संभ्रमावस्थेमध्ये आहे. वर्ध्यामध्ये तसेच मध्यप्रदेश आणि आंध्रप्रदेशमध्ये श्री. राहूल गांधी गेले होते. तेथे त्यांनी 15 एकरापर्यंत शेतकऱ्यांची कर्जमाफी होईल असे सांगितले होते. माझ्याकडे पेपरची कात्रणे आहेत. मी राजकीय भाषण करणार नाही. मी मंत्रीमहोदयांना विनंती करीन की, अजून केंद्र शासनाचे याबाबतीत निश्चित असे धोरण आलेले नाही. कोकणाच्या दृष्टीने विचार केला तर बँका शेतकऱ्यांना कर्ज देऊ शकत नाहीत. कारण केंद्र शासनाचेधोरणच आलेले नाही. शेतकऱ्यांना येत्या 8/10 दिवसात कर्ज दिले पाहिजे. डोंगरकपाऱ्यात राहणारा शेतकरी आहे त्याचा रस्ता बंद होणार आहे. त्याला खताची आवश्यकता आहे. म्हणून माझ ी शासनाला विनंती आहे की, हे अधिवेशन संपण्यापूर्वी शासनाचे धोरण निश्चित झाले पाहिजे. कर्जमाफी कोणाला मिळणार आहे ज्या शेतकऱ्याच्या कर्जाचे पुनर्घटन झालेले त्यांना कर्जमाफी मिळणार काय नवीन कर्ज देता येणार आहे काय या सर्व गोष्टींचा खुलासा झाला पाहिजे. सरकारी धोरण अजून निश्चित झालेले नाही. मध्यंतरी वर्तमानपत्रात एक स्टेटमेंट आले होते. त्याबाबत सन्माननीय सदस्य सर्वश्री दिवाकर रावते आणि भास्कर जाधव बोलले नाहीत. पाच एकरापेक्षा जास्त जमीन असलेल्या शेतकऱ्याने कर्ज घेतले असेल आणि त्याने एकरकमी कर्ज फेडले तर त्याला 25टक्के सूट देण्यात येईल. यासंबंधात अजून धोरण ठरलेले नाही. माझी मंत्रीमहोदयांना विनंती आहे की उद्या अधिवेशन संपण्यापूर्वी याचे उत्तर दिले पाहिजे. उद्या आम्ही जेव्हा मतदारसंघात परत जाणार आहोत त्यावेळी मतदार आम्हाला विचारणार आहेत की मुंबईला अधिवेशनातून काय घेऊन आला आहात ? म्हणून याठिकाणी आम्ही पोटतिडीकीने बोलत आहोत. कर्जमाफीचे धोरणच अजून केंद्र शासनाने जाहीर केलेले नाही. दोन्ही पक्षाच्या नेत्यांनी कर्जमाफीचे मेळावे घेतले आणि आम्ही फक्त पहात बसलो. मेळावे घेण्यापेक्षा धोरण ठरविणे आवश्यक होते. बँकींग क्षेत्रात काम करणारा मी एक कार्यकर्ता आहे. कर्जमाफीबाबत विचारले की राज्य शासन

.....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र.पाटील....

केंद्राकडे बोट दाखविते. सरकारचे सचिव सांगतात धोरणच आम्हांला माहीत नाही. मी सहा वेळा नाबार्डमध्ये जाऊन आलो. तेथील अधिकारी सांगतात आम्ही लेखी काही देऊ शकत नाही परंतु खाजगीमध्ये सांगतात की धोरण माहीत नाही. ही परिस्थिती असेल तर विनाकारण एकमेकांवर टीका करुन काही उपयोग नाही. शासनाकडून आम्हांला उत्तर पाहिजे. 25/25 टक्केप्रमाणे 3 वर्षात परतफेड करु असे सांगितले पण धोरण ठरविले नाही. त्यांची ती क्षमता आहे काय ? याठिकाणी पतपेढयामधील कर्ज माफ करु असे सांगितले. मंत्रीमहोदयांनी अनेक वेळा सभागृहात सांगितले की पतपेढयांना आदेश दिलेले आहेत की तुम्ही शेतीसाठी कर्ज दिले पाहिजे.

नंतर श्री. भोगले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ KGS/ MMP/ 15:50

श्री.जयंत प्र.पाटील.......

अर्बन बँकांना आदेश दिले गेले. अर्बन बँकांनी शेतीसाठी कर्ज दिले पाहिजे. दोन वर्षे सातत्याने मंत्रीमहोदयांनी सांगितले मग कर्जमाफी व्हायला नको, बँका नको, पतपेढ्या नको का याची चर्चा केली पाहिजे. बहुतांश सन्माननीय सदस्य ही ग्रामीण भागातील शेतकऱ्यांसाठी काम करणारी नेतेमंडळी आहेत. या चर्चेसाठी वेळ अपुरा आहे. दीड तासाच्या वेळेत ही चर्चा संपवू पहात आहोत. परंतु या चर्चेच्या निमित्ताने आपल्याला रिझल्ट मिळाले पाहिजेत. हे अधिवेशन संपल्यानंतर आम्ही जेव्हा मतदारसंघात जाऊ तेव्हा आम्हाला कर्जमाफी मिळणार की मिळणार नाही? राज्य सरकार माफी देणार की नाही? केंद्र सरकार एकरकमी माफी देणार की तीन टप्प्यात देणार आहे? याचे उत्तर शेतकऱ्यांना द्यावे लागणार आहे. याबाबतचे धोरण चर्चेचा शेवट करताना मंत्रीमहोदय ठोसपणे सांगू शकणार नाहीत. परंतु उद्या अधिवेशन संपण्यापूर्वी मंत्रीमहोदयांनी यासंबंधीचे धोरण स्पष्ट केले पाहिजे. केंद्र सरकारने सांगितले आहे की, 5 एकरवरील शेतकऱ्यांना कर्जमाफी देणार नाही. परंतु राज्य शासन विदर्भातील शेतकऱ्यांना, दुष्काळी भागातील शेतकऱ्यांना काय देणार आहे हे अधिवेशन संपण्यापूर्वी जाहीर केले पाहिजे. भाषणाची सुरुवात करताना मी सांगितले की, या राज्याच्या भौगोलिक परिस्थितीप्रमाणे शेतकऱ्यांना न्याय दिला पाहिजे. माझ्या कोकणावर अन्याय झाला तरी चालेल परंतु विदर्भामध्ये लॅण्ड होल्डिंग कोकणापेक्षा जास्त आहे, त्या ठिकाणी वेगळा अन्याय होऊ शकतो. त्यादृष्टीकोनातून वेगळी भूमिका घेतली पाहिजे. सन्माननीय उपमुख्यमंत्री महोदय, आता शेतकरी कर्ज भरावयास तयार नाहीत. मी ज्या बँकेचा चेअरमन आहे त्या बँकेने गेल्या वर्षी मार्चपर्यंत 95 टक्के वसुली केली होती. यावर्षी 10 टक्के देखील वसुली झालेली नाही. लोक म्हणतात, माफी दिलेली आहे. माफीचे धोरण जाहीर होऊ द्या, त्याशिवाय आम्ही कर्ज भरणार नाही. कर्ज थकविले तर पुढील कर्ज मिळू शकणार नाही. यामध्ये नाबार्डचा अडथळा येणार नाही. या ज्या अडचणी आहेत त्या सहकार खात्याने सोडविल्या पाहिजेत आणि आम्हाला त्यासंदर्भात मार्गदर्शन केले पाहिजे. यामधून कसा मार्ग काढता येईल याची चर्चा या निमित्ताने सभागृहात व्हावी अशी विनंती करुन माझे भाषण संपवितो.

-------------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर (विरोधी पक्षनेता) : सन्माननीय सभापती महोदय, कर्जमाफीच्या घोषणेमुळे या महाराष्ट्रातील लाखो शेतकरी आज संभ्रमावस्थेत आहेत. 29 फेब्रुवारी, 2008 रोजी या देशाचे वित्तमंत्री सन्माननीय श्री.चिदंबरम यांनी लोकसभेत 60 हजार कोटी रुपयांच्या कर्जमाफीची घोषणा केली तेव्हापासून हा संभ्रम निर्माण झाला आहे. खरे म्हणजे देशाच्या स्वातंत्र्याच्या 60 वर्षानंतर शेतकऱ्यांच्या कर्जाचा विषय ऐरणीवर आला. सन्माननीय सदस्य श्री.भास्कर जाधव यांना मी सांगू इच्छितो की, हा ऐतिहासिक निर्णय आहे हे मान्य करावे लागेल. परंतु यापूर्वीच्या सन्माननीय श्री.व्ही.पी.सिंग यांच्या सरकारने 10 हजार कोटी रुपयांची कर्जमाफी केली होती. पहिल्यांदा तुम्ही कर्जमाफी केली असे नाही. परंतु हा विषय ऐरणीवर का आला? विदर्भात गेल्या आठ वर्षात 5000 शेतकऱ्यांनी आत्महत्या केली. त्यातून शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा पुढे आला. त्यातून कर्जमुक्तीची मागणी पुढे आली. माननीय पंतप्रधानांचे पॅकेज आले, माननीय मुख्यमंत्र्यांचे पॅकेज आले. त्यातून शेतकऱ्यांचे समाधान झाले नाही. मग या कर्जमुक्तीवर देशभर चर्चा सुरु झाली. या देशाचे सन्माननीय कृषिमंत्री एका समारंभासाठी अकोला येथे आले असताना बोलून गेले की, शेतकऱ्यांची कर्जमाफी झाली पाहिजे. त्यांनी ही घोषणा केली नाही परंतु आपले मत व्यक्त केले. त्यातून पुढे चर्चेला सुरुवात झाली आणि त्यातूनच 60 हजार कोटी रुपयांच्या कर्जमाफीची घोषणा झाली.

(नंतर श्री.जुन्नरे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्रीमती उषा दराडे )**

श्री. पांडुरंग फुंडकर ....

फक्त घोषणाच झाली. या घोषणेचे पुढे काय झाले? संवेदनशील विषयावर मला या ठिकाणी राजकीय भाषण करावयाचे नाही. कारण मी शेतक-यांमध्ये काम करणारा एक कार्यकर्ता आहे. शेतक-यांचे प्रश्न प्रामाणीकपणे मांडण्याचा मी सातत्याने प्रयत्न करीत असतो आणि यापुढेही करीत राहणार आहे. केंद्रशासनाच्या 60 हजार कोटी रुपयांमध्ये पाच एकराच्या आतील शेतक-यांचे कर्ज माफ होणार आहे. केंद्रसरकारने ही बाब जाहीर करीत असतांना 31 मार्च 2007 ही तारीख दिली आहे. तुम्ही पॅकेज दिलेल्या सहा जिल्हयात 5000 आत्महत्या झालेल्या आहेत. राज्यशासनाने शेतक-यांनी घेतलेल्या कर्जावारील व्याज माफ केले होते व त्यानंतर शेतक-याच्या कर्जाचे पुनर्रगठण करण्यात आले व मागचे कर्ज शेतक-याच्या उरावर कायम ठेवले, त्याला नव्याने कर्ज दिले, मागच्या कर्जाचे हप्ते पाडले आणि हे कर्ज जून मध्ये दिले. 31 मार्च पूर्वीच्या कर्जाची घोषणा झाली आणि सहा जिल्हयातील शेतक-यांना जूनमध्ये कर्ज मिळाले. त्यामुळे विदर्भातील सहा जिल्हयातील शेतक-यांना या योजनेचा लाभ होणार नाही. मी सोसायटयाना विचारले की, यामध्ये किती शेतकरी लाभार्थी होतील तर कोणी चार सांगितले तर कोणी आठ सांगितले. त्यामुळे यासंदर्भात शासनाला घोषणा करावी लागणार आहे. आम्ही मागणी केली होती की, यासंदर्भातील मुदत 31डिसेंबर, 2007 धरली तर विदर्भातील पाच एकराच्या आतील शेतक-यांना त्याचा फायदा होऊ शकेल. परंतु विदर्भातील होल्डींग जास्त आहे. नागपूर अधिवेशनामध्ये माननीय मुख्यमंत्र्यांनी जाहीर केले होते की, विदर्भात आणि मराठवाडयात होल्डींग जास्त आहे त्यामुळे याचा गांभीर्याने विचार करावा लागेल व त्यामुळे आम्ही यासंदर्भात केंद्राला प्रस्ताव पाठवू, केंद्राची यासंदर्भातील घोषणा झाल्यानंतर आम्हाला काय करावयाचे ते आम्ही ठरवू. परंतु अजून सुध्दा काहीही ठरलले नाही. केंद्राने पाच एकराच्या आतील शेतक-यांचे कर्ज माफ करुन केंद्रसरकार मोकळे झाले आहे. त्यामुळे मराठवाडा आणि विदर्भातील पाच एकराच्या वरील शेतक-यांचे तुम्ही काय करणार आहात? वन टाईम सेटलमेंटची काय अवस्था आहे? आता सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील साहेबांनी सांगितले की, 15 एकरवाल्या शेतक-याच्या संदर्भात तुम्ही काही विचार केलेला आहे काय? अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला आपण चहापाणाला आम्हाला बोलावले, आम्ही कधी नाही



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर.....

परंतु यावेळेस आपल्या निमंत्रणावरुन चहापानाला आलो. त्या ठिकाणी आम्ही जेव्हा कर्ज मुक्तीचा विषय काढला त्यावेळेला माननीय मुख्यमंत्र्यांनी मान्य केले की, "नाही, तुम्ही म्हणता ते खरे आहे. 15 एकरवाला शेतक-याचा समावेश केला पाहिजे किंवा 50 हजार रुपयांपर्यंतचे कर्ज माफ झाले पाहिजे, कर्ज माफीची जमिनीची मर्यादा 15 एकरापर्यंत वाढवली पाहिजे" अशा पध्दतीने माननीय मुख्यमंत्र्यांनी चहापानाच्या वेळी विचार व्यक्त केला होता. मी आबासाहेबांना हात जोडून विनंती करतो की, आबा साहेब आपण बोलू नका. पहिल्या दिवशी केंद्रीय कृषी मंत्री श्री. पवार साहेब बोलले की, आता सावकाराचे कर्ज देऊ नका. माननीय पवार साहेब बोलल्यानंतर दुस-याच दिवशी तुम्ही स्टेटमेंट दिले की, "15 दिवसाच्या आत सावकाराने शेतक-यांच्या घेतलेल्या जमिनी परत करा." माननीय पवार साहेब बोलले म्हणजे तुम्ही बोललेच पाहिजे का? कशाला आपण त्यांच्याशी स्पर्धा करता? आपण जी घोषणा केली त्या घोषणेमुळे शेतकरी संभ्रमीत झालेला आहे. शेतकरी आम्हाला विचारतात की, आबांच्या घोषणेचे काय झाले? सावकारी कायदा आला काय? 15 एकराच्या वरील शेतक-यांना कर्जमाफी देण्याचे आदेश निघाले काय? त्यामुळे संभ्रमीत अवस्था आता तरी बाजूला सारण्याची आवश्यकता आहे. आबांनी सांगितले होते की, आम्ही एक महिन्यात कायदा आणू. एखादे बील महत्वाचे असेल तर तुम्ही वाट न बघता ऑर्डीनन्स काढता, अधिवेशन 15 दिवसावर आले तर तुम्ही ऑर्डीनन्स काढतातच ना? आता तुम्ही यासाठी दिल्लीचे ओपिनियन मागितले आहे. या चर्चेला आपल्याला फार व्याप्ती देता येणार नाही.

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर .....

पाच एकरा पेक्षा जास्त शेती असलेले जे शेतकरी आहेत त्यांच्या वरील कर्ज माफ करण्याच्या बाबतीत शासनाचे कोणते धोरण आहे ? महाराष्ट्र सरकार त्याबाबतीत कोणता निर्णय घेणार आहे त्याचबरोबर 31 मार्च पर्यतची मुदत 31 डिसेंबर पर्यत वाढवून देण्यात येणार आहे काय ? पत संस्थाचा सुध्दा यामध्ये समावेश होणार आहे असे माननीय सहकार मंत्र्यांनी सांगितलेले आहे तेंव्हा पत संस्थाच्या बाबतीत कोणते धोरण स्वीकारले जाणार आहे ? या सर्व मुद्याच्या बाबतीत खुलासा करण्यात आला पाहिजे.आज शेतक-यांच्या मनामध्ये संभ्रम निर्माण झाला आहे. केन्द्र सरकारने कर्ज माफ केले आहे तेव्हा त्या संदर्भात केन्द्र सरकारकडून राज्य सरकारला काही आदेश आला आहे काय ?

डॉ.पंतगराव कदम (बसून) : नाही.

श्री.पांडुरंग फुंडकर : ठीक आहे.पेरणीचे दिवस आता जवळ आलेले आहेत. बॅन्केचे एन.सी.स्टेटमेन्ट आतापर्यंत तयार व्हावयास पाहिजे होते. परंतु अजून काहीही आदेश आलेले नाहीत त्यामुळे बॅन्का आणि सोसायटया आज संभ्रमामध्ये आहेत. अजून आदेश आलेले नसल्यामुळे स्टेटमेन्ट तयार करावयाचे किंवा नाही अशा व्दिधा मनस्थितीत बॅन्का आहेत.जो मुद्दा इतर सन्माननीय सदस्यांनी मांडलेला नाही तो मुद्दा मी मांडत आहे.माननीय सहकार मंत्र्याना मला असे सांगावयाचे आहे की, शेतक-यांकडील कर्ज माफ करण्यासबंधी घोषणा झाल्यानंतरसुध्दा काही बॅन्कांनी सक्तीची कर्ज वसुली सुरु केलेली आहे. शेतक-याला असे वाटले की आपल्यावरील कर्ज आता माफ झालेले आहे. परंतु बॅन्कांनी दोन एकरवाल्या शेतक-याकडील कर्जाची वसुली सुरु केलेली आहे. तेव्हा अशा प्रकारे सक्तीची वसुली राज्यात सुरु आहे किंवा नाही ही बाब माननीय मंत्री महोदयांनी तपासून पहावी. शेतक-यांच्या दृष्टीने हा प्रश्न अत्यंत जिव्हाळयाचा आहे सरकार जर या संदर्भात सकारात्मक विचार करीत असेल तर त्याबाबतीत आमचे मत मांडणे हे आमचे कर्तव्य आहे. सकारात्मक विचार सरकार करीत असतांना काही गोष्टीची स्पष्टता झाली पाहिजे. 29 फेब्रुवारीला कर्ज माफ करण्यासबंधीची घोषणा करण्यात आली होती आता एप्रिल महिना संपत आला असतांना केन्द्र सरकारकडून मात्र अजून काहीही आदेश आलेले नाहीत. 21 मे पासून पावसाचे पहिले नक्षत्र सुरु होणार आहे. त्या दिवसापासून जर पाऊस पडायला सुरुवात झाली तर पेरणी करण्यास सुरुवात होईल तेव्हा कर्जाच्या बाबतीत नेमके काय करावयाचे हे बॅन्कांना समजत



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर ....

नाही.मी परवा लातूरला गेलो होतो तेव्हा श्री.रामप्रसाद बोर्डीकर यांचे स्टेटमेन्ट मी पेपरमध्ये वाचले होते. त्यात त्यांनी असे सांगितले की," यंदा शेतक-यांना पीक कर्ज मिळणार नाही." केन्द्र सरकारने अर्थसंकल्पात शेतक-यांकडील कर्ज माफीची घोषणा केली परंतु याबाबतची लेखी भूमिका अद्याप जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅन्कांकडे प्राप्त झालेली नाही त्यामुळे येत्या खरीप हंगामात शेतक-यांना नवीन पीक कर्ज देणे शक्य नसल्याचे परभणी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅन्केचे चेअरमन श्री.रामप्रसाद बोर्डीकर यांनी "लोक संचार" या वर्तमानपत्राला दिलेल्या विशेष मुलाखतीत स्पष्ट केले आहे. तेव्हा याबाबतीत शासन काय करणार आहे ? शेतक-यांना पेरणी केल्यानंतर कर्ज देण्यात येणार आहे काय ? शेतक-यांना कधी कर्ज देणार आहात ? पाऊस सुरु झाल्यानंतर त्यांना कर्ज देणार आहात काय ? पीक कर्ज मिळणार नाही अशी एका बाजूला शेतक-यांची अवस्था आहे. दुस-या बाजूला खताच्या बाबतीत प्रश्न निर्माण झालेला आहे त्याबाबतीत मी परवा प्रश्न उपस्थित केला होता. महाराष्ट्र सरकारने अजून खताचे बुकींग केलेले नाही. कोणत्याही जिल्हयात पाच टक्केसुध्दा खत आलेले नाही. महाराष्ट्र सरकारने खताचे बुकींग केलेले आहे काय असा प्रश्न माननीय कृषी मंत्र्यांना विचारला असता त्यांना या प्रश्नाचे उत्तर देता आले नाही. इतर राज्यांनी मात्र ,खताचे बुकींग केलेले आहे. त्याचबरोबर इम्पोर्टेड खत आपल्याकडे येते त्यासाठी तीनच बंदराचा उपयोग केला जातो. त्यातील एक मुंबईचे जे.एन.पी.टी. चे बंदर आहे, व कांडला , मुंदरा नावाचे गुजराथ मधील दोन बंदरें आहेत. ज्यांनी खताचे बुकींग केले आहे त्यांच्याकडे हे खत जाईल. महाराष्ट्राचा नंबर नंतर लागणार आहे. त्यामुळे एका बाजूला शेतक-याना पीक कर्ज मिळणार नाही दुस-या बाजूला त्यांना खत मिळणार नाही तिस-या बाजूला बी बियाण्यांचा दुष्काळ आहे अशा स्थितीमध्ये या शेतक-याने काय करावयाचे ? जे काही बी बियाणे त्यांना मिळते त्यामध्ये भेसळ केली जाते. राज्य बियाणे महामंडळाची एकदा सीआयडी मार्फत चौकशी केली पाहिजे. मध्य प्रदेशातील मार्केटमधील धान्य खरेदी करुन बियाण्यांच्या पिशव्यांमध्ये भरुन महाराष्ट्रातील शेतक-यांना दिले जाते व त्याची फसवणूक केली जाते. त्याचबरोबर चौथ्या बाजूला सावकर शेतक-याना कर्ज देत नाही. उप मुख्यमंत्र्यांनी सांगितले होते की सावकारांना फोडून काढण्यात यावे त्यामुळे सावकारांना असे वाटते की आता माननीय

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

उप मुख्यमंत्री कोपरा पासून ढोपरापर्यंत सोलून काढतील त्यामुळे कर्ज देतांना सावकारांनी हात आखडता घेतला आहे . त्याचबरोबर शेतकरी व्यापा-यांना धान्य विकत होता परंतु आता व्यापा-यांनी शेतक-याकडून धान्य खरेदी करण्याचे बंद केलेले आहे अशा प्रकारे शेतकरी चक्रव्युहात अडकवले आहेत. तेव्हा यामध्ये माझे काय चुकले आहे आणि यामध्ये मी कोणते राजकारण करीत आहे हे आपण मला सांगावे. अभिमन्यू सारखी या शेतक-याची परिस्थिती करुन टाकली व त्याला चक्रव्युहात अडकवून टाकलेले आहे.

नतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

KBS/KGS/MMP. श्री. गायकवाड नंतर --- 16:05

श्री. फुंडकर ....

आणि तो चक्रव्यूह भेदता आला नाही की शेतकरी मरतो, आत्महत्या करतो. मी माननीय उपमुख्यमंत्री श्री.आर.आर.पाटील यांना सांगू इच्छितो की, ही गोष्टी तुमच्यासाठी जशी शरमेची आहे तशीच ती आमच्यासाठीदेखील शरमेची आहे. एक शेतकरी आपल्या या राजधानीच्या शहरात येऊन आपल्याकडे मागणी करतो, त्याच्या भूसंपादनाचे पैसे अजून त्याला मिळालेले नाहीत ते मिळावेत म्हणून मागणी करतो, त्यासाठी उपोषणाला बसतो आणि त्याच्या उपोषणाची कोणी दखल घेत नाही म्हणून मग विष प्राशन करतो. यापेक्षा दुसरी शरमेची गोष्ट या महाराष्ट्राला दुसरी कोणती नाही. सभापती महोदय, बुलढाणा जिल्ह्यातील असेच एक उदाहरण मी देईन. तेथे तर एका शेतकऱ्याने स्वत:चीच कडबा गंजी पेटवून त्यामध्ये उडी टाकतो. ही गंमत नाही तर ही गंभीर अशीच बाब आहे. एका शेतकऱ्याने स्वत:चे सरण स्वत:च रचले. यामध्ये कोणतेही राजकारण नाही. बुलढाणा जिल्ह्यातील चिखली येथील धोतरा-भंदोजी गाव आहे तेथील शेतकऱ्याने स्वत:च स्वत:चे सरण रचले आणि ते पेटवले व सतीप्रमाणे त्या सरणावर तो बसला. कारण काय तर कर्ज फिटले नाही आणि त्यामुळे बँकेने बेइज्जत केले म्हणून. श्री.बबनराव जेवघाने नावाच्या शेतकऱ्याचे हे दाहरण आहे, त्याची मी पुनरूक्ती करीत नाही. सभापती महोदय, आमच्याकडे श्री.प्रकाशराव पोहरे यांचे 'देशोन्नती' हे वर्तमानत्र निघते. त्यात 'शेतकऱ्यांच्या आत्महत्या' नावाचा एक कॉलम असतो. मी रोज ते वर्तमानपत्र मागवून घेऊन त्यातील हे सदर वाचतो की, आज किती शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. मी सकाळी सकाळी माझ्या मुलाला ते वृत्तपत्र आणण्यासाठी पाठवतो. त्याला प्रश्न पडतो की, आपले वडील रोज रोज हे वर्तमानपत्र का मागवितात ? त्यातील वरळी-मटक्याचे आकडे तर ते पाहत नाही ना ? मला त्याने रोज वर्तमानपत्र मागविण्याचे कारण विचारले. मी त्याला सांगितले की, त्यामध्ये शेतकऱ्यांनी केलेल्या आत्महत्यांची संख्या असते म्हणून मी ते मागवून वाचतो. आजपर्यंत 229 आत्महत्यांची यादी आलेली आहे. 1 मार्च पासूनची ही यादी आहे. 5 एकरावरील शेतकऱ्यांची ही यादी आहे. सभापती महोदय, 29 फेब्रुवारीला शेतकऱ्यांना कर्जमाफी जाहीर झाली आणि 1 मार्च पासूनची ही यादी आहे. ज्या दिवशी कर्जमाफीची घोषणा झाली त्याच्या अर्ध्या तासामध्येच यवतमाळ जिल्ह्यातील बोरली गावातील श्री.दुर्गादास पवार या शेतकऱ्याने विष घेऊन आपले जीवन संपविले. त्याच्याकडे स्थानिक सहकारी बँकेकडून घेतलेले 25 हजाराचे आणि सावकाराकडून घेतलेले 30 हजाराचे कर्ज होते आणि त्याच्याकडे 9 एकर शेती

...... 3क्यू 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. फुंडकर ....

होती. नेहमीचा घरखर्च चालवून कर्ज कसे फेडायचे या विवंचनेमध्ये तो नेहमी असायचा. त्यातच कर्जमाफी मिळेल ही आशा त्यालाही होती. परंतु कर्जमाफी जाहीर झाली आणि त्यामध्ये पाच एकरावरील शेतकऱ्याला त्याचा फायदा मिळणार नाही हे लक्षात आल्याबरोबर तो खचला आणि निराशेने त्याने आत्महत्या केली. तेव्हा आता तरी सरकारने याबाबत स्पष्टपणे खुलासा करणे आवश्यक आहे. सरकारने कर्जमाफी दिली म्हणून कोणी मेळावे घेतले, कोणी मोठे हार घालून घेतले. .. सभापती महोदय, मी आमचे मित्र सन्माननीय सदस्य श्री.भास्कर जाधव यांना सांगू इच्छितो की, मी त्यांच्यापेक्षाही अधिक राजकीय भाषेत भाषण करू शकतो. पण मला तसे करायचे नाही. आम्हाला यासाठी काम करायचे आहे. मी आपल्याला सांगेन की, भारतीय जनता पक्षाच्या रामभाऊ म्हाळगी ट्रस्टने विदर्भातील 500 शेतकऱ्यांची घरे दत्तक घेतली आहेत. त्या घरातील मुलांचे शिक्षण तसेच त्या घरातील सर्व लोकांच्या जेवणाची जबाबदारी या ट्रस्टद्वारा आम्ही घेतली आहे. आम्ही काही सत्तेमध्ये नाही, पण विरोधी पक्षामध्ये राहून रचनात्मक कार्य इमानदारीने आम्ही करीत आहोत, शेतकऱ्यांसाठी देखील काही केले पाहिजे म्हणून आम्ही काम करीत आहोत. ...

( यानंतर सौ.रणदिवे .... 3आर 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/ KGS/ MMP/ पूर्वी श्री.सुंबरे . . 16.10

श्री.पांडुरंग फुंडकर . . . .

सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्य श्री.भास्कर जाधव यांना विचारु इच्छितो की, जे शेतकरी आत्महत्या करतात, त्यांच्या घरी तुमच्या पक्षातील कितीजण जातात ? ते पहावे. मी सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांना धन्यवाद देतो. कारण विदर्भामध्ये ज्या-ज्या शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत, त्या प्रत्येक शेतकऱ्याच्या घरी जाऊन त्यांनी साडी-चोळी आणि पाच हजार रुपयांची मदत दिलेली आहे. ही साधी गोष्ट नाही. सन्माननीय सदस्यांनी असेही सांगितले की, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी राजकीय स्वरुपाचे भाषण केले आहे. परंतु येथे राजकीय भाषण करण्याचा उद्देश नव्हता. जवळजवळ पावणे दोन महिने होऊन गेले, परंतु शेतकऱ्यांच्या प्रश्नाच्या बाबतीत कोणतीही स्पष्टता आली नाही. माननीय मुख्यमंत्र्यांच्या वक्तव्यानंतर देखील स्पष्टता आली नाही. सदनातून बाहेर गेल्यावर शेतकऱ्यांना जबाब द्यावा लागणार आहे. एकदंर सात आठवडे अधिवेशन झाले पण त्यामध्ये शेतकऱ्यांच्या प्रश्नाबाबत कोणताही निर्णय झाला नाही. म्हणून आम्ही हा विषय येथे उपस्थित केला. आमचे धोरण हे शेतकऱ्यांचा 7/12 कोरा करण्याचे आहे आणि माननीय केंद्रीय कृषी मंत्री श्री.शरद पवारसाहेबांनी घोषणा केली, तेव्हापासूनचे हे धोरण नाही तर गेल्या तीन-चार वर्षपासून आम्ही याबाबतीत सतत मागणी करीत आहोत. बजेट अधिवेशनाच्या पूर्वी माननीय कृषी मंत्री श्री.शरद पवारसाहेब अकोला येथे आले होते आणि त्यांना यासंबंधातील घोषणा नंतर करावयाची होती, म्हणून त्यांनी अगोदरच सांगितले. म्हणजे मग त्यांना असे म्हणता येईल की, मी बोललो, त्या प्रमाणे वागलो आहे. शेतकऱ्याला एक लाख रुपयांचे अनुदान देणे हा आत्महत्या रोखण्याचा उपाय नाही. तर संपूर्ण कर्जमुक्ती हाच एक उपाय आहे. सध्या पाच एकर जमीन असलेल्या शेतकऱ्यांच्या बाबतीत जो निर्णय घेतला, तो चांगला आहे. त्याबद्दल अभिनंदन करण्याऱ्यांपैकी मी एक आहे. पण पुढचे काय ? पाच एकरावरील जे शेतकरी आहेत, त्यापैकी जवळजवळ 229 शेतकऱ्यांनी गेल्या दीड महिन्यामध्ये आत्महत्या केल्या आहेत. त्यांच्या बाबतीत काय करणार आहात ? हे स्पष्ट केले पाहिजे. याबाबतीत महाराष्ट्र शासनाची देखील जबाबदारी आहे. या शासनाने गेल्या आठ वर्षामध्ये राज्यावर असलेल्या कर्जामध्ये 1 लाख 50 हजार कोटी रुपयांची वाढ केलेली आहे. मग शेतकऱ्यांसाठी अजून 5-25 हजार कोटी रुपयांचे कर्ज वाढले तरी काही फरक पडणार नाही. असे केले तर माननीय मंत्री डॉ.पतंगराव कदम, आपल्यामार्फत बाहेर जनतेमध्ये असा मॅसेज जाण्याची गरज आहे की, तुम्ही सहकार मंत्री

. . . .3आर-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर . . . .

असताना शेतकऱ्यांसाठी काहीतरी केले आहे. शेतकऱ्यांमध्ये असलेली संभ्रमावस्था संपवावयाची असेल तर काही गोष्टींमध्ये स्पष्टता आली पाहिजे. पाच एकर पर्यंत शेती असलेल्या शेतकऱ्यांच्या कर्ज मर्यादेची तारीख 31 डिसेंबर होणार आहे काय ? यामध्ये पतसंस्था समाविष्ट होणार आहेत काय? वन टाईम सेटलमेंटनुसार शेतकऱ्यांनी 75 टक्के रक्कम भरली तर उरलेली 25 टक्के रक्कम शासन कशा पध्दतीने देणार आहे ? 15 एकर शेतकऱ्यांचा शासन भार उचलणार आहे काय ? या पाच-सहा मुद्यांच्या बाबतीत माननीय मंत्री महोदयांच्या उत्तरामध्ये स्पष्टता आली पाहिजे आणि राज्यामधील शेतकऱ्यांपर्यंत चांगला मॅसेज गेला पाहिजे. तसेच माननीय मंत्री महोदयांनी हे देखील स्पष्ट करावे की, सावकारी कर्जाच्या बाबतीत एक महिन्याच्या आत अध्यादेश काढण्यात येणार आहे काय ? माननीय मंत्री महोदयांकडून या पाच-सहा मुद्यांबाबत समर्पक उत्तर येईल अशी अपेक्षा आहे. नुसत्या घोषणा करु नका. याठिकाणी हा प्रस्ताव चर्चेसाठी आणण्याचा एवढाच उद्देश होता.तसेच मला माननीय गृहमंत्र्यांना सांगावयाचे आहे की, आपण काही बोलू नका. जर काही करावयाचे नाही, तर मग कशासाठी बोलता ? परंतु माननीय गृहमंत्री केवळ बोलतात. ज्यावेळी राज्याचा ज्येष्ठ नेता काही बोलतो, तेव्हा शेतकऱ्यांपर्यंत मॅसेज जातो. परंतु ते जे बोलतात, त्याप्रमाणे होत नाही. मग शेतकऱ्यांमध्ये संभ्रमावस्था निर्माण होते. महायुध्दामध्ये अर्जूनाची जशी अवस्था झाली होती, तशी ती आज शेतकऱ्यांची झालेली आहे. मघाशी सन्माननीय सदस्य श्री.भास्कर जाधव यांनी सांगितले की, आता गावागावामध्ये कसे जावयाचे असा आमच्यासमोर प्रश्न आहे. परंतु दोन महिने जाऊ द्या. त्यानंतर तुम्हालाच गावागावामध्ये जाणे मुष्किल होणार आहे हा माझा इशारा आहे. माननीय मंत्री महोदय, जर याबाबतीत काही कार्यवाही झाली नाही तर पुढच्या काळामध्ये पांढऱ्या कपडयातील कोणीही दिसला तर गावातील लोक जोडे मारल्याशिवाय रहाणार नाहीत. अशी अवस्था ग्रामीण भागामध्ये तयार होत आहे. म्हणून याबाबतीत वेळीच गांभीर्याने विचार करावा असा इशारा देऊन मी माझे भाषण संपवितो.

-----

यानंतर कु.गायकवाड . . . .

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

DVG/ MMP/ KGS/ प्रथम श्रीमती रणदिवे.. 16:15

प्रा. सुरेश नवले ( नामनियुक्त ) : सभापती महोदया, शेतकऱ्यांच्या संदर्भात जो प्रस्ताव आलेला आहे त्याबाबत तसेच गेल्या काही काळापासून राज्यातील शेतकऱ्यांच्या होणाऱ्या आत्महत्येबाबत माझ्या भावना येथे व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदया, राज्य शासनाच्या विनंती वरुन केंद्र शासनाने 60 हजार कोटी रुपयांचे कर्ज माफ केले आहे. हा ऐतिहासिक निर्णय आमच्या शासनाने घेतलेला आहे. मी आपणास सांगू इच्छितो की, भारताच्या इतिहासामध्ये असा ऐतिहासिक निर्णय यापूर्वी कधीही घेण्यात आला नाही. हे कशामुळे करावे लागले आहे ? राज्यातील शेतकरी आत्महत्या करीत आहेत. शेतकऱ्यांचे दैन्य आहे. आज शेतकरी भयावह परिस्थितीला झुंज देत आहेत. अशा शेतकऱ्यांना दिलासा देण्याची आवश्यकता आहे, म्हणून केंद्र शासनाने 60 हजार कोटी रुपयांचे कर्ज माफ केले. या ऐतिहासिक निर्णयाबद्दल आदरणीय सोनियाजी गांधी, आदरणीय पंतप्रधान, आदरणीय कृषी मंत्री, आदरणीय मुख्यमंत्री, माननीय सहकारमंत्री डॉ. पतंगराव कदम, केंद्रीय अर्थ मंत्री श्री. चिदंबरम यांना मी धन्यवाद देऊ इच्छितो. आपल्याला ही नावे आयुष्यभर लक्षात ठेवावी लागणार आहेत. राज्यातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबल्या नाहीत. कर्जमाफी देण्याची आवश्यकता का भासली ? आज शेतकऱ्याची अवस्था अत्यंत बिकट आहे.

हा शेतकऱ्याचा आवाज आहे पाशाभाई... ज्या पार्श्वभूमीवर हा निर्णय घेण्यात आला आहे तो अतिशय महत्वाचा आहे.

( काही सन्माननीय सदस्य एकमेकांशी बोलतात.)

**तालिका सभापती ( श्रीमती उषा दराडे )** : सन्माननीय सदस्यांना मी विनंती करु इच्छिते की, एका गंभीर विषयावर बोलत असताना सन्माननीय सदस्यांनी खाली बसून चेष्टा मस्करी करु नये. विषयाचे गांभीर्य लक्षात घेऊन कोणीही कोणाला डिस्टर्ब करु नये.

प्रा. सुरेश नवले : सभापती महोदय, एका कवीने शेतकऱ्यांच्या परिस्थिती काव्यात्मकरीत्या सादर केलेली आहे.

"पायजो पायजो म्हणता, म्हणता बेडीच पायात आली.
तरी तुझ्या डोळयातून कसे आले नाही पाणी,
जखम झाल्या पायावर पदर तरी ठेव,
जिवाचाही तुला कसा लागत नाही भ्येव,

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. सुरेश नवले......

तुला वाटलं तरी तू अधीन येणार नाही,
दूर गेलेल्या पाखरांना तुझी हाकही जाणार नाही,
सप्नात राहायचं बिचारं गालातच हसतं
मला तर गडे मुलुखा न्यारीच दिसतं.
काळा काळा ढेकूण म्हणतो, तू नवरीवानी दिसते,
रक्ताचा थेंबही त्यावर मेंदीवानी हसते "

सभापती महोदया, आमच्या राज्यामध्ये श्रमाला प्रतिष्ठा प्राप्त करुन देण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे. इतके दिवस शेतकरी उपेक्षित होता. शेतकऱ्यांना न्याय देणारे हे शासन आहे असे आपण म्हणतो. शेतकऱ्यांकरिता 60 हजार कोटी रुपये कर्जमाफी करण्यात आली या 60 हजार कोटी रुपयांपैकी आमच्या वाटयाला काय आले आहे ? प्रत्येक वेळी शेतकरी आम्हाला प्रश्न विचारतात की कोठले कर्ज माफ झाले आहे ?

सभापती महोदया, आज माननीय मंत्रीमहोदय येथे उपस्थित आहेत. त्यांना मी आग्रहाची विनंती करु इच्छितो की, शेतकऱ्यांना किती कर्जमाफी देण्यात येणार आहे या बाबत त्यांनी विवरण द्यावे. हा तपशील देणे आवश्यक आहे. कशाला विरोधी पक्षाला आपण संधी देता ? त्यांना तशी संधी देण्याची काही आवश्यकता नाही. आज ग्रामीण भागामध्ये 42 ते 44 सेल्शियस तापमान आहे. " पान नाही, फूल नाही आला ऋतु कुठे गेला, भिरभिर पाखराचा जीव झुरणी लागला " अशी स्थिती आज मराठवाडा व विदर्भामध्ये आहे. त्यांना आपण दिलासा मिळवून दिला पाहिजे. त्यामुळे शासनाने हे सर्व जाहीर केले पाहिजे. माननीय पंतप्रधानांनी जाहीर केलेली घोषणा प्रत्यक्षात शेतकऱ्यांपर्यंत जाण्याची आवश्यकता आहे. त्या संदर्भात आपण घोषणा करणार आहे की नाही हा प्रश्न सभागृहामध्ये आता उपस्थित झालेला आहे.

यानंतर श्री. बरवड..

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

प्रा. सुरेश नवले ......

विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते हे भावनिक बोलले. शेतकऱ्यांविषयी त्यांना जिव्हाळा आहे, कणव आहे, आपुलकी आहे, आस्था आहे, प्रेम आहे. त्यांच्या भावनेशी मी सहमत आहे. पण त्यांनी या सभागृहामध्ये सांगितले की, माननीय श्री. शरद पवार हे शेतकऱ्यांचे मारेकरी आहेत. सभापती महोदया, एक गोष्ट मी निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, त्यांच्या पक्षाचे सर्व सन्माननीय नेते श्री. शरद पवार साहेबांचे पाय धरुन सांगतात की, आपण पंतप्रधान व्हावे आणि दुसरीकडे सांगतात की, ते शेतकऱ्यांचे मारेकरी आहेत. हे किती विसंगत आहे ? आपल्याला श्री. शरद पवार हे देशाचे पंतप्रधान म्हणून चालतात मग त्यांना मारेकरी म्हणताना शिवसेनाप्रमुखांची परवानगी घेतली काय ? परवा एका दैनिकामध्ये त्यांच्या कार्यकारी अध्यक्षांचा एक फोटो आला होता. त्यामध्ये शिवसैनिकांच्या वतीने त्यांना एक भेटवस्तू देण्यात आली. त्यांना कुदळ देण्यात आली. त्यांना कुदळ आणि टिकाव याच्यातील फरक कळत नाही. तो टिकाव होता.. त्यांना टिकाव दिला असताना शिवसैनिकांनी सांगितले की, ही कुदळ आहे. टिकाव कसा असतो, कुदळ कशी असते, दांडा म्हणजे काय, शिवरा म्हणजे काय, जोता म्हणजे काय हे यांना माहीत आहे काय महाराष्ट्रामध्ये सुडाचे राजकारण कोणी केले ? सभापती महोदया, सन्माननीय सदस्य श्री. पाशा पटेल असे म्हणत आहेत की, सभापतींकडे बघून बोलावे. मी त्यांना सांगू इच्छितो की, आपल्याकडे बघावे लागते. आपले चेहरेच एवढे सुंदर आहेत की, पाहिल्याशिवाय राहावत नाही. सन्माननीय सदस्य श्री. पाशा पटेल, आपण किती सुंदर आहात ? त्या परमेश्वराचे मी आभार मानतो की त्यांनी आपल्याला या सभागृहामध्ये पाठवले आणि मला बघण्याची इच्छा झाली.

सभापती महोदय, एकीकडे शेतकऱ्यांविषयी आस्था आणि आपुलकी दाखवावयाची आणि दुसरीकडे रात्रंदिवस ए.सी. मध्ये राहावयाचे. त्या कार्यकारी अध्यक्षांचा आणि शेतकऱ्यांचा काय संबंध आहे ? या महाराष्ट्राला फक्त शेतकऱ्यांचे पुत्र धुरंधर नेतेच सांभाळू शकतात. आपण फक्त सुडाचे राजकारण करावे. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचे जे पुत्र आहेत त्यांच्या घरावर हल्ले कोणी केलो ? मी मंत्री होतो. माझ्या घरावर कोणी हल्ला केला ? तो कोणी करावयास लावला ? माननीय मंत्रिमहोदय श्री. छगन भुजबळ यांच्या घरावर कोणी हल्ला केला ? मी



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MMP/

प्रा. सुरेश नवले .....

शेतकऱ्यांच्या पोरांविषयी बोलत आहे. आपले धोरण काय आहे ? त्यामुळे या शेतकऱ्यांचे धोरण आखत असताना आणि जाहीर करत असताना या शेतकऱ्यांविषयी आपण गांभीर्याने विचार करण्याची आवश्यकता आहे. पंजाबमध्ये बटाट्याचे उत्पादन एकरी दीड लाख रुपयांपेक्षा जास्त काढलेले आहे. त्यामध्ये मॅकडोनॉल्ड संस्थेचा सहभाग आहे. मग आम्ही शेतकऱ्यांचे उत्पन्न एक लाख रुपयांपेक्षा जास्त वाढविण्याच्या दृष्टीने प्रयत्न करणार की, नाही हा खरा प्रश्न आहे. 80 टक्के शेतकरी कोरडवाहू आहेत. 20 टक्के शेती पाण्याखाली आहे. मग या 80 टक्के कोरडवाहू शेती पाण्याखाली आणण्यासाठी काही धोरण जाहीर करणार आहात काय, हा खरा प्रश्न आहे. आपण ग्रामीण भागामध्ये जी शेततळी उभी करतो त्यांची खोली वाढविण्याची गरज आहे. कारण त्यांची खोली वाढवली तर कमीतकमी जमिनीमध्ये झिरपा वाढेल. पाण्याचा साठा वाढेल. महाराष्ट्रामध्ये जास्तीत जास्त विहिरी खोदण्याची आवश्यकता आहे. भूगर्भातील पाणी जर वाढेल तर तपमान कमी होईल आणि तपमान कमी झाले तर पर्यावरणावर दुष्परिणाम होणार नाही. या सगळ्या दृष्टीने आपण प्रयत्न करावा आणि ठोसपणे महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना यानंतर सुध्दा दिलासा देण्याच्या दृष्टीने धोरण आखावे आणि त्यादृष्टीने प्रयत्न करावा. या ठिकाणी माननीय मंत्रिमहोदय डॉ. पतंगराव कदम साहेब उपस्थित आहेत.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.सुरेश नवले....

सन्माननीय सहकार व पुनर्वसन मंत्री डॉ.पतंगराव कदम हे अतिशय दक्ष आणि कार्यक्षम आहेत. ते पुढे बघत असले तरी त्यांचे कान माझ्याकडे आहेत. त्यांनी यादृष्टीने स्पष्ट घोषणा करावी आणि विरोधी पक्षाच्या हातामध्ये कोलीत न देता महाराष्ट्रातील शेतक-यांचे जीवनमान पुन्हा उंचावण्यासाठी काही घोषणा कराव्यात अशी आग्रहाची विनंती करुन मी आपली रजा घेतो.

------

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MMP/ KGS/

श्री.पाशा पटेल ( विधानसभेने निवडलेले ) सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर यांनी शेतक-यांच्या आत्महत्यांच्या संदर्भात नियम 260 अन्वये प्रस्ताव मांडलेला आहे. त्याला पाठिंबा देण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, शेतक-यांची सध्या परिस्थिती कशी आहे ? शेतकरी भ्रमात आणि सरकार आरामात अशी स्थिती आहे. जरा गावात काय चालले आहे ते जाऊन पहावे. येथे जोरजोराने भाषण केले म्हणजे शेतक-यांना बरे वाटेल असे नाही. सन्माननीय सदस्य श्री.सुरेश नवले यांच्यासारखा मी देखील मोठया आवाजात बोलू शकतो, परंतु मी बोलणार नाही. सभापती महोदय, हा विषय आता पुन्हा अचानकपणे सभागृहासमोर का आला ? केंद्रीय कृषि मंत्र्यांनी शेतक-यांच्या कर्जमाफीच्या संदर्भात संसदेमध्ये दिलेल्या उत्तरामुळे हा विषय सभागृहासमोर आला आहे. शेतक-यांच्या आत्महत्या हा विषय ऐरणीवर का आला आहे ? महाराष्ट्रातील विशेषत: विदर्भातील शेतक-यांनी आत्महत्या केल्या. शेतक-यांच्या पोरांनी आंदोलने केली. त्यावेळी सरकारला घाम फुटला नाही. शेतकरी झाडांवर लटकले, विष पिऊन मरु लागले त्यावेळी सरकारला घाम फुटला नाही. परंतु आत्महत्यांची संख्या वाढू लागली तेव्हा या रेडयांना कर्जमाफी सुचली. होय रे, बाबा आता राज्यात गोंधळ उडणार आहे असे समजल्यावर कर्जमाफी केली. ज्या विदर्भातील शेतक-यांनी आत्महत्या केल्या, शेतक-यांच्या प्रश्नाची सोडवणूक सुरु झाली आणि ज्याच्यामुळे कर्जमुक्ती आली त्या विदर्भातील शेतक-यांना फक्त 16.80 टक्के कर्ज माफ झालेले आहे. ही बाब लक्षात ठेवली पाहिजे. कर्जमाफीचा फायदा सहकारी बँकांना मिळाला. कर्जमाफी होण्यास वेळ लागण्याची शक्यता आहे याबाबत मोठमोठया दैनिकामध्ये बातमी छापून आली त्यावेळी राज्याच्या मुख्यमंत्र्यांना असे वाटले की, आता धोरण बदलले पाहिजे, केंद्रीय कृषि मंत्र्यांनी सांगितले की, धोरण बदलले पाहिजे. परंतु आता तेच केंद्रीय कृषि मंत्री म्हणतात की, आता कोणताही निर्णय बदलणार नाही. यावरुन केंद्र सरकारला शेतक-यांबद्दल किती पुळका आहे ते दिसून आले आहे. ओळखीचा चोर जीवानिशी सोडत नाही. मला सन्माननीय सदस्य श्री.सुरेश नवले म्हणाले की, तुम्हाला कुदळ आणि टिकावमधील फरक तुम्हाला कळतो का ? तुम्ही ए.सी.मध्ये बसणारे आहात. 60 वर्षापैकी 50 वर्षे तुमच्याच पक्षाचे सरकार सत्तेत आहे, विरोधी

3....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MMP/ KGS/

श्री.पाशा पटेल.....

पक्ष एवढी वर्षे सत्तेत नव्हते. ज्याला फास आणि टिकाव कळते ती मंडळी सत्तेत नव्हती. विरोधी पक्षाच्या लोकांना माहीत नसताना सुध्दा ते उन्हातान्हात फिरु लागले आहेत, त्यामुळे आपण त्यांचे फोटो गोंदवून घ्यावेत. सत्तेत असून सुध्दा शेतक-यांना मारण्याचे पाप गेली 60 वर्षे करीत आहात, हे पाप तुम्ही कधी फेडणार आहात ? एवढया वर्षात शेतक-यांना मरणापासून वाचविण्यासाठी शासनाला कोणीही अडविले नव्हते. तुम्ही शेतकरी, मतदार शेतकरी, मंत्री शेतकरी, मुख्यमंत्री शेतकरी आणि शेतकरीच मरु लागले आहेत. काय गबरु वाघ आहात तुम्ही ? तुमचे पाय धुवून पाणी प्यायले पाहिजे. कु-हाडीचा दांडा गोतास काळ, मला दांडयाचा अर्थ कळतो, पण तुम्ही तुमच्याच लोकांची मान कापण्यात हयात घालविली, लोकांकडे बघून जोरजोरात बोलण्याचे नाटक कशासाठी करता ? मला हे कळत नाही ?

**( सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.अरविंद सावंत )**

नंतर श्री.शिगम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. पाशा पटेल....

मंडल आयोगाच्या संदर्भातील आंदोलन दिल्लीला चिघळले त्यावेळी त्या आंदोलनामध्ये तीन मुले मेली आणि देशातील सरकार पडले. मग देशातील 1 लाख 40 हजार शेतकरी आत्महत्या करीत असताना तुमचे सरकार काय करीत आहे ? काही तरी मार्ग काढाल की नाही ? तुम्ही सरकार चालवित आहात. शेतीतील तुम्ही तज्ज्ञ आहात. मग शेतकरी मरायला लागले आहेत हे तुम्हाला का कळत नाही ?..(अडथळा) .. कर्जमाफीचा शेतक-यांच्या आत्महत्येशी संबंध आहे काय ? मागील नागपूरच्या हिवाळी अधिवेशनामध्ये मी सरकारचीच आकडेवारी सरकारला दाखविली होती. केन्द्रीय शेतमाल समिती शेतक-याच्या शेतमालाचे भाव काढते आणि ते केन्द्राकडे शिफारशीसाठी पाठवते. राज्य सरकार शेतक-याच्या शेतमालाचे जे भाव काढते त्यामध्ये शेतीच्या घसा-याचा संबंध धरला जात नाही, शेतामध्ये काम करणा-या मजुराची मजुरी 66 रुपयापेक्षा अधिक धरली जात नाही, वर्षभर लागलेच्या बैलजोडीची मजुरी फक्त 13 दिवस धरली जाते. अशा प्रकारे खर्च कमी कमी करुन जे भाव काढले तेच भाव दिल्लीला पाठवले. केन्द्रीय शेतमाल समितीने त्यापेक्षा निम्मे दर जाहीर केले. मागील वेळेस जेव्हा मी या संबंधातील आकडेवारी दिली त्यावेळी माननीय कृषी मंत्र्यांनी टाळ्या वाजवल्या, माननीय मुख्यमंत्र्यांनी माझे कौतुक केले. मला वाटले, अधिवेशन संपल्यानंतर माननीय मंत्री महोदय मला आपल्या ऑफीसमध्ये बोलावतील, चहा पाजतील आणि विचारतील. पण मला कोणीही विचारले नाही. याचा अर्थ असा की, हे प्रश्न सोडविण्याच्या बाबतीत सरकार गंभीर नाही. सभापती महोदय, या सदनाचे नेते येथून का उठून गेले हे मला कळत नाही. त्यांच्याकडून एक चूक झालेली आहे. गेल्या 6 महिन्यामध्ये ग्रामीण भागाचे नुकसान जास्त कोणी केले असेल तर ते या राज्याचे माननीय उपमुख्यमंत्री श्री. आर.आर.पाटील यांनी केलेले आहे. त्यांनी कोपरापासून, ढोपरापर्यन्त सोलतो, फोडतो अशा घोषणा केल्या. त्यामुळे ज्यांच्याकडून घेतले त्याला परत द्यायचे नाही आणि ज्याला दिले त्याला परत द्यायचे नाही... सन्माननीय सहकार मंत्री डॉ. पंतगराव कदम यांना मी सांगू इच्छितो की, गावामध्ये काय चालले आहे ते त्यांना कळणार नाही. गावामध्ये सावकारी कशासाठी असते हे मी सांगतो. सावकारी लग्नासाठी असते. लग्न झालेल्या मुलीला सासरी पाठविण्यासाठी सावकारी असते, माहेरी आलेल्या मुलीला सासरी पाठवताना तिच्या लुगड्याच्या पैशासाठी सावकारी असते. ही गावातील सिस्टिम आहे.

...नंतर श्री. गिते...

श्री.सय्यद पाशा पटेल...

ही सिस्टीम तुमच्या बोलण्याने उद्ध्वस्त करुन घेऊ नका. बॅक काही माझ्या बहिणीच्या लुगडयासाठी कर्ज देणार नाही. माझ्या मुलीचे डोहाळे जेवण थांबले आहे. त्यासाठी देखील पैसे मिळणार नाहीत. बँकेत एक कागद कमी असला तर बँकेचा मॅनेजर दरवाज्यात येऊ देत नाही. पण माझ्या गावातील माणसाला माहिती असते की, गावातील नाते बंद झाले तर माणूस मेलेला परवडतो, परंतु अशी वेळ त्याच्यावर येऊ नये. परंतु परिस्थितीचे भान न ठेवता गेल्या सहा महिन्यामध्ये बेछूट गोष्टी तुम्ही बोलत गेलात, त्यामुळे ग्रामीण भागातील अर्थव्यवस्था खिळखिळी झालेली आहे. त्याचे काय होईल हे सांगता येत नाही. काही तरी करुन तर दाखवा. माझ्याकडे एक प्रकरण आहे. त्या प्रकरणाच्या कागदपत्राचे वजन पाव किलो आहे. ही सर्व निवेदने आहेत. बीड जिल्हयातील आंबेजोगाई तालुक्यातील हे प्रकरण आहे. श्री. उग्रसेन शंकरराव किर्तद नावाचा शेतकरी आहे. या शेतक-याने सावकाराकडून 40 हजार रुपये कर्ज घेतले. त्या शेतक-याने सावकाराला 1 लाख रुपये दिले. पुन्हा 50 हजार रुपये द्यावेत म्हणून तो सावकार शेतक-याचा छळ करीत आहे. या शेतक-याने 15.11.2006 रोजी श्री.आर.आर.पाटील यांना पत्र लिहिले आहे. 14.3.08 रोजी श्री.आर.आर.पाटील यांना पत्र लिहिले आहे. 14.12.07 सहाय्यक निबंधक यांना पत्र लिहिले आहे. 13.2.08 रोजी निबंधक यांना पत्र लिहिले आहे. जिल्हा पोलीस प्रमुखांना 3.3.08 रोजी पत्र लिहिले आहे. 29.11.06 रोजी पोलीस निरीक्षक यांना पत्र लिहिले आहे. सहाय्यक निबंधक यांना 23.3.06 रोजी पत्र लिहिले आहे. 14.2.06 रोजी सहाय्यक निबंधकांना पत्र लिहिले आहे. पी.एस.आय. यांनाही 10.06 रोजी पत्र लिहिले आहे. त्या शेतक-याने माझी जमीन मिळवून द्यावी म्हणून जवळपास 20 अर्ज संबंधित अधिका-यांकडे पाठविलेले आहेत.

प्रा.सुरेश नवले : माझी आग्रहाची विनंती आहे की, ग्रामीण भागातील सावकाराच्या सावकारी पध्दतीचे विस्तृतपणे विवेचन केले आहे. त्यासंबंधीचे अनुकरण अतिशय व्यवस्थितपणे केले आहे. आता पुन्हा सावकारांच्या संदर्भात ते बोलत आहेत.

श्री.सय्यद पाशा पटेल : आपण माझे पूर्ण भाषण ऐकून घेतले तरच तुम्हाला ते कळेल. माझे भाषण तुम्हाला कळणार नाही हा काही माझा प्रॉब्लेम नाही. तो तुमचाच प्रॉब्लेम आहे. मी काय बोलतो आहे याचे मला पूर्णपणे भान आहे. मला तेवढी सदसदविवेकबुध्दी आहे. मी एका विषयासाठी लढलेलो आहे. सावकाराच्या तावडीतून मोकळे करतो म्हणून तुम्हीच आम्हाला सांगत





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सय्यद पाशा पटेल...

आहात. एवढे अर्ज करुन त्या शेतक-याची जमीन मोकळी करुन देण्यास काय हरकत होती ? परवा एक प्रकरण निदर्शनास आले आहे. राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या सावकाराने गावातील जमीन दाबली. आमची दुतर्फा कोंडी झाली आहे. सावकारांच्या ताब्यातून शेतक-यांच्या जमिनी सोडवून देऊ असे शासनाने आम्हाला सांगितले आहे त्याप्रमाणे शेतक-यांच्या जमिनी सावकाराकडून सोडवून दिल्या नाही. यासंदर्भात अनेक अर्ज केले परंतु त्या अर्जांचा काही उपयोग झाला नाही. पूर्वी जी सिस्टीम होती ती आपण बरबाद केली. त्यामुळे डबल फाइर्न शेतक-यांच्या नशिबी आलेला आहे. माननीय सहकार मंत्र्यांनी सांगितले की, यासंदर्भात कायदा आणणार आहोत. मला सांगावयाचे आहे की, गावातील सावकारी जग बुडेपर्यंत संपणार नाही. शेतक-यांकने माझ्याकडून पैसे घेतले आहे असे सावकार काही सांगत नाही. शेतक-याच्या शेतीमालाला भाव नाही. गेल्या 60 वर्षापासून या देशातील व्यवस्थेने शेतक-यांचे शोषण केलेले आहे. सध्या जगण्या पेक्षा मरण बरे अशा अवस्थेत शेतक-यांना आपण आणले आहे. बारक्या बारक्या गोष्टीसाठी सावकाराकडे जावे लागते. तुम्ही सावकारीची सिस्टीम एका दिवसात तोडू शकत नाही. नवीन सिस्टीम डेव्हलप करुन सगळया ग्रामीण भागात गरजेपोटी कर्ज तुम्ही देऊ शकत नाही. यासंबंधीचा कायदा करताना ग्रामीण भागाच्या या अवस्थेचे भान सरकारला राहिले तर काही तरी होईल. याच्या केसेस त्याच्यावर आणि त्यांच्या केसेस यांच्यावर अशी परिस्थिती निर्माण होईल. मारामा-या शिवाय यातून मार्ग निघणार नाही...

यानंतर श्री. कानडे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पाशा पटेल...

शेतकऱ्यांचा प्रश्न सोडवायचा असेल आणि शेतीचा देखील प्रश्न सोडवायचा असेल तर यानिमित्ताने मी काही सूचना करणार आहे. शेतकरी वाचवायचा असेल तर त्याला वैयक्तिक विमा संरक्षण दिले पाहिजे. जोपर्यंत शेतकऱ्याला वैयक्तिक विमा मिळणार नाही तोपर्यंत त्याची प्रगती होणार नाही. सहकाराच्या माध्यमातून शेतीला कर्ज मिळते त्या कर्जाची मर्यादा शासनाने वाढवावी ही माझी दुसरी सूचना आहे. हेक्टरी 20-25 हजार रुपये कर्ज मिळते. पण आता महागाई वाढलेली आहे. नांगरणी, कोळपणी, बियाणे, खते, मजुरीचे दर वाढलेले आहेत. म्हणून कर्जाची मर्यादा देखील वाढविणे आवश्यक आहे. मी याबाबत सांगू इच्छितो की, शेतकऱ्याच्या जमिनीच्या आणि एकूणच प्रॉपर्टीच्या 50 टक्के कर्ज जोपर्यंत मिळणार नाही तोपर्यंत शेतकऱ्याचे जमणार नाही. परंतु या मूलभूत गोष्टी होत नाहीत. चिंतन होत नाही, मनन होत नाही. या सर्व गोष्टी शासनासमोर आलेल्या आहेत. सरकारने शेतकऱ्याचे भले केले नाही तरी निदान वाईट तरी करु नये अशी अपेक्षा आहे. विरोधी पक्षनेत्यांनी परभणी जिल्हयाचे उदाहरण याठिकाणी दिले. कॉँग्रेसच्या चेअरमनचे स्टेटमेंट आहे. पीक कर्ज वाटप बंद. म्हणजे 60 वर्षांची परंपरा मोडीत काढली आहे. परभणीची केस सांगितली. त्याचप्रमाणे लातूर, जळगांव, पंढरपूर, सोलापूर याठिकाणी देखील तीच परिस्थिती आहे. कारण वरुनच आदेश नाहीत, कायदा नाही तर खालचे काय करणार ? घोड ऐकत नाही म्हणून शिंगराचे कान धरुन काय उपयोग होणार आहे. गेले सहा महिने शेतकऱ्यांच्या जीवनाशी शासनाचा खेळ चालला आहे. हे कुठे तरी थांबले पाहिजे. कर्ज देण्याच्या बाबतीत मी काही सूचना करणार आहे. विदर्भामध्ये जास्त जमीनधारक शेतकरी आहेत. कर्जमाफीचे धोरण निश्चित करताना जमिनीची मर्यादा वाढविली पाहिजे. कर्जाच्या रकमेचा नेमका आकडा काढला पाहिजे. व्याजाच्या संदर्भात निर्णय झाल पाहिजे. शासनाने कर्ज माफ केले तरी शेतकऱ्यांच्या हातात काहीच पडणार नाही. कर्जमाफीचे पैसे बुडलेल्या बँकांना जिवंत करण्यासाठी वापरले गेले. बँकांची परिस्थिती सुधारली पण शेतकऱ्यांच्या हातात एक रुपया पडला नाही. शेतकऱ्यांच्या हातात दोन पैसे पडावे असे वाटत असेल तर सिस्टीम तयार केली पाहिजे. शासन ती करणार नाही हे मला माहीत आहे. माझ्या लातूर जिल्हयामध्ये दररोज दीड कोटी रुपयांचा फटका शेतकऱ्यांना बसतो आहे. सरकार व्यापाऱ्यांच्या घरावर/गोदामावर धाड टाकीत आहे. सरकार धान्य साठविण्यासाठी गोडाऊनच्या माध्यमातून शेतकऱ्याला मदत करते. त्यासाठी त्याला सबसिडी मिळते. शासनाची





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पाशा पटेल....

यंत्रणाच पुन्हा त्या व्यापाऱ्यावर धाड मारते. मग व्यापाऱ्याने माल ठेवायचा कुठे हा प्रश्न निर्माण होतो. जिकडे पहाल तिकडे अंदाधुंदी चालू आहे. अशा अंदाधुंदीमुळे शेतकऱ्यांच्या अवस्था बेचैनीसारखी झालेली आहे. मी यानिमित्ताने सहकार मंत्र्यांना विनंती करणार आहे की शेतकऱ्यांचा प्रश्न मिटविण्यासाठी काही तरी करा. मगाशी मी जी बीड जिल्हयातील केस सांगितली त्या शेतकऱ्याला तरी न्याय देणार काय ? एवढे विनंतीअर्ज करुन सुध्दा त्याला न्याय मिळाला नाही. पोलीस खात्याने सांगितले आम्ही आमचे काम केले, सहकार खात्याने सांगितले आम्ही आमचे काम केले आहे. परंतु शेतकऱ्याच्या नावावर जमीन झाली नाही. घोषणा फक्त कागदावर झाल्या. घोषणा अंमलात आणण्यासाठी सरकारजवळ जादूची कांडी नाही.

नंतर श्री. भोगले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पाशा पटेल..........

आणि पुन्हा एकदा सांगतो की, जर समजा माझ्या गावातील सावकाराने रजिस्ट्री करुन दिली, रजिस्ट्री करुन देतो, विश्वास बैनामा देतो. विश्वास बैनामा याचे शब्दामध्ये रुपांतर करणार असाल तर त्याचा उपयोग होणार आहे. या सगळ्या गोष्टी नवीन कायदा करताना विचारात घ्याव्यात. काही ग्रामीण भागातील लोकांशी संपर्क साधावा. याठिकाणी जे सन्माननीय सदस्य उपस्थित आहेत त्यांना विचारावे. तुम्ही केवळ तुमचेच काही लिहिले, ताकदीच्या जोरावर मंजूर करुन घ्याल. तसे करु नका. अशीच कुठे ताकद वापराल तर पुढच्या वेळी तुम्ही इकडे आणि आम्ही तिकडे असे होणार आहे. अशी वेळ येऊ देऊ नका. आपल्या हातून शेतकऱ्यांचे काही भले होणार आहे का एवढा विचार करावा एवढे बोलून माझे भाषण पूर्ण करतो.

-----------------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: माननीय मंत्री (पदुम) यांच्या मंत्रालय इमारतीमधील कार्यालयाच्या मिटींग हॉलमध्ये शॉर्ट सर्किट झाल्याने लागलेली आग

**मु.शी.**: माननीय मंत्री (पदुम) यांच्या मंत्रालय इमारतीमधील कार्यालयाच्या मिटींग हॉलमध्ये शॉर्ट सर्किट झाल्याने लागलेली आग यासंबंधी माननीय सार्वजनिक बांधकाम राज्यमंत्र्यांचे निवेदन.

श्री.रविशेठ पाटील (सार्वजनिक बांधकाम राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 46 अन्वये पुढील निवेदन करतो :-

नि वे द न

(प्रेस येथे सोबतचे निवेदन छापावे)

--

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : केंद्र शासनाने शेतकऱ्यांना जाहीर केलेली कर्जमाफी

मु.शी. : केंद्र शासनाने शेतकऱ्यांना जाहीर केलेली कर्जमाफी या विषयावर सर्वश्री पांडुरंग फुंडकर, मधुकर सरपोतदार, नितीन गडकरी, दिवाकर रावते, डॉ.दिपक सावंत, सर्वश्री.अरविंद सावंत, पाशा पटेल, अरुण गुजराथी, गुरुनाथ कुलकर्णी, भास्कर जाधव, राजन तेली, प्रा.सुरेश नवले, श्री.कपिल पाटील, वि.प.स. यांचा प्रस्ताव

(चर्चा पुढे सुरु.......

श्रीमती उषा दराडे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, नियम 260 अन्वये मांडलेल्या प्रस्तावावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभी आहे.

केंद्र सरकारने 5 एकरच्या आतील शेतकऱ्यांची 60 हजार कोटी रुपयांची कर्जमाफी केली याबाबतच्या भूमिकेचे स्पष्टीकरण जाणून घेण्यासाठी मी काही मुद्दे उपस्थित करणार आहे. 5 एकरपेक्षा जास्त जमिनी आहेत, परंतु कोणतेही उत्पन्न नाही अशा शेतकऱ्यांना फायदा मिळणार का? कशा पध्दतीने मिळणार आहे आणि केव्हा अंमलबजावणी होणार आहे? 31 मार्च ही तारीख बदलून पुढील तारीख मिळणार आहे का? त्यासाठी मुदत वाढणार आहे का? अशा अनेक बाबींवर चर्चा उपस्थित करण्यात आली आहे. मूळ मुद्यावर बोलत असताना मला समोरच्या बाकावरुन केलेल्या भाषणाबद्दल खंत व्यक्त करावीशी वाटते. आपण 12 महिने, 24 तास फक्त नकारात्मक सूर लावणार आहात का? लोकशाहीमध्ये विरोधी पक्षाची भूमिका सकारात्मक असेल तर लोकशाही सुदृढ होते. विरोधकांनी विषय खूप चांगला घेतला. परंतु विषय मांडताना नकारात्मक भूमिका घेतली. आत्महत्या, आत्महत्या म्हणून उल्लेख केला गेला. आत्महत्या होत नाहीत का? होतात. आज सत्ताधारी पक्षाने, केंद्र शासनाने, राज्य शासनाने मान्य केले आहे. शेतकरी अडचणीत आला त्याला त्यातून बाहेर काढले पाहिजे. त्यासाठी काय मार्ग काढायचा याचा विचार झाला पाहिजे. पूर्वी कर्जपुरवठा 12 टक्के दराने व्हायचा. नंतर 10 टक्के दराने होऊ लागला. नंतर 8 टक्क्याने आणि आता 6 टक्के दराने कर्जपुरवठा केला जात आहे. अंमलबजावणीमध्ये काही बँकांच्या वतीने गडबडी होतात. पाहिजे त्या प्रमाणात सुरळीत झालेले नाही. परंतु कर्जपुरवठा होत आहे. ज्या घटना घडतात त्यामध्ये काही चांगल्या गोष्टी देखील आहेत त्या समाजासमोर ठेवल्या पाहिजेत. खुल्या दिलाने ठेवल्या पाहिजेत. केंद्राचे व राज्याचे सरकार शेतकऱ्यांना अडचणीतून बाहेर काढण्यासाठीच असते. जे प्रयत्न केले जातात त्याबद्दल मोकळया मनाने स्वागत केले पाहिजे.

..4..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती उषा दराडे..........

जनसामान्यांवर परिणाम होतात त्यावेळी सत्ताधारी पक्षाच्या लोकांच्या स्टेटमेंट होतात तशा विरोधकांच्या स्टेटमेंट होतात. आई वडील रडके असले तर मुलाच्या मनामध्ये आत्मविश्वास कसा निर्माण होईल? शेतकऱ्यांना आत्मविश्वास द्यावयाचा असेल, जगण्यासाठी श्वास घेण्याच्या दृष्टीने तर उभे करावयाचे असेल तर 100 टक्के कर्जमाफीतून तो उभा राहू शकतो का? नव्याने कसे जीवन उभे करण्याचा विश्वास द्यायचा असेल तर नकारात्मक भूमिका घेणे योग्य नाही अशी भावना याठिकाणी व्यक्त करते. याठिकाणी केंद्र शासनाने जो कर्जमाफीचा निर्णय घेतला त्याबद्दल खुलासा होणे आवश्यक आहे.

(नंतर श्री.जुन्नरे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती उषा दराडे....

मागे सुध्दा अर्थसंकल्पावर बोलत असतांना या गोष्टीची विनंती केली होती की, कर्ज माफी करत असतांना महाराष्ट्रातील अनेक जमिनींचे भुसपांदन झालेले आहे. मग त्या जमिनींचे भूसंपादन 33 के.व्ही. साठी असेल, पाझर तलावासाठी असेल, साठवण तलावासाठी असेल, मोठया धरणांसाठी असेल किंवा रस्त्यांसाठी असेल. खरे म्हणजे आम्ही आमच्या शेतक-याला नीट शिकवण्याचा कधीही प्रयत्न करीत नाही. ज्या त्या वेळेला ती गोष्ट करावयास पाहिजे हे त्याला माहिती नसते. म्हणून 10-20 वर्षापूर्वी ज्या जमिनी संपादित झाल्या, त्यांचे निवाडे झाले परंतु त्या जमिनी सातबाराच्या उता-यावरुन कमी करण्यात आल्या नाहीत. रेकॉर्ड ऑफ राईटला नोंद करण्याची जबाबदारी विशेष भूसंपादन अधिकारी आणि रेव्हेन्यू अधिका-यांची आहे. ज्यांच्या जमिनी भूसंपादित झाल्या आणि जो शेतकरी पाच एकराच्या आतील आहेत त्या जमिनी रेकॉर्ड ऑफ राईटला करेक्ट करुन द्याव्यात किंवा नाही झाल्या तर ॲवार्ड स्टेटमेंट येईल किंवा शेतक-याने निवाडा दाखल केला किंवा अधिका-यांनी केले तर ते बँकानी मान्य केले पाहिजे. या विषयाच्या संदर्भात मी विशेष उल्लेखाची सूचनाही केली होती. या विषयाच्या संदर्भात माननीय सभापती महोदयांनी निर्देशही दिले होते. हे प्रकार केवळ बीड जिल्हयातच घडलेले आहेत असे नसून संपूर्ण महाराष्ट्रात असे प्रकार घडलेले आहेत त्यामुळे शासनला यासंदर्भात गंभीर दखल घ्यावी लागणार आहे. या अडचणीमुळे हजारो शेतकरी केंद्रसरकारच्या कर्जमाफीच्या योजनेच्या लाभापासून वंचित राहण्याचा धोका निर्माण झालेला आहे. माझ्याकडे बीड जिल्हाधिका-याचे पत्र आलेले आहे. त्यांनी असे सर्क्युलर काढलेले आहे की, सर्व शेतक-यांनी आपापल्या जमिनी कमी करुन घ्याव्यात, तलाठयांने दवंडी पिटावी, तहसीलदाराने प्रयत्न करुन या जमिनी रेक्टीफाईड कराव्यात. हे मोठे काम असल्यामुळे एक दोन दिवसात पूर्ण होणारे काम नाही. त्यामुळे या कामासाठी वेळ देण्याची आवश्यकता आहे. मी एका शेतक-याला ॲवार्ड स्टेटमेंट घेऊन बँकेकडे उदाहरणादाखल पाठवले होते. त्यावेळेस बँक मॅनेजरने ही भूमिका घेंतली की, ज्या तारखेला तुम्ही कर्ज घेतले त्या तारखेला तुमच्या सातबाराच्या उता-यावर 10 एकर जमीन होती. परंतु त्या तारखेच्या अगोदरच ॲवार्ड पास झाले होते परंतु शासनाने ही जमीन रेकॉर्ड ऑफ राईटला कमी केली नाही. विशेष भूसंपादन अधिका-याने रेव्हेन्यू तालुका अधिका-याला पत्र पाठविले पाहिजे की, या या जमिनीचे भूसंपादन

...2

श्रीमती उषा दराडे....

झाले असल्यामुळे या जमिनी सातबाराच्या उता-यावरुन कमी करा. असे तहसीलदाराने तलाठयाला कळवले पाहिजे. ही जबाबदारी शासनाची आहे. परंतु शासनाच्या चुकीमुळे शेतकऱ्यांना शिक्षा भोगावी लागत आहे. माननीय मंत्री महोदयांना मी विनंती करु इच्छिते की, या संदर्भात सर्व बँकांना सर्क्युलर काढण्याची आवश्यकता आहे. एखादा शेतकरी जमीन संपादन केल्याचे अवॉर्ड आणि स्टेटमेंट घेऊन आला असेल, ज्यामध्ये जमीन शासनाकडे संपादित झालेली असेल त्याचे पैसे शेतकऱ्याला दिलेले असेल परंतु ही जमीन रेकॉर्ड ऑफ राईटवरुन कमी झालेली नसेल अशा परिस्थितीत या शेतकऱ्यांना देखील कर्जमाफीचा लाभ मिळाला पाहिजे. या दृष्टीने बँकांशी व रेव्हेन्य ऑफिसरशी बोलण्याची गरज आहे. तसेच या बाबींचा मोठया प्रमाणात प्रचार करुन शेतकऱ्यांना त्याची माहिती करुन देण्याची आवश्यकता आहे. माननीय मंत्री महोदय, पतसंस्था देखील मर्यादित राहतील या आपल्या निर्णयाबाबत केंद्र शासनाचे व राज्य शासनाचे मी स्वागत करते. सन्माननीय सदस्या श्रीमती मंदा म्हात्रे यांची देखील एक पतसंस्था आहे. यामध्ये एक बाब लक्षात आणून द्यावयाची आहे की, राज्यामध्ये मागील 6 ते 7 वर्षापासून महिला बचत गटांनी जिल्हा पातळीवर पतसंस्था स्थापन केलेल्या आहेत. त्यातील 99 टक्के महिलांनी शेतीसाठी कर्ज घेतलेले आहे. त्यातील बऱ्याच महिला थकबाकीदार आहेत. मधील काही 3 ते 4 वर्षे पाऊस अनियमित पडला होता. शेतीच्या व्यवसायामध्ये शेळयांसाठी, कोंबडयांसाठी, दुधाच्या व्यवसायासाठी, पेरणीसाठी त्यांनी पैसे घेतलेले आहेत. जिल्हा बचत गटाच्या ज्या पतसंस्था आहेत, ज्यांनी शेती करण्यासाठी कर्ज धेतले आहे, त्या संदर्भात डीडीआरला सूचना देऊन अशा प्रत्येक जिल्हयात किती पतसंस्था अहेत, किती गटाच्या महिलांचे शेतीसाठीचे कर्ज थकीत आहे याचीसुध्दा आपण माहिती घ्यावी व त्यांना देखील हा लाभ मिळवून द्यावा. बहुतेक वेळा गरीब माणसावरच अन्याय होतो. आमच्या महिला भगिनींवर अन्याय होऊ नये याची दक्षता आपण घेणे गरजेचे आहे. दुसरा मुद्दा असा आहे की, शेतीकर्ज वाटपामध्ये, बीड आणि नगर जिल्हयामध्ये, सोसायटींच्या वतीने जे कर्ज दिले जाते त्यामध्ये दुपटीचा फरक आहे. बीडमध्ये जर 25 हजार रुपये दिले जात असतील तर नगर जिल्हयामध्ये 45 -50 हजार रुपये दिले जातात. त्यामुळे हा फरक कसा मिटवता येईल याचा विचार करणे आवश्यक आहे. मला अजूनही विरोधी पक्षाचा ट्रेंड आश्चर्यकारक वाटतो.

....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती उषा दराडे....

माननीय शरद पवार साहेब केंद्रामध्ये कृषी मंत्री झाल्यानंतर त्यांनी माननीय पंतप्रधानांना, माननीय सोनीया गांधींना, माननीय अर्थमंत्र्यांना ही बाब प्रस्ताव देऊन समजावून सांगितली व त्यानंतर त्य सर्वांनी ही बाब एक्सेप्ट केली. खरे म्हणजे शेतकऱ्याचे पोर कृषी मंत्री झाल्यामुळे ही घटना घडली आहे ही गोष्ट आपण सर्वांनी मान्य करण्यास काही हरकत नाही.

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती उषा दराडे.

माननीय उप मुख्यमंत्री श्री.आर.आर पाटील यांच्यावर नेहमीच टीका होत असते व त्यांना असे सांगण्यात येते की, तुम्ही या विषयावर बोलू नका. माझे असे म्हणणे आहे की, आंबानी बोलले पाहिजे. समाजातील ज्या काही चुकीच्या घटना आहेत, सोसायटीतील ज्या एव्हील्स आहेत त्याबाबतीत आत्मविश्वासाने बोलावयाचे नाही काय ? जर त्याबाबतीत आत्मविश्वासाने बोलले तरच सामान्य माणूस चुकीच्या गोष्टीच्या विरोधात पेटून उठेल. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.पाशा पटेल यांनी जो मुद्दा मांडलेला आहे त्याबाबत मला बोलावयाचे आहे ही सिस्टीम मोडून काढत आहात असा आरोप त्यांनी केलेला आहे मला या आरोपाचे फार वाईट वाटले आहे. ही कोणती सरंजामी सिस्टीम आहे. 20 हजार रुपये जर एका शेतक-याने कर्ज घेतले असेल तर एक ते दीड लाख रुपये त्याला फेडावे लागते ही सिस्टीम आपण पोसावयाची काय ? मुलीच्या लग्नाला कर्ज मिळत नाही व महागाई वाढलेली आहे त्यामुळे आमच्या कडे गेटकेन पध्दतीचे लग्न होत आहेत. त्या पध्दतीनुसार सात आठ माणसे एका जीपमध्ये बसतात आणि देवस्थळी जाऊन विवाह लावतात त्यासाठी लग्नपत्रिका छापल्या जात नाहीत तर वधूकडील चार पाच व्यक्ती आणि वराकडील चार पाच व्यक्ती जमतात व विवाह लावतात . यावरुन असे दिसून येते की, लोकांना परिस्थितीतून मार्ग काढण्याची सवय झाली आहे. जुलै 2005 मध्ये मुंबईत मुसळधार पाऊस पडून प्रलय आला होता तरी दोन दिवसात मुंबईचे व्यवहार सुरळीत सुरु झाले होते.लोकांना परिस्थितीतून मार्ग काढण्याची सवय असून त्यांना मार्ग दाखविण्याची शक्ती शासनाकडे किती आहे, पोलिटीकल विल किती आहे यावर राज्य चालते.त्यामुळे राज्यात सुरु असलेली सावकारी सिस्टीम सध्या मोडून काढण्यात आलीच पाहिजे असे मला वाटते. या सिस्टीमचा परिणाम केवळ त्या व्यक्तीच्या आर्थिक परिस्थितीवरच होत नाही तर राज्याच्या आर्थिक परिस्थितीवर होत असतो. सावकाराकडून कर्ज काढल्यानंतर आदिवासी, दलित, अल्पसंख्याक, मजूर यांच्यावर बिकट प्रसंग ओढवतो. ज्या घरातील व्यक्तीने कर्ज काढले असते त्या घरातील महिलांवर सुध्दा कोणता प्रसंग येत असेल याचा विचार करुन पहावा. त्यामुळे सावकारांना सोलून काढले पाहिजे असे केवळ माननीय उप मुख्यमंत्र्यांनी बोलणे बरोबर नाही तर सावकारांना कारावासात पाठविलेच पाहिजे
अशा प्रकारची कठोर भूमिका घेतली पाहिजे. व त्यासाठी शेतकऱ्यांनीसुध्दा आत्मविश्वासाने उभे राहिले पाहिजे. सावकारांविरुध्द कारवाई करण्यासंबंधीचे बिल आणण्यात येणार आहे तेव्हा हे बिल

2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लवकरात लवकर आणावे अशी माझी शासनाला विनंती आहे.लवकरात लवकर बिल आणून या राज्यातील शेतक-यांना दिलासा देऊन नवीन क्रांतिकारक व ऐतिहासिक पाऊल शासन उचलील अशी मी अपेक्षा व्यक्त करते.

सभापती महोदय, संसदेमध्ये श्री. गुरुदास गुप्ता यांनी माननीय कृषी मंत्री श्री.शरद पवार यांना प्रश्न विचारला होता तेव्हा सावकाराकडून घेतलेले कर्ज माफ केले जाईल या बाबतीत माननीय कृषी मंत्र्यांनी अशी स्पष्ट भूमिका घेतली की," सावकाराकडून कशा पध्दतीने कर्ज घेतले आहे, किती घेतले, कोणत्या पार्श्वभूमीवर घेतले होते आणि कोणत्या व्याख्येत बसवावयाचे यासंबंधी स्पष्ट कायदा नाही निरनिराळया राज्यामध्ये निरनिराळया पध्दती आहेत." त्यावेळी त्यांनी "नाऊ" हा शब्द वापरलेला होता. त्यांनी उत्तर देतांना असे म्हटले की,

"...but that is why it is not possible to take that responsibility now."

नाऊ या शब्दाचा अर्थ असा आहे की, या विषयाची क्लॅरिटी असली पाहिजे. सावकाराना कडक शिक्षा करण्याचा कायदा या राज्यामध्ये केला जाणार आहे. माननीय कृषी मंत्री महाराष्ट्राबद्दल बोलले नाहीत तर काही राज्यांबद्दल बोलले होते. इतर राज्यामध्ये संदिग्धता असतांना महाराष्ट्र सरकार मात्र नेहमीच पुरोगामी भूमिका घेत आहे.

सभापती महोदय, यानंतर मला दुसरा मुद्दा मांडावयाचा आहे. रामभाऊ म्हाळगी ट्रस्टने 500 शेतक-यांचे पुनर्वसन करण्याचे ठरविले तर तुम्ही टाळया वाजवता परंतु केन्द्रसरकारने 80 टक्के शेतक-यांवरील कर्ज माफ केल्यानंतर आपण टाळया वाजविणार नाही काय ? 20 टक्के शेतकरी राहिले आहेत त्यांच्यावरील कर्ज सुध्दा माफ झाले पाहिजे या भूमिकेला कोणीही विरोध करीत नाही. कोकणामध्ये देखील अशाच प्रकारची स्थिती आहे. डोंगरावर आंब्याची झाडे असतील चार पाच एकरच्या टेकडया असतील तर त्या शेतक-याना कर्ज माफी पासून वंचित ठेवण्यात येणार आहे काय ? मराठवाडयात सुध्दा हीच स्थिती आहे. भालाघाट पर्वत रांगामध्ये कुसळं, हुलगेसुध्दा उगवत नाहीत. त्यामुळे तेथील डोंगरात कोरडवाहू बाजरीचे पीक घेण्यात येते. ही बाजरी खाण्यास फार चवदार लागते. या जमिनीच्या बाबतीत आम्हाला फार सरंजामी हव्यास असतो.

3...



VTG/ KTG/ SBT/ 16:55

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती उषा दराडे.

अजूनही आजोबाचे नाव सुध्दा सात बाराच्या उता-यावर आहे. कै. मारुती दगडू घुले यांना आठ मुले असून मारुतीचे निधन झालेले आहे परंतु अजूनही त्या सात बाराच्या उता-याची फोड झालेली नाही . अजूनही मुलांच्या नावावर जमीन झालेली नाही वडिलांच्या नावावरच ही जमीन आहे.पारंपारिक पध्दतीला चिटकून राहण्याची ही पध्दत आहे. घर मोडले आणि अंगावर पडले तरी वडिलांचे घर आहे म्हणून दुस-या घरात जावयाचे नाही तर तेथेच रहावयाचे अशा प्रकारची पारंपारिक पध्दतीची लोकांना सवय झालेली आहे. त्यामुळे सात बाराच्या उता-यावर फोड झालेल्या नाही. त्यामुळे हे शेतकरी कर्ज माफी पासून वंचित राहणार आहेत. माननीय मंत्री महोदयांना माझी हात जोडून विनंती आहे की, याबाबतीत महाराष्ट्र सरकारने एकदा क्रांतिकारक निर्णय घ्यावा. मध्यंतरी विजेचे बिल काही दिवसासाठी माफ केलेले होते ना ? केन्द ् सरकाने पाच एकर पेक्षा कमी शेती असलेल्या शेतक-यांचे कर्ज माफ केलेले आहे ना ?मग त्यापेक्षा जास्त शेती असलेल्या शेतक-यांचे कर्ज राज्य सरकारने माफ केले पाहिजे व त्यामध्ये महाराष्ट्राचा काही ना काही तरी वाटा असलाच पाहिजे असे मला वाटते. तेव्हा याबाबतीत राज्य सरकारने क्रांतिकारक निर्णय घ्यावा अशी माझी सरकारला विनंती आहे.

सभापती महोदय, यानंतर मला शेवटचा एक मुद्दा मांडावयाचा आहे. कृषी क्षेत्रामध्ये महिलांचा सहभाग वाढविला पाहिजे आणि कृषी क्षेत्राला उद्योगाचा दर्जा देऊन ग्रामीण भागातील रोजगार निर्मिती वाढविण्यात आली पाहिजे पाच एकर पेक्षा जास्त शेती असलेल्या शेतक-याचे कर्ज माफ करण्यासाठी काही ना काही तरी क्रायटेरिया ठरविण्यात आला पाहिजे. जो कोरडवाहू शेतकरी आहे व त्याच्याकडे पाच एकर ,दहा एकर जमीन असली तरी त्याला कर्जमाफीचा फायदा दिला पाहिजे. हा फायदा राज्य सरकार देईल अशा प्रकारचा आत्मविश्वास बाळगून केन्द्र सरकारचे आणि राज्य सरकारचे अभिनंदन करुन मी माझे विचार येथेच संपविते. जयहिंद, जय महाराष्ट्र.

---------------------------

( यानंतर श्री.जामा यांचे हिंदी भाषण
श्री.सुंबरे यांच्याकडे )

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री सय्यद जामा (विधानसभा द्वारा निर्वाचित ): सभापति महोदय, किसानों की आत्महत्या एवम् कर्ज माफ करने के संबंध में इस सदन में इसी अधिवेशन में यह दूसरी बार चर्चा हो रही है. लेकिन किसानों की आत्महत्या के बारे में मैंने अभी कुछ सम्माननीय सदस्यों के भाषण सुने हैं, उससे थोड़ी मुझे निराशा हुई है. सम्माननीय सदस्य किसानों की आत्महत्या और कर्ज माफ करने के संबंध में बोलने के बजाए ज्यादातर अपने आका का नाम लेते रहे कि, कैसे उनके आका की वजह से ये कर्ज माफ हुए, ताकि उनके आका खुश हो जाए. यह अच्छी बात नहीं है. क्योंकि सही तौर में यह बड़ी चिंता का विषय है. आज आम जनता में राजनैतिक नेताओं की क्रेडिट बहुत खराब है. विपक्ष के नेता हो या सत्ता पक्ष के नेता हो, उनकी बात आम जनता अब गंभीरता से नहीं लेती है. क्योंकि यहां पर समस्याओं को गंभीरता से नहीं रखा जाता है, ऐसी आम सोच है. इसलिए हम सबको गंभीरता से लेना होगा. हम सभी पक्षों के लोगों को मिलकर इस समस्या पर समाधान ढूंढने के लिए मिलकर काम करना चाहिए. मैं सम्माननीय सदस्य श्री फुंडकर जी का अभिनंदन करता हूं कि उन्होंने अधिवेशन शुरु होने से पहले सम्माननीय मुख्यमंत्री, उप मुख्यमंत्री से अनुरोध करके इस विषय पर बैठक आयोजित की और किसानों की आत्महत्या के संबंध में चिंता व्यक्त की. यह बात सही है कि कोई भी राजनीतिक पार्टी हो, सत्ताधारी पक्ष हो या विरोधी पक्ष हो, कोई भी नहीं चाहेगा कि किसान आत्महत्या करें. पूरे देश में सारे राज्यों में किसान आत्महत्या कर रहे हैं. हमारे राज्य में कोंकण, मराठवाड़ा, विदर्भ में किसानों ने आत्महत्या की हैं और अभी भी विदर्भ में किसानों की आत्महत्या जारी है. वेस्ट बंगाल में जहां सीपीएम की पिछले 30 सालों से सरकार है और जहां क्रांतिकारी सुधार का डंका पीटा जाता है वहाँ भी किसानों ने आत्महत्या की है. उसी प्रकार से पंजाब, छत्तीसगढ़, मध्यप्रदेश, बिहार, झारखंड इत्यादि राज्यों में भी किसान आत्महत्या कर रहे हैं. जब हर राज्यों में किसान आत्महत्या करने लगे तब केन्द्रीय सरकार का भी ध्यान इस समस्या की ओर गया. विदर्भ में सबसे ज्यादा आत्महत्या हुई. लेकिन किसी ने यह कारण नहीं बताया कि किसान आत्महत्या क्यों कर रहे हैं ? यह समस्या पैदा होने के बाद सम्माननीय प्रधानमंत्री जी ने और सम्माननीय मुख्यमंत्री जी ने किसानों को राहत देने के लिए पॅकेज की घोषणा की. मैं इस संबंध में यह कहना चाहता हूं कि राज्य में कहीं भी जब किसान आत्महत्या करता है तो उसके परिवार को सहायता करते समय या कॉम्पेनसेशन देते

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

एसबीटी

17:00

श्री सय्यद जामा .....

समय भेदभाव नहीं करना चाहिए. आत्महत्या ग्रस्त हर परिवार को जरुर सहायता मिलनी चाहिए. चाहे आत्महत्या करने वाला किसान मराठवाड़ा का हो, कोंकण का हो, विदर्भ का हो, किसी भी क्षेत्र का किसान जब आत्महत्या करता है तो उसके परिवार को समान रुप से कॉम्पेनसेशन मिलना चाहिए. कम से कम एक लाख या दो लाख रुपये कॉम्पेनसेशन मिलना ही चाहिए. विदर्भ में सबसे ज्यादा किसानों की आत्महत्या का कारण यह है कि वहां पर पर्याप्त सिंचाई सुविधा नहीं है. अच्छे बीज, खाद, कीटनाशक औषध का अभाव है. इन चीजों में भ्रष्टाचार हो रहा है. बीज और खाद में मिलावट हो रही है. यह विदर्भ की हकीकत है. सम्मानीय सदस्य इस संबंध में सदन में प्रश्न भी उठाते हैं और शासन जवाब भी देता है लेकिन आगे क्या होता है, कुछ नहीं होता है. किसी को सजा नहीं होती. क्या कभी मिलावट करने वाले को, भ्रष्टाचार करने वाले को कड़ी सजा हुई है ? नहीं हुई है, यह वास्तविकता है. इसलिए कड़े कानून बनाए जाने चाहिए. मिलावट करने वालों के खिलाफ, भ्रष्टाचार करने वालों के खिलाफ फॉसी की सजा तय होनी चाहिए.

**तालिका सभापति ( श्री. अरविंद सावंत )**: आपको दिया गया समय समाप्त हो गया है. इसलिए आप अपना भाषण जल्दी समाप्त कीजिए.

श्री सय्यद जामा : सभापति महोदय, मुझे और 10 मिनट दीजिए. मैं ट्रेड युनियन का कार्यकर्ता हूं. कामगारों की मांगों के संबंध में मैं सरकार के खिलाफ लड़ा हूं. मैं किसानों की मांगों के संबंध में भी लडूंगा. मैं यह बताना चाहता हूं कि किसानों को न्याय दिलाने के संबंध में अब हम और इंतजार नहीं करेंगे. हम किसानों को न्याय दिलाने के लिए मोर्चा निकालेंगे, सत्याग्रह करेंगे. क्योंकि यह हमारी सरकार और पार्टी की क्रेडिटीबिलिटी का सवाल है. हम नाटक नहीं करेंगे, दिखावा नहीं करेंगे. जिस प्रकार से हम मजदूरों के लिए लड़ते है, उसी प्रकार से हम किसानों के लिए भी लड़ेंगे. मेरी यह मांग है कि किसानों की समस्या की ओर सरकार को, प्रशासन को तत्काल ध्यान देना चाहिए और कारगर कदम उठाने चाहिए.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री सय्यद जामा ......

सभापति महोदय, राज्य सरकार को केन्द्रीय सरकार से यह मांग करनी चाहिए कि किसानों को राहत देने के लिए जल्द से जल्द स्कीम तैयार करें. केन्द्रीय सरकार ने किसानों को राहत देने के लिए 60 हजार करोड़ रुपये के कर्ज माफ करने की घोषणा की है. लेकिन राहत देने की घोषणा करने के बाद स्कीम बनाने में दो महीने क्यों लग गए ? केन्द्रीय सरकार द्वारा कर्ज माफ करने की घोषणा करने के बाद विदर्भ में 229 किसानों ने आत्महत्या की है. कर्ज माफ करने की घोषणा करने के बाद भी विदर्भ के किसान आत्महत्या क्यों कर रहे हैं ? इसलिए राज्य सरकार केन्द्रीय सरकार से यह मांग कर सकती है कि किसानों को राहत देने के लिए अविलंब स्कीम बनाई जाए. आज हिन्दुस्तान में बहुत सारे कृषि विद्यापीठ हैं, एक्सपर्ट है लेकिन किसी ने भी इस विषय में सोलूशन नहीं दिया. प्रधानमंत्री जी द्वारा पॅकेज जाहिर करने के बाद भी किसानों की आत्महत्या नहीं रुकी. 60 हजार करोड़ रुपये की कर्ज माफी की घोषणा करने के बाद भी किसानों की आत्महत्या नहीं रुकेगी, ऐसा मुझे लगता है. मैं यह कहना चाहता हूं कि किसानों के लिए पॅकेज जाहिर करने के बाद भी किसान आत्महत्या क्यों कर रहे हैं, इस संबंध में एक्सपर्ट और किसानों के नेता, राजनीतिक नेता आत्ममंथन करें. किसानों की आत्महत्या नहीं रुक रही है तो क्या करेंगे, क्या हम राजनीतिज्ञों को आत्महत्या कर लेनी चाहिए ? इसलिए किसानों की आत्महत्या को रोकने के विषय में जरुर विचार किया जाना चाहिए. यह शोध का विषय है. पिछली बार जब चर्चा हुई थी तब मैंने यह कहा था कि नागपुर में बहुत सारे गरीब लोग झोपड़ियों में रहते हैं, एक समय का भोजन बड़ी मुश्किल से उन्हें नसीब होता है लेकिन वे आत्महत्या नहीं करते हैं. अगर आत्महत्या का कारण गरीबी है, भूख है, तो झोपड़पट्टी में रहने वाले लोग आत्महत्या क्यों नहीं कर रहे है ? क्यों ऐसा हो रहा है कि किसान ही आत्महत्या कर रहे हैं, इसका अभ्यास किया जाना चाहिए. राष्ट्रीय स्तर पर, राज्य स्तर पर इस संबंध में सर्वे होना चाहिए. इस विषय में कोई मुहिम चला कर आत्महत्या के कारणों का पता लगाना होगा. इस विषय में सरकार को गंभीरता से ध्यान देना होगा.

...2

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

APR/ SBT/ KTG/ 17:05

श्री सय्यद जामा ......

सभापति महोदय, अभी कई सम्माननीय सदस्यों ने बताया कि आज किसानों को लोन नहीं मिल रहा है, पुराना कर्ज रिकॉर्ड पर होने के कारण किसानों को नया लोन नहीं मिल रहा है. कई जगह पुराने लोन को वसूल करने की मुहिम चल रही है. यह भी सच है कि पुराने लोन को वसूल करने की मुहिम तेज कर दी गई है.

सभापति महोदय, मैं यह सुझाव देना चाहता हूं कि महाराष्ट्र सरकार को सबसे पहले कर्ज वसूली को रोकने का निर्णय लेना चाहिए. किसानों को 6 प्रतिशत की ब्याज दर पर इझी लोन प्रदान किया जाना चाहिए. किसानों को अच्छे बीज, खाद और कीटनाशक औषधी उपलब्ध कराई जानी चाहिए. जो लोग बीज, खाद इत्यादि चीजों में मिलावट कर रहे हैं, भ्रष्टाचार कर रहे हैं उनके खिलाफ कड़ी से कड़ी कार्रवाई की जानी चाहिए. मिलावट करने वालों के लिए फाँसी की सजा तय की जानी चाहिए.

इसके बाद श्री शर्मा.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DVG/ प्रथम श्रीमती रणदिवे.. 17:10

. . . . . श्री. सय्यद जामा (पूर्वी तालेवार)

31 मार्च की "कट ऑफ डेट" बढ़ानी चाहिए, किसानों की आत्महत्या रोकने के लिए इस सभागृह में माननीय सदस्यों ने जो उपाय बताए हैं, उनके ऊपर मंत्री महोदय को निर्णय लेकर अमल करना चाहिए. हमने शॉर्ट टर्म और लॉंग टर्म उपाय बताए हैं. हमारी सरकार में कृषि मंत्री अलग हैं और सहकार मंत्री अलग हैं. किसानों को 4 प्रतिशत की दर से कर्ज देने का कार्य सहकार विभाग को करना है और उनको बीज, खाद इत्यादि की व्यवस्था करने में कृषि विभाग सहयोग करता है. उनका संबंध कृषि और सहकार दोनों विभागों के साथ आता है, इसलिए मुझे ऐसा लगता है कि कृषि व सहकार विभाग के लिए "सिंगल विंडो एप्रोच" होनी चाहिए.

सभापति महोदय, "लॉंग टर्म प्लान", इरीगेशन, सीड, फर्टिलाइजर, क्रॉप इन्श्योरेंस के बारे में यहां पर हमारे साथियों ने जिक्र किया है. आखिर में मेरी सभागृह से और सरकार से भावनात्मक मांग है कि हम लोग इस बारे में एकमत बनाएं और किसानों की आत्महत्या रोकने और उनको बचाने का काम करने के लिए किसी एक समाधान पर पहुँचे और लॉंग टर्म उपाय-योजना बनाकर कार्यवाही करें, जिससे किसान अपने पैरों पर खड़ा हो सके. इतना कहते हुए मैं अपना भाषण समाप्त करता हूँ.

.............

. . . भाषण पूर्ण.

. . . .4 D- 2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. पतंगराव कदम ( सहकार व पुनर्वसन मंत्री ) : सभापती महोदय, शेतकऱ्यांच्या संदर्भात महत्वाच्या विषयावर या सदनामध्ये गेल्या 2 ते 3 तासापासून चर्चा सुरु आहे. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी या चर्चेला सुरुवात केली. कर्जमाफी संबंधी अनेकांनी राजकीय भांडवल केले. परंतु आज शेतकऱ्यांची काय अवस्था आहे याचे भावनाप्रधान वर्णन त्यांनी केले आहे. मी त्यांना धन्यवाद देऊ इच्छितो. ज्या घरामध्ये आत्महत्या झालेली आहे, तेथे ते स्वत: जातात. त्या घरातील बाईला साडीचोळी देतात. ही धटना महत्वाची आहे. सन्माननीय सदस्य श्री. पांडुरंग फुंडकर यांना देखील मी धन्यवाद देऊ इच्छितो. केंद्र शासनाने शेतकऱ्यांना 60 हजार कोटी रुपयांची कर्जमाफी दिल्यामुळे, त्यांनी शासनाचे अभिनंदन केले आहे. परंतु या पुढे काय ? असे त्यांनी विचारले होते. पतसंस्था, अर्बन बँका यांच्या बाबत निर्णय झालेला आहे. मी आपणास सांगू इच्छितो की, आजपर्यंत भूविकास बँका, जिल्हा मध्यवर्ती बँका, सहकारी सोसायटया यांचे कर्ज माफ होईल. अर्बन बँका, पतसंस्था यांनी शेतकऱ्यांसाठी, शेतीसाठी किंवा अलाईड इंडस्ट्रीसाठी कर्ज दिलेले आहे. विदर्भातील आकडेवारी मी सांगणार आहे. या सर्व कर्जाचा समावेश कर्जमाफीमध्ये होणार आहे.

सभापती महोदय, बऱ्याच सन्माननीय सदस्यांनी त्यांच्या भाषणामध्ये याबाबत कन्फयुजन उपस्थित केले होते. माझ्या या स्पष्टीकरणामुळे, त्यांची शंका दूर होण्यास आता काही हरकत नाही. सन्माननीय सदस्य प्रा. सुरेश नवले यांच्या भाषणानंतर स्फूर्ती येऊन सन्माननीय सदस्य श्री. पाशा पटेल यांनी अतिशय तडाखेबाज असे भाषण केले. त्यांना असे वाटले असेल की, मी मुंबई पुण्यातून आलो आहे. परंतु प्रत्यक्षात तसे नाही. सन्माननीय सदस्य श्री. पाशा पटेल यांना मी एकदा माझ्या गावामध्ये घेऊन जाईन. माझ्या गावातील लोकसंख्या 812 आहे.

यानंतर श्री. बरवड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. पतंगराव कदम ......

माझ्या गावात चौथीपर्यंत शाळा होती. मी त्या ठिकाणी चौथीपर्यंत शिकलो. सातवी पर्यंत शिकण्यासाठी 4 किलोमीटरपर्यंत चालत गेलो. मी असा काही हवेतून आलेला माणूस नाही. मला गरिबी माहीत आहे. मला शेती माहीत आहे. तेथील प्रश्न माहीत आहेत. तेथील अडचणी माहीत आहेत. शेतकरी नाईलाजाने शेती करतात, त्याला दुसरा पर्याय नाही म्हणून शेती करतात. शेती किफायतशीर होत नाही. कारण त्यांच्या मालाला योग्य भाव मिळत नाही. या सर्व गोष्टी मला ठाऊक आहेत.

सभापती महोदया, केंद्राने हा जो अतिशय महत्वाचा निर्णय घेतलेला आहे त्यामध्ये यूपीएच्या अध्यक्षा श्रीमती सोनियाजी गांधी, पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग, केंद्रीय वित्तमंत्री श्री. पी. चिदंबरम, केंद्रीय कृषी मंत्री श्री. शरद पवार तसेच युनियन कॅबिनेट या सगळ्यांनी मिळून तसेच आपणा सर्वांची मागणी असल्यामुळे आणि आपण सातत्याने हा प्रश्न मांडत होतो त्यामुळे हा निर्णय झालेला आहे. यामध्ये राजकारण आणण्याचे कारण नाही. हा गंभीर प्रश्न आहे. हा शेतकऱ्यांच्या जीवनमरणाचा प्रश्न आहे. त्यांना कोणत्या पध्दतीने रिलीफ मिळणार आहे यासंबंधी विचार करण्याचा हा प्रश्न आहे. त्यादृष्टीकोनातून एकंदर राज्याची आकडेवारी पाहिली तर राज्यात एकंदर खातेदार 121 लाख आहेत. त्यापैकी थकीत खातेदार 68 लाख आहेत. कर्जमाफीस पात्र असणारे खातेदार 90 लाखापैकी 43 लाख आहेत. माननीय विरोधी पक्ष नेते सभागृहात उपस्थित झालेले आहेत. त्यांच्या माहितीसाठी सांगू इच्छितो की, अर्बन बँकांनी, पतसंस्थांनी ज्या शेतकऱ्यांना आणि त्यांच्या पूरक उद्योगांना कर्ज दिले आहे त्यांची सुध्दा कर्जमाफी होणार आहे असे मी सांगितले आहे. या ठिकाणी विदर्भाबद्दल चर्चा झाली. दोन, तीन, पाच असे आकडे सांगण्यात आले. विदर्भातील आकडेवारी माझ्याकडे आहे. त्या ठिकाणी पाच एकरापेक्षा कमी शेती असलेल्या शेतकऱ्यांची संख्या 17 लाख आहे. थकीत शेतकऱ्यांची संख्या 12 लाख आहे. थकीत रक्कम 1730 कोटी रुपये आहे. कर्जमाफी 1730 कोटी रुपयांची होणार आहे. पंतप्रधान पॅकेजमध्ये 828 कोटी रुपयांचे व्याज माफ झालेले आहे. आता 5 एकरपेक्षा अधिकच्या बाबतीत 25 हजार रुपयांची घोषणा झाली. त्या शेतकऱ्यांची संख्या एकंदर 8 लाख आहे आणि थकीत शेतकरी 6 लाख आहेत. थकीत

....2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ KTG/

डॉ. पतंगराव कदम ......

रक्कम एकंदर 1200 कोटी रुपये आहे. प्रत्यक्ष लाभ 300 कोटी रुपयांचा मिळणार आहे. हे सगळे झाल्यानंतर माननीय मुख्यमंत्र्यांनी 10 मार्चला माननीय पंतप्रधानांना पत्र लिहिले होते की, विदर्भामध्ये आणि काही भागामध्ये 15 एकरपर्यंत मर्यादा वाढवावी किंवा एका व्यक्तीला 50 हजार रुपये कर्जमाफी करावी. आपण या ठिकाणी 31 मार्चच्या अनुषंगाने तसेच थकीतच्या बाबतीत डिसेंबरच्या संदर्भात सातत्याने चर्चा केली.

श्री. दिवाकर रावते : 50 हजार रुपये सरसकट आहेत काय ?

डॉ. पतंगराव कदम : सरसकट 50 हजार रुपये आहे. त्यामध्ये 5 एकर वगैरे काही नाही. सरसकट 50 हजार रुपये अशा पध्दतीची मागणी माननीय मुख्यमंत्र्यांनी केलेली होती. माननीय केंद्रीय कृषी मंत्री श्री. शरद पवार यांनी त्या ठिकाणी प्रश्नाला जे उत्तर दिले त्याचा उल्लेख फार मोठ्या पध्दतीने झाला. माननीय कृषी मंत्र्यांनी यासंदर्भात जो प्रयत्न केला त्यावर पाणी टाकण्याचा प्रयत्न दुर्दैवाने या ठिकाणी झालेला आहे. मी सन्माननीय सदस्यांच्या माहितीसाठी सांगू इच्छितो की, मी या ठिकाणी यूपीएच्या अध्यक्षा श्रीमती सोनियाजी गांधी, पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग, केंद्रीय कृषीमंत्री श्री. शरद पवार, वित्तमंत्री श्री. चिदंबरम, युनियन कॅबिनेटचा उल्लेख केलेला आहे. त्यांनी उत्तर देताना सांगितले की, आज ही परिस्थिती आहे. सबंध देशातून तसेच पार्लमेंटमधून अनेक मागण्या येत आहेत. श्रीमती सोनियाजी गांधी जेव्हा सांगलीला आल्या होत्या त्यावेळी आम्ही मागणी केली की, डीपीएपी एरियातील सगळा भाग यामध्ये समाविष्ट करावा. तसेच कॉँग्रेसचे तरुण नेते श्री. राहूल गांधी यांनीही मागणी केली. मागण्या सातत्याने होतात परंतु शेवटी केंद्र सरकार आणि अर्थमंत्र्यांना त्यासबंधी एकंदर परिस्थिती पाहूनच निर्णय ध्यावा लागणार आहे. ही गोष्ट खरी आहे की, या क्षणापर्यंत काहीही लेखी आदेश आमच्याकडे आलेले नाहीत.

श्री. दिवाकर रावते : यूपीएच्या अध्यक्षांनी काय सांगितले ?

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.पतंगराव कदम : मॅडमनी सांगलीत असे सांगितले की, "हम विचार करेंगे, गव्हर्नमेंट को बतायेंगे" या प्रश्नामाध्ये राजकारण न आणता सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर यांनी सांगितले आहे, त्यामुळे मी त्यांचे खास करुन कौतुक करतो. कारण जे घडले आहे ते चांगले घडले आहे. कारण केंद्राच्या सर्वे रिपोर्टप्रमाणे या 60 हजार कोटीतून 80 टक्के शेतक-यांना फायदा मिळणार आहे. म्हणजे बहुसंख्य शेतक-यांचा फायदा होत आहे. त्यामुळे उर्वरित शेतक-यांबाबत शासन काय निर्णय घेणार असा प्रश्न शिल्लक आहे. केंद्राने कर्जमाफी जाहीर केल्यानंतरही आत्महत्या होत आहेत, त्यासाठी कोणता पर्याय आहे ? असे विचारले गेले. हा प्रश्न सुटण्यासाठी शासनाने अनेक कमिटया नेमल्या, अनेक कमिशन नेमले आहेत. शेवटी पुणे विद्यापीठाचे कुलगुरु डॉ.नरेंद्र जाधव यांची एक कमिटी नेमली आहे. टाटा इन्स्टिटयूटने अहवाल दिला आहे, या सर्वांनी या आत्महत्यांची कारणे विशद केलेली आहेत, त्यामध्ये मुख्यत: कर्जाचे कारण असल्याचे नमूद केले आहे. सगळयांना या आत्महत्यासंबंधी चिंता व्यक्त करावी लागेल. सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी जी सरणाची दोन उदाहरणे सांगितली ती मनाला स्पर्श करणारी आहेत. सन्माननीय सदस्य श्री.पाशा पटेल यांनी पाव किलो की दोन किलोचे पाकिट आणले आहे ते माझ्याकडे द्यावे. त्याबाबत निश्चितपणे मी कार्यवाही करीन. आता सरणाची दोन उदाहरणे सांगितली आहेत त्याचीही माहिती द्यावी. त्याची कारणे शोधून त्याबाबत निश्चित विचार केला जाईल.

सभापती महोदय, याठिकाणी सावकारी कर्जासंबंधीचा विषय मांडण्यात आला आहे. सावकारी कर्जाचे अनेक चांगले व वाईट अनुभव आहेत. सन्माननीय सदस्य श्री.पाशा पटेल यांनी दोन्ही उदाहरणे सांगितली. त्यांनी असे म्हटले की, शासन सावकारी मोडून काढणार आहे. शासन सावकारी मोडणार नाही किंवा कायदा रद्द करण्याच्या विचारात नाही. पण सावकार शेतक-यांचे एक्सप्लॉयटेशन करीत होते, चुकीच्या पध्दतीचा वापर करीत होते त्यासाठी कायद्यात दुरुस्ती केली जाईल. सावकारी चालू राहील, त्यांना लायसन्सही मिळेल. पण लोकांना नागवणा-या लोकांवर बंधन आणण्यासाठी, त्यांच्यावर नियंत्रण आणण्यासाठी हे पाऊल सरकार उचलणार आहे. अनेकांनी जमिनीबाबतचे उदाहरण दिले. कायद्यात असलेल्या तरतुदीमुळे गेलेली

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.पतंगराव कदम.....

जमीन घेण्याचा कोणाला अधिकार नव्हता. परंतु नवीन कायद्यामध्ये तशी तरतूद करणार आहोत. मला वाटते की, या विषयामध्ये ज्या ज्या सन्माननीय सदस्यांना रस आहे त्यांनी जरुर माझ्याकडे यावे. त्यांना मी कायद्यातील तरतुदी दाखविन. त्या कायद्यासंबंधी आणखी काही तरतुदी सुचविल्या तर त्यांचाही त्या कायद्यात समावेश केला जाईल. मंत्रिमंडळाने हा कायदा मंजूर केलेला आहे, मला आजच ते विधेयक मांडावयाचे होते. परंतु विधी व न्याय विभागाने असे सांगितले की, आपल्या कायद्याचा केंद्र सरकारच्या कायद्याशी संबंध येत आहे त्यामुळे त्यांना याबाबतची माहिती घेऊन क्लीअरंस घ्यावा लागेल. तरी सुध्दा हे अधिवेशन संपल्यानंतर शासन एक महिन्याच्या आत अध्यादेश काढणार आहे. केंद्र सरकारकडे जाऊन यासंबंधीची मान्यता मिळण्यासाठी जे काही सोपस्कार असतील ते पूर्ण करु. सावकारीसंबंधी यापूर्वी जे काही घडले असेल त्याला आळा घालू. सन्माननीय केंद्रीय कृषि मंत्री श्री.शरद पवार यांनी आपल्या भाषणात उल्लेख केला की, पैसे देऊ नका. पण त्यांचा हेतू लक्षात घेतला पाहिजे. त्यातील लिगल किंवा टेक्नीकल शब्द घेण्यामध्ये काही अर्थ आहे असे मला वाटत नाही. यादृष्टीकोनातून या प्रश्नाकडे पाहिले तर निश्चितपणे मार्ग निघेल. केंद्र शासनाने अतिशय डायनॅमिक, अतिशय महत्वाचा निर्णय घेतलेला आहे. त्याबाबतची निश्चित ऑर्डर शासनाकडे येईल त्यावेळी राज्य सरकार निर्णय घेईल. सन्माननीय सदस्य श्री.रावते हे सारखे म्हणत आहेत की, राज्य सरकार याबाबत काय निर्णय घेणार आहे ? त्याबाबत मी सांगेन की, केंद्राकडून एकदा ऑर्डर आली की, महाराष्ट्र सरकारला जे पाऊल उचलावयाचे आहे त्याबाबत निश्चितपणे आणि गांभीर्याने विचार करु.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांनी आता असे शब्द उच्चारले की, केंद्र सरकारकडून सरकारकडे निश्चित आकडेवारी आल्यानंतर शासन निश्चित पाऊल उचलणार आहे. आम्हाला आनंद आहे, कारण याठिकाणी माननीय मुख्यमंत्र्यांनी आम्हाला शब्द दिला आहे. महाराष्ट्रातील जनतेच्या दृष्टीने चांगले होईल. आता माननीय मंत्रिमहोदयांनी 60 हजार कोटीमुळे निश्चित किती शेतक-यांना फायदा होणार आहे त्याची आकडेवारी सांगितली आहे. त्यामुळे शासनाला हे माहीत आहे. याचा अर्थ महाराष्ट्रातील 5 एकरमधील शेतक-यांसाठी कोणता निर्णय झाला याची आपल्याला माहिती आहे. त्यामुळे शासनाला यासंबंधी निर्णय घेण्यामध्ये कोणतीही आडकाठी नसावी. हे मी आपल्या निदर्शनास आणून देत आहे.

3...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.पतंगराव कदम : सभापती महोदय, हे आकडे आता जरी काढले असले तरी केंद्र सरकारकडून जोपर्यंत ऑथेंटिक ऑर्डर येत नाही तोपर्यंत पुढे राज्य सरकार काय करणार यासंबंधीचा निर्णय घेता येणार नाही. हे सरकार शेतक-यांचे आहे, शेतक-यांची मुले राज्य करीत आहेत. शेतक-यांचे प्रश्न आणि अडचणी शासनाला ठाऊक आहेत. यासंबंधी महाराष्ट्र शासनाच्यावतीने कोणते पाऊल उचलले पाहिजे यादृष्टीने निश्चित विचार करील.

नंतर श्री.शिगम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ SBT/ KGS/ KTG/ MMP/ पूर्वी श्री. खंदारे 17:25

(डॉ. पतंगराव कदम....)

केन्द्र सरकारच्या लेखी ऑर्डर्स आलेल्या नाहीत. त्या आल्यानंतर याचा आम्ही निश्चित विचार करु. सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी पतसंस्था, अर्बन संस्था यासंबंधात मुद्दे उपस्थित केले होते, त्याचे उत्तर मी दिलेले आहे. सावकारी कायद्यासंबंधीही मी सांगितले आहे.

श्री. जयंत प्र. पाटील : केन्द्र सरकारच्या ऑर्डर्स आल्या नाहीत तर आम्ही शेती पिकवायची नाही काय ? अशी विचारणा मी केली होती. त्यावेळी माननीय केन्द्रीय कृषी मंत्र्यांनी जाहीर केले होते की, ज्यांची 5 एकराच्या वर शेती आहे त्यांनी एकरकमी कर्ज फेडले तर 25 टक्क्याचे वेगळे पॅकेज देऊ. त्यासंदर्भात माननीय मंत्री महोदयांनी खुलासा करावा.

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

डॉ. पतंगराव कदम : 25 टक्के हा पॅकेजचा भाग आहे. 5 एकराच्या वरच्या शेतक-यांना 25 टक्के पॅकेज मिळणार आहे. कर्ज वाटपाच्या संदर्भात संपूर्ण राज्यामध्ये कर्ज वाटप बंद झालेले आहे काय ? कर्ज वसुली चालू आहे काय ? असे प्रश्न सन्माननीय सदस्यांनी विचारले. मी सांगू इच्छितो की, कर्जमाफीचा भाग ॲडिशनल आहे, पीक कर्ज देण्याचे थांबलेले नाही. वसुलीच्या बाबतीत कुठे कोअरर्शन झालेले नाही.

श्री. पांडुरंग फुंडकर : या ठिकाणी चुकीचे रेकॉर्ड होत आहे. सोसाट्यांच्या अध्यक्षांनी सांगितले की, आम्ही चार किंवा पाच लोकांनाच नव्याने कर्ज देऊ शकू...

डॉ. पतंगराव कदम : सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी परभणी बँकेच्या संदर्भात माहिती सांगितली. त्यासंबंधी निश्चितपणे चौकशी करण्यात येईल.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, आम्ही या ठिकाणी सर्व माहिती घेऊन बोलत असतो. शेतकरी त्यांचे प्रश्न आमच्याकडे मांडत असतात. सगळेच सन्माननीय सदस्य हे अनुभवनातून बोलत असतात. माननीय मंत्री महोदयांकडून आमच्या अपेक्षा आहेत. "उद्या पासून हे बंद होईल" असे मंत्री महोदयांनी सांगावे.

डॉ. पतंगराव कदम : केन्द्राकडून ऑर्डर्स येईपर्यन्त कर्ज मिळणार नाही असे नाही . सर्व बँकातून कर्ज मिळालेले आहे. आम्ही ऑडर्स घेऊन वसुलीला स्टे देऊ.

...2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विलासराव शिंदे : जे थकबाकीदार आहेत त्यांना कायद्याने पुन्हा कर्ज देता येत नाही. जोपर्यन्त या कर्ज माफीच्या योजनेचा निर्णय होत नाही तोपर्यन्त सर्व थकबाकीदारांना कर्ज देण्यात येईल असा निर्णय शासनाने घेतला तरच शेतक-यांना कर्ज मिळेल. कायद्याने थकबाकीदाराला पुन्हा कर्ज देता येत नाही.

डॉ. पतंगराव कदम : ऑर्डर्स येईपर्यन्त जे थकबाकीदार असतील त्यांना कर्ज देण्यासंबंधी आम्ही निर्णय घेऊ.

श्री. दिवाकर रावते : प्रथमत: मी माननीय मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, या कर्जमाफीच्या संदर्भात या सदनामध्ये राजकीय अभिनिवेश बाजूला ठेवून चर्चा झाली. सत्ताधारी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांनी देखील या प्रश्नासंबंधी तळमळ व्यक्त केली. जे काही घडत आहे ते या ठिकाणी सांगण्यात आले. 5 एकरावरच्या शेतक-यांनी माननीय मंत्री महोदय डॉ. पतंगराव कदम यांना निवेदन दिलेले आहे. त्यांनी श्रीमती सोनिया गांधी, केन्द्रीय कृषी मंत्री शरद पवार, पंतप्रधान मनमोहन सिंग तसेच राज्याचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री या सर्वांना निवेदन दिलेले आहे. शेवटी तुम्ही काही करत नाही म्हणून शेतक-यांनी आत्महत्या केली. 5 एकरापर्यन्त काय दिलेले आहे हे मंत्री महोदयांनी सांगितलेले आहे. केन्द्रीय कृषी मंत्री श्री. शरद पवार यांनी लोकसभेमध्ये सविस्तर उत्तर दिलेले आहे. प्रश्न असा आहे की, सन्माननीय श्रीमती सोनिया गांधी महाराष्ट्रामध्ये आल्यानंतर त्यांनी शेतक-यांना दिलासा दिला होता. माननीय मुख्यमंत्री श्री. विलासराव देशमुख, माननीय उपमुख्यमंत्री श्री. आर.आर.पाटील यांनी देखील दिलासा दिला होता. केन्द्रीय कृषी मंत्री श्री. शरद पवार हे देखील येऊन गेले होते.

...नंतर श्री. गिते....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

ABG/ SBT/ KGS/ KTG/ प्रथम श्री.शिगम 17:30

श्री. दिवाकर रावते...

सध्या महाराष्ट्रात शेतकरी आत्महत्या करीत आहेत. त्या आत्महत्या निराशेतून होत आहेत. पाच एकरचा पुढे कर्जमाफीचा निर्णय होत नाही. यासंदर्भात कोणताही ठोस निर्णय घेतला जात नाही. आता देखील या विषयाच्या बाबतीत सगळीच माणसे संभ्रमावस्थेत आहेत. म्हणून शासनाने या बाबतीत ठोस असा निर्णय जाहीर केला पाहिजे. वसुलीच्या संदर्भात विचारले तर शासनाकडून सांगितले गेले की, आम्ही वसुली थांबवू. परंतु असा निर्णय घेण्याची तुमच्यावर वेळ कशी काय आली या विषयी माझ्या मनात प्रश्न निर्माण झाला आहे. 5 एकरच्या वरच्या शेतक-यांना दिलासा देईल अशा प्रकारचे उत्तर आपल्याकडून अपेक्षित होते. माननीय मुख्यमंत्री महोदयांनी यासंदर्भात सांगितले आणि काल मला श्री.अजित पवार बोलले की, यासंबंधीचा निर्णय घेण्यासाठी गरज पडली तर मंत्रिमंडळाची बैठक घेऊ. यासंदर्भातला योग्य तो निर्णय देण्याचा प्रयत्न करु. शेतक-यांच्या बाजूने निर्णय घेऊ. या विषयाबाबतची सरकारची भूमिका माननीय मंत्र्यांच्या भाषणात दिसून आली नाही. शेतक-यांना या चर्चेतून कोठला आधार दिला जातो आहे हे मला समजत नाही. विदर्भातील सभेमध्ये माननीय मुख्यमंत्र्यांनी कोरडवाहू हा शब्द वापरला आहे. कोरडवाहू शेतकरी या लाभापासून वंचित राहिला आहे. 15 एकर पर्यंतच्या कोरडवाहू शेतक-याला कर्जमाफीचा फायदा कसा होईल याचा गांभीर्याने विचार केला पाहिजे. 50 हजार रुपयांचे पॅकेज देण्यासंदर्भात माननीय मुख्यमंत्री म्हणाले आणि त्यासंदर्भात मी माननीय मंत्री महोदयांकडून खुलासा घेतला. 5 एकर नाही, 10 एकर नाही, सरसकट 50 हजार रुपये देण्याचा शासन निर्णय घेत आहे. त्यामुळे आणखी लोकांमध्ये मोठा संभ्रम निर्माण झाला आहे. या विषयावर सन्माननीय सदस्यांनी अतिशय चांगले विचार मांडले आहेत. शेतक-यांच्या भावना आमच्या माध्यमातून शासन जाणून घेणार नसेल तर त्याची हतबलता आम्हाला होते की, या विषयाच्या बाबतीत चर्चा कशाला करावयाची ? सन्माननीय सदस्या श्रीमती उषा दराडे यांनी तारखेच्या संदर्भात विचारणा केली होती. माननीय मंत्री महोदयांनी तारखेचा देखील उल्लेख केला नाही. आपल्या भाषणातून शेतक-यांनी काय अर्थबोध घ्यावयाचा ? मला माननीय मंत्र्यांच्या भाषणाचा निषेध करण्याची वेळ आलेली आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मी सुध्दा तारीख विचारली होती. 31 मार्च ही तारीख विदर्भातील सहा जिल्हयातील शेतक-यांसाठी बरोबर नाही. शेतक-यांच्या कर्जाचे पुनर्गठन झालेले आहे. पुनर्गठन झाल्यामुळे तेथील शेतक-यांना जून मध्ये कर्ज मिळालेले आहे. 31मार्च या

2...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर...

तारखेमुळे या विभागातील सहा जिल्हयातील शेतक-यांना लाभ मिळणार नाही. 31 डिसेंबर या तारखेची आम्ही मागणी करीत आहोत. उरलेले आठ लाख शेतकरी आहेत. त्यापैकी 6 लाख शेतकरी थकीत आहे. 6 लाख शेतक-यांचे 1200 कोटी रुपये थकीत आहे. या शेतक-यांना वन टाईम सेटलमेंट पॅकेज देणार आहात. त्याच्यातून 300 कोटी रुपयांची सूट मिळणार आहे. मला असे म्हणावयाचे आहे की, उरलेल्या शेतक-यांचा 1200 कोटी रुपयांचा बोजा शासनाने उचलला पाहिजे. माननीय उप मुख्यमंत्र्यांनी फार आवेशात सांगितले की, महाराष्ट्राची तिजोरी खाली झाली तरी चालेल. आता प्रश्न 1200 कोटी रुपयांचा प्रश्न आहे. 1200 कोटी रुपये माफ करण्यासंबंधी निर्णय घेण्याचा विचार शासन करणार आहे काय व 31 मार्च ऐवजी 31 डिसेंबर ही तारीख करणार आहात काय ? 1200 कोटी रुपयांचा विषय मंत्रिमंडळाच्या बैठकीसमोर नेऊन महाराष्ट्रातील किमान सहा लाख शेतक-यासाठी निर्णय घेतला जाईल काय ? 1.50 लाख कोटीचे कर्ज झाले. अजून 1 हजार कोटी रुपयांचे कर्ज वाढले तर काय फरक पडतो आहे? 1 लाख 51 हजार कोटी रुपयांचे कर्ज होईल. 6 लाख शेतक-यांना याचा लाभ मिळणार आहे. 1200 कोटी रुपये माफ करण्यासंबंधी शासन सहानुभूतीने विचार करणार आहे काय ?

यानंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. पतंगराव कदम : सभापती महोदय, मी पुन्हा पुन्हा सांगितले आहे की, राज्य सरकारने केंद्राकडे मागण्या केलेल्या आहेत आणि त्यासंबंधात माननीय मुख्यमंत्र्यांनी 10 मार्च रोजी केंद्र शासनाला पत्र लिहिलेले आहे. केंद्रातील युपीएच्या अध्यक्षा श्रीमती सोनिया गांधी या सांगली आणि उस्मानाबाद येथे आल्या होत्या. त्यावेळी चर्चा झाली. पण अजून यासंबंधीचा निर्णय मंत्रिमंडळासमोर झालेला नाही. कर्ज माफी संदर्भात केंद्र शासनाच्या रिटर्न ऑर्डर्स येतील त्यानंतर कर्जमाफीमधून राहिलेल्या शेतकऱ्यांना कोणत्या पध्दतीने दिलासा द्यावयाचा याचा सरकार जरुर विचार करील.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, माझा एकच प्रश्न होता. 1200 कोटी रुपये राज्य शासन स्वत:च्या तिजोरीतून देणार आहे काय ? केंद्रीय कृषीमंत्र्यांनी सांगितले होते की, पाच एकराच्या वरील शेतकऱ्यांना कसलाही फायदा नाही. राज्य शासन नेहमी सांगते की आम्ही शेतकऱ्यांना मदत करु. एक एकरावरील शेतकऱ्यांना शासन कोणती मदत करणार आहे ते शासनाने सांगावे.

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, या खात्याचे मंत्री डॉ. पतंगराव कदम यांनी वारंवार सांगितले आहे की, देशातील शेतकऱ्यांना कधीच न्याय मिळाला नव्हता एवढा ऐतिहासिक न्याय देण्याचे काम केंद्र शासनाने केलेले आहे. केंद्रीय कृषीमंत्र्यांच्या वक्तव्याचा हवाला देऊन हे वक्तव्य केले जात आहे त्याबाबतीत मी त्यांच्याशी बोललो आहे. त्यांच्यासोबत चर्चा केलेली आहे. यापुढील काळात केंद्र शासनाकडून मदत करणे शक्य आहे काय यासंदर्भात लोकसभेत आणि विधानसभेत सरकारने जो निर्णय घेतलेला असतो त्या मर्यादेपर्यंत बोलता येते. न घेतलेल्या निर्णयाबद्दल भाष्य केले जाऊ शकत नाही. पहिल्यांदा केंद्र शासनाने घोषित केलेल्या पॅकेजची अंमलबजावणी करु. त्यानंतर जो काही विचार करावा लागणार आहे तो निश्चितपणाने केला जाईल अशा प्रकारची भूमिका शासनाने घेतलेली आहे. केंद्र शासनाचे यासंबंधातील डिटेल्स् आल्यानंतर कोणाला लाभ मिळणार आहे ते निश्चित होईल. यासंबंधात माननीय मुख्यमंत्री, मी स्वत: आणि सहकार मंत्र्यांनी वारंवार सांगितलेले आहे. अनेक सन्माननीय सदस्यांनी आज प्रश्न उपस्थित केला की, दुष्काळी भागात लॅन्ड होल्डर्स जास्त प्रमाणात आहेत तसेच विदर्भात देखील लॅन्ड होल्डर्स जास्त आहेत त्यांना कर्जमाफीचा फायदा कसा मिळणार ? ज्या शेतकऱ्यांनी प्रामाणिकपणाने कर्ज भरले आहे त्यांना कशी मदत मिळणार आहे ? केंद्र सरकारच्या पॅकेजचे

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील ....

डिटेल आल्यानंतर जे गरजू शेतकरी असतील आणि ज्यांना कर्जमाफीची आवश्यकता असेल त्यांच्या बाबतीत राज्य शासन ठाम भूमिका घेईल. 5 एकरावरील शेतकऱ्यांच्या बाबतीतच मी हे बोलत आहे. केंद्र शासनाचे डिटेल आल्यानंतर शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी प्रसंगी विरोधी पक्षनेत्यांना बोलावून त्यांच्याशी चर्चा करुन केंद्र सरकारच्या पॅकेजमधून जे शेतकरी वंचित राहणार आहेत त्यांच्या बाबतीत विचार-विनिमय करुन मी छातीवर हात ठेऊन सांगतो की राजस्थान, गुजरात, मध्यप्रदेश, छत्तीसगड या राज्यातील शेतकऱ्यांना जो न्याय मिळेल त्याच्या दुप्पट न्याय महाराष्ट्रातील शेतकऱ्याला मिळेल. महाराष्ट्रातील शेतकऱ्याला मदत करण्याच्या बाबतीत राज्य शासन कुठेही पाठीमागे राहणार नाही. सन्मानीय सदस्य श्री. दिवाकर रावते हे सहकार मंत्री होते.

( विरोधी पक्षाचे सदस्य घोषणा देऊन सभागृहातून बहिर्गमन करतात )

युती शासन सत्तेवर असताना त्या शासनाने शेतकऱ्यांच्या तोंडावर फुटकी दमडी देखील मारली नाही.

नंतर श्री. भोगले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील........

त्यांना शेतकऱ्यांचा का पुळका आला आहे? सहा वर्षे यांची दिल्लीत सत्ता होती. महाराष्ट्रामध्ये पाच वर्षे यांची सत्ता होती. शेतक-यांच्या तोंडावर ज्यांनी फुटकी दमडी कधी मारली नाही, त्यांना शेतकऱ्यांबद्दल पुळका आला आहे. हा पुळका पुतना मावशीचा आहे, शेतकऱ्यांचा नाही. राज्य सरकारने याबाबत खुली भूमिका नेहमीच घेतली आहे. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना जास्तीत जास्त मदत झाली पाहिजे आणि मी पुन्हा एकदा सांगतो, प्रसंगी आमच्या अन्य योजना बाजूला ठेवाव्या लागल्या तरी चालेल, राज्यावर आणखी कर्ज झाले तरी चालेल परंतु जे गरीब आणि गरजू शेतकरी लाभापासून वंचित राहतात त्यांची पाठराखण करण्याचे काम महाराष्ट्र शासन करेल.

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य घोषणा देत असतात)

**तालिका सभापती** (श्री.अरविंद सावंत) : सभागृहाने या प्रस्तावावर विचार केला आहे.

-------------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती** : आजच्या कामकाजपत्रिकेतील अनुक्रमांक-8 वरील सर्वश्री पांडुरंग फुंडकर व इतर विधानपरिषद सदस्य यांचा नियम 259 अन्वये अंतिम आठवडा प्रस्ताव उद्या घेण्यात येईल. सकाळी प्रलंबित राहिलेली अर्धातास चर्चा सुध्दा उद्या घेण्यात येईल. सभागृहाचे उद्याचे कामकाज पुढीलप्रमाणे असेल :-

सभागृहाची बैठक सकाळी 10.00 वाजता सुरु होईल.

1) नवनिर्वाचित सदस्यांचा शपथविधी

2) प्रश्नोत्तरे

3) सभापतींची निवडणूक

4) औचित्याचे मुद्दे

5) नियम 93 अन्वये सूचना तसेच निवेदने

6) लक्षवेधी सूचना

7) शासकीय विधेयके (असल्यास)

8) अंतिम आठवडा प्रस्ताव

9) अशासकीय कामकाज (ठराव)

सभागृहाची बैठक आता स्थगित होत आहे. उद्या शुक्रवार, दिनांक 25 एप्रिल, 2008 रोजी सकाळी 10.00 वाजता सभागृहाची बैठक पुन्हा भरेल.

(सभागृहाची बैठक सायंकाळी 5 वाजून 42 मिनिटांनी शुक्रवार, दिनांक 25 एप्रिल, 2008 रोजीच्या सकाळी 10.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

---------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही